# वाचकांचं जग

## शंकर सारडा



म. ग्रं. सं. ठाणे.
विषय निबंध
सं. क्र. ३४७८

REFBK-0026633

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

ा :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे,
न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे
वर्गणी भरावी लागेल.

9 AUG 1992

3 OCT 1992

1992

UL 1993

N 1994
N 1994

9 JUN 1994

(क्र. मा. पहा)
२०००-१२-८

संदर्भ
निबंध
३७८८
२६६३३
८/७/९२

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
निबंध
दा. क्र. ३८६८
२६६३३
८/७/९२
ग्रंथ० शाखा (स्वतः मत)

# पुस्तकांचं जग

शंकर सारडा

REFBK-0026633

पुष्प प्रकाशन, चिंचवड, पुणे १९

प्रकाशन क्र. १९

मुखपृष्ठ
सुहास चांडक

© शंकर सारडा
प्राकृती प्रिंटर्स
८५७ शनिवार पेठ
सातारा ४१५ ००२

प्रथमावृत्ती
मे १९९२

प्रकाशक
पुष्प प्रकाशन
सी-२ एटीएसएस
चिंचवड, पुणे ४११०१९

मुद्रक
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय
'शिव-पार्वती'
टिळक रस्ता
पुणे ४११ ०३०

मूल्य ऐंशी रुपये

# अनुक्रमणिका

१. विसाव्या शतकातील महान पुस्तके ९
२. जेथे पुस्तकांवर वाचक अधाशासारखे तुटून पडतात १८
३. रशियन मायभूमीने दूर लोटलेले साहित्यिक २६
४. सोल्झेनित्सिनचा जाहीरनामा ३९
५. लेखणी जेथे शस्त्र बनते ४३
६. ग्रंथपुरस्कार ५३
७. रहस्यकथांच्या दुनियेतले मातबर मानकरी ७२
८. इंग्लंडमधील ग्रंथबहर ८०
९. आफ्रिकन साहित्य : जादुई वास्तववादाचा प्रभाव ८६
१०. निग्रो साहित्याची नवी झेप ९२
११. उत्साही वाचकांचा देश : जपान १००
१२. नोबेल पारितोषिकाचा इजिप्शियन मानकरी : नगीब महफौज १०६
१३. कॉमिक्स : लोकप्रियतेच्या लाटेवर ११२
१४. विश्वकोशाचा इलेक्ट्रॉनिक अवतार ११७
१५. बोलणारी पुस्तके हवीत १२२
१६. पाककला साहित्याचे विश्वरूप १३०

*पुस्तकांच्या विशाल जगात*
*रममाण होताना*
*घरच्या छोट्या जगाची*
*भक्कम साथ लागते*
*ती साथ*
*समर्थपणे देणाऱ्या*

**सौ. निर्मला**

*हीस —*

निबंध 3868 22633 8/6/82

# प्रास्ताविक

माणसांच्या जगाइतका पुस्तकांच्या जगाचा मोह पडतो, आणि पुस्तकांच्या जगात आपण जास्त रंगू लागतो. माणसं खूप परिचय होऊनही ब्रीचशी अपरिचित राहतात. अनपेक्षित वागतात. पुस्तकं त्यामानानं परिचयानंतर खरोखरच आपल्यालाच पूर्ण कळल्यासारखी वाटतात; नवनवीन अर्थ प्रकट करण्याची क्षमता त्यांच्यात असते, परंतु माणसांप्रमाणं ती 'अनप्रेडिक्टेबल' नसतात. माणसांप्रमाणे ती बदलत नाहीत, चमत्कारिकपणा करून अडवणूक करीत नाहीत. आणि त्यामुळेच की काय माणसांच्या जगापेक्षाही पुस्तकांचं जग अधिक भरवशाचं वाटू लागतं. त्यांच्याशी आपला सूर जुळतो. माणसांच्या जगापेक्षा आपण पुस्तकांच्या जगातूनच आपले सखेसोबती आणि सुखदु:खे शोधण्याची सवय आपल्याला लागते.

अशी सवय लागणे हे वाईटच. पुस्तके हा खरं तर या मानवी जीवनाचा वा मानवी सृष्टीचा पर्याय नव्हे. परंतु मानवी जीवनाचा आणि मानवी सृष्टीचा थांग लागत नाही; पुस्तकांचा लागतो. पुस्तकांमुळे मानवी मनाचाही थोडाफार थांग लागतो. आणि बुडत्याला काडीचा आधार या न्यायाने पुस्तकांवरच सर्वस्वी विसंबून राहण्याचे आणि आपले आदर्श त्यातूनच धुंडाळण्याचे अंगवळणी पडत जाते. पुस्तके आपल्याला व्यामिश्र आणि गूढ मानवी मनाचं आणि सृष्टीचं रहस्य थोडेफार उलगडून दाखवतात; त्यांनाही सगळं माहीत असतं असं नव्हे; कारण तीही प्रतिभावंतांनी लिहिलेली असली तरी त्यांच्या प्रतिभेलाही अनेक मर्यादा असतात; आपण स्वत:च्या पंचेंद्रियांनाच प्रमाण मानून जगाचा जो प्रत्यय घेऊ शकतो, त्यालाही मर्यादा असतात; परंतु पुस्तकं अनेकदा या मर्यादांवर मात करून मानवी मनाचे आणि जीवनाचे, एवढेच नव्हे तर भूतकाळाचे आणि भविष्यकाळाचे विश्वासार्ह भाष्यकार बनून आपल्या शंकाकुशंकांचे निराकरण करतात. माणसांच्या जगाच्या ज्या मर्यादा त्यांना पुस्तके जुमानत नाहीत. मुलापेक्षा नातू प्रिय तसे आपल्या स्वत:च्या प्रज्ञेला जाणवलेल्या या जगाच्या साक्षात

स्वरूपापेक्षा पुस्तकांनी उभ्या केलेल्या त्रिकालदर्शी विश्वस्वरूपाची व्यापकता अधिक स्वीकारार्ह व खात्रीची वाटू लागते. पुस्तकांच्या या अद्‌भुत सामर्थ्यामुळे आपल्या आकलनाचे विश्वही दशदिशांनी विस्तारू लागते.

लहानपणापासून कळत नकळत आपण विश्वसाहित्याचा आस्वाद घेत असतो, आणि सगळं विश्व आपल्या कवेत घेण्याचा संस्कार आपल्यावर होत असतो. पंचतंत्र, अरेबियन नाइटस, इसापच्या कथा, ग्रिम बंधूंच्या लोककथा, हॅन्स ख्रिश्चन ॲंडरसनच्या परीकथा, टॉलस्टॉयच्या कथा, ज्यूल व्हर्नच्या विज्ञानकथा-बिरबल-तेनालीराम, नसरुद्दिनच्या चातुर्यकथा दंतकथा, लोककथा, वीरकथा, इ. आपल्या कानावर पडत असतात, वाचनात येत असतात; आणि त्या आपल्याला विश्वमानव म्हणून आकार देत असंतात. विश्वात्मकतेचा वारसा देत असतात. 'हे विश्वचि माझे घर' हा भाव जागवत असतात. आपल्या मातृभाषेच्या परिसरात राहूनही आपल्याला विश्वातील निरनिराळ्या भाषांमधील साहित्याची ओळख.बाल्यकाळापासूनच अशी कळत नकळत होत असते. लहानपणी मिळालेला हा वारसा पुढेही काही प्रमाणात आपण टिकवून धरतो. आज आपल्या वाचनाला भाषेचे बंधन मर्यादा घालू शकत नाही. कारण भाषांतराद्वारे आपल्या भाषेतही अन्य भाषांमधील साहित्य कमी जास्त प्रमाणात आपल्याला उपलब्ध होत असते. पुस्तकाच्या या व्यापक विशाल जगात विहरताना टिपलेले काही लेख या पुस्तकात एकत्र आणले आहेत. खरे म्हणजे आणखीही असे अनेक लेख शिल्लक आहेत. आणि अजून बरेच लिहावयाचे आहेत. यथावकाश तेही पुस्तक रूपाने प्रसिद्ध होतील.

हे लेख पुस्तकांसंबंधी असले तरी समीक्षात्मक नाहीत; पुस्तके किंवा साहित्य म्हणजे केवळ कथाकादंबऱ्या-काव्य-नाटके इ. ललित लेखन नव्हे. त्याबाहेरही लेखनाचे नाना प्रकार आहेत, आणि त्यांचीही उपयुक्तता व रंजकता काही कमी नाही. त्याचप्रमाणे पुस्तक म्हटल्यावर छापलेले विशिष्ट आकारातील कागद एकत्र बांधून त्याला आवरण घालून सिद्ध केलेली वस्तू एवढाच अर्थ आता घेऊन चालणार नाही. 'वाङ्‌मय' या शब्दान पूर्वी लिखित शब्द यापेक्षा वाणीने उच्चारलेले शब्द यालाच प्राधान्य होते; आता गटेनबर्गने केलेल्या मुद्रणक्रांतीला मागे टाकून, इलेक्ट्रॉनिकमधील प्रगतीद्वारे साहित्याची आणि प्रसारमाध्यमांची नवनवी रूपे आपण शोधत चाललो आहोत. 'पुस्तकांचं जग' ही संज्ञा आता केवळ कागदावरील छापील मजकुराच्या मर्यादेत राहण्यास तयार नाही, ती वेगवेगळे अर्थ सामावून घेण्यास सिद्ध झाली आहेत.

बोलणारी पुस्तके हवीत, विश्वकोशाचा इलेक्ट्रॉनिक अवतार हे लेख भविष्यकाळातील पुस्तकांचे स्वरूप सूचित करणारे आहे.

त्याचप्रमाणे चित्रकथा (कॉमिक्स) हा आता बालवाङ्‌मयातील एक विश्वव्यापी अग्रगण्य प्रकार म्हणून लोकप्रिय होत आहे. रहस्यकथांचेही आकर्षण देशकालाच्या

सीमांना जुमानत नाही. या दोहोंच्या लोकप्रियतेचा मागोवा घेणारे दोन लेख या पुस्तकात घेतले आहेत.

पाकशास्त्रावरील ग्रंथांना आज कुठल्याही ग्रंथप्रदर्शनात मोक्याची जागा देण्यात येते. त्यांची विक्री धूमधडाक्यात होते. पाकशास्त्रावरील गाजलेली पुस्तके मराठीतही अनेक आवृत्त्या निघून लाखाचा खप गाठतात, हे आपण पाहत आहो. पाकशास्त्रावरील ग्रंथांच्या आंतरराष्ट्रीय दुनियेत एक धावता फेरफटका मारून त्यांचे विश्वरूप एका लेखात दाखवले आहे.

साहित्याचा अभ्यास करताना देशकालपरिस्थितीचा संदर्भ नेहमी लक्षात घ्यावा लागतो. प्रत्येक देशाचे साहित्य थोड्याफार प्रमाणात आपल्या वेगळेपणाची मुद्रा मिरवत असते. एकेका देशातही वेगवेगळ्या काळातले आणि वेगवेगळ्या वर्गातील लेखकांनी लिहिलेले साहित्य हे वेगवेगळे असल्याचे आढळते. साहित्याच्या प्रादेशिक-राष्ट्रीय स्वरूपाचा शोध घेण्याचा प्रयत्न अनेक स्तरांवर चालतो. या दृष्टीने वेगवेगळ्या देशांतील आणि वर्गातील साहित्याची आणि त्यातील नव्या जुन्या प्रवाहांची ओळख करून घेण्याची जिज्ञासा आहे. जगातील अनेक देशांचा प्रवास झाल्यामुळे आणि वृत्तपत्रीय क्षेत्रात वावर असल्याने देशोदेशींच्या लेखकांबद्दलचे कुतूहलही कायम राहिले. राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय चर्चासत्र-परिसंवाद, हार्वर्डमधील वास्तव्य यामुळे अनेक परदेशी लेखककवींच्या भेटीचा व परिचयाचा योग आला. अमेरिकेत असताना थोरोचे वॉल्डन पाँड, इमर्सनचे घर पाहण्याचा योग आला, जॉन उपडाइक, सेसिल डे. लेविस, आय ए रिचर्डस, निग्रो लेखक ले रोइ जोन्स, रॉबर्ट लोवेल वगैरे साहित्यिकांचा परिचय झाला. तो पुढे वाढण्याचे जमले नाही. दिल्लीत असताना, आक्टोविया पाझ, लोलिताचा लेखक नबोकोव्ह, ब्रिटनमधील जॉन वेन, स्टिफन स्पेंडर, आर्थर कोसलर, टॉलस्टॉयचा रशियन चरित्रकार सीमन्स, इंडोनेशियन लेखक मोश्तार ल्युब्रिस वगैरेंशी बातचीत करण्याचा मोका मिळाला. अशा ओझरत्या भेटींनी फार काही साधले असे नाही; परंतु त्या त्या व्यक्तीबद्दलची, त्याच्या साहित्याबद्दलची, त्याच्या देशाबद्दलची आस्था निश्चितच वाढीला लागते. ईस्ट बर्लिनला गेल्यावर नाटककार बर्थोल्ट ब्रेश्त याने उभारलेले नाट्यगृह पाहायला मुद्दाम गेलो. त्या नाट्यगृहाच्या प्रमुखांशी चर्चा झाली; त्यांच्या बोलण्यात ब्रेश्तचे थडगे जवळच आहे असा उल्लेख आला. ते पाहायला गेलो. ती प्रचंड स्मशानभूमी होती. आपल्याकडे मैलाचा दगड वा वरवंट्याचा पाटा असतो, तसा एक दगड, अनघड; ओबडधोबड आणि त्यावर बर्थोल्ट ब्रेश्त आणि त्याच्या जन्ममृत्यूचे वर्ष -एवढाच मजकूर. बाकी काही नाही. ब्रेश्तच्या नाटकांचे आणि जीवनाचे एक वेगळेच भान त्या अनघड दगडाने दिले....

जपानी साहित्य, निग्रो साहित्य, आफ्रिका- लॅटिन अमेरिकेतील मॅजिक रिॲलिझमचा जादुई वास्तववादाचा भुलभुलैय्या, अरबी भाषेतील साहित्य (नोबेल पुरस्कार विजेता

नगीब महफौजच्या परिचयाच्या अनुरोधाने), झेकोस्लोव्हाकिया-पोलंडमधील साहित्य वगैरे लेखांतून त्या त्या वाङ्‌मयाची काही प्रमुख वैशिष्ट्ये नोंदवलेली आहेत. त्या त्या भाषांतील साहित्याचा संपूर्ण इतिहास देण्याचा हेतू त्यामागे नाही. काही बाबींकडे वाचकांचे लक्ष वेधावे, आणि त्यांचे कुतूहल जागे करावे एवढीच माफक अपेक्षा आहे.

रशिया आणि अन्य कम्युनिस्ट देश यांमध्ये गेल्या चार वर्षांत आमूलाग्र उलथापालथ झाली आहे. रशियामध्ये साहित्य व साहित्यिक यांचे सरकारीकरण झाले, आणि तेथील लेखक संघटनेचा सदस्य झाल्याशिवाय कोणाचेही लेखन प्रसिद्ध होणे अशक्य झाले. पुस्तके प्रकाशित करणारी यंत्रणाही पूर्णतया सरकारी नियंत्रणाखाली असल्याने फक्त सरकारच्या मर्जीतल्या लेखकांची पुस्तकेच प्रकाशित होत राहिली. तत्कालीन शासनपद्धती व जनजीवन यावर टीका करणारी किंवा वास्तव चित्रण करणारी पुस्तके प्रसिद्ध होणेच अशक्यप्राय ठरले. अशा पुस्तकांवर आणि लेखकांवर शासकीय गैरमर्जी होऊन त्यांचा छळ केला जाई. त्यांना सैबेरियात धाडले जाई. पोलंडमध्ये तर कोरा कागद हीच दुर्मिळ गोष्ट ठरली. मुद्रणालये सरकारी मालकीची, कोणी आपले पुस्तक स्वत:च छापू म्हटले तरी अशक्य. त्यातून काही लेखकांनी आपली हस्तलिखिते चोरून परदेशी पाठवली. ती पुस्तके परदेशात प्रसिद्ध झाली. काही लेखकांना मायदेशातून हद्दपार करण्यात आले; काहींवर देश सोडून जाण्याची सक्ती करण्यात आली. साहित्याच्या या सर्वंकष गळचेपीचे स्वरूप कसे भयानक होते याबद्दलची माहिती आता हळूहळू बाहेर येत आहे. रशियन मायभूमीने दूर लोटलेले साहित्यिक, साहित्यजगतातले ग्लासनोस्त, लेखणी जेथे शस्त्र बनते, जेथे पुस्तकांवर वाचक अधाशासारखे तुटून पडतात हे १९८८ साली लिहिलेले लेख त्या अनुषंगाने निर्माण झालेल्या परिस्थितीची वेगवेगळी रूपे प्रकट करणारे आहेत. आज त्यातील काही तपशील इतिहासजमा झाल्यासारखा वाटेल; परंतु आणीबाणीतील आपला अनुभव इतिहासाचा भाग झाला म्हणून विसरणे जसे अशक्य आहे, तसेच सर्वंकष शासकीय प्रणालीत साहित्य, कला यांची जी घुसमट होते; त्याचे हे तपशील सतत धोक्याची सूचना देऊन आपले निर्मितीचे स्वातंत्र्य टिकवण्याची प्रेरणा देत राहतील. सोल्झेनित्सिनचा जाहीरनामा त्यासाठी मुद्दाम दिला आहे.

दरवर्षी मराठीत १२०० वर पुस्तके प्रसिद्ध होतात. निरनिराळ्या भारतीय भाषांतही हजारो पुस्तके प्रसिद्ध होतात. निरनिराळ्या देशांतही लक्षावधी पुस्तके प्रसिद्ध होतात. ही सर्व पुस्तके वाचणे कोणालाही अशक्य आहे. उपलब्ध वेळ, आपली आवड, आपली गरज आणि समकालीन वातावरणाचा रागरंग यांचा अंदाज घेऊन आपण कुठली पुस्तके वाचायची हे ठरवावे लागते. त्या त्या वर्षातील उत्कृष्ट पुस्तके कुठली हे कळले तर निवड करणे सोयीचे होऊ शकते. या दृष्टीने विविध ग्रंथपुरस्कारांचे

महत्त्व अमर्याद आहे. ग्रंथपुरस्कारांचा उपयोग करून घेतला तर पुस्तकांच्या खपाला चालना देता येईल.

काळाच्या कसोटीला उतरलेल्या विश्वसाहित्यातील महान ग्रंथांचा आणि त्यातील विचारांचा परिचय असणे हा आपल्या काळाशी सुसंवाद साधण्याचा एक मार्ग ठरतो. त्या दृष्टीने विसाव्या शतकातील महान पुस्तकांची निवड डॉ. मार्टिमर ॲडलर यांनी १९७७ मध्ये केली. त्या पुस्तकांच्या यादीत आता आणखी काही भर पडणे अपरिहार्य आहे. परंतु ही यादी चोखंदळ वाचकांना उपयुक्त ठरेल. पुस्तकांच्या अफाट जगात स्वैरसंचार करताना ही यादी म्हणजे हक्काची, विश्वासाची, मुक्कामाची स्थळे ठरतील.

पत्रकारांसाठी असणारी नीमन अभ्यासवृत्ती मिळाल्याने हार्वर्ड युनिव्हर्सिटीत वर्षभर अध्ययन करण्याचे भाग्य मला लाभले. पहिल्याच दिवशी या विद्यापीठातर्फे तेथील ग्रंथालयाच्या सहलीचा कार्यक्रम झाला. शंभर इमारतींत एक कोटीवर पुस्तके तेथे होती. त्यातील विडनेर लायब्ररी ही प्रमुख. अनेक मजली प्रचंड इमारत. त्या इमारतीत सगळी दालने पुस्तकांच्या कपाटांनी भरलेली. त्यात आम्हाला प्रत्येकाला खास टेबल. वाटेल तेवढी पुस्तके स्वहस्ते घेण्याची मुभा. झेरॉक्सची सोय. तेथे बरीच पुस्तके मी चाळली. काही वाचली.

परंतु एकूण जीव दडपून गेला.

ही एवढी पुस्तके...त्यात दरवर्षी पडणारी भर... आपण कितीही जन्म घेतले तरी ही सगळी वाचू शकणार नाही. समुद्राच्या काठावरील एखादा वाळूचा कण शंख-शिंपला. एवढ्याचेच आपण फारतर धनी.

त्या दिवशी माझा वाचनाचा हव्यास संपला.

वाचन सुरू राहिले.

पुस्तकांच्या जगातच मी जास्त रमलो.

आणि अखेरपर्यंत या पुस्तकांच्या जगात रमण्याविना गती नाही. ईश्वराने कृपाळूपणे दृष्टीतले तेज त्यासाठी कायम ठेवावे एवढीच प्रार्थना!

कल्पना मुद्रणालयाचे अण्णासाहेब लाटकर यांच्याकडे या पुस्तकाच्या छपाईचा योग आला. त्यांनी आत्मीयतेने काम केले.

पुस्तकांच्या जगात रमताना घरच्या माणसांसाठी देण्याचा जो वेळ, त्यावरच आक्रमण होते. सौ. निर्मला, चि. हृषिकेश आणि आनंद आणि स्नुषा, सौ. अरुणा यांनी त्याबद्दल कुरकुर न करता जे निवांतपण दिले त्याचे मोल मोठे आहे.

**शंकर सारडा**

# १

# विसाव्या शतकातील महान पुस्तके

महाविद्यालयात असताना मला इंग्लिश पुस्तकांची गोडी लागली. मराठीतील बहुतेक सर्व नामवंत लेखकांची पुस्तके नजरेखालून गेली होती. ती सर्वच पुस्तके वाचली वा सगळी सारख्याच समरसतेने वाचली गेली असे मात्र नाही. सगळीच पुस्तके आपल्या मनाचा सारख्याच उत्कटतेने ठाव घेतात असेही नाही; परंतु कोणताही महत्त्वाचा लेखक घेतला तर त्याचे नेमके वैशिष्ट्य व साहित्यातील सापेक्ष स्थान हे ठरवण्याइतपत आणि एखाद्या नव्या लेखकाचे त्या वेळच्या आकलनाच्या संदर्भात नवीन काही वैशिष्ट्य असेल, तर ते कोणते, हे बरेचसे नेमकेपणाने सांगण्याइतपत आत्मविश्वास निर्माण झाला. अर्थात एका विशिष्ट साहित्यविषयक सूत्राच्या अधिष्ठानावर एकेका कृतीचे सापेक्ष नवे-जुनेपण वा लहान-मोठेपण आपण ठरवत असतो; आणि वैयक्तिक आवडी-निवडीचाही त्यावर प्रभाव पडत असतो. आपण जी काही चाळणी लावतो ती वैयक्तिकच असते; आणि म्हणूनच मर्यादितही असते. परंतु आपल्याला या विषयातले काहीतरी कळते एवढा विश्वास वा भ्रम त्यामुळे बाळगता येतो; आणि तो सोयीचा असतो.

मराठी पुस्तकांच्या संदर्भात वाटणारा हा खरा-खोटा विश्वास वा भ्रम इंग्रजी पुस्तकांच्या संदर्भात अर्थातच कधी वाटू शकणार नाही अशी प्रथमदर्शनीच आपली धारणा होते. इंग्रजीमध्ये केवळ ब्रिटिश-अमेरिकन लेखकांनी मूळ इंग्लिश भाषेत लिहिलेलीच पुस्तके उपलब्ध आहेत असे नव्हे; जगातील बहुतेक भाषांतील उत्तम वाङ्मय हे चांगल्या प्रकारे इंग्लिशमध्ये भाषांतरित स्वरूपात

सहजगत्या मिळू शकते; आणि त्यामुळे इंग्लिश भाषेद्वारे समग्र जागतिक साहित्याचे विराट विश्वदर्शन घडू शकते. त्यामुळे माझे वाचन अद्ययावत आहे असे विधान करणे तर दूरच राहिले; मी बरेच वाचले आहे, एवढा साधा अभिमानही बाळगणे मुष्किल होते.

**नोबेल पारितोषिक विजेते**

मी माझ्यापुरता त्या वेळी या अवघड परिस्थितीतून मार्ग काढला. होमर, ॲरिस्टॉटल, प्लेटो, ग्रीक व रोमन नाटके, डॉन क्विक्झोट, अरेबियन नाइट्स, किंग ऑर्थर्स टेल्स, गटे, टॉम-जोन्स-ट्रिस्ट्रम शँडी वगैरे आरंभीच्या इंग्लिश कादंबऱ्या व्हॉल्टेअर, रूसो वगैरे फ्रेंच साहित्यिक, रोमँटिक कवी, स्टोरी ऑफ फिलॉसफी आणि १०१ ग्रेट बुक्स यांसारखी पुस्तके, मिळतील तशी नजरेखालून घालायची असे ठरवले. त्याचबरोबर सॉमरसेट मॉमने निवडलेल्या ' टेन ग्रेट नॉव्हेल्स ऑफ दि वर्ल्ड ' आणि नोबेल पारितोषिक विजेत्या साहित्यिकांची एकेक तरी कृती आपल्या परिचयाची असावी असा प्रयत्न करायचे ठरवले. त्या वेळी मॉडर्न लायब्ररी या मालिकेमधील पुस्तके चार-चार रुपयांना मिळत. पृष्ठे चारशेपासून हजार-बाराशे असली तरी किंमत सारखीच. पेपरबॅक्सही तीन ते सहा रुपयांना मिळत. एकेका लेखकाचे संकलित साहित्यही एकेका मोठ्या ग्रंथाद्वारे तेरा-चौदा रुपयांना मिळे. त्यामुळे पुस्तके विकत घेऊन स्वतः संग्रही बाळगणे आटोक्यात असे. कॉलेज व विद्यापीठाचे ग्रंथालय, अमेरिकन लायब्ररी, ब्रिटिश कौन्सिल लायब्ररी यांचाही उपयोग होई; आणि स्वतःजवळ नसलेल्या पुस्तकांचाही परिचय करून घेणे तितकेसे कठीण जात नसे. अर्थात पुढे पुढे लक्षात यायला लागले की हा सर्व आटापिटा व्यर्थ आहे. सगळेच लेखक आपल्याला सारख्याच उत्कटतेने भावत नाहीत; आणि आवडलेल्या लेखकाचेही सगळेच्या सगळे वाङ्मय सारख्याच तोलामोलाचे असते, असेही नाही. एकेकाचे सर्वांत जास्त गाजलेले एकेक पुस्तक वाचायचे म्हटले तरी तेही अवघड आहे; आणि त्यामुळे जे काही हाती पडत गेले तेवढे वाचून वा चाळून दुधाची तहान ताकावर अशी मनाची समजूत काढणे अटळ ठरले. परंतु एक प्रकारचा बहुश्रुतपणा त्यायोगे येतो आणि आपल्या जाणिवेला तो कसदार जोपासतो हे खरेच.

### आपले अज्ञानच मोठे

हार्वर्ड युनिव्हर्सिटीची शंभर ठिकाणी विखुरली गेलेली लायब्ररी आणि वॉशिंग्टनमधील लायब्ररी ऑफ काँग्रेस बघताना मात्र आपल्या या बहुश्रुतपणाच्या मर्यादाही जाणवल्या. तेथील दशलक्षांच्या संख्येत मोजली जाणारी पुस्तके पाहताना अनेक जन्म घेतले तरी हे सारे वाचून होणार नाही याची खात्री पटली आणि सर्व काही आपल्या डोळ्यांखालून जायला हवे ही आकांक्षाही संपली. या सर्व वाचनाचा काही उपयोग असलाच तर तो एका मर्यादेतच आहे. स्वत:चे अस्तित्व हे आणि स्वत:ची जीवनानुभूती ही पुन्हा त्यापेक्षा अलगच आहे आणि पुस्तकां-पेक्षाही त्यांचे मोल मोठे आहे, हे जाणवले आणि वाचनाचा हव्यास कमी झाला. तरीही नवी पुस्तके बघितली, नव्या पुस्तकांवरचा चांगला अभिप्राय वाचला की मनाला हुरहूर लागून राहते. जागतिक ग्रंथयात्रेत वा ग्रंथालयात गेल्यावर आपले अज्ञान किती भयंकर आहे याचीच जाणीव प्रखरतेने होत राहते.

तरीही बहुसंख्य वाचकांच्या दृष्टीने एक प्रश्न उरतोच. आधुनिक जगाचे नागरिक म्हणून आपली सांस्कृतिक व कलात्मक परंपरा जाणून घेण्यासाठी कोणती पुस्तके वाचावी ? अशा निवडक शंभर-दीडशे पुस्तकांची नावे सुचवली तर आयुष्यात कधीतरी ती वाचून संपवायचीच असा प्रयत्न करता येईल. ब्लेझ पास्कल म्हणत असे, ‘ प्रत्येक गोष्टीबद्दल जे जे ज्ञात असेल ते ते सर्व जाणून घेणे हे आपल्याला शक्य नसल्याने प्रत्येक गोष्टीबद्दल थोडेतरी जाणून घेणे हे आपले कर्तव्य ठरते.’ परंतु खूप ज्ञान मिळवूनही जर त्यावर आपले नियंत्रण नसेल तर त्यासारखे दुर्दैव नाही, या हिरोडोटसच्या विधानातही काही तथ्य नाही असे नाही. इतरांच्या ज्ञानाचा अभ्यास करून आपण आपले ज्ञान फार तर वाढवू शकू; परंतु इतरांच्या शहाणपणाने आपण शहाणे होऊच असे नाही, हा मॉर्सनचा इशाराही लक्षात ठेवायला हवा.

### महत्त्वपूर्ण ४४३ ग्रंथ

विसाव्या शतकातील सर्वांत महान ग्रंथ कोणते, असा प्रश्न स्वत:लाच विचारून १९७७ मध्ये मॉर्टिमर जेरोम ॲडलर या तत्त्वचिंतकाने त्याचे उत्तर देण्याचा प्रयत्न केला. पाश्चात्त्य देशांतील महान ग्रंथ म्हणून ७४ लेखकांचे ४४३ ग्रंथ त्याने १९५२ मध्ये निवडले होते; आणि त्या निवडीत फ्राइड वुइल्यम

जेम्स यांच्यापर्यंत तो येऊन ठेपला होता. त्या घटनेला २५ वर्षे झाल्यावर विसाव्या शतकाकडे तो वळला.

**निवडीचे व्यापक अधिष्ठान**

१९७७ मध्ये विसाव्या शतकातील महान ग्रंथ ही नवीन मालिका सुरू करताना निवड करण्यासाठी अॅडलरने नॉर्मन कझिन्स आणि जेकर बारझुन यांचे साहाय्य घेतले. आपली निवड ही अनेकांना सदोष वाटेल अशी त्यांचीही अटकळ होतीच. परंतु कोणतीही निवड करताना मतभेदाला वाव असणारच. आज इतक्या वर्षांनंतर ही यादी वाचतानाही तिच्यातील बहुसंख्य पुस्तके महत्त्वाची आहेत हे पटते. या यादीत येऊ न शकलेल्या पुस्तकांची पाहिजे तर आपण आपापल्या आवडीनुसार भर घालावी आणि क्षतिपूर्तीचा आनंद लुटावा.

**अॅडलर यांचे प्रचंड कार्य**

डॉ. मार्टिमर अॅडलर यांनी डॉ. हट्चिन्स यांच्या सहकार्याने ७४ लेखकांच्या ४४३ ग्रंथांची निवड करून, पाश्चात्त्य जगातील सर्वोत्तम ग्रंथांकडे लक्ष वेधले. एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिकाने ५४ खंडांत ते ग्रंथ प्रकाशित केले. १९४४ पासून १९५१ अखेर मुद्रणाचे काम चालले. या ५४ खंडांत होमर, एस्किलस, सॉफोक्लिनज, युरिपिडस, अॅरिस्टोफेनिस, हीरोडोटस, थ्यूसिडायसिस, प्लेटो अॅरिस्टॉटल, गालेन, युक्लिड, आर्किमिडिज, अपोलोनियस, निकोमाकस, एपिक्टेटस, मार्कुस ऑरेलियस, व्हर्जिल, लुक्रेटिस, प्लुटार्क, टॅसिरस, टॉलेमी, कोपर्निकस, केपलर, प्लॉटिनम, ऑगस्टाइन, टॉमस अॅक्विनॉस, डान्टे, चॉसर, मॅकियावेली, हॉब्ज, राबेलाइस, मॉटेन, शेक्सपीयर, गिल्बर्ट, गॅलिलिओ, हार्वे, सर्व्हेंतिस, फ्रॅन्सिस बेकन, डेकार्टस, स्पिनोझा, मिल्टन, पास्कल, न्यूटन, ह्यूजन्स, लॉक, बर्कले, ह्यूम, स्विफ्ट, स्टर्न, फील्डिंग, मॉटेस्क्यू, रुसो, अॅडम स्मिथ, गिबन, कान्ट, हॅमिल्टन, मॅडिसन, जे. एस. मिल, बॉस्वेल, लॅव्होझिए, फॉरीयर, फॅरडे, हेगेल, गटे, मेलव्हिल, डार्विन, मार्क्स, एंजेल्स, टॉलस्टॉय, डोस्टोवस्की, वुइल्यम जेम्स आणि फ्राइड यांचा समावेश होता. या ग्रंथांचे प्रकाशन ही अर्थातच पाश्चात्त्य जगातील एक महत्त्वपूर्ण घटना होती. 'मानवी प्रज्ञेचे उदात्त स्मारक', 'आजवरच्या पाश्चात्त्य इतिहासातील एक अभूतपूर्व बौद्धिक उपक्रम' असा त्याचा

गौरव करण्यात आला. एकावर एक हे ग्रंथ टेवले तर ७ फूट उंची होई. ॲडलरने या ग्रंथांसाठी जी सूची ( सिंटोपिकॉन ) तयार केली, तिने दोन खंड व्यापलेले आहेत. या संपादनकार्यातील आठ वर्षांचा खर्च २० लाख डॉलर्स होता. या सर्व ग्रंथांतून प्रकट होणाऱ्या १०२ मूलभूत संकल्पना आणि त्यांचे २९८७ पोटविभाग पाडून त्यावर १ लाख ६३ हजार संदर्भनोंदी देण्यात आल्या आहेत. त्या काळातील स्वस्ताई लक्षात घेतली तर या प्रकल्पातील संपूर्ण संचासाठी ५०० डॉलर्स हे सवलतीचे मूल्य भरून नाव नोंदवणारे ५०० संस्थापक सदस्य मिळाले. दुसऱ्या एका फाउण्डेशनने या ग्रंथाचे १६०० संच सार्वजनिक वाचनालयांना भेटीदाखल दिले. १९५६ मध्ये ३३०० संच विकले गेले, तर १९६० मध्ये ४० हजार संच गेले.

कोलंबिया विद्यापीठात जॉन एरस्किनने ' महान ग्रंथां 'वरचा एक कोर्स सुरू केला तो १९२० साली. डॉ. चिन्स व डॉ. ॲडलर यांनी शिकागो विद्यापीठात अधिक विस्तृत प्रमाणावर तो विकसित केला. पंचवीस वर्षांच्या त्या शिक्षणक्रमाच्या अनुभवानंतर ४४३ पुस्तकांची यादी पक्की झाली. त्याला २५ वर्षे लोटल्यावर विसाव्या शतकातील १३१ महान ग्रंथांची निवड केली गेली.

ॲडलरने निवड केलेल्या पुस्तकांत ललित वाङ्मय ( कादंबऱ्या, नाटके, काव्य इ.), समाजशास्त्रीय वाङ्मय, विज्ञानविषयक व इतिहास-पुस्तके, तत्त्वज्ञान, धर्मशास्त्र आणि धर्मविचार यावरील ग्रंथ यांचा समावेश आहे. चेकॉव्ह, शॉ, जेम्स जॉइस, प्राउस्ट, टॉमस मॅन, कॉलरॅड, फॉकनेर, हेमिंग्वे, डी. एच. लॉरेन्स, टी. एस. एलियट, काफ्का, जॉर्ज ऑरवेल, सोल्झेनित्सिन, सॉल बेलो, सॅम्युएल बेकेट, आल्बेर कामू, हेन्रिक बोल, ओ'नील, आल्डस हक्स्ले, सार्त्र, ग्रॅहॅम ग्रीन, यीटस्, रिल्के वगैरे ललित-लेखक, कवी व नाटककार त्यात आहेत; त्याप्रमाणे लेनिन, ट्रॉटस्की, टॉयन्बी, बर्गसन, जॉन ड्युई, व्हाइटहेड, सांतायाना, सार्त्र, बरट्रॅंड रसेल, कार्ल जेस्पर्स, आंद्रे माल्रा, आइनस्टाइन, नील्स भोर आदी विचारवंत, शास्त्रज्ञ, इतिहासकार, तत्त्वचिंतक यांचाही या यादीत समावेश झालेला आहे. त्या दृष्टीने ही यादी खरोखरच आधुनिक विचारवैभवाचे व्यापक दर्शन घडविणारी आहे.

कादंबऱ्या, नाटके, काव्य, ललित वाङ्मय

१. अँटन चेकॉव्ह– द थ्री सिस्टर्स; द चेरी ऑर्चर्ड.

२. जेम्स जॉईस– अ पोर्ट्रेट ऑफ द आर्टिस्ट अॅज ए यंग मॅन: युलिसिस.

३. मार्सेल प्राउस्ट– रिमेंब्रन्स ऑफ थिंग्स पास्ट.

४. जॉर्ज बर्नार्ड शॉ– मॅन अॅण्ड सुपरमॅन, मेजर बार्बरा, हार्टब्रेक हाऊस, सेंट जोन.

५. डी. एच. लॉरेन्स– सन्स अॅण्ड लव्हर्स, वूमेन इन लव्ह.

६. टी. एस. एलियट– मर्डर इन द कॅथिड्रल, द कॉकटेल पार्टी, द वेस्ट लॅण्ड.

७. युजीन ओ'नील– लाँग डेज जर्नी इन टू नाइट, द आइसमॅन कमथ, मोर्निंग बिकम्स इलेक्ट्रा.

८. टॉमस मॅन– द मॅजिक माउण्टन, जोसेफ अॅण्ड हिज ब्रदर्स.

९. जोसेफ कॉनरॅड– नोस्ट्रोमो, द सिक्रेट शेअरर, हार्ट ऑफ डार्कनेस.

१०. फ्रान्झ काफ्का– द ट्रायल, द कॅसल.

११. वुइल्यम् फॉकनेर– सारटोरिस, द साउण्ड ऑफ द फ्यूरी, लाइट इन ऑगस्ट.

१२. ज्यां पॉल सार्त्र– नॉशिया.

१३. आंद्रे जिद– दि काउंटरफीट्स.

१४. आल्बेर कामू– द प्लेग, द फॉल, द स्ट्रेंजर, द रिबेल.

१५. अर्नेस्ट हेमिंग्वे– द ओल्ड मॅन अॅण्ड द सी.

१६. आंद्रे माल्रा– मॅन्स फेट, मॅन्स होप.

१७. जॉर्ज ऑरवेल– ॲनिमल फार्म.

१८. सॉल बेलो– मिस्टर सॅमलर्स प्लॅनेट, हेरझोग.

१९. सॅम्युअल बेकेट– वेटिंग फॉर गोदो, एण्डगेम.

२०. आल्डस हक्सले– ब्रेव्ह न्यू वर्ल्ड.

२१. हेन्रिक बोल– द क्लाउन.

२२. जॉर्ज लुइस बोर्जेस– द बुक ऑफ इमॅजिनरी बीइंग्ज, डॉक्टर ब्रॉडीज रिपोर्ट, ड्रीम टायगर्स.

२३. व्लादिमीर नबोकोव्ह– लोलिता

२४. गिसेप द लांपेदुसा- द लिओपार्ड.
२५. ग्रॅहम ग्रीन— द पॉवर अ‍ॅण्ड द ग्लोरी.
२६. अलेक्झांडर सोल्झेनित्सिन- द फर्स्ट सर्कल, द कॅन्सर वार्ड.
२७. डब्ल्यू. बी. यीटस, रॉबर्ट फ्रॉस्ट, इ. आर. रॉबिन्सन, एलियट, रिल्के यांच्या भावकवितांचे संकलन.

**समाजशास्त्रे, इतिहास**

२८. लिऑन ट्रॉटस्की— हिस्टरी ऑफ द रशियन रिव्होल्युशन.
२९. निकोलाय लेनिन— द स्टेट अ‍ॅण्ड रिव्होल्युशन.
३०. मॅक्स वेबर— एसे इन सोशिऑलॉजी, द प्रॉटेस्टंट एथिक अ‍ॅण्ड द स्पिरिट ऑफ कॅपिटॅलिझम.
३१. आर एच. टॉनी— द ॲक्विझिटिव्ह सोसायटी, रिलिजन अ‍ॅण्ड द राइझ ऑफ कॅपिटॅलिझम.
३२. जे. एम. कीन्स—द जनरल थिअरी ऑफ एम्प्लॉयमेंट, इंटरेस्ट अ‍ॅण्ड मनी.
३३. हेन्री ॲडम्स— द एज्युकेशन ऑफ हेन्री ॲडम्स, द डिग्रेडेशन ऑफ द डेमोक्रॅटिक डोग्मा.
३४. जॉर्जेस सोरेल— रिफ्लेक्शन्स ऑन व्हायोलन्स.
३५. आर्नोल्ड टॉयन्बी— द स्टडी ऑफ हिस्टरी, सिव्हिलायझेशन ऑन ट्रायल, चेंज अ‍ॅण्ड हॅबिट.
३६. पीयर टीलहार्ड दि चारडिन— द फिनॉमेनॉन ऑफ मॅन.
३७. क्लॉल्ड लेव्हि-स्ट्रॉस—द सॅव्हेज माइंड, द रॉ अ‍ॅण्ड द कुक्ड, टोटेमिझम.
३८. जेकस एलुल— टेक्नॉलॉजिकल सोसायटी.
३९. हॅना आरेन्ड —द ह्यूमन कंडिशन, द ओरिजिन्स ऑफ टोटॅलिटेरिआनिझम.
४०. सीमन वील— वेटिंग फॉर गॉड.
४१. एडमंड विल्सन— टू द फिनलँड स्टेशन.
४२. सीमॉन द बोवाँ— द सेकंड सेक्स.
४३. थोरस्टेइन वेब्लेन— द थिअरी ऑफ द लीझर क्लास.
४४. कार्ल जुंग— द एसेज ऑन ॲनॅलिटिकल सायकॉलॉजी; सायकॉलॉजिकल टाइप्स, मॉडर्न मॅन इन सर्च ऑफ अ सोल.

४५. कार्ल पोलान्या– द ग्रेट ट्रॅन्सफॉर्मेशन.

**तत्त्वज्ञान, धर्मशास्त्र**

४६. जॉन ड्युई– डेमॉक्रसी ॲण्ड एज्युकेशन, ह्यूमन नेचर ॲण्ड कॉंडक्ट, द क्वेस्ट फॉर सर्टण्टी, एक्सपीरियन्स ॲण्ड नेचर, रिकन्स्ट्रक्शन इन फिलॉसफी.

४७. हेन्री बर्गसॉं–क्रिएटिव्ह इव्होल्युशन, द टू सोर्सेस ऑफ मोरॅलिटी ॲण्ड रिलिजन.

४८. आल्फ्रेड नॉर्थ व्हाइटहेड– ॲन इन्ट्रोडक्शन टू मॅथेमॅटिक्स, सायन्स ॲण्ड द मॉडर्न वर्ल्ड, ॲडव्हेंचर्स ऑफ आयडियाज, प्रोसेस ऑफ रिॲलिटी, मोडस ऑफ थॉट.

४९. बरट्रॅंड रसेल– प्रिन्सिपल ऑफ मॅथेमॅटिक्स, प्रॉब्लेम ऑफ फिलॉसफी, प्रपोझ्ड रोडस टू फ्रीडम.

५०. लुडविग विट्गेनस्टाइन– ट्रॅक्टाटस लॉजिको– फिलॉसफिक्स; फिलॉसॅफिकल इन्व्हेस्टिगेशन्स.

५१. एटिने गिल्सन– द युनिटी ऑफ फिलॉसॉफिकल एक्सपीरिअन्स.

५२. ज्यॉं पॉल सार्त्र - बीइंग ॲण्ड नथिंगनेस.

५३. जेकस मॅरिटेन– द डिग्री ऑफ नॉलेज, फ्रीडम इन द मॉडर्न वर्ल्ड, मॅन ॲण्ड द स्टेट.

५४. जोझ ओर्टेगा गॅसेट– द रिव्होल्ट ऑफ द मासेस.

५५. कार्ल जेस्पर्स– रीझन ॲण्ड ॲंटिरीझन, इन अवर टाइम्स, रीझन ॲण्ड एक्झिस्टन्स.

५६. कार्ल पॉपर– कंजेक्चर्स ॲण्ड रेप्युटेशन्स, दि लॉजिक ऑफ सायंटिफिक डिस्कव्हरी.

५७. मार्टिन हिडेगर– बीइंग टाइम, द क्वेश्चन ऑफ बीइंग, व्हाट इज अ थिंग ?, व्हॉट इज फिलॉसफी ?

५८. मार्टिन बुबर– आय ॲण्ड दाऊ.

५९. आंद्रे माल्रॉ– द व्हॉयसेस ऑफ सायलेन्स.

६०. रिनॉल्ड नीभूर– द नेचर ॲण्ड डेस्टिनी ऑफ मॅन.

विज्ञान

६१. आल्बर्ट आइनस्टाइन– साइडलाइटस् ऑन रिलेटिव्हिटी, द मीनिंग ऑफ रिलेटिव्हिटी, ऑन द मेथड ऑफ थिअरेटिकल फिजिक्स.

६२. मॅक्स प्लँक– व्हेअर इज सायन्स गोइंग ?, द फिलॉसफी ऑफ फिजिक्स, सायंटिफिक ऑटोबायोग्राफी.

६३. जेकस् मोनोद– चान्स अॅण्ड रिअॅलिटी.

६४. वेर्नर हीलेनबर्ग– फिजिक्स अॅण्ड फिलॉसफी, फिलॉसॉफिक प्राब्लेम ऑफ न्युक्लिअर सायन्स, फिजिक्स अॅण्ड बियाँड.

६५. जोसेफ वुडगर– बायॉलॉजिकल प्रिन्सिपल्स

६६. आर्थर एडिंग्टन– द नेचर ऑफ द फिजिकल वर्ल्ड, स्टार्स अॅण्ड अॅटम्स

६७. नील्स भोर– अॅटॉमिक फिजिक्स अॅण्ड ह्यूमन नॉलेज.

६८. एडविन स्क्रोडिंगर– व्हॉट इज लाइफ ?

विसाव्या शतकातील या महान पुस्तकांमध्ये गेल्या दहा-पंधरा वर्षांत प्रसिद्ध झालेल्या अनेक पुस्तकांचा समावेश करावासा वाटेल तत्पूर्वीच्या काळातीलही काही लेखक, कवी व विचारवंतांची नावे या यादीतून गळलेली आहेत. ' फ्रीडम फर्स्ट 'चा एरिक फ्रॉम, आयझॅक असिमोव्ह, आर्थर सी. क्लार्क, आयन रँड, आचार्य रजनीश, ग्रॅब्रिएल गार्सिआ मार्क्विझ, फ्रिटजॉफ कॅप्रा, मिलान कुंदेरा, इसाक सिंगर, जे. कृष्णमूर्ती, मार्गरेट मीड, गुंतर ग्रास, मार्शल मॅकलुहान, फ्युचर शॉकचा आल्विन टॉफ्लर वगैरे लेखकांची नावे मला या यादीत घालावीशी वाटतात. त्यांच्या महत्त्वाच्या कृती या लक्षणीय आहेतच.

अर्थातच ही सर्वच्या सर्व पुस्तके प्रत्येकजण वाचेल वा वाचू शकेल असे नाही. परंतु मार्क ट्वेनने म्हटल्याप्रमाणे ' आपणापैकी प्रत्येकाला जे आपण वाचलेले असावे असे वाटते; पण वाचावेसे मात्र वाटत नाही असे पुस्तक हेच महान असते. ' महान पुस्तकांचे वाचन ही तशी डोक्याला ताण देणारी बाब असते. आपल्या अनेक गृहीत कृत्यांना उन्मळून टाकणारे युक्तिवाद वा जीवन-दर्शनही त्यात असते; आणि ते पचवणे, सहन करणे सोपे नसते. परंतु अशा पुस्तकांची तोंडओळख असणे हेदेखील आपल्या वेगळेपणाचे, स्वत्वाचे व सत्त्वाचे अधिष्ठान बनू शकते. विचाराला व जीवनाला काही खास परिमाण देऊ शकते.

( महाराष्ट्र टाईम्स : ३ एप्रिल १९८८ )

# २

## जेथे पुस्तकांवर वाचक अधाशासारखे तुटून पडतात

मराठी पुस्तके फारशी खपत नाहीत ही आपली कायमची तक्रार आहे. हजार-पंधराशे प्रतींची आवृत्ती संपायलाही पाच-दहा वर्षे लागतात. तशात पुस्तक वाचनाला पूर्वी जो काही वेळ मोकळा मिळायचा, त्या वेळेवर आता मासिके, साप्ताहिके, टेलिव्हिजन इत्यादींचे आक्रमण झाले आहे; त्यामुळे पुस्तकाच्या वाचनाला आणखीही दुय्यम स्थान प्राप्त होणे स्वाभाविक आहे.

**पुस्तके घेण्यासाठी रांगा**

परंतु जगात असेही काही देश आहेत की जेथे पुस्तकांवर वाचकांच्या उड्या पडतात. एखाद्या पुस्तकाच्या दहा-वीस हजार प्रती एका दिवसात संपतात. पुस्तकासाठी लोक बुकस्टॉलपुढे थंडी-पावसातही रांगा लावतात. एवढेच नव्हे, तर लोकप्रिय पुस्तके चोरून छापली जातात व ती गुप्तपणे विकली जातात. झेकोस्लोव्हाकियाची राजधानी प्राग येथे आरबेस नावाचे एक एम्पोरियम आहे; त्यात वर्षाला ४ लाख पुस्तकांची विक्री होते. जागा अपुरी असूनही तेथे नेहमीच वर्दळ असते. दर गुरुवारी सायंकाळी ४ वाजता त्या आठवड्यात आलेल्या नव्या पुस्तकांची विक्री सुरू होते. त्यासाठी सकाळपासून शेकडो वाचक फूटपाथवर रांगा लावून उभे असतात.

**२४ तासांत लाख प्रतींची विक्री**

हंगेरीत ॲगाथा ख्रिस्तीच्या ' स्लीपिंग मर्डर ' या रहस्यकथेच्या १ लाख प्रती

२४ तासांत खपल्या. रेमंड चँडलरच्या ' फेअरवेल माय लव्हली 'च्या १'५ हजार प्रती पहिल्याच महिन्यात विकल्या गेल्या. स्वातंत्र्यासाठी नेपोलियनशी पोलिश सैनिकांनी दिलेल्या संघर्षाची पद्यमय कहाणी रंगवणाऱ्या ' पान तादेउत्झ ' या पुस्तकाच्या १९८५ या एका वर्षात १० लाख प्रती खपल्या.

पोलंडमधील नीनाकी या साठीतल्या कादंबरीकाराच्या ' वन्स ए इयर इन स्किरोलावकी ' या कादंबरीच्या १९८४ साली १ लाख २० हजार प्रती हातोहात उडाल्या. वास्तविक हा पोलिश सरकारच्या मर्जीतला लेखक; परंतु पोलिश सरकार-बद्दल जनतेला प्रेम नसले तरी नीनाकीने आपल्या लेखनाने जनतेला वेड लावले आहे. एका काल्पनिक खेड्यातील गावकऱ्यांची हळूहळू अशी खात्री पटत जाते की आपल्या खेड्याला एका विशिष्ट दिवशी मुक्त रतिक्रीडेचा दैवी आदेश लाभलेला आहे, ह्या प्रचलित दंतकथेत सत्यांश आहे, या कल्पनेभोवती ' वन्स ए इयर इन स्किरोलावकी ' या कादंबरीची उभारणी झालेली आहे. नीनाकी तसा नशीबवान लेखक म्हणायला हवा; कारण शासकीय मान्यता असलेल्या लेखकांची पुस्तके फारशी खपत नाहीत. ती कपाटात धूळ खात पडतात. परंतु नीनाकील मात्र लोकप्रियता चांगली लाभलेली आहे. त्याला मानधनही उत्तम मिळतो मसुरियन लेक डिस्ट्रिक्टमध्ये एका आलिशान बंगल्यात तो राहतो. आचार्य अत्रे यांच्यासारखेच त्याचे एकूण व्यक्तिमत्त्व आहे. त्यामुळे त्याच्याबद्दलच्या अनेक गोष्टी चवीने लोक सांगत असतात.

### नवलाची बाब

पुस्तकांवर प्रेम करणारे असे हजारो, लाखो वाचक ज्या देशांत आहेत त्या देशांबद्दल अर्थातच कुतूहल वाटणारच. पोलंड, हंगेरी, रुमानिया, पूर्व जर्मनी, बल्गेरिया इत्यादी साम्यवादी गोटातील हे देश आहेत; आणि तेथे टेलिव्हिजन, रेडिओ वगैरे घरोघर असूनही पुस्तके वाचण्यासाठी लोक इतके उत्सुक असतात याचे नवलही वाटेल.

तेथील सरकारी मालकीच्या टेलिव्हिजन-रेडिओवर अत्यंत रटाळ व प्रचारात्मक कार्यक्रम होतात; त्यामुळे आपल्याकडील प्रेक्षकांप्रमाणे दूरदर्शनचे कार्यक्रम सुरुवातीपासून अखेरपर्यंत बघत बसायला तिकडे कोणी तयार नसते. वृत्तपत्रे-मासिके इ. सर्व सरकारी मालकीची; आणि शासकीय धोरणे सांभाळून लेख-

बातम्या देणारी– ' लोकराज्य 'सारखी. त्यामुळे त्यांच्यावरून एक नजर फिरवून ती दूर सारणारेच वाचक जास्त. या सर्व देशांत कागदाची भीषण टंचाई आहे; कारण तेथे कागद तयार होत नाही. परदेशातून आयात करावा लागतो. त्याचा वापर फारच काटकसरीने केला जातो. कोरा कागद मुद्रणासाठी शासनाच्या परवानगीनेच मिळू शकतो.

## सरकारच पुस्तके प्रसिद्ध करते

प्रकाशन व्यवसायही पूर्णतया सरकारी खात्यांमार्फत चालतो. कल्पना करा की, साहित्य संस्कृती मंडळासारख्या शासकीय संस्थेवरच आपल्या मराठी भाषेतील सर्व पुस्तके प्रकाशित करण्याची जबाबदारी सोपवली गेली तर ? या मंडळातर्फे प्रसिद्ध होणारी पुस्तके, त्यांची निवड, त्यांच्या मुद्रणातील विलंब, त्यांच्या वितरणाबाबतची अनास्था व गैरव्यवस्था इ. गोष्टींची आपल्याला कल्पना आहेच. नोकरशाहीच्या हाती पुस्तक प्रकाशनाचे काम सोपवले की त्याचे जे काही धिंडवडे आपल्याकडे निघतात, तसेच ते पूर्व युरोपातील राष्ट्रांतही निघतातच. एक तर नोकरशाही या कामाकडे मद्दडपणे बघते. दुसरे, एखादे पुस्तक व त्यातील काही भाग शासनकर्त्यांना आवडला नाही वा सरकारी ध्येयधोरणावर दूरान्वयानेही टीकाटिप्पणी करणारा असला तर आपली धडगत नाही अशा भीतीची टांगती तलवार सारखी लटकत राहते. त्यामुळे अगदी निरुपद्रवी पुस्तकेच प्रकाशनासाठी निवडण्याकडे अशा शासकीय प्रकाशन समित्यांचा कल असतो. निवडलेल्या पुस्तकांची हस्तलिखितेही वर्षानुवर्षे पडून राहतात. कारण कागदाची उपलब्धता, मुद्रणालयाची सवड आणि शासकीय निधीची तरतूद यांचा मेळ घालणे ही कठीण कसरत असते. त्याबरोबरच प्रतींची संख्या व पुस्तकांची संख्या यावरही मर्यादा पडतेच. एखादे पुस्तक वाचकांना आवडले, चांगले खपले तरी त्याच्या जादा प्रती वा जादा आवृत्ती लगेच निघतीलच अशी खात्री नसते. मागणीच्या मानाने पुस्तकांच्या दुकानात पुरेशी पुस्तके क्वचितच उपलब्ध असतात. त्यामुळे पुस्तक छापून दुकानात आले रे आले की ते लगेच विकले जाते. नंतर कधी संदर्भासाठी पुस्तक हवे असले तरी मिळणे दुरापास्त असते. वाचनालयातून पुस्तक मिळवायचे हेही एक दिव्यच ठरते.

या सर्व देशांत साक्षरतेचे प्रमाण जवळजवळ शंभर टक्के आहे; आणि

आर्थिकदृष्ट्या स्वास्थ्य असल्याने, अन्नवस्त्राची कमतरता नसल्यामुळे जीवनमानही चांगले आहे; परंतु करमणुकीची साधने मात्र तोकडी आहेत. वृत्तपत्रे-मासिके ही सर्व शासनातर्फेच निघत असल्याने आणि त्यात येणाऱ्या मजकुरावर बरीच नियंत्रणे असल्याने वाचकांची जिज्ञासा ती पूर्ण करू शकत नाहीत. या सर्व देशांत अन्नधान्यापासून सर्वच वस्तू रेशनवर मिळतात; रेशन दुकानापुढे लांबच लांब रांगा लावून तासन् तास उभे राहणे हा येथील जीवनक्रमातला एक अविभाज्य सर्वमान्य भाग आहे. त्यामुळे रांगेत उभे राहिल्यावर वेळ घालवण्यासाठी एखादे पुस्तक बरोबर ठेवणे ही येथील मोठीच गरज आहे.

## काळ्या बाजारात पुस्तके

पोलंडमध्ये शासनातर्फे चालवण्यात येणाऱ्या ४३ प्रकाशन संस्था आहेत; आणि त्यांच्या वतीने विविध पुस्तकांच्या सुमारे २५ कोटी प्रती प्रसिद्ध होतात. माणशी ६-७ पुस्तके असे प्रमाण तेथे पडते. अमेरिकेत दरवर्षी सुमारे २१० कोटी प्रती निघतात. माणशी प्रमाण ९ ते १० पुस्तके असे पडते. परंतु ही आकडेवारीही काहीशी फसवी ठरते. कारण अमेरिकेत अन्य देशांतूनही विपुल पुस्तके येतात आणि अन्यत्र निर्यातही केली जातात. पोलंडमध्ये परदेशातून येणाऱ्या पुस्तकांची संख्या फारच मर्यादित असते. अधिकृतरीत्या आयात होणाऱ्या पुस्तकांची संख्या मागणीच्या मानाने अत्यल्प असल्याने चोरूनही मोठ्या प्रमाणावर पुस्तके आणली जातात. ती काळ्या बाजारात विकली जातात. चार्ल्स डिकन्स, मार्क ट्वेन, अर्नेस्ट हेमिंग्वे, ॲगाथा ख्रिस्ती, ॲलिस्टर मॅक्लीन वगैरेंची पुस्तकेही येथे प्रचंड खपतात. पोलंडमध्ये एखादे नवे पुस्तक बाजारात आले की पहिल्या तीन आठवड्यांत ते निम्मे अधिक संपते व वर्षभरात दुर्मिळ होते असे सांगण्यात येते. इसाक असिमोव्ह, आर्थर सी. क्लार्क, रे ब्रॅडबरी वगैरेंच्या विज्ञानकथांनाही तेथे मोठी मागणी असते...

## पुस्तके मोजकी मागणी अफाट

पोलंडमध्ये भूमिगत प्रकाशन व्यवसाय हा त्यामुळे जोरात चालतो. परदेशातील लोकप्रिय पुस्तके तेथे चोरून छापली जातात आणि ती काळ्या बाजारात विकली जातात. काही प्रकाशक वर्षानुवर्षे सरकारी यंत्रणेच्या डोळ्यांत धूळ फेकून हा

व्यवसाय नित्यनेमाने करीत आहेत. काहींनी त्यासाठी कारावासही पत्करला आहे. खुद्द पोलंडमधील अनेक लेखकांची पुस्तकेही भूमिगत प्रकाशकांकडून प्रसिद्ध होतात; आणि त्यांचा खपही दणकेबाज होतो. शासकीय प्रकाशन संस्थांनी एखादे पुस्तके स्वीकारले तरी ते किती काळाने प्रसिद्ध होईल याचा काहीच भरवसा नसतो. त्यामुळे अनेक लेखक, कवी भूमिगत प्रकाशकांकडे वळतात. त्यामुळे पुस्तके लगेच बाहेर पडते आणि तात्बडतोब त्याचे वितरणही सर्वदूर होते.

सरकारतर्फे प्रसिद्ध होणारी पुस्तके रटाळ आणि निरुपद्रवी असणार, अशीही समजूत असल्याने त्यांचा खप बेताचाच होण्याची शक्यता असते. त्या मानाने चोरटेपणातले थ्रिल हे वाचकाला अधिक आनंददायक वाटत असावे अशी मानसशास्त्रीय शक्यता संभवतेच. सरकारमान्य लेखक म्हणजे सर्कशीतले माणसाळलेले प्राणी. त्यामुळे त्यांना कोणी वाचक विशेष महत्त्व देत नाहीत. परंतु नीनाःक्रीसारखे काही लेखक याला अपवादही आहेत. त्यांची पुस्तके सरकारमान्य प्रकाशनाद्वारे प्रसिद्ध होऊनही हातोहात खपतात; परंतु त्यांच्या प्रतींची संख्या मर्यादित असल्याने बऱ्याच वाचक-ग्राहकांना ती विकत घेऊन स्वतःच्या संग्रही ठेवण्याच्या आनंदापासून वंचित राहावे लागते. ते काळ्या बाजारात त्यासाठी वाटेल ती किंमत द्यायला तयार असतात. सरकारने बंदी घातलेल्या लेखकांची पुस्तकेही चोरून छापली जातात व शासनाला चकवण्यासाठी दुसरीच कुठली तरी कव्हर्स वर टाकून दिली जातात.

**वर्षभरात १० लाख प्रतींची विक्री**

अर्थात शासनाच्या अधिकृत प्रकाशकांद्वारे प्रसिद्ध होणारी सर्वच पुस्तके वाईट वा रटाळ असतात असेही नाही. सध्या थोडेफार वातावरण मोकळे होऊ लागले आहे. त्यामुळे वाचकांना आवडतील अशीही पुस्तके बाहेर पडत आहेत. ‘ दि आर्ट ऑफ लव्हमेकिंग ’ हे कामविज्ञानाची सुलभ माहिती देणारे पावणेतीनशे पृष्ठांचे पुस्तक. पोलंडमध्ये त्याच्या १० लाख प्रती विकल्या गेल्या आहेत. रोमन कॅथॉलिक पंथाच्या पुरस्कर्त्यांनी या पुस्तकावर टीकेची जोरदार झोड उठवली आहे; आणि या पुस्तकात ‘ दररोजच्या कंटाळवाण्या जीवनावर उतारा म्हणून रतिक्रीडा व मेजवान्या यात रममाण होणे ही वाईट सवय आहे ’ अशासारखी उपदेशपर वचनेही जागोजाग विखुरलेली आहेत. तरीही हे पुस्तक बेस्ट सेलर

ठरले आहे.

लोकांनी काय वाचावे, काय चांगले आहे, याबद्दल समीक्षक आणि प्रकाशक ( किंवा शासक ) यांचे मत आणि पुस्तके विकत घेऊन वाचणाऱ्या ग्राहकांचे मत यांत असे अंतर अर्थात आपल्याकडेही आढळतेच.

### कधी अंगलटही येतात

शासनाने प्रसिद्ध केलेल्या पुस्तकांमुळेही काही वेळा पेचप्रसंग निर्माण होतात. डॉ. आंबेडकरलिखित ' रिडल्स ऑफ रामा अँड कृष्ण ' यांसारखे प्रकरण शासनाने प्रसिद्ध केलेल्या पुस्तकातून गाळावे अशी शासनाकडेच मागणी होते. रुमानियामध्ये मारिन ग्रेडा या लेखकाचे स्टॅलिनच्या कारकीर्दीची चिरफाड करणारे ' मोस्ट ब्रिलव्हेड ऑफ ह्यूमन्स ' हे पुस्तक प्रसिद्ध झाले आणि ते तुफान खपले. परंतु त्या पुस्तकात स्टॅलिन राजवटीवर केलेली टीका रुमानियातील तत्कालीन राजवटीलाही लागू पडते हे काही शासनकर्त्यांच्या लक्षात आल्याबरोबर त्या पुस्तकाचे वितरण थांबवण्यात आले. १६ मे १९८० रोजी मारिन ग्रेडा संशयास्पद परिस्थितीत मृतावस्थेत आढळला. त्याची शासनाकडून हत्या करण्यात आली असा लोकापवाद आहे.

१९८२ मध्ये ' ए फेस ' या नावाची ब्लागा दिमित्रोवा हिची कादंबरी बल्गेरियात प्रसिद्ध झाली. दुसऱ्या महायुद्धात नाझींशी लढा देणाऱ्या काही तरुणांचा स्टॅलिनच्या दबावामुळे पुढे छळ झाला; त्यामुळे त्यांच्यात निर्माण झालेल्या वैफल्याचे चित्रण या कादंबरीत करण्यात आले होते. प्रसिद्ध झाल्याबरोबर हे पुस्तक हातोहात विकले गेले. परंतु बल्गेरियन सरकारने त्यावर लगेच बंदी आणली. आज हे पुस्तक झेरॉक्स करून चोरबाजारात विकले जात आहे. जेम्स बाँडच्या धर्तीवरील बल्गेरियन सीक्रेट एजंट आवाकुम झखोव्ह यांच्या हेरकथाही तेथे खूप लोकप्रिय आहेत.

### बंडखोर प्रकाशन संस्था

झेकोस्लोव्हाकियात शासनाच्या गैरमर्जीतल्या लेखकांची पुस्तके उघडपणे प्रकाशित होऊ शकत नाहीत; तेथे फोटोस्टॅट झेरॉक्स प्रतींची चलती आहे. नोबेल पारितोषिक विजेता जरोस्लाव सीफर्ट याच्या आठवणींची सेन्सॉर केलेली

प्रतच तेथे अधिकृतपणे उपलब्ध आहे; परंतु न कापलेली प्रत मात्र छुप्या प्रकाशकांकडून चोरबाजारात विकली जाते; आणि तिच्यावर वाचकांच्या उड्या पडतात. जाझ सेक्शन नावाच्या एका बंडखोर टोळक्याने जप्त केलेली अशी अनेक पुस्तके गुप्तपणे छापून विकली आहेत. त्या टोळक्यातील काहीजणांना तुरुंगातही डांबण्यात आले; परंतु प्रकाशनात मात्र खंड पडला नाही. मिलान कुंदेरा, जोसेफ सोरेकी यासारखे अग्रगण्य कादंबरीकार कडक सेन्सॉरशिपला वैतागून परदेशी स्थलांतर करण्यास उद्युक्त झाले. त्यांची पुस्तके झेकोस्लोव्हाकियात उघडपणे बाळगणे हा गुन्हाच आहे.

**आत्मपर पुस्तकांना मागणी**

हंगेरीमध्ये पुस्तक प्रकाशनाची सर्व जबाबदारी शासकीय प्रकाशकांवर आहे. परंतु तेथील मुद्रणालयांना एक सवलत देण्यात आली आहे. जादा वेळ काम करून ही मुद्रणालये आपल्या पसंतीची पुस्तके छापू शकतात. पण त्यांच्या जवळच्या यंत्रसामग्रीच्या मर्यादेमुळे जास्त खपणाऱ्या पुस्तकांच्या जादा प्रती काढण्याकडेच त्यांचा कल दिसतो. हंगेरीत विद्यार्थिवर्गाला परदेशातून आयात केलेली पाठ्यक्रमातील पुस्तके मात्र अर्ध्या किंमतीत मिळतात. टी एस. एलियट, इरिस मरडॉक, फॉकनेर, मोराविया, हेन्री जेम्स, जे. डी. सॅलिंजर, टॉमस हार्डी यांसारखे लेखक या सोयीमुळेच तेथे वाचायला मिळतात. पाश्चात्त्य पुस्तकांची पूर्व युरोपमधील वाचकांना भलतीच ओढ आहे; आणि त्यासाठी वाटेल ती किंमत मोजण्याची त्यांची तयारी असते. तेथील स्थानिक लेखकांपेक्षा पाश्चात्त्य लेखकांना तेथे अधिक वाचकवर्ग मिळतो. लंडन-बुडापेस्ट येथील प्रवासात आपल्याला आलेले वेगवेगळे लैंगिक अनुभव चविष्टपणे कथन करणारे पॉप सिंगर सारोल्टा झलाटने हिचे ' आय ॲम नो नन ' हे पुस्तकही खूपच खळबळ उडवून देणारे ठरले. माओ त्से तुंगच्या ' लिटल रेड बुक 'चे विडंबन करणारे ' पॉकेट हंगेरियन पोर्नोग्रफी ' हे पुस्तक बाजारात आल्याबरोबर त्याच्या २५ हजार प्रती एका आठवड्यात संपल्या. नोकरशाही, गुप्त पोलिस, शासकीय अधिकारी वगैरेंची खिल्ली उडवणारे हे पुस्तक अधिकृतपणे हंगेरीत प्रसिद्ध झाले याचेच काहींना आश्चर्य वाटले. हंगेरीच्या सोकर संघातील राजकीय हेवेदावे, भ्रष्टाचार व बनवेगिरी यांचा गौप्यस्फोट करणारे ' दि इनक्युरेबल ' हे माहितीपर

पुस्तकही लोकप्रिय ठरले. विश्वचषक स्पर्धेत हंगेरीचा रशियाने ६ विरुद्ध शून्य असा दणदणीत पराभव केला, त्याची कारणमीमांसा या पुस्तकात करण्यात आली आहे. पराभवानंतर दोन-तीन महिन्यांनीच बाजारात हे पुस्तक आले आणि त्याच्या पाच लाख प्रती खपल्या. एखाद्या घटनेनंतर इतक्या अल्पावधीत असे एखादे पुस्तक प्रसिद्ध होणे हाही तेथील नाकर्त्या, नाठाळ नोकरशाहीच्या कार्यपद्धतीला सरावलेल्या नागरजनांना एक सुखद धक्काच वाटला.

### जे दुष्प्राप्य त्यावर उड्या

आपल्या देशातील शासनपद्धती, राजकारण, नोकरशाही, बंधने यांच्यावर टीकात्मक, विडंबनात्मक, उपहास–उपरोधात्मक लेखनच बहुसंख्य लेखकांकडून होत राहते. अमेरिकन गुप्तहेरकथांची नक्कल करायची; पण नायक मात्र स्थानिक निवडायचा व वातावरणही स्थानिक रंगवायचे अशी प्रवृत्ती तेथील लेखकांत प्रबळ दिसते. अशी पुस्तके तेथील वाचकांनाही प्रिय आहेत.

भारतातले प्रकाशक व लेखकदेखील अशा नाना क्लृप्त्या लढवत आहेत; परंतु भारतीय वाचक मात्र क्वचितच पुस्तकांवर उड्या मारतो. त्यामुळेच पूर्व युरोपमधील लेखकांच्या पुस्तकांवर वाचक जसे तुटून पडतात; आणि लाख लाख प्रतींचा खप हां हां म्हणता होतो हे दृश्य कल्पनेनेही डोळ्यांसमोर रंगवताना मोठे सुख होते. जे सुलभ मिळते त्याची आपल्याला किंमत वाटत नाही; जे दुष्प्राप्य असते त्याच्या प्राप्तीसाठी आपण जिवाचे रान करायला तयार असतो, असे हे वाचकांचे चमत्कारिक मानसशास्त्र आहे.

( महाराष्ट्र टाइम्स : २७ डिसेंबर १९८७ )

# ३

# रशियन मायभूमीने दूर लोटलेले साहित्यिक

१९८७ चे वाङ्मयाचे नोबेल पारितोषिक मिळवणारा कवी जोसेफ ब्रॉडस्की; जन्माने रशियन ज्यू; पण सध्या वास्तव्य अमेरिकेत. वयाच्या ३२ व्या वर्षी १९७२ साली रशियातून त्याला 'अनिच्छेने हद्दपार' व्हावे लागले. कारण त्याला कवी व्हायचे होते; आणि रशियात कवी म्हणून पेशा पत्करायचा असेल तर तेथील लेखक संघटनेची मान्यता मिळवावी लागते. जोसेफ ब्रॉडस्कीचे शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर त्याला एका कारखान्यात कामाला जाण्याचा आदेश मिळाला; परंतु त्या कारखान्यातील यांत्रिक वातावरणात त्याचे मन रमले नाही. त्याला कविता करायचा नाद होता; आणि कामाऐवजी तो कविता रचण्यात आणि चिंतनात गढलेला असे. त्याला वरचेवर कामचुकारपणासाठी तंबी दिली जाई, बेशिस्त आणि बेजबाबदार वर्तनाबद्दल मेमो दिले जात; परंतु ब्रॉडस्कीला त्या मेमोंची मुळीच पर्वा नसे. त्याचे चित्त त्या कारखान्यातल्या यांत्रिक कामात कधीच नसे. शेवटी त्या कारखान्याच्या व्यवस्थापनाने त्याला येथून दुसरीकडे कुठेतरी टाका, असे संबंधित अधिकाऱ्यांना कळवले आणि ब्रॉडस्कीला तेथून मुक्त करण्यात आले.

**लेखक संघटनेकडून नकार**

'तुला कुठल्या कामात रस आहे', असे ब्रॉडस्कीला विचारण्यात आले. त्याने उत्तर दिले, "मला कविता करण्यात रस आहे."

त्याची रवानगी अर्थातच रशियन लेखक संघटनेकडे करण्यात आली. त्याने लिहिलेल्या कवितांमधील सरकारी अधिकृत धोरणाबद्दल अधिक्षेप आणि सामाजिक वास्तवाच्या चौकटीत न बसणाऱ्या रोमँटिक कल्पनांची उधळण पाहून लेखक संघटनेने त्याला आपला सदस्य करून घेण्यास नकार दिला. त्याच्या फक्त चार कविताच काय त्या रशियन वाङ्मयीन मासिकात प्रसिद्ध होऊ शकल्या; परंतु लेखक संघटनेची मान्यता नसल्याने त्यापुढे कोणीही त्याच्या कविता प्रसिद्ध करीना. सर्वच बाजूंनी सगळे दरवाजे बंद झालेले ब्रॉडस्कीला दिसले.

## सामाजिक बांडगूळ

पुन्हा त्याला कारखान्यात पाठवण्यात आले. परंतु तोही कमालीचा हट्टी आणि कोडगा होता. कारखान्यातील कामात लक्ष द्यायची त्याची तयारीच नव्हती. साहजिकच 'या कारखान्यातून त्याला दुसरीकडे न्या,' अशी विनवणी कारखान्याच्या अधिकाऱ्यांनी शासनाकडे केली. "काम नीट कर; तुला फुकट पोसायला देशाजवळ अन्नधान्याच्या राशी अतिरिक्त पडलेल्या नाहीत," असे त्याला सांगण्यात आले; परंतु ब्रॉडस्कीच्या वर्तनात सुधारणा होईना.

अखेर त्याला 'सामाजिक बांडगूळ' ठरवून सैबेरियात एका सामूहिक शेतावर मजूर म्हणून पाठवण्यात आले. पाच वर्षे मुदतीची ही शिक्षा ब्रॉडस्कीला देण्यात आली. एवढेच नव्हे, तर त्याच्या आई-वडिलांचे निवृत्तिवेतनही थांबवण्यात आले.

त्या सामूहिक शेतावरही जोसेफ ब्रॉडस्की कामात लक्ष देईना. त्यामुळे तेथील अधिकारीही त्याला वैतागले आणि याला येथून हाकला, अशी मागणी करू लागले. कसल्याही धाकदपटशाला, शारीरिक छळाला दाद न देता, ब्रॉडस्कीचा एकच एक आग्रह होता– "मी कवी आहे, मला कविता लिहिण्यासाठी मोकळा वेळ हवा. इतर कुठल्याही कामात मला रस नाही. मी ते करणार नाही." ब्रॉडस्कीचा हा एक प्रकारचा सत्याग्रहच होता.

त्याला तुरुंगात डांबण्यात आले; परंतु तेथेही त्याचे वर्तन हे आडमुठ्या सत्याग्रह्याचेच राहिले.

ब्रॉडस्कीच्या या सत्याग्रहाला कसे तोंड द्यावे, असा प्रश्न तुरुंगाच्या अधिकाऱ्यांना तसेच रशियन राज्यकर्त्यांना पडला. शेवटी ही ब्याद येथे नको, असे ठरवून त्यांनी ब्रॉडस्कीला सुनावले, "हे बघ, इथं राह्यचं तर कवी बनण्याचं वेड डोक्यातून

काढून टाक. शेतावर वा कारखान्यात निमूटपणे काम कर. तरच तुला पगार मिळेल आणि इथं राहता येईल. नाही तर तू दुसऱ्या कुठल्या देशात जाऊन राहा. इथून तुझं तोंड काळं कर."

**गद्यलेखनासाठी इंग्रजीचा आश्रय**

ब्रॉडस्कीने परदेशात वास्तव्य करण्याचे ठरवले. अमेरिकेत त्याने १९७२ साली आश्रय घेतला. इंग्रजी भाषा त्याला नीट येत नव्हती; परंतु ती भाषा त्याने रात्रंदिवस अभ्यास करून आत्मसात केली. कविता करायच्या त्या रशियन भाषेत; वृत्तपत्रांसाठी पुस्तक परीक्षणे, लेख वगैरे गद्यलेखन करायचे इंग्रजीत, असा धडाका त्याने लावला. कोलंबिया विद्यापीठात काही विषय शिकवण्याचे कामही मिळाले. अशा रीतीने उदरनिर्वाहाचा आणि आपल्या आवडीचे काम करण्याचा प्रश्न त्याने सोडवला. ब्रॉडस्कीच्या काही कवितांची इंग्रजीत भाषांतरे झाली. स्वतःही त्याने काही कवितांची भाषांतरे केली. 'ए पार्ट ऑफ स्पीच' हा त्याचा काव्यसंग्रह फरार, स्ट्रॉस अँड गिराऊ या प्रकाशन संस्थेने काढला. त्याला मॅकआर्थर फाऊंडेशनचे १९८१ सालचे दोन लाख डॉलर्सचे पारितोषिक मिळाले; अनेक अभ्यासवृत्त्या आणि बक्षिसे मिळाली. सध्या तो न्यूयॉर्कचा रहिवासी असून युरोपमध्येही अधूनमधून त्याचे दौरे चालू असतात.

त्याचे वृद्ध आईवडील रशियातच असतात. गेली १२ वर्षे ते रशियन सरकारकडे मुलाला भेटण्यासाठी अमेरिकेला जाण्याची परवानगी मागत होते; पण त्यांना ती परवानगी देण्यात आली नाही. अशी भेट निष्कारण, निर्हेतुक आहे, असे रशियन सरकारचे म्हणणे होते. ब्रॉडस्की त्यांना आठवड्यातून एकदा फोन करी. परंतु जवळ खूप पैसे असूनही ती आईवडिलांना पाठवू शकत नव्हता; पुस्तके व कपडे पाठवता येत.

आपली अवस्था ही पाण्याबाहेर काढून वाळूवर टाकलेल्या माशासारखी आहे, असे तो आजही मानतो; आणि आपल्याप्रमाणेच आपला मायदेश सोडून अन्य देशात राहण्याची पाळी ज्यांच्यावर येते त्या लेखक-कवींची अशीच तडफड चालू असते, असे तो म्हणतो.

आपण रशियाबाहेर पडलो आणि आपल्या मनाप्रमाणे लेखन करू शकलो याचे त्याला समाधान वाटते; परंतु अनेक प्रतिभाशाली कवी रशियात खितपत

पडलेले आहेत याचे शल्य त्याच्या मनात आहेच. आणि परदेशात राहणाऱ्या अनेक रशियन कवींना अजून चांगले अनुवादक वा भाषांतरकार न मिळाल्याने त्यांच्या साहित्याची व प्रतिभेची उपेक्षाच होत आहे याचेही दुःख तो प्रकट करतो. लेव लोसेव, युरी कुब्लानोवस्की, दिमित्री बॉबीशेव वगैरे कवींचा तो या संदर्भात उल्लेख करतो.

नोबेल पारितोषिक मिळाल्यावर जोसेफ ब्रॉडस्कीचे इंग्लिश टीकात्मक लेखही संग्रहरूपाने बाहेर पडले. पेंग्विनने 'लेस दॅन वन' हे त्याचे पुस्तक १८८८ साली प्रसिद्ध केले. ५०० पृष्ठांच्या या पुस्तकात 'लेस दॅन वन' हा आत्मवृत्तपर लेख आहे. त्याशिवाय 'गाइड टु ए रिनेम्ड सिटी' ( लेनिनग्राड – ब्रॉडस्कीचे जन्मगाव ) 'फ्लाइट टु बिझँटियम' ( प्रवासवर्णन ), 'फूटनोट टु ए पोएम, ऑडेनच्या १ सप्टेंबर १९३९ या कवितेवर व्याख्यान, अॅना कॅरेनिना, डोस्टोवस्की, प्लॅटोनोव्ह, वॉलकॉट, ओसिप मांदेलश्ताम वगैरे लेखकांवरील समीक्षात्मक निबंध वगैरेंचा समावेश आहे. ब्रॉडस्कीच्या या टीकात्मक लेखांतून त्याच्या भाषेवरील प्रेमाचा आणि वाङ्मयीन दृष्टीच्या वेगळेपणाचा प्रत्यय येतो.

### हद्दपार लेखकांची संख्या मोठी

ब्रॉडस्कीसारखेच अनेक रशियन लेखक आज रशियातून हद्दपार होऊन परदेशात राहत आहेत आणि आपल्यातील कलावंताची जपणूक करीत आहेत. युरोप-अमेरिकेत अशा हद्दपारित रशियन लेखकांची संख्या पन्नासावर सहज जाईल. १९७०-८० या दशकात रशियाचा त्याग करून बाहेर पडलेले हे लेखक पाश्चात्त्य वाङ्मयीन विश्वावर आपला ठसा उमटविण्यात कमीजास्त यशस्वी ठरत आहेत. रशियन पुस्तकांची इंग्रजी भाषांतरे आता अधिक वेगाने अमेरिकेत उपलब्ध होत आहेत. रशियात प्रसिद्ध होऊ न शकलेल्या वा रशियात बंदी असलेल्या कादंबऱ्यांची भाषांतरेही युरोप-अमेरिकेत सध्या मिळू लागलेली आहेत. या लेखकांनी युरोप-अमेरिकेत वास्तव्य केल्यावरदेखील रशियन भाषेतच वैशिष्ट्यपूर्ण कथा-कादंबऱ्या लिहिल्या असून त्याही प्रसिद्धीच्या झोतात येत आहेत.

हद्दपारीचे जीवन जगणाऱ्या अशा लेखकांत वासिली अक्स्योनोव, सर्जी दोवलातोव, युझ अलेक्शोवस्की, आंद्रे सिन्यावस्की, साशा सोकोलोव, अलेक्झांडर सोल्झेनित्सिन यांचा प्रामुख्याने उल्लेख करता येईल. ( मराठीत हे उच्चार

इंग्रजी स्पेलिंगच्या अनुरोधाने लिहिले आहेत. मूळ रशियन उच्चार यापेक्षा वेगळे असू शकतील हे चोखंदळ वाचकांना नम्रपणे सांगू इच्छितो. फ्रेंच वा अन्य भाषिक नावांचेही इंग्रजी स्पेलिंगवरून होणारे उच्चार आपण देतो. मूळचे उच्चार जाणकारांनी प्रमाणित केल्यास मोठी सोय होईल. )

**सोल्झेनित्सिन**

यांपैकी आपल्या सर्वाधिक परिचयाचे नाव अर्थातच असणार अलेक्झांडर सोल्झेनित्सिन हे. व्हेरमाँटच्या ग्रामीण भागात त्याने ५० एकर जमीन खरेदी केली असून तिथेच तो बहुतेक वेळ घालवतो. आपल्या इस्टेटीच्या बाहेर तो पडत नाही. अमेरिकेत येऊन स्थायिक होण्यापूर्वी लिहून झालेली त्याची पुस्तके पुढे हळूहळू प्रसिद्ध झालेली आहेत. त्यांपैकी ‘ दि ओक अँड दि काफ ’, ‘ वॉर्निंग टु दि वेस्ट ’ वगैरे त्याची पुस्तके चांगली खपली आहेत. १९६२ साली सोल्झेनित्सिनची ‘ वन डे इन दि लाइफ ऑफ इवान डेनिसोविच ’ ही कादंबरी प्रसिद्ध झाली. त्यानंतरची १५ वर्षे लेबर कँप्समध्ये वा भूमिगत म्हणून त्याला काढावी लागली. अमेरिकेत आल्यावर त्याचे नवे लेखन काय चालले आहे याबद्दल काहीसे गूढच आहे. ‘ ऑक्टोबर १९१६ ’ ही त्याची कादंबरी प्रसिद्धीपूर्वीच खूप कुतूहलाचा विषय बनलेली आहे. ‘ दि फर्स्ट सर्कल ’ या त्याच्या कादंबरीने स्टॅलिनच्या कारभाराचे प्रत्ययकारी दर्शन घडवले होते.

परंतु सोल्झेनित्सिनसारखे सारेच हद्दपारित रशियन लेखक भाग्यवान आहेत असे मात्र नाही. अनेकांना अमेरिकन वाङ्मयीन विश्वात अजून स्वतःचे स्थान मिळालेले नाही.

साशा सोकोलोव यांच्या ‘ स्कूल फॉर फूल्स ’ या कादंबरीचे इंग्रजी भाषांतर खूप प्रयत्नांनीही नीटस होऊ न शकल्याने आणि तिच्यातील अर्थवाही प्रतिमांचे आणि तरल कल्पनांचे वैभव इंग्रजीत नेमके हरवले गेल्याने, इंग्रज वाचकांच्या पसंतीला उतरू शकले नाही. एका स्किझोफ्रेनिक तरुणाच्या दोन व्यक्तित्वांत चाललेल्या अंतर्गत संघर्षाच्या व संवादाच्या स्वरूपात ही कादंबरी लिहिण्यात आलेली आहे. चांगल्या भाषांतरकारांची वाण ही अनेक रशियन लेखकांना अज्ञातवासात जगणे भाग पाडते.

साशाप्रमाणेच अरकाडी एलवोव या लेखकाच्या ‘ दि कोर्टयार्ड ’ या कादं-

बरीचीही अमेरिकन प्रकाशकांनी उपेक्षाच केली आहे. ८०० पृष्ठांची ही द्विखंडात्मक कादंबरी प्रकाशनासाठी स्वीकारायला अजून कोणीच पुढे येत नाही. रशियातील एका अपार्टमेंट हाऊसमध्ये राहणाऱ्या काही सर्वसामान्य कुटुंबांचे परस्परांशी असणारे संबंध तपशीलवार नोंदवणारी, प्रचंड विस्तार असलेली ही कादंबरी. लेखक अरकाडीने तिचे हस्तलिखित आपल्याजवळच्या व्हॅक्यूम क्लीनरच्या ब्रशांच्या मुठीत दडवून रशियन अधिकाऱ्यांच्या डोळ्यांत धूळ फेकून अमेरिकेत आणले हे एक मोठेच आश्चर्य म्हणायचे.

## युझ अलेश्कोवस्की : विडंबनकार

युझ अलेश्कोवस्कीचा भर फार्सिकल विडंबनात्मक विनोदी लेखनावर असतो. रशियात असताना मुलांसाठी गोष्टी लिहून त्याला समाधान मानावे लागे. रशियात ज्या ज्या गोष्टींवर बंधने आहेत त्या त्या गोष्टींचा वापर आपल्या फार्सिकल शैलीतल्या लेखनात कच्च्या मालासारखा करण्यात युझला मोठी गंमत वाटे. कनेक्टिकटमधील वेस्लियन युनिव्हर्सिटीत संभाषणात्मक रशियन शिकवण्याचे काम अलेश्कोवस्की करीत असे.

त्याच्या 'निकोलाय निकोलायेविच' या कादंबरीचा नायक आपली कामवासना तृप्त करण्यासाठी सतत हस्तमैथुन करीत असतो. परंतु तो तैलबुद्धीचा असल्याने या आपल्या सवयीचा आपल्या फायद्यासाठी वापर करण्याची तो एक शक्कल काढतो. एका प्रयोगशाळेला तो आपले वीर्य प्रयोगासाठी विकतो; त्यासाठी त्याला एक बिनकामाची खास नोकरीही देण्यात येते. रशियन विज्ञानाच्या उज्ज्वल भवितव्यासाठी या नायकाने जे अपूर्व योगदान दिलेले आहे त्याबद्दल त्याचा गौरवही केला जातो. गांभीर्याचा घट्ट मुखवटा घालून केलेले हे विडंबन विदारक वास्तवाची तीव्रता लक्षात आणते.

अलेश्कोवस्कीची 'कांगारू' ही कादंबरीही अशीच धमाल उडवणारी आहे. स्टॅलिनच्या काळामध्ये राजकीयदृष्ट्या आपल्याला त्रासदायक वाटणाऱ्या व विरोध करणाऱ्या पक्षकार्यकर्त्यांकडून जबरदस्तीने वा चलाखीने कबुलीजबाब घेतले जात. 'डार्कनेस ॲट नून' या कादंबरीत आर्थर कोसलरने असे कबुलीजबाबही स्वेच्छेने मिळवले जाण्याबाबत छळाचे वेगवेगळे मार्ग कसे वापरले जात त्याचे वास्तव चित्रण केलेले आहे. एक व्यावसायिक अट्टल गुन्हेगार निवेदन करीत

आहे अशा थाटात ' कांगारू 'चे लेखन करण्यात आलेले आहे. हा अट्टल गुन्हेगार मॉस्कोमधील प्राणिसंग्रहालयातील सर्वांत वृद्ध कांगारूवर आपण बलात्कार केला असा कबुलीजबाब देताना दाखवला आहे. गुन्हेगाराला शोभेल अशीच गावंढळ भाषा वापरण्यात आली आहे; आणि पोलिस यंत्रणा, कारागृह यंत्रणा, तसेच गुन्हेगारी जगतातील कार्यपद्धती यांचे उत्तम ज्ञान या सर्व निवेदनाच्या मुळाशी असल्याने या कादंबरीतील उपरोधाला आगळीच धार चढलेली आहे.

अलेक्झोवस्कीची आणखी एक कादंबरी आहे. ती अमेरिकेत राहणाऱ्या एका स्त्रीलंपट रशियन हद्दपारित तरुणाच्या जीवनावर आधारलेली आहे. हा तरुण एक कार भाड्याने घेऊन देखण्या सौंदर्याचा शोध घेण्याच्या मोहिमेवर निघतो. त्याची गाठ पडते ती एका सुंदर तरुणीशी. ही सुंदर तरुणी एफ.बी.आय. एजंट असते आणि त्या तरुणाच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी तिची नेमणूक झालेली असते. पण त्या तरुणाच्या वाक्‌चातुर्याने ती आपल्यावर सोपवलेले काम विसरून त्याच्या गळ्यात गळा घालते. एखाद्या रहस्यकथेसारखीच बाह्य रूपरेखा असलेली ही कादंबरी रशियन जीवनाच्या आणखी एका पैलूची टर उडवण्यासाठीच लिहिली गेली आहे.

### सर्जी डोवलातोव

सर्जी डोवलातोवचे वय अवघे ४४ आहे; आणि रशियात त्याचे काहीही लेखन प्रसिद्ध झालेले नाही. ७८ साली तो रशिया सोडून अमेरिकेत स्थायिक झाला. ' न्यू यॉर्कर ' या मासिकात त्याचे लेखन वरचेवर प्रसिद्ध होत असते. ' दि कॉम्प्रोमाइज ' हा त्याचा कथासंग्रह १९८६ साली प्रसिद्ध झाला. रशियन नोकरशाहीची चीड आणणारी संथ गती आणि दैनंदिन जीवनात अनुभवाला येणारा भ्रष्टाचार यावर या कथांचा रोख आहे. एका कथेत रशियातील बातम्या देण्याच्या नोकरशाही पद्धतीची झलक दाखवण्यात आली आहे. कम्युनिस्ट पक्षातील एक बडी असामी मरण पावते. तेव्हा त्याबद्दल बातमी देताना रशियन पत्रकार लिहितो की, " त्या उघड्या थडग्याजवळ उभे राहून पक्षाचे अधिकारी गंभीरपणे त्याचा निरोप घेणारे शब्द घोकत होते. " त्यापुढेच त्या बातमीला पुस्ती जोडली होती : शवागाराच्या पहारेकऱ्याने एक भलतेच प्रेत संबंधित

नेत्याच्या ऐवजी दर्शनासाठी ठेवल्याचे लक्षात आल्यावर तेथील उपस्थित जनसमुदायात एकच खळबळ माजली.

## नीना वोरोनेलची नाटके

नीना वोरोनेल ही रशियन नाटककार महिला सध्या इस्रायलमध्ये राहते. तेथे तिची दोन नाटके रंगभूमीवर आली. तिच्या पटकथांवर आधारलेली दूरदर्शन मालिकाही तयार झाली असून एका चित्रपटाचीही कथा तिने लिहिलेली आहे. अमेरिकेत ऑफ-ब्रॉडवेवरही तिच्या दोन एकांकिका सादर केल्या गेल्या. रशियातील आपल्या गतजीवनातील घटनांनाच ती नाट्यरूप देते. रशियातील गर्भपात केंद्रे आणि रशियन लेखकांसाठी चालवण्यात येणारे वृद्धाश्रम वगैरे संस्थांतील भीषण कारभाराचे, नोकरशाही मनोवृत्तीचे भेदक दर्शन नीना वोरोनेल आपल्या नाट्यकृतींतून उभे करते. रशियातील नाट्यगृहांनी आपली नाटके बसवावी यासाठी खूप प्रयत्न तिने केले; परंतु तेथील संस्थात्मक कारभाराच्या तिने रेखाटलेल्या वास्तवभेदक चित्रांमुळे कोणीही दिग्दर्शक त्या नाटकांना हात लावायला तयार होईना. त्यामुळे नाइलाजाने तिने रशिया सोडण्याचा निर्णय घेतला.

## छापले तर सैबेरियात धाडतील

लुडमिला श्टेर्न या लेखिकेलाही असाच अनुभव आला. लेनिनग्राडमध्ये भूगर्भशास्त्राची अध्यापिका म्हणून ती काम करायची. हौसेखातर फावल्या वेळात मुलांसाठी मजेदार गोष्टी लिहायची. आपल्याला भेटलेल्या विक्षिप्त वल्लींची शब्दचित्रे रंगवायची. दैनंदिन जीवनात रशियन माणसाला भेडसावणाऱ्या समस्या विनोदाची फोडणी देऊन सुसह्य बनवायची. जेव्हा ती आपल्या कथा वा व्यक्तिचित्रे घेऊन नियतकालिकांच्या कार्यालयात जायची, तेव्हा संपादक मंडळ त्या कथा-व्यक्तिचित्रांचे मोठ्याने वाचन करायचे आणि पोटभर हसायचे. वाचन संपल्यावर मात्र ते तिला सांगायचे, " लुडमिला, हे इतकं छान आहे; पण ते छापलं तर आम्हाला सैबेरियात जावं लागेल. पण एक काम कर. पुन्हा काही लिहिलंस तर जरूर दाखवायला आण. असं मोकळेपणानं हसायला लावणारं लेखन आपल्याकडे कोणीच लिहीत नाही. तुझ्या कथा वाचताना मोठीच मजा येते."

लुडमिला पुढे बोस्टनला राहू लागली. जमिनीची खरेदीविक्री करून पैसा

मिळते. तिच्या कथा तेथील छोट्यामोठ्या मासिकांत प्रसिद्ध होत; वाचकांचे लक्ष वेधून घेत.

### सर्वांत प्रभावी कादंबरीकार

वासिली अक्स्योनोव हा स्टॅलिनच्या मृत्यूनंतर उदयाला आलेला सर्वांत प्रभावी कथा-कादंबरीकार. त्याच्या वास्तववादी कथा तुफान लोकप्रिय झाल्या. त्याच्या कादंबरीच्या पहिल्या आवृत्तीच्या एक लाख प्रती ४८ तासांत खपत; आणि त्याची कथा असलेल्या मासिकाच्या प्रती २० लाख छापाव्या लागत. ' हाफ वे टु दि मून ' यासारख्या त्याच्या कथांवर वाचक तुटून पडत. स्टॅलिननंतरच्या काळात रशियात वाचकवर्गावर इतके वजन असणारा दुसरा साहित्यिक झाला नाही. वासिलीने गद्य लेखनात जेवढे भाषेचे प्रयोग केले तेवढे अन्य कोणी केल्याचे दिसत नाही. ' सोशॅलिस्ट रिअलिझम 'चा रशियात शासकीय पातळीवर सारखा ढोल बडवण्यात येत असला तरी वासिलीने मात्र त्याची कधीच भीड मनात बाळगली नाही. त्याचे वडील हे कझानचे कम्युनिस्ट महापौर होते; गुलाग-मध्ये १८ वर्षे त्यांना डांबून ठेवले होते आणि त्या १८ वर्षांमधील छळवादाची कहाणी सांगणारी दोन पुस्तके त्याच्या आईने – युजेनिया गिंझबर्गने – लिहिली होती. स्टॅलिनच्या रोषाला पात्र ठरलेल्या पालकांच्या पोटी जन्मलेला तो मुलगा होता. एका अनाथाश्रमात त्याचे लहानपण गेले. त्याचे नाव होते ' जनतेच्या शत्रूच्या मुलांचे निवासस्थान ' ( होम फॉर दि चिल्ड्रेन ऑफ एनिमीज ऑफ दि पीपल. ) त्याचमुळे त्याच्या सगळ्या लेखनात त्या राजवटीतील पाशवीपणाचा तीव्र दर्प आढळतो.

वासिलीची पहिली कथा ही रशियातील तरुणवर्गाच्या वास्तव जीवनाचे चित्रण करणारी होती. १९६१ मध्ये प्रसिद्ध झालेली ' स्टारी टिकेट ' ही कथा गाजली. शिक्षण अर्धवट सोडून शाळेबाहेर पडलेली काही मुले आपल्या सनातनी, कर्मठ विचारांच्या आईवडिलांचा जाच चुकवण्यासाठी पळ काढून बाल्टिक समुद्रकाठच्या पर्यटनस्थळी येतात; आणि तेथे धुमाकूळ घालतात, त्यावरून जो काही गोंधळ माजतो त्याची उग्र झलक या कथेत बघायला मिळते. त्याची ' व्हिक्टरी ' ही कथा म्हणजे रशियन कथासाहित्यातील एक खणखणीत नाणे आहे. रेल्वेच्या प्रवासात एका लबाड व धूर्त खेळाडूबरोबर गमतीदाखल बुद्धिबळाचा डाव मांडून

एक बुद्धिजीवी खेळत राहतो; आणि हा डाव म्हणजे शुद्ध नैतिक आचरणाचा आग्रह आणि मृत्यू यांतील संघर्षाचा डाव ठरतो.

'दि स्टील बर्ड' या लघुकादंबरीत वास्तवाऐवजी विडंबनाचा वापर केलेला आहे. एक भयानक दिसणारा, लोखंडी आवरण असलेला मानवसदृश प्राणी एका बहुमजली इमारतीच्या सुपरिंटेंडंटला धमकी देऊन, तिच्या लिफ्टमध्ये राहण्याची परवानगी मिळवतो. स्टॅलिनप्रमाणे धूर्तपणे पावले टाकत हा धातूचा पक्षी हळूहळू सगळ्या इमारतींवर आणि तिच्यात राहणाऱ्या कुटुंबांवर कब्जा करतो. ती इमारत लवकरच कोसळते. लिफ्टच्या वरच्या टोकावर विजयी मुद्रेने उभा राहिलेला स्टील बर्ड त्या कोसळलेल्या इमारतीच्या मातीच्या ढिगाऱ्यांचे निरीक्षण करीत आहे असा त्या लघुकादंबरीचा शेवट आहे.

या कादंबरिकेतील टीकेचे लक्ष्य अर्थातच तसे दडून राहिले नाही. त्यामुळे युनियन ऑफ सोविएट रायटर्समधून त्याची हकालपट्टी करण्यात आली. 'मेट्रोपोल' हा शासकीय धोरणाच्या विरोधी लेखनाचा संग्रह संपादित केल्यावर तर त्याच्यावर देशद्रोही असा शिक्काच वृत्तपत्रांनी मारला. तेव्हापासून के. जी. बी. चा ससेमिरा त्याच्या मागे लागला; आणि वासिलीने रशिया सोडून अन्य देशात जावे, असे त्याला सुचवण्यात आले. १९८० मध्ये सरकारच्या दडपणाला बळी पडून वासिलीने व त्याच्या पत्नीने रशिया सोडण्याचा निर्णय घेतला. त्यांचे नागरिकत्व रशियाने रद्दबातल ठरवले. वासिलीने मातृभूमीशी विश्वासघात करण्याचा मार्ग पत्करला, अशी टीका लिटररी गॅझेटने केली.

अमेरिकेत प्रवेश करताना पन्नास वर्षांचा हा रशियन लेखक म्हणाला, "माझ्या उर्वरित आयुष्यात मला पुरून उरेल इतकी सामग्री मी माझ्या डोक्यात भरून आणलेली आहे."

बाल्टिमोरजवळच्या एका कॉलेजमध्ये तो रशियन वाङ्मयावर एक सेमिनार घेई. 'व्हॉइस ऑफ अमेरिका'वरून रशियन भाषेत रशियन श्रोत्यांसाठी अमेरिकन कला व वाङ्मयाचा साप्ताहिक आढावा सादर करी.

वासिली अक्स्योनोवची इंग्लिशमध्ये प्रसिद्ध झालेली पहिली कादंबरी 'दि आयलँड ऑफ क्रिमिया' होय. काळ्या समुद्रावरील एक भूखंड हा रशियाच्या मुख्य भूमीपासून अलग पडतो. त्या द्वीपकल्पावरील स्थानिक लोकांचे स्वच्छंद जीवन, उपभोगवादी वृत्ती, मोकळे सामाजिक संबंध – यांच्या विरोधात रशियातील

बंदिस्त समाजजीवन, सगळ्या गोष्टीची भीषण टंचाई, मोकळेपणाने बोलण्यास मज्जाव वगैरेंचा निर्देश येतो. क्रिमिया ही कॅलिफोर्नियाचीच प्रतिकृती वाटते. या द्वीपकल्पाचे पन्नास लाख रहिवाशी संपन्न, सुखासीन आणि स्वच्छंद जीवन जगायला मोकळे असतानाही रशियाबरोबर पुन्हा आपले एकत्रीकरण व्हावे अशी इच्छा असल्याचे निवेदन रशियाकडे पाठवतात. रशिया त्या निवेदनाचा आदर राखण्यासाठी काय करते ? तर क्रिमियावर पूर्ण ताकदीनिशी लष्करी आक्रमण करते. बिचारे क्रिमियन लोक पार गोंधळून जातात. ते टेलिव्हिजनवर हा काय घोळ आहे तो बघत बसतात; पण रशियन सैन्य टेलिव्हिजन केंद्रावर रणगाडे नेऊन ते केंद्र जमीनदोस्त करते.

अक्स्योनोवची ‘ दि बर्न ’ ही कादंबरी स्टॅलिनच्या कारकीर्दीत शुद्धीकरणाच्या नावाखाली जे अनन्वित अत्याचार केले गेले त्यांचे दर्शन घडवते. त्या अत्याचारात बळी पडलेल्या कुटुंबातील मुलांना ज्या अग्निदिव्यातून जावे लागले, त्याची दाहक स्मृतिचित्रे ‘ बर्न ’ मध्ये भेटतात.

## आंद्रे सिन्यावस्की

आंद्रे सिन्यावस्की या हद्दपारित लेखकाने १९८८ मध्ये साठी ओलांडली आहे. परदेशात परवानगीशिवाय पुस्तक प्रसिद्ध केले म्हणून सिन्यावस्कीला सहा वर्षांचा कारावास भोगावा लागला. १९७३ साली फ्रान्समध्ये त्याला आश्रय मिळाला. पॅरिसमध्ये तो गेली दहा वर्षे राहत आहे. त्याने तेथील वास्तव्यात दोन कादंबऱ्या आणि डझनावारी लेख लिहिले; परंतु इंग्लिशमध्ये त्याचे फक्त ‘ ए व्हॉइस फ्रॉम दि कोरस ’ हेच एकमेव पुस्तक प्रसिद्ध झालेले आहे. रशियातील कॉन्सेन्ट्रेशन कँपमधील जीवनाचे वास्तव स्वरूप त्यात प्रकट करण्यात आले आहे.

## झिनोव्हिव

‘ दि यॉनिंग हाइट्स ’ ही झिनोव्हिव याची कादंबरी म्हणजे रशियन समाजव्यवस्था व राज्यप्रणाली यावरील एक घणाघाती उपरोधिक प्रहार आहे. रशियन भाषेत ही कादंबरी प्रसिद्ध झाली आहे हे विशेष. सोल्झेनित्सिननंतर इतकी खळबळ उडवणारी दुसरी कादंबरी नाही असे जाणकारांचे मत आहे. झिनोव्हिव हा अत्यंत तल्लख विश्लेषक आहे.

इब्रान्स्क नावाचा काल्पनिक देश. तेथील इब्रानोव्हज हे रहिवाशी. या रहिवाशांपैकी कोणाचाही झिनोव्हिव नावाने उल्लेख करीत नाही. व्यवसायावरून करतो. शिक्षक, नेता, कलाकार, दि बॉस, इंजिनियर, लेखक, अधिकारी.

सत्य हे नेहमी धूसर असते. सत्य शोधण्यासाठीही खोट्याचा आश्रय घ्यावा लागतो. खोटे बोलण्यासाठी सत्याचा उपयोग करावा लागतो. असत्य ही एक जाणीव असते; आणि कोणीही प्रामाणिकपणे चूक करू शकतो वा खोटे बोलू शकतो. जेव्हा राजकारणी नेते खोटे बोलतात तेव्हा ते काही गोष्टी लपवू पाहत असतात. आणि ते काहीतरी लपवण्याचा प्रयत्न करीत आहेत हे आपल्याला कळत असते; परंतु ते आपल्याला कळते आहे हे दाखवण्यात आपल्याला रस नसतो. लोक दुष्टबुद्धीनेच खोटे बोलतात असे नाही; ते घाबरट वा भ्याड असतात किंवा मठ्ठ असतात म्हणून खोटे बोलत असतात, असेही नाही; परंतु लोक खोटे बोलतात याचे कारण अशा प्रकारची फसवणूक वा वंचना ही सामाजिक व्यवहाराची एक सर्वमान्य रीत बनलेली आहे. स्टॅलिनचे निर्णय हे शहाणपणाचे असत; परंतु तो गरजेनुसार क्रौर्याचा वापर करी. स्टॅलिनसारखे पुढारी हे धूर्त, लुच्चे, पाताळयंत्री वा कपटी नसतात; आपल्या कल्पना व आपले धोरण हे शेवटच्या पूर्णविरामापर्यंत रास्त व अचूक आहे असा त्यांचा प्रामाणिक समज असतो. या कल्पना आणि आपल्या समाजाचा सामूहिक झपाटलेपणा या दोन्ही गोष्टी एकमेकांशी सुसंगत, सुसंवादी ठरतात आणि त्यातच त्या कल्पनांचे आणि स्टॅलिनसारख्या नेत्यांचे सामर्थ्य दडलेले असते. सामूहिक झपाटलेपणामुळे स्टॅलिन-सारखा नेता – म्हणजे बॉस – हा सर्वश्रेष्ठ, सर्वशक्तिमान ठरतो. या कादंबरीत झिनोव्हिव जो रशियन नीतिधर्म रंगवतो तो वाङ्मयीन कल्पकतेवर आधारलेला नाही; तर तो अभेद्य अशा तर्कशास्त्रावर, युक्तिवादावर आणि पृथक्करणावर आधारलेला आहे.

हे तर्कशास्त्र, हा युक्तिवाद बंदिस्त समाजरचनेला सोयीस्कर असतो. या तर्कशास्त्राची परिणती कशात होते ? इब्रान्स्कचे नागरिक हे राज्यप्रणालीच्या बंदिस्तपणाचा कंटाळा येऊन मरतात किंवा आत्महत्या करून मृत्यूला कवटाळतात. झिनोव्हिवची ही कादंबरी रशियासारख्या बंदिस्त समाजाला दीर्घकालपर्यंत जुलूम सहन करण्याची जी सवय लागलेली असते, तिचे आंतरिक मर्म उलगडून दाखवते.

गोर्बाचेव्ह यांच्या मोकळेपणाच्या आणि पुनर्रचनेच्या नव्या धोरणामुळे रशियातील कलावंतांना आपल्या मनाप्रमाणे लिहिणे आता शक्य होईल; वृत्तपत्रे, नियतकालिकेही असे लेखन छापू शकतील आणि रशियन लेखक संघटनाही उदार धोरण ठेवील अशी आशा वाटते. परंतु रशियन लेखकांनी आपल्या वाङ्मयीन भूमिकेसाठी या आधी जी अभूतपूर्व लढत दिली आहे; ती त्यायोगे व्यर्थ वा उपेक्षणीय ठरत नाही.

(महाराष्ट्र टाइम्स, १९-६-८८)

# ४

# सोल्झेनित्सिनचा जाहीरनामा

अलेक्झांडर सोल्झेनित्सिन हा रशियाचा आधुनिक काळातला अग्रगण्य लेखक. नोबेल पारितोषिकाचा मानकरी. ' वन डे इन दि लाइफ ऑफ इवान डेनिसोविच ' या त्याच्या कादंबरीने १९६२ मध्ये खळबळ उडवली. पुढे त्याच्यावर रशियन सरकारने नाना बंधने लादली, त्याला नजरकैदेत ठेवले, त्याच्या लेखनाच्या प्रकाशनावर बंदी घातली; परंतु सोल्झेनित्सिनने आपली सुटका करून घेऊन अमेरिकेत स्थायिक होण्याची अनुज्ञा मिळवली. अमेरिकेत गेल्यावर त्याच्या काही पुस्तकांचे प्रकाशन झाले. रशियातील कम्युनिस्ट राजवटीतील घुसमट त्याद्वारे सर्वांना ज्ञात झाली. रशियाबाहेर राहून रशियातील राज्यकर्त्यांच्या जुलमाविरुद्ध सोल्झेनित्सिन आवाज उठवत राहिले.

रशियात सरकारवर टीका करणे वा सरकारविरुद्ध काही लिहिणे हे अशक्यप्राय होते. अशा त्या काळात लेखनस्वातंत्र्याचा वा सत्याचा आग्रह धरणे ही गोष्टही अवघड होती.

### समिझ्दात—छुपी पत्रके

परंतु सोल्झेनित्सिनसारखे अस्वस्थ आत्मे स्वस्थ बसत नाहीत. त्या काळातही ' समिझ्दात ' म्हणजे हस्तलिखित, टंकलिखित वा झेरॉक्स केलेली पत्रके, पुस्तिका व अनियतकालिके गुप्तपणे निघत आणि त्यात सरकारने बंदी घातलेल्या पुस्तकांतील उतारे देण्यात येत. हे साहित्य गुप्तपणे चोरून सर्वत्र प्रसारित होई.

सरकारी प्रचारयंत्रणा खोट्यानाट्या गोष्टींचा गवगवा करीत असत. वृत्तपत्रे, दूरदर्शन, रेडिओ खोट्या आकडेवाऱ्या देत. यशाचे गुलाबी चित्र रंगवत. जनतेची दिशाभूल करीत. आपल्या जुलूम-जबरदस्तीला, छळवणुकीला असत्याच्या आधारे मायावी गोंडस मुखवटे चढवत. सत्तेत राहण्यासाठी, सत्ता टिकविण्यासाठी जनतेला कायम अज्ञानात, अंधारात ठेवत. खोट्या आकडेवारीच्या झगमगाटात दिपवून टाकत.

अशा वेळी सोल्झेनित्सिनने आपल्या देशबांधवांसाठी एक आवाहन प्रसिद्ध केले. “ असत्याचा प्रचार करून सरकार लोकांची दिशाभूल करीत असेल तर आपण स्वस्थ बसायचे का ? नाही. आपण त्या असत्यात, खोटेपणात सहभागी होण्याचे नाकारायला हवे. सत्य आणि असत्य यांतील दुभाजक रेषा कुठली हे जाणून घेणे ही पहिली गोष्ट. ही रेषा निरनिराळ्या लोकांच्या दृष्टीने पाहता, निरनिराळी असू शकेल हेही त्याने मान्य केले. परंतु तरीही असत्य हे असत्यच असणार. त्या असत्यावर कुठलाही गोंडस मुखवटा असला तरी तो खरवडून काढायला हवाच. भीड-मुर्वत, घाबरटपणा, संकोच वा स्वार्थ सोडून अशा असत्याचा दंभस्फोट करण्याची आपली तयारी हवी. किमानपक्षी आपल्याला ज्या गोष्टी असत्य व खोट्या आहेत असे नक्की जाणवलेले आहे, त्यांच्या प्रचारात किंवा त्यांच्या समर्थनात आपण सहभागी होता कामा नये असा आग्रह सोल्झेनित्सिनने धरला. “ असत्याचा त्याग करून प्रामाणिक व्यक्ती म्हणून जगण्याचा आपण निश्चय करायला हवा; तरच आपण आपल्या मुलाबाळांच्या आणि सहकाऱ्यांच्या आदराला पात्र ठरू. ” अशी प्रस्तावना करून सोल्झेनित्सिनने त्या वेळी एक जाहीरनामाच प्रसृत केला. तो केवळ लेखक-कवींसाठी वा कलावंतासाठी नव्हता; सर्वांसाठी होता. कोणाही सच्छील प्रामाणिक व्यक्तीने कुठल्याही प्रकारच्या असत्य वा खोट्या गोष्टीच्या समर्थनासाठी आपली शक्ती, बुद्धी, वाणी, लेखणी वापरता कामा नये हे या जाहीरनाम्याचे मुख्य सूत्र.

### जाहीरनाम्यातील प्रमुख कलमे

■ सत्याचा अपलाप होईल, सत्य दडविले जाईल, सत्याचे विकृतीकरण केले जाईल अशी शब्दसंहिता वापरण्याचे, लिहिण्याचे, छापण्याचे टाळले पाहिजे.

§ अशी शब्दसंहिता खासगी बैठकीत किंवा सार्वजनिक ठिकाणी स्वतःची म्हणून वा इतर कोणाचे नाव घेऊन उच्चारता कामा नये.

§ प्रचारक, शिक्षक, अध्यापक, रंगमंचावर अभिनयासाठी उभा राहिलेला नट यांपैकी कोणीही अशा शब्दसंहितांचा– त्यांना लिहून देण्यात आल्या तरी– उच्चार करू नये.

§ एखादी विशिष्ट गोष्ट असत्य आहे, खोटी आहे वा अर्धसत्य व विकृत आहे असे आपल्याला माहीत असेल तर ती गोष्ट नाट्य, चित्र, शिल्प, छायाचित्र, संगीत, आकाशवाणी, दूरदर्शन, याद्वारे मांडणे, दाखवणे किंवा सांगणे टाळायला हवे.

§ सत्तारूढ व्यक्तींवरील आपली निष्ठा प्रकट करण्यासाठी, एखादे उच्च पद मिळविण्यासाठी, आपल्या कल्पना-योजनांना शासकीय पाठिंबा मिळविण्यासाठी एखादा शब्द वा शब्दसंहिता कोणी सत्तापिपासू वापरत असेल, तर त्याचा वापर वा उच्चार करण्याचे टाळले पाहिजे. अर्थात तो शब्द वा शब्दसंहिता आणि तिच्यातील भावना या आपल्याला पूर्णतया मान्य नसल्या वा शंभर टक्के सुसंगत नसल्या तरच त्या वापरण्याचा मोह टाळला पाहिजे.

§ आपल्या विवेकबुद्धीशी प्रतारणा करणाऱ्या वा मनाविरुद्ध असणाऱ्या कोणत्याही सार्वजनिक निदर्शनात, मेळाव्यात वा मिरवणुकीत भाग घेण्याची सक्ती होऊ देता कामा नये.

§ आपल्याला पूर्णतया न पटलेली घोषणा वा मजकूर लिहिलेला फलक मिरवणुकीत हाती घेता व उंच धरता कामा नये.

§ जी सूचना वा जो प्रस्ताव आपल्याला मनापासून पटलेला नाही वा मान्य नाही, त्याच्या पुष्टीसाठी हात उंच करता कामा नये.

§ एखादी व्यक्ती विशिष्ट पदासाठी लायक नसेल वा शंभर टक्के विश्वसनीय वाटत नसेल तर तिला उघड वा छुपा पाठिंबा वा मत देता कामा नये.

§ ज्या बैठकीत होणारी चर्चा पक्षपाती, एकांगी वा खोडसाळपणाची असेल, अशा बैठकीला हजर राहण्याची सक्ती आपल्यावर होऊ नये अशी सावधगिरी बाळगायला हवी.

§ जेथे असत्य बोलले जात असेल, विशिष्ट मतप्रणालीचा प्रचारकी उदोउदो केला जात असेल वा तुमच्या मेंदूवर विशिष्ट संकल्पनांचा मारा केला जात असेल

तेथे एक क्षणभरही थांबू नये. सभा, परिषदा, व्याख्यान, नाटक, चित्रपट यामध्ये कोणी असत्य जाणूनबुजून आपल्या माथी मारत असेल तर तेथून बाहेर पडणेच श्रेयस्कर.

**पक्षपाती वृत्तपत्रे**

ঙ वास्तव लपवून, सत्याला विकृत वळण देणारे वृत्तपत्र वा मासिक विकत घेता कामा नये किंवा त्याची वर्गणी भरता कामा नये.

ঙ आरंभी अशा प्रकारचे वागणे हे खरोखर अवघड ठरेल. कदाचित नोकरी जाईल, कामधंदा सुटेल, शासनाचा रोष होईल; परंतु प्रामाणिकपणे राहायचे असेल, तर दुसरा पर्याय नाही. भ्याड, भित्र्या लोकांना अर्थातच हे जमणार नाही. सुखासीन आणि संधिसाधू लोकांनाही हे परवडणार नाही. पूर्णतया भ्रष्ट झालेल्यांनाही हे जमणार नाही. देहाच्या दृष्टीने हा मार्ग खडतर असेल; पण आत्म्याच्या दृष्टीने तोच एकमेव मार्ग ठरेल.

फेब्रुवारी १९७४ मध्ये सोल्झेनित्सिनने आपले हे आवाहन प्रसिद्ध केले; त्यानंतर त्याला रशियन राजसत्तेने तुरुंगात डांबले आणि परदेशी हद्दपार केले.

या आवाहनाच्या प्रती मात्र लोकांमध्ये पसरत राहिल्या. हस्तलिखित, टंकलिखित वा मुद्रित स्वरूपात.

या आवाहनाचा शेवट करताना सोल्झेनित्सिनने असा इशारा दिला होता,

"हा मार्ग खरोखरच अवघड आहे, खडतर आहे; परंतु काही माणसे, काही डझन माणसे या मार्गावरूनच गेली अनेक वर्षे वाटचाल करीत आहेत. सत्याशी प्रतारणा न करता जगत आहेत. आपल्यात या मार्गाने जाण्याएवढे धैर्य नसेल तर मात्र आपल्याला जुलमी राजसत्तेविरुद्ध किंवा आपल्या अभिव्यक्तीच्या स्वातंत्र्या-आड येणाऱ्यांविरुद्ध तक्रार करण्याचा अधिकार राहणार नाही. कारण या गोष्टीसाठी आपणच जबाबदार आहो असे पुढे म्हणावे लागेल. पुढे आपण थोडे आणखी नतमस्तक होऊ, आणखी खाली खाली वाकत जाऊ. पुढे आपले जे जीवशास्त्रज्ञ बंधू असतील ते आपल्या घडणीतील जीवसूत्रेच बदलून अधिक लाचार आणि नेभळट बनवण्याची साधने शोधून काढतील ! त्याविरुद्ध ब्र देखील काढता येणार नाही."

('साप्ताहिक सकाळ' २४-२-९०)

# ५

# लेखणी जेथे शस्त्र बनते

‘ लेखण्या मोडा, तलवारी हाती घ्या ’ असा संदेश स्वा. सावरकरांनी दिला होता. लेखणी ही कधी कधी तलवार बनते हेदेखील खोटे नाही.

झेकोस्लोव्हाकियाचे प्रेसिडेंट म्हणून व्हॅक्लॅव्ह हवेल या नाटककाराची निवड झाली. गेली वीस-पंचवीस वर्षे झेकोस्लोव्हाकियातील कम्युनिस्ट सत्तेच्या जुलमाविरुद्ध आवाज उठविण्याचे काम तेथील साहित्यिकांनीच प्रामुख्याने केले. त्यांच्या या परिश्रमांना आलेले हे यश–कारावास, नजरकैद, भूमिगत जीवन, मुस्कटदाबी, पोलिसांचा ससेमिरा, हलकी-सलकी पडेल ती कामे करून निर्वाह करण्याची तयारी – अशा काट्याकुट्यांतून वाटचाल करून लाभलेले होते. हवेल हा त्या सर्व लेखक-कवींनी दीर्घकाळ चालवलेल्या स्वातंत्र्यलढ्याचाच प्रतिनिधी म्हणून, साम्यवादी सत्तेचा बीमोड करून, राष्ट्राध्यक्षपदावर आरूढ झाला होता. रशियन वृत्तपत्रांनी ट्रबल मेकर आणि कम्युनिझमचा शत्रू म्हणून देशघातकी ठरवलेल्या हवेलच्या हाती झेकोस्लोव्हाकियाची शासनसूत्रे येणे ही घटना म्हणजे काळाने रशियावर उगवलेला सूडच होय.

१९८९ च्या यशस्वी क्रांतीनंतर तेथील नव्या राजवटीचे नेतृत्व हवेल याच्या हाती येणे हेच उचित होते. कारण या नव्या उठावाची वैचारिक व संघटनात्मक भूमिका तयार करण्याचे काम तो सातत्याने वीस वर्षे करीत होता. कम्युनिस्ट राजवटीच्या दोषाचे मूलगामी विवेचन करून, ती राज्यप्रणाली कधीही जनकल्याणकारक ठरू शकणार नाही, हे लोकमानसावर तो बिंबवत होता. लोकांनीच

आपली ताकद ओळखून या तथाकथित जुलमी सत्ताधीशांना हाकलून लावायला हवे, ही ताकद लोकांमधे आहे याची जाणीव तो सतत देत होता.

## देशात लेखन प्रसिद्ध होणे दुरापास्त

१९८२ मधे झेकोस्लोव्हाकियातून बाहेर पडलेल्या विचारवंतांनी टोरोंटो येथे एक प्रकाशन संस्था सुरू केली. अडुसष्ट प्रकाशकांची ही संस्था होती. आणि तिने विसाव्या शतकातील झेक लेखकांची सूची प्रथम प्रसिद्ध केली. झेकोस्लोव्हाकियाच्या शासनाने ज्यांच्या लेखनावर बंदी घातली होती अशा लेखकांच्या या सूचीमधे पाचशे नावे होती. कादंबरीकार, नाटककार, निबंधकार, अभ्यासक, संशोधक सगळ्यांवर कम्युनिस्ट झेक राजवटीची संतप्त करडी नजर पडलेली होती आणि रशिया व झेक शासनकर्ते तेथील शासनाची धोरणे यांच्याविरुद्ध जरा कुणी काही लिहिले की त्याच्याकडे शासनाची वक्रदृष्टी वळत होती. मिलान कुंदेरा, लुडविक वाकुलिक, व्हॅक्लॅव्ह हवेल, बोहुमिया हरबाल, इवान क्लिमा, जेरोस्लोव सेइफर्ट, अशा नामवंतांची नावेही या यादीत होती. सेइफर्ट हा तर नोबेल पारितोषिकाचा मानकरी; परंतु झेक सरकार त्यांच्या लेखनावरही आपली सेन्सॉरची कात्री चालवण्यास मागेपुढे पाहत नव्हते.

या लेखकांना झेकोस्लोव्हाकियात लेखन करायला बंदी होती. त्यांचे लेखन प्रसिद्ध होऊ शकत नव्हते. आपले लेखन बाहेर पाठवणेही सरळसोपे नव्हते. उदरनिर्वाहासाठी वाटेल ते काम करण्याची पाळी त्यांच्यावर आलेली होती.

## एकतंत्री राजवटीतील जुलूम

ज्या समाजात एकतंत्री कारभार करणारे लोकांच्या स्वातंत्र्यावर नाना तऱ्हेची बंधने लादतात, त्या अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्याचे काम लेखक-विचारवंतांवर येऊन पडते. एखादा ललित लेखक तत्कालीन समाजाचे वास्तववादी चित्रण रेखाटतो; पण तेदेखील अशा सत्ताधीशांना रुचत नाही, त्यावरही त्यांची वक्रदृष्टी वळते आणि त्यावर बंदी घालण्यात येते. आविष्कार स्वातंत्र्यावर होणारा हा हल्ला सहन करणे कठीण जाते; आणि त्यातून राजकीय सत्तेविरुद्ध लेखन करण्याची ऊर्मी प्रबळ होत राहते. मिल्टन मग केवळ 'पॅराडाइज लॉस्ट' लिहून गप्प बसत नाही; तो उच्चार-स्वातंत्र्यावरही निबंध लिहितो. जोनाथन स्विफ्ट लहान

मुलांच्या करमणुकीसाठी गलिव्हरच्या प्रवासातल्या गमती सांगून थांबत नाही; आयरिश दुष्काळात झालेल्या हानीबद्दल चवताळून शासनाला धारेवर धरतो. रशियातला ओसिप मांदेलश्ताम कुठल्याही प्रकारे साम्यवादी सरकारवर लिहिण्याचे टाळू पाहतो; परंतु असे लिहा, तसे लिहा अशी मार्गदर्शक सूत्रे त्याला सरकारी लेखक संघाचे कारकून शिकवू लागतात तेव्हा तो स्टॅलिनच्या 'झुरळासारख्या मिश्या आणि तेलाने माखलेली सुरवंटासारखी जाडसर बोटे' यांच्यावर तुटून पडतो; आणि तुरुंगवास पत्करतो. सोल्झेनित्सिन, पास्तरनाक, जोसेफ ब्राडस्की केवळ आपल्या ललित लेखनात व काव्यात रमून स्वस्थ राहत नाहीत; राजकीय टीकाटिप्पणीही करायला प्रवृत्त होतात.

### विद्रोही बनणे हाच पर्याय

लोकशाही राजवटीत व मुक्त समाजात लेखक हा प्रामुख्याने रंजनकार असतो. हे रंजन प्राथमिक पातळीवरचे असेल वा उच्च कलात्मक गांभीर्याच्या पातळीवरचे असेल.

बंदिस्त व एकतंत्री हुकूमशाही राजवटीत लेखक हा विद्रोहाचा प्रवक्ता मानला जातो; आणि त्याला बंडाचे नेतृत्व करावे लागते.

झेकोस्लोव्हाकिया या देशाचे भागधेय असे चमत्कारिक की १९१८ ते १९३८ हा वीस वर्षांचा कालखंड सोडला तर त्याला गेल्या चारशे वर्षांत स्वातंत्र्याचा खऱ्या अर्थाने उपभोग घेता आलेला नाही. प्रागजवळच्या व्हाइट हॉल येथील लढाईत बोहेमियाचा पराभव झाला आणि जेसुइटांनी या देशात धार्मिक आणि राजकीय दडपशाही सुरू केली. जीझस सोसायटीने पहिल्याप्रथम कुठली गोष्ट केली असेल तर ती म्हणजे झेक पुस्तकांची होळी. जे जे पुस्तक हाती लागेल ते त्यांनी अग्निदेवतेला समर्पण केले. प्रॉटेस्टंट बायबलवर त्यांचा विशेष राग होता. प्रॉटेस्टंट विचारवंतांचा जेसुइटांनी छळ आरंभिला, अनेकांना हद्दपार केले; अनेकांना फासावर लटकावले. ही गोष्ट आहे चारशे वर्षांपूर्वीची.

जॉन अमीस कोमेन्स्की हा झेक बिशप आपला देश सोडून नॉर्वेला गेला. कोमेनियस या लॅटिन धर्तीच्या नावाने तो आता ओळखला जातो. आधुनिक धर्मोपदेशकांच्या शिक्षण संस्थेचा तो संस्थापक मानला जातो. अमेरिकेतील हार्वर्ड

युनिव्हर्सिटीचे प्रेसिडेंट जॉन विनथ्राप यांनी त्याला 'हार्वर्डच्या प्रेसिडेंटपदावर आरूढ व्हा' अशी आग्रहाने गळ घातली; परंतु ती त्याने धुडकावून लावली. अटलांटिकचा प्रवास झेपणार नाही अशी सबब त्याने पुढे केली. परंतु त्याचे अनेक अनुयायी अमेरिकेला येत राहिले. अमेरिकेच्या शैक्षणिक, धार्मिक जडण-घडणीत त्यांनी महत्त्वपूर्ण वाटा उचलला. कॉमेनियसच्या मोराबियन ब्रदर्स या शिक्षण-संस्थेचे अमेरिकेशी घनिष्ठ संबंध जडले. मानवतावादी विचारांचे आदानप्रदान सुरू राहिले.

**झेक वाङ्मय जाळून भस्म केले**

जेसुइट धर्मगुरूंनी झेकोस्लोव्हाकियाचे वाङ्मय नष्ट केले, तेथील विचारवंतांचे खच्चीकरण केले, तेथील धर्मसुधारणावादी प्रवृत्तींचा बीमोड केला आणि रोमन कॅथॉलिक पंथाचा प्रसार करून, जर्मन भाषेला तेथे प्रतिष्ठित केले. कुठल्याही क्षेत्रातील उच्च ज्ञानासाठी आणि वरिष्ठ अधिकारपदासाठी जर्मन भाषा ही अनिवार्य ठरली. १८ व्या शतकाच्या मध्यापर्यंत झेक भाषा ही फक्त बोलीभाषा म्हणूनच उरली. थोड्याफार प्रार्थना व लोककथा-लोकगीते याव्यतिरिक्त झेक भाषेचे अस्तित्वच जणू संपुष्टात आले.

**भाषेचे पुनरुज्जीवन**

झेक भाषेच्या पुनरुज्जीवनाचे श्रेय एका जर्मन व्यक्तीकडे जावे हादेखील एक विरोधाभासच मानावा लागेल.

जोहान गॉटफ्रिड हर्डर या जर्मन तत्त्वज्ञाने असे प्रतिपादन केले की राजकारण आणि राज्यघटना यांच्यापेक्षाही भाषेचे महत्त्व अधिक आहे. मानवी जीवनप्रणालीचे स्वरूप निश्चित करण्यासाठी भाषा हा सर्वांत अर्थपूर्ण घटक आहे. भाषा म्हणजे राष्ट्राचा आत्मा होय. झेक जनतेला या प्रतिपादनाने जणू नवे क्षितिज गवसले. आपल्या भाषेची गळचेपी करून, आपल्यावर जर्मन भाषा लादली गेली याबद्दलची चीड तेथे होतीच; तिला आता व्यापक विद्रोहाचे बळ लाभले. 'आउटलाइन्स ऑफ दि फिलॉसाफी ऑफ द मॅन' या ग्रंथात त्याने असे भविष्य वर्तवले की गुलामगिरीतून एकदा सुटका करून घेतली तर स्लाविक राष्ट्रांपुढे उज्ज्वल भवितव्य आहे.

## नव्या भाषेची जडण-घडण

नष्टप्राय झालेल्या झेक भाषेचे पुनरुज्जीवन करण्यासाठी झेकमधील जाणकार जाणत्यांनी कंबर कसली. दोनशे वर्षांपूर्वी या प्रयत्नांना सुरुवात झाली. मुद्रणालये स्थापन करून, नव्या लेखकांना प्रोत्साहन देऊन, नवीन पुस्तकांची रचना करायला त्यांना प्रवृत्त करून झेक भाषेला पुन्हा व्यवहारोपयोगी भाषा बनवण्याची धडपड सुरू झाली. आधुनिक विज्ञानावरचे लेखन झेक भाषेत व्हावे; तांत्रिक पारिभाषिक शब्दांची निर्मिती व्हावी या दिशेने पावले टाकली गेली. झेक भाषेतील शब्दसंपत्तीत भर पडली. केवळ वाङ्मयीन भाषा म्हणून नव्हे, तर विज्ञानाची भाषा म्हणूनही तिची उपयुक्तता वाढेल अशी दृष्टी प्रारंभापासूनच ठेवण्यात आली. अर्थात त्यासाठी शास्त्रीय ग्रंथांच्या अनुवादांवर भर देण्यात आला. त्यासाठी कथा-कादंबरीकारांपेक्षा भाषाशास्त्रज्ञांची जिद्द अधिक फलदायक ठरली. १८७२ पर्यंत स्वतंत्र दर्जेदार काव्य आणि गद्य विपुल प्रमाणावर झेक भाषेत सिद्ध झाले.

## भाषांतर म्हणजे देशभक्तीच

भाषांतर करणे ही झेक नागरिकांच्या दृष्टीने एक हौसेची वा फावल्या वेळेतील उद्योगाची बाब नव्हती. भाषांतर म्हणजे राष्ट्रीय देशप्रेमाची कामगिरी असे तेथे मानले गेले. झेक भाषेतील पुस्तके वाचणे ही देखील देशप्रेमाचीच कृती ठरली. साहित्यिक हा साहजिकच केवळ कथा-कादंबरीकार राहिला नाही; तो जनतेचा प्रवक्ता प्रतिनिधी बनला, राजकीय नेता ठरला, विचारवंत मार्गदर्शक व पथप्रदर्शक म्हणून आदराला पात्र ठरला. जेरास्लाव सेइफर्ट या कवीने १९५६ साली जाहीरपणे म्हटले– "लेखक म्हणजे देशाची विवेकशक्ती होय. देशाच्या नैतिक मूल्याचा उद्गाता होय. पुस्तक-वाचनाची प्रवृत्ती झेकोस्लोव्हाकियात अधिक आढळते."

झेकोस्लोव्हाकियामध्ये नाझींच्या आक्रमणकाळात पुस्तकांवर संक्रांत आली. सेन्सॉरशिप लादण्यात आली. साम्यवादी राजवटीनेही अधिकाधिक बंधने जारी केली. उत्तमोत्तम झेक पुस्तके या धोरणामुळे दुर्मिळ झाली. परंतु जर्मन भाषेतून स्वातंत्र्याचे, मुक्ततेचे विचार मांडले तर सेन्सॉरशिपमधून ते अनेकदा निसटत; आणि झेक जनतेची स्वातंत्र्याची ऊर्मी बळावत राही.

काही वेळा या देशप्रेमाच्या अतिरेकी अपेक्षेमुळे चांगले ललित लेखनही उपेक्षिले गेले; टीकेचे लक्ष्य ठरले. राजकारण आणि काव्य यांचे मिश्रणच प्रतिष्ठेला पात्र ठरले. केवळ काव्य हे झेक जनतेच्या पचनी पडेनासे झाले. कारेल हायनेक मात्रा याची मे नावाची ( १९३६ ) ग्रामीण भागाचे रोमँटिक चित्र उभे करणारी सुंदर भाव कविता, तिच्यात देशप्रेमाचा संदेश नाही म्हणून टीकाविषय ठरली.

## राजकारणातही लेखक सक्रिय हवा

लेखकाने अर्थातच केवळ राजकीय विषयांवर लिहून आपल्या देशप्रेमाची द्वाही फिरवावी, एवढ्यावरच जनतेचे समाधान होत नसते. लेखकाने राजकारणात प्रत्यक्ष भाग घ्यायला हवा अशी अपेक्षाही असते. फँटिसेक पालाकी हा लेखक-राजकीय नेता झेकोस्लोव्हाकियाचा राष्ट्रपिता म्हणून झेक जनतेच्या हृदयसिंहासनावर विराजमान झाला. त्याने झेक-राष्ट्राचा इतिहास लिहिला. जर्मन भाषेत प्रथम हा इतिहास लिहिण्याचे काम त्याने सुरू केले; परंतु पुढे झेक भाषेचा आश्रय घेतला. १९४८ मध्ये तेथील उदारमतवादी पक्षाचा तो मुख्य सूत्रधार होता.

टॉमस गॅरिग्यू मासारिक हा तत्त्वज्ञानाचा प्राध्यापक, त्याने मार्क्सवादाची चिकित्सा करणारा ग्रंथ लिहिला. मध्यमवयात तो राजकारणात पडला. स्वतंत्र झेकोस्लाव्हाकियाचा तो पहिला राष्ट्राध्यक्ष बनला. १९२५–३५ या काळात अन्य युरोपियन देशांत फॅसिझमचा प्रभाव होता; मासारिकने मात्र उदारमतवादी लोकशाहीचा पुरस्कार करून झेक जनतेला स्वातंत्र्याचा सुखद अनुभव घडवला.

## कॅरेल चॅपेक

कॅरेल चॅपेक हा मासारिकचा एक चहाता व भक्त होता. तो कविता करी; नाटके लिही; कथा लिही. वृत्तपत्रांमध्ये राजकीय-सांस्कृतिक विषयांवर टीकाटिप्पणी करी. मासारिकची व त्याची दर आठवड्याला भेट होत असे. ' मासारिकबरोबरची संभाषणे ' हा त्याचा ग्रंथ त्या दोघांच्या स्नेह-सौहार्दावर प्रकाश टाकणारा आहे. चॅपेकच्या लेखणीद्वारे मासारिकचे विचार झेक जनतेपर्यंत पोचत होते.

चॅपेकच्या कथांमध्ये मात्र राजकीय विषयांना महत्त्वाचे स्थान नसे. रोबो हा शब्द त्यानेच प्रथम वापरला. रीसम्स युनिव्हर्सल रोबोटस – R. U. R. या नाटकात तो

आला आहे. सरंजामशाहीच्या काळात कुळाकडून सक्तीने काम करून घेतले जाई, त्याला रोबोटा हा झेक शब्द वापरतात. त्यावरून यंत्रमानवाला उद्देशून कॅरेल चॅपेकने रोबोट हा शब्द वापरला. व्हाइट इनलेस, मदर ही त्याची प्रचारकी फॅसिस्टविरोधी नाटकेही गाजली.

राजकीय आडंबरामुळे कॅरेल चॅपेकच्या लेखनाचे मोल काहीसे उणावले. तो उत्तम कथानिवेदक होता याकडे पाश्चात्त्य जगाचे दुर्लक्ष झाले.

नाझींनी अनेक झेक लेखकांना छळले. ठार मारले.

कॅरेल चॅपेकचा भाऊ जोसेफ हाही लेखक-कलावंत होता. तो बर्गन-बेल्सन येथे मारला गेला.

कॅरेल पोलासेक ह्या ज्यू लेखकाला ऑसवित्झच्या छळछावणीत मृत्यू आला.

व्लादिस्लाव व्हँकुरा या लेखकाला गोळ्या घालून ठार मारण्यात आले. बोहेमियाच्या नाझी गव्हर्नरच्या हत्येचा सूड उगवण्यासाठी अनेक लेखक-कवींचे शिरकाण करण्यात आले त्यात व्हँकुराही सापडला.

### लेखक संघटनेचे फतवे

साम्यवादी राजवटीत लेखक-कवींना कसे लिहावे, कशावर लिहावे याचे आदेश देण्यात येत.

फॉर्म्यलिझम आणि कास्मॉपॉलिटिझम हे वाङ्मयीन गुन्हे मानण्यात आले.

सोशॅलिस्ट पेट्रिऑझिमला ( देशभक्तीला ) सर्वोच्च स्थान मिळाले.

सोशॅलिस्ट वसाहतवादाचा – सोव्हिएट वास्तववादाचा स्वीकार करणे हे कायद्यान्वये बंधनकारक ठरले.

लेखक संघटनेच्या ध्येयधोरणानुसार लिहिणाऱ्यांनाच त्या संघटनेचे सभासद होता येई. सभासदांचेच लेखन पुस्तकरूपाने वा नियतकालिकात प्रसिद्ध होऊ शके. इतरांचे लेखन कुठेच प्रसिद्ध होणे शक्य नसे.

१९६८ नंतर झेक लेखकांमध्ये जे शासकीय धोरणाचे पुरस्कर्ते होते, ते आरामशीर जीवन जगू लागले. त्यांना निवासस्थाने मिळत, चांगला पगार मिळे, त्यांचे लेखन प्रसिद्ध होई.

परंतु सरकारी धोरणाला न जुमानणाऱ्या लेखकांना जगणेही मुश्किल ठरे. त्यांचे लेखन प्रसिद्ध होत नसे; त्यांना मिळेल त्या शारीरिक श्रमाच्या हलक्या

नोकऱ्या कराव्या लागत. सोव्हिएत प्रभुत्वाखाली सर्वदूर नियंत्रणे आणि बंधने असत. प्रत्येक गोष्टीचे रेशन, भयानक भ्रष्टाचार, धाकदपटशा. १९७० नंतरच्या दशकात एकेक सरकारमान्य कवी एकेक तरी कवितासंग्रह लिहून पूर्ण करी; एखादे तरी पुस्तक लिहून छपाईसाठी देई.

१९६० ते १९६८ या काळात त्या मानाने शासनात मोकळेपणा होता. सोशॅलिस्ट रिॲलिझमचा जाच नव्हता. त्या काळात हरबाल, हवेल, कुंदेरा, जिरी ग्रुसा, वेरा लिनहार्टोवा, जोसेफ टोपोल वगैरे प्रतिभावंत लेखक-कवींची पिढी पुढे आली होती. या लेखक-कवींनी आपल्या लेखणीद्वारे झेक जनमानसाची स्वातंत्र्याची आकांक्षा फुलवली. परंतु १९६८ मध्ये रशियाने आपले सैन्य पाठवून, झेकोस्लोव्हाकियावरील आपली पकड घट्ट करून, लेखक-कवींवर अंकुश बसवला.

### रशियाचा जाच

स्वातंत्र्याची थोडीफार सवय झालेल्या लेखक-कवींना हा रशियन जाच सहन होणे शक्यच नव्हते.

त्यांनी आपल्या आविष्कारासाठी नव्या तंत्राचा आधार घेतला. वरकरणी साध्या सरळ प्रचारकी वाटणाऱ्या लेखनात सरकारविरोधी संदेश पेरण्याची आणि तो संदेश हेरण्याची लेखक-वाचकांची तयारी झाली. सरकारला हुलकावण्या देण्याचे गनिमी तंत्र या लेखक-कवींनी, विचारवंतांनी, धर्मगुरूंनी, तत्त्वज्ञांनी विकसित केले. झेक लेखकांनी लिहिलेले साहित्य झेकोस्लोव्हाकियात प्रसिद्ध होऊ शकत नव्हते; परंतु त्यांची हस्तलिखिते परदेशात चोरून पाठवली जात. ती परदेशात छापून तयार होणारी पुस्तके पुन्हा झेकोस्लोव्हाकियात येत. सरकारी यंत्रणेला धाब्यावर बसवून हा सर्व प्रकार चाले. गुप्तपणे चोरून हे कसे त्या वेळी जमत असे याचे तपशील पुढे येतील तेव्हा रहस्यकथेसारखेच ते तपशील चित्तवेधक ठरतील. या लेखकांनी केवळ लेखनच केले नाही; राष्ट्राला नेतृत्व दिले. अनेक लेखकांना तत्कालीन कम्युनिस्ट राजवटीने देश सोडून परदेशी कुठेही जा, आम्ही तशी परवानगी देऊ असे सांगितले. व्हॅक्लॅव्ह हवेल याला तर 'कारावासातून सोडतो; पण परदेशात—अमेरिकेत—जा' असे सांगण्यात आले होते. त्याच्यावरचे खटले मागे घेण्याचे अभिवचन देण्यात आले. अमेरिकेत त्याला नाट्यदिग्दर्शक म्हणून नोकरी

देण्याचीही सगळी सोय केली गेली. परंतु त्याने अट घातली की माझ्याबरोबरचे जे लेखक तुरुंगात आहेत त्यांच्यावरचेही आरोप मागे घ्या. सरकारला ही अट मान्य होणे शक्य नव्हते. त्याला परत तुरुंगात डांबण्यात आले. न्युमोनियाने तो मरता मरता वाचला. तुरुंगातील डॉक्टरांनी त्याच्याकडे दुर्लक्ष केले, असे त्याचे आजही म्हणणे आहे.

**चार्टर ७७**

१९७७ साली काही लेखक-कवींनी चार्टर ७७ ही संघटना स्थापन केली. सरकारने स्वतःच मान्य केलेल्या घटनेचे पालन करावे असा आग्रह या संघटनेने धरला. या मागणीकडे लक्ष जावे इतका मोठा तो आवाज नव्हता. प्रारंभी तरी. परंतु एकूणच पूर्व युरोपीय देशांत नव्या राजकीय जागृतीचे वारे वाहू लागले. रशियातही गोर्बाचेव्ह यांनी पेरेस्त्रोइका आणि ग्लासनोस्तचे नवे पर्व आणले.

१९८९ मध्ये झेकोस्लोव्हाकियात निवडणुका झाल्या. कम्युनिस्ट राजवट संपुष्टात आली.

नाटककार व्हॅक्लॅव्ह हवेल हा राष्ट्राध्यक्ष-पदावर स्थानापन्न झाला. साहित्यिक विचारवंतांच्या हाती राज्यसूत्रे आली.

**हवेल-क्रांतीचे तत्त्वज्ञान**

गेली वीस वर्षे हवेलने आपल्या नाटकाद्वारे व लेखांद्वारे या नव्या राज्यक्रांतीचे, लोकाभिमुख सत्ताप्रणालीचे तत्त्वज्ञान मांडले. एकतंत्री हुकूमशाहीतून निर्माण होणाऱ्या सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय अधोगतीचे भीषण परिणाम दाखवून, या सर्व प्रणालीला उलथून टाकणारा, आर्किमिडीजच्या कल्पनेतला पृथ्वी हलवून सोडणारा पृथ्वीबाहेरचा एक बिंदू शोधून काढला; आणि त्यावर पाय रोवून आपल्या वैचारिक तरफेने हवेल व त्याच्या लेखक-कवी सहकाऱ्यांनी १९८९ ची क्रांती घडवून आणली. अस्तित्ववादी दृष्टिकोणातून चार्टर ७७ ने हक्कांचा प्रश्न मांडला. पॉवर ऑफ दी पॉवरलेस ( सत्ताहीनांची सत्ता ), लिव्हिंग इन ट्रुथ ( सत्याधिष्ठित जीवन ), ओपन लेटर टू गुस्ताप हुसाक ( डॉ. हुसाक यांना अनावृत्त पत्र ), राजकारण आणि विवेकशक्ती वगैरे त्याचे निबंध ' लिव्हिंग इन ट्रुथ ' या संग्रहात एकत्रित करण्यात आले आहेत. कम्युनिस्ट राष्ट्रातील राजवटीचे सर्वंकष अनीतीचे



मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणे
निबंध
ग्रा. क्र. ३४६८
२६६३३

व भ्रष्टाचाराचे स्वरूप स्पष्ट करून, त्याविरुद्ध लोकमानसातच चीड निर्माण करण्याची, जन आंदोलन उभे करण्याची आकांक्षा त्याने धरली. महात्मा गांधींच्यासारखे त्याने जुल्मी राजवटीचा प्रतिकार करण्याचे आत्मबळ तेथील सामान्य माणसांत जागे केले. जेव्हा लोकांची भाषा व इच्छा आणि बंडखोर राजकीय नेत्यांची भाषा व कार्यक्रम यांत एकवाक्यता येते तेव्हाच खरी लोकशाही जन्म घेते असे तो मानतो.

रोमानियाचा हुकूमशहा चॅसेस्क्यू याला पदच्युत केले. तेव्हा रोमानियातील एक अभिनेता म्हणाला, ' चॅसेस्क्यूला पदच्युत करण्याचा कट काही थोड्या पुढाऱ्यांनी आखला असे नाही; जनतेच्या हृदयातच त्या कल्पनेने मूळ धरले. शासनप्रणाली ही सूत्रबद्ध व बंदिस्त करताना जीवनाच्या मूलभूत नियमांची पायमल्ली होत जाते; एकतंत्री सत्ता जशी केन्द्रीभूत होत जाते तशी ती जीवनाच्या बुडाशी असलेल्या चैतन्याचा गळा घोटू पाहते; एकतंत्री राज्यप्रणाली घोषणा, कर्मकांड, एकतर्फी कायदे, दुटप्पीपणा, यांद्वारे जुलमाचे हत्यार बनते आणि समाजाच्या प्रत्येक घटकाला भ्रष्ट व्हायला भाग पाडते. सत्तेचे केंद्र म्हणजेच सत्याचे केन्द्र असा आभास निर्माण करून शिक्षणक्षेत्र, कलाक्षेत्र, उत्पादकक्षेत्र, करमणूक या सर्वांनाच वेठीला धरले जाते. सर्वांनाच गुलाम बनवले जाते. अशा पद्धतीने कोणाच्याही हाती काही लागत नाही. फक्त देवच आपल्याला वाचवू शकेल हेच मग सत्य ठरते. सामाजिक समस्या ही नैतिक समस्या आहे; आणि हिंसाचाराने वा धाकदपटशाने प्रश्न सुटणार नाहीत, तेथे आध्यात्मिक पुनरुत्थानावर श्रद्धाच हवी असा आग्रह तो धरतो.

तत्त्वज्ञ राजा ही कल्पना एक आदर्श कल्पना म्हणून मांडली जाते. ती फारशी प्रत्यक्षात येत नाही; आलेली नाही. हवेलच्या रूपाने ती झेकोस्लोव्हाकियात आज मूर्त रूपात आलेली दिसतेय. हा तत्त्वज्ञ राजा काय करतो, कशी पावले टाकतो याकडे त्यामुळेच आपले लक्ष राहील, साऱ्या जगाचे लक्ष राहील यात शंका नाही.

( साप्ताहिक ' सोबत ', ४ नोव्हेंबर १९९० )

## ६

# ग्रंथपुरस्कार

मराठी लेखकांना व पुस्तकांना मिळणाऱ्या पारितोषिकांच्या संख्येत व रकमेत गेल्या काही वर्षांत लक्षणीय भर पडत आहे, ही मोठी उत्साहदायक घटना आहे.

ज्ञानपीठ ॲवॉर्ड घसघशीत खरे; परंतु मराठीच्या वाट्याला ते दहा-पंधरा वर्षांनी एकदा येणार.

साहित्य अकादमीचा पुरस्कार दरवर्षी प्रत्येक भाषेतील ग्रंथाला मिळतो. त्यातील निवडीचे राजकारणच पुस्तकापेक्षा अधिक डोळ्यांवर येते. तरी त्याचे मोल कमी आहे असे नाही.

**सरकारची खिरापत**

महाराष्ट्र सरकार खिरापतीसारखी दोन हजार-एक हजाराची बक्षिसे दोन-चार वर्षांनी एकदम झोपेतून जाग आल्याप्रमाणे जाहीर करते. ( आता ५ हजारांची ती झाली आहेत. )

साहित्य व संस्कृती मंडळाचे दानशूर अध्यक्ष डॉ. सुरेंद्र बारलिंगे कोणावर तरी आपली कृपादृष्टी प्रेमपूर्वक टाकून दहा हजारांची थैली त्याच्या झोळीत टाकत. कोणाच्याही वाङ्मयीन कर्तृत्वापेक्षा बारलिंगे यांच्या मेहेरबानीवर ही शासकीय खैरात अवलंबून असे.

महाराष्ट्र साहित्य परिषद आपल्या वर्धापन-दिनी ( २७ मे रोजी ) एका ज्येष्ठ साहित्यिकाची निवड करून त्याला तीन हजार रुपयांचा पुरस्कार आणि मानचिन्ह

प्रदान करते.

कॉंटिनेंटल प्रकाशनच्या अनंतराव कुळकर्णी यांनी चिं. वि. जोशी आणि कुसुमाग्रज या आपल्या दोन मातब्बर लेखकांच्या नावाने विनोदी वाङ्मय आणि काव्य यासाठी दोन पुरस्कार प्रत्येकी १२०० रुपयांचे देण्याची व्यवस्था केली आहे. या पुस्तकांच्या प्रकाशकांनाही प्रत्येकी ८०० रुपये देण्याचे औदार्य त्यांनी दाखवले आहे. म. सा. परिषदेकडे या पुरस्काराची सर्व जबाबदारी सुपूर्त करण्यात आली आहे.

केशवराव कोठावळे यांच्या स्मृति-प्रीत्यर्थ मॅजेस्टिक प्रकाशनने दरवर्षी एका उत्कृष्ट पुस्तकाला पारितोषिक व मानपत्र देण्याचा उपक्रम गेली काही वर्षे चालवला आहे.

मेनका प्रकाशनानेही आपले आवडते साहित्यिक पु. भा. भावे यांच्या स्मरणार्थ दरवर्षी आपल्या एका लेखकाला पुरस्कार-मानचिन्ह देण्याचा परिपाठ ठेवला आहे.

श्री लेखन वाचन भांडारचे कृष्णकुमार ठोकळ यांनी आपले वडील ग. ल. ठोकळ यांच्या स्मृतिपर एक हजार रुपयांचा पुरस्कार या वर्षापासून ग्रामीण साहित्यासाठी ठेवला आहे. त्याची व्यवस्थाही म. सा. परिषद पाहणार आहे.

महाराष्ट्र वाङ्मय मंडळ ही संस्था कराड पुरस्काराची व्यवस्था पाहते. साहित्य संमेलनातून उरलेल्या रकमेचा ट्रस्ट करून त्याचा विनियोग नव्या, पण प्रतिभावंत लेखक-कवींना पुरस्कार देण्यासाठी केला जातो.

सुप्रसिद्ध कथाकार शंकर पाटील यांच्या षष्ट्यब्दिपूर्तीनिमित्त नव्या दमदार कादंबरीकाराला व कथाकाराला आलटून पालटून दोन हजार रुपयांचे बक्षीस देण्याची व्यवस्था केली गेली आहे.

अनंत काणेकर यांनी ललितलेखन, प्रवासवर्णन, नाट्यलेखन आणि काव्यलेखन यात रस घेतला. त्या तीन वाङ्मयप्रकारांतील उत्तम कृतींना आलटून पालटून प्रत्येकी तीन हजार रुपयांचे पारितोषिक सुरू करण्यात आले आहे.

विष्णुपंत भागवत यांनी मौजच्या रूपाने मराठी ग्रंथमुद्रणात एक नवा आदर्श निर्माण केला. उत्कृष्ट ग्रंथनिर्मितीबद्दल प्रकाशन संस्थांना त्यांच्या नावे पुरस्कार देण्यात येतो. या पारितोषिकाची यंत्रणा मुंबई मराठी साहित्य संघ हाताळते.

## परिषदेमार्फत ३० पुरस्कार

महाराष्ट्र साहित्य परिषदेकडे निरनिराळ्या संस्थांनी आणि व्यक्तींनी पारितोषिक दिलेल्या देणग्यांमधून दरवर्षी सुमारे ३० पुरस्कार दिले जातात. कवितांसाठी महाराष्ट्रकवी यशवंत पारितोषिक (रुपये ५०१) आणि ह. स. गोखले पारितोषिक ( रुपये ३०० ) हे पुरस्कार वर उल्लेखिलेल्या कुसुमाग्रज पारितोषिकाव्यतिरिक्त आहेत.

कथांसाठी आनंदीबाई शिर्के पारितोषिक ( रुपये १००० ), नी. स. गोखले पारितोषिक ( रुपये ३०० ) आणि दि. बा. मोकाशी पारितोषिक (रुपये ५००) ठेवण्यात आली आहेत. मात्र मोकाशी पुरस्कार आलटून पालटून कादंबरी व प्रवासवर्णने यांच्यासाठीही द्यावयाचा आहे.

कादंबऱ्यांसाठी वा. म. जोशी पुरस्कार ( रुपये १००० ) आणि ह. ना. आपटे पारितोषिक ( रुपये १०१ ) ही दोन बक्षिसे आहेत.

समीक्षेसाठी शेणोलीकर व रा. श्री. जोग यांच्या नावे, तर ललितेतर वैचारिक ग्रंथांसाठी विश्वनाथ पार्वती गोखले, ना. गो. चापेकर, शिवरामपंत परांजपे, ठाकूर देसाई यांच्या नावांची दीडशे ते चारशे रुपयांची बक्षिसे आहेत. इतिहास, संत-वाङ्मय, कोशवाङ्मय, कुमारवाङ्मय, उत्कृष्ट संपादित ग्रंथ यासाठीही शंभर ते पाचशे रुपयांची छोटेखानी बक्षिसे आहेत.

महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक सभेची पारितोषिके, केसरीच्या वतीने देण्यात येणारे केळकर पारितोषिक, लोकमान्य सेवा संघाचे पेंढारकर पारितोषिक ही आणखी काही पारितोषिके. दोन वर्षांनी देण्यात येणाऱ्या पेंढारकर पारितोषिकाची रक्कम ५००० रुपये आहे; परंतु त्याचा विशेष गाजावाजा झालेला नाही. अनेकांना तर त्याबद्दल कल्पनाही नसेल. वनिता समाजानेही उत्कृष्ट स्त्री-लेखिकेला दहा हजारांचा पुरस्कार दरवर्षी देण्याचा मनोदय जाहीर केलेला आहे.

## विशिष्ट प्रकारास पुरस्कार

उत्कृष्ट ग्रंथनिर्मितीला सोन्याबापू ढवळे पुरस्कार ( प्रकाशकाला ) १००० रुपये गतवर्षापासून देण्यात येत आहे. ग्रंथप्रसार कार्य निष्ठापूर्वक करणाऱ्या व्यक्तीला गंगाधर गाडगीळ यांनी एक पुरस्कार ठेवलेला आहे.

काही विशिष्ट प्रकारच्या लेखनासाठी आपल्याकडे पारितोषिके आहेत. ग्रामीण

विकासाच्या दृष्टीने उपयुक्त ग्रंथाला गुरुवर्य सवनीस पारितोषिक, आयुर्वेदविषयक ग्रंथाला इन्स्टिटयूट ऑफ इंडियन मेडिसिनचे पारितोषिक, ग्रंथालय शास्त्रविषयक लेखनाला वा. वि. भट पारितोषिक, महानुभाव पंथाविषयीच्या ग्रंथाला महानुभाव ग्रंथोत्तेजक पारितोषिक, धार्मिक ग्रंथाच्या प्रकाशकाला केशव भिकाजी ढवळे पारितोषिक, भाषा विज्ञानविषयक ग्रंथाला बँक ऑफ महाराष्ट्राचा पुरस्कार इत्यादी पारितोषिकांचा या संदर्भात निर्देश करता येईल.

'सोविएत देश 'तर्फे रशिया-भारत मैत्रीच्या दृष्टीने उपयुक्त ठरणाऱ्या कृतीबद्दल लेखकांना दहा हजार रुपये व रशियाचा दौरा असे दुहेरी बक्षीस मिळते. शिवाय पाच हजार रुपयांचीही काही बक्षिसे असतात. परंतु ही पारितोषिके साधारणपणे कम्युनिस्ट विचारसरणीच्या लेखकांनाच दिली जातात. त्यासाठी जे पुस्तक निमित्तमात्र ठरवले जाते, ते वाङ्मयीन गुणवत्तेच्या दृष्टीने कुठल्याही कसोटीला उतरावे, अशी अपेक्षा बहुधा नसावी.

**प्रतीकात्मक**

मोजके अपवाद वगळता बहुतेक पारितोषिकांच्या रकमा या शंभर ते दोन हजार रुपयांच्या दरम्यान आहेत; म्हणजे त्या केवळ प्रतीकात्मक आहेत, असे आजच्या वाढत्या महागाईच्या काळात म्हणावे लागते. बहुतेक पारितोषिकांचे स्वरूप त्या त्या वर्षातील विशिष्ट वाङ्मयप्रकारातील उत्तम व उत्कृष्ट पुस्तक निवडणे हे आहे. पारितोषिक देऊन अशा लक्षणीय वाङ्मयीन कृतींचा गौरव करण्याची भावना अर्थात स्पृहणीय आहे. आपल्या वाङ्मयीन जाणिवेची आणि आस्थेची निदर्शक आहे. परंतु रुपयाच्या क्रयशक्तीत झपाट्याने होणाऱ्या घसरगुंडीमुळे या पारितोषिकांचा लेखकाला विशेष उपयोग होतो, असे म्हणणे अतिशयोक्तीचे ठरेल. शंभर रुपयांचे पारितोषिक स्वीकारण्यासाठी दोनशे रुपये प्रवासखर्चही कदाचित करावा लागतो आणि सगळ्याच संस्था प्रवासखर्चाची भरपाई करतात असे नाही. लेखकाला अर्थातच नव्या लेखनासाठी थोडाफार मानसिक दिलासा त्यामुळे मिळतो, त्याच्या अहंकाराला व अस्मितेला एक नवे परिमाण लाभते.

**बक्षिसे लहान, पण हमी मोठी**

बक्षिसाच्या रकमेवर अर्थात बक्षिसाचे महत्त्व ठरत नाही, असा मुद्दा कोणी

मांडला तर त्यावर वाद घालण्याचे कारण नाही. फ्रान्समधील एका पारितोषिकाचे उदाहरण येथे देण्यासारखे आहे. प्रिक्स गॉनकोर्ट हे पारितोषिक फक्त ५० फ्रँकचे आहे. म्हणजे फक्त दोनशे रुपये. परंतु हे पारितोषिक ज्या पुस्तकाला मिळते, त्या पुस्तकाचा लेखक अक्षरशः आनंदाने हवेत भराऱ्या मारतो. का ? तर हेः पारितोषिक मिळाल्यामुळे किमान पाच लाख प्रती खपणार, याची त्याला खात्री असते. अर्थात तशा प्रकारची लक्षावधी प्रतींच्या विक्रीची शक्यता फार थोड्या वाङ्मयीन पारितोषिकांबाबत आढळते, हा इंग्लंड-अमेरिकेतलाही अनुभव आहे. फ्रान्समधील हे पारितोषिक त्या दृष्टीने अजोड आहे. १९०३ सालापासून ते अव्याहतपणे देण्यात येत आहे.

इंग्लंडमधील उत्कृष्ट वाङ्मयासाठी शंभरावर पुरस्कार आहेत आणि दरवर्षी त्यात दहा-वीस नव्या पारितोषिकांची भर पडत आहे. त्याविषयी मिळालेली माहिती आपल्या मराठी साहित्याच्या पार्श्वभूमीवर ताडून पाहण्यासारखी आहे. केवळ वाङ्मय-प्रकारांच्या अनुरोधाने बक्षिसे ठेवण्यापेक्षा त्यात वेगळेपणा कसा आणता येईल आणि या बक्षिसाचा उपयोग पुस्तकांच्या प्रचारासाठी कसा होऊ शकतो, यावर थोडाफार प्रकाश त्यामुळे पडू शकेल. शंभर पौंडांपासून तीस हजार पौंडांपर्यंत या पारितोषिकांच्या रकमा आहेत. एक पौंड म्हणजे ४० रुपये. या हिशेबाने सर्वांत मोठे पारितोषिक १२ लाख रुपयांचे ठरते.

### बुकर व व्हिटब्रेडचा प्रभाव

इंग्लंडमध्ये 'बुकर प्राइझ' आणि 'व्हिटब्रेड बुक ऑफ दि इयर प्राइझ' या दोन पारितोषिकांचा विशेष दबदबा आहे. अमेरिकेतील पुलिट्झर पारितोषिकांशी त्याची तुलना करता येईल. बुकर पुरस्कार हा एका अर्थाने मानदंड ठरला आहे. इंग्लंडचा प्रिक्स गॉनकोर्ट पुरस्कार असेही त्याचे वर्णन केले तर वावगे ठरणार नाही. हे पारितोषिक सकस खाद्यपदार्थ निर्मिती व विक्री करणाऱ्या मॅक्कोनेल या तेथील मातब्बर संस्थेने सुरू केलेले आहे. आपल्या उत्पादनांचा प्रचार करण्याचा एक मार्ग म्हणून या संस्थेला वाङ्मयीन पारितोषिके देण्याची इच्छा झाली की वाङ्मयाबद्दलच्या आंतरिक आस्थेतून – हे आज महत्त्वाचे नाही. १९७१ पासून सुरू असलेल्या या पारितोषिकांनी इंग्लंडमधील वाङ्मयीन विश्वात चैतन्य निर्माण केले, याला खरे महत्त्व आहे. साहित्य क्षेत्र आणि उद्योग-धंदे-व्यवसाय

यांच्यातील साहचर्य दोघांनाही श्रेयस्कर ठरते, हे या पारितोषिकाद्वारे चांगल्या प्रकारे लक्षात येते.

आरंभी हे पारितोषिक फक्त सात वर्षांच्या बोलीने सुरू करण्यात आले. पहिल्या वर्षी ते पी. एच. न्यूबी यांच्या 'समथिंग टु अॅन्सर फॉर' या कादंबरीला मिळाले. पारितोषिक मिळूनही त्या कादंबरीच्या त्या वेळी फक्त १८०० प्रती खपल्या. १९८२ मध्ये टॉमस केनीली यांच्या 'शिंडलर्स आर्क' या कादंबरीला हे बक्षीस मिळाले. दरम्यानच्या काळात या पारितोषिकाची महती खूपच वाढली. तेथील दूरदर्शनवर, रेडिओवर आणि वृत्तपत्रांमध्ये विपुल प्रसिद्धी मिळू लागली. ग्रंथविक्रेते या पारितोषिकप्राप्त पुस्तकांच्या खपासाठी विशेष व्यवस्था करू लागले. त्या वर्षीचे खपाचे आकडेच विचारात घेऊन पाहा. हे पारितोषिक दिनांक १९ ऑक्टोबरला जाहीर झाले. दिनांक १५ ऑक्टोबरला कादंबरीच्या साडेचार हजार प्रती खपलेल्या होत्या. २२ ऑक्टोबरला पुस्तकांची १७ हजार प्रतींची पहिली आवृत्ती संपली आणि जानेवारीपर्यंत हा खप ४० हजारांवर गेला.

**वाचकांवर प्रभाव**

१९८७ चा बुकर प्राइझ वितरणाचा समारंभ हा अॅकॅडमी अॅवार्डसारखा थाटामाटाचा झाला आणि तो इंग्लंडमधील टेलिव्हिजनवर मोठ्या प्रमाणावर दाखवण्यात आला. त्याचा प्रभाव वाचकवर्गावर पडल्याविना कसा राहील ?

या बुकर पारितोषिकाच्या निवडीबाबत सर्वच जाणकार वाचकांना समाधान आहे असे नाही. तेथेही मतभेद होतातच. डोरसेट लायब्ररी सर्व्हिस या संस्थेने या घटनेचे एका अभिनव पद्धतीने भांडवल केले. ज्या पुस्तकांना हे बक्षीस मिळायला हवे होते; परंतु ते मिळाले नाही, अशा २० कादंबऱ्यांची निवड या संस्थेने १९८५ साली केली. आणि 'नॉट ए बुकर' अशी त्यांची जाहिरात सर्वत्र केली. त्या जाहिरातीचा वाचकांवर इतका प्रभाव पडला की बुकर पारितोषिक हुकलेल्या या पुस्तकांनाही तुफान मागणी आली. बुकर प्राईझ मिळण्यास पात्र असणारी; पण ते हुकलेली ही पुस्तके गाजत राहिली. पीटर अॅक्रॉईडची 'हॉक्स मूर' ही कादंबरी १९८५ सालातील अनेकांच्या मते सर्वोत्कृष्ट कादंबरी होती; परंतु तिला बुकर प्राइझ मिळाले नाही. ते तिला मिळाले नाही, म्हणून इतकी टीका झाली की त्या वर्षी ही कादंबरी पारितोषिकपात्र 'दि बोन पीपल' या कादंबरीपेक्षाही

अधिक खपली.

### संडे एक्स्प्रेस पारितोषिक

बुकर पारितोषिकासाठी अनेकदा पुस्तकांची जी निवड होते ती चुकीची असते अशी भावनाही काही जाणकार वाचकांना स्वस्थ बसू देत नाही. संडे एक्स्प्रेस या या तेथील साप्ताहिकाचा वाङ्मयीन संपादक ग्रॅहॅम लॉर्ड याला या चुकीच्या निवडीबद्दल इतका राग आला की, त्याने संडे एक्स्प्रेसतर्फे त्या वर्षातील सर्वोत्कृष्ट पुस्तकाला देण्यासाठी स्वतःच एक नवे पारितोषिक देण्याचे जाहीर केले. शैलीदार पण वाचनीय ललितकृतीला हे पारितोषिक देण्यात येते. संडे एक्स्प्रेस पारितोषिक हे इंग्लंडमधील सर्वाधिक रकमेच्या पारितोषिकांपैकी एक आहे ( त्यापेक्षाही जादा रकमेचे पारितोषिक ललितेतर कृतीला एन्सीआर ही संस्था देत आहे. ) २५ हजार पौंड– सुमारे दहा लाख रुपये रकमेचे ते आहे. इंग्लंडमध्ये अशी मोठ्या रकमेची पारितोषिके ठेवण्याची जणू स्पर्धाच आता लागली आहे.

### मंदीच्या काळात विक्रीला चालना

बुकरसारखेच महत्त्वाचे दुसरे पारितोषिक व्हिटब्रेड हे आहे. कादंबरी, पहिली कादंबरी, बालकादंबरी, चरित्र-आत्मचरित्र आणि काव्य या पाच प्रकारांतील पुस्तकांना नोव्हेंबरमध्ये व्हिटब्रेट पारितोषिके जाहीर केली जातात. ज्यांना ही पारितोषिके मिळतात त्या पुस्तकांची विक्री खिसमसमध्ये दणकेबाज होते; आणि जानेवारीमध्ये त्या पाच पुस्तकांपैकी एक त्या वर्षाचे सर्वोत्कृष्ट पुस्तक म्हणून घोषित केले जाते. जानेवारीतील पुस्तक विक्रीक्षेत्रातील मंदीची झळ कमी करण्यासाठी या बक्षिसाच्या घोषणेचा उपयोग चांगला होतो. १९८७ मध्ये ‘ अंडर दि आय ऑफ दि क्लॉक ’ या खिस्तोफर नोलानच्या आत्मचरित्रवजा पुस्तकाची निवड सर्वोत्कृष्ट म्हणून करण्यात आली. खिसमस ते जानेवारी या दरम्यान या पुस्तकाच्या ३० हजार प्रती विकल्या गेल्या. पाच वेळा त्याचे पुनर्मुद्रण करावे लागले.

बुक ट्रस्ट ही इंग्लंडमधील संस्था १३ वाङ्मयीन पुरस्कारांचे नियंत्रण करते. ऑड फेलोज सोशल कन्सर्न अवॉर्ड, हे त्यांपैकी एक आहे. दरवर्षी वेगवेगळ्या सामाजिक महत्त्वाच्या विषयावरील पुस्तकाला हे पारितोषिक देण्यात येते.

## उद्योगपतींचा पुढाकार

कादंबऱ्या, काव्य, बालवाङ्मय या वाङ्मयप्रकारांसाठी इंग्लंडमध्येही मोठ्या संख्येने पारितोषिके आहेत; परंतु विशिष्ट विषयावरील पुस्तकांना मिळणारी पारितोषिकेही काही कमी नाहीत. आणि लक्षात घेण्यासारखी बाब अशी की, बुकर व व्हिटब्रेड या औद्योगिक संस्थांप्रमाणेच इतरही बडे कारखानदार व उद्योगपती अशा प्रकारच्या बक्षिसांसाठी आता पुढे येऊ लागले आहेत. साहित्य-कलावृद्धीसाठी आपला हातभार लागतो आहे, हा तेथे प्रतिष्ठेचा व आत्मगौरवाचा एक नवाच आविष्कार मानला जात आहे. टॉमस कुक या जगद्विख्यात प्रवासी कंपनीने प्रवासवर्णनात्मक उत्कृष्ट पुस्तकाला पारितोषिक ठेवले आहे. आपल्या सर्व शाखांतून त्या पुस्तकाच्या विक्रीची व्यवस्थाही करण्याची त्या कंपनीची योजना आहे. डब्ल्यू. एच. स्मिथ ही इंग्लंडमधील ग्रंथविक्री केंद्राची सर्वांत मोठी साखळी आहे. तिच्या नावाने देण्यात येणारे वाङ्मयीन पारितोषिक ज्या पुस्तकांना मिळते, त्यांची आकर्षक मांडणी त्या सर्व शाखांमधून केली जाते. त्यामुळेही खपात वाढ होते, असा अनुभव आहे.

महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे देण्यात येणारी बरीचशी पारितोषिके ही कोणाच्या तरी स्मृतीदाखल आहेत. इंग्लंडमध्येही अशा स्मृति-पुरस्कारांची संख्या मोठी आहे. युद्धभूमीवर अकाली मरण पावलेल्या जॉन लेवेलिन ऱ्हीस याच्या नावाने त्याच्या पत्नीने ४५ वर्षांपूर्वी एक पारितोषिक देणे सुरू केले. ते फक्त ५०० पौंडांचे आहे; परंतु पस्तिशीच्या आतील लेखकालाच ते देण्यात येते, त्यामुळे त्याचीही महती मोठी मानली जाते. व्ही. एस. नायपॉल, मार्गारेट ड्रॅबल, एंजेला कार्टर वगैरेंना ते मिळालेले आहे.

विज्ञानकथा ( आर्थर सी. क्लार्क अॅवॉर्ड ), वैद्यकीय लेखन ( अशर प्राइज ), उत्तम सूची ग्रंथ ( बेस्टरमन अॅवॉर्ड ), गिर्यारोहणावरील लेखन ( बोर्डमन टस्कर अॅवॉर्ड ); ग्रंथ मांडणी व निर्मिती ( रेडवूड बर्न अॅवॉर्ड ), चित्रपटविषयक ग्रंथ ( फिल्म इन्स्टिटयूट अॅवॉर्ड ), विज्ञानकथा (ब्रिटिश सायन्स फिक्शन असोसिएशन अॅवॉर्ड ), धार्मिक ग्रंथ ( कॉलिन्स अॅवॉर्ड ), गुन्हेगारकथा ( क्राइम रायटर्स असोसिएशन अॅवॉर्ड ), फ्रेंच-ब्रिटिश सामंजस्यवृद्धी (एनिड मॅकलिओड अॅवॉर्ड), ज्यूविषयक लेखन ( विनगेट अॅवॉर्ड ), ऐतिहासिक कादंबरी ( हेयर अॅवॉर्ड ), आंतरराष्ट्रीय जलपर्यटनविषयक ग्रंथ ( मेरिटाइम बुक प्राइझ ), समुद्रविषयक ग्रंथ

( किंग जॉर्ज फंड फॉर सेलर्स अॅवॉर्ड ), प्रवास मार्गदर्शक ( लंडन टूरिस्ट बोर्ड अॅवॉर्ड), सर्वोत्कृष्ट स्कॉटिश लेखक (मकूव्हिटिंज् प्राइझ), मनोविकृतिविषयक ग्रंथ ( माइंड बुक-अॅलन लेन अॅवॉर्ड ), कलेचा इतिहास ( मिटचेल प्राइझ ), चरित्र ( नेल्सन हर्स्ट अँड मार्श अॅवॉर्ड ), ग्रंथालय व्यवस्थापनात सुधारणा सुचविणारा ग्रंथ (रॉबिन्सन अॅवॉर्ड), रोमँटिक कादंबरी ( रोमँटिक नॉव्हेलिस्ट्स असोसिएशन अॅवॉर्ड ), नाट्यकृती ( सॅम्युएल बेकेट अॅवॉर्ड ), जर्मन ग्रंथांचे इंग्रजीत भाषांतर ( श्लोगेल-टिक प्राइझ ), फ्रेंच ग्रंथांचे इंग्रजीत भाषांतर ( स्कॉट मोनक्रिक अॅवॉर्ड), वास्तुशास्त्र ( सर बॅनिस्टर फ्लेचर अॅवॉर्ड ), शिक्षणविषयक ग्रंथ (स्टँडिंग कॉन्फरन्स ऑफ स्टडीज इन एज्युकेशन बुक प्रायझेस ), उद्योगधंद्यांचा इतिहास ( वॅडस्वर्थ प्राइझ ), उत्तम अनुक्रमणिका व सूची ( व्हीटले अॅवॉर्ड ), इतिहासविषयक ग्रंथ ( वूल्फसन अॅवॉर्ड ), अशी अनेक पारितोषिके इंग्लंडमध्ये आहेत. अप्रकाशित रोमँटिक कादंबरीला बेटी टोस्क अॅवॉर्ड देण्यात येते.

### उल्लेखनीय सॉमरसेट मॉम पुरस्कार

या सर्वांत लक्ष वेधून घेणारा पुरस्कार सुप्रसिद्ध साहित्यिक सॉमरसेट मॉम यांच्या स्मृतीदाखल आहे. तरुण लेखकाला आपले अनुभवविश्व संपन्न करण्यासाठी प्रवास करण्याची संधी या पुरस्कारामुळे मिळते. १९८७ मध्ये या पुरस्काराचा मान स्टिफन ग्रेगरी, जानी हौकर, अँड्र्यू मोशन या तिघांना मिळाला.

आपल्याकडील वाङ्मयीन पुरस्कारांचा उपयोग ग्रंथविक्रीला चालना देण्यासाठी तसेच लेखकांना आपल्या आवडीच्या विषयांचा पाठपुरावा करण्याची संधी देण्यासाठी कितपत होतो ? अशा पुरस्कारांचा प्रभाव वाढणे श्रेयस्कर ठरेल. प्रकाशक-लेखक-साहित्यसंस्था यांनी त्याबाबत जागरूकता दाखवायला हवी. आपल्याकडील आघाडीवरच्या औद्योगिक प्रतिष्ठानांनीही त्यात रस घ्यायला हवा. वृत्तपत्रे-नियतकालिके ग्रंथप्रसाराचे काम आपल्या परीने करीत आहेत. अशा पुरस्कारांना वृत्तपत्रांप्रमाणेच रेडिओ-दूरदर्शनने व्यापक प्रसिद्धी द्यावी, ती उत्तेजनार्ह ठरेल, हे जाताजाता सुचवावेसे वाटते.

### लेखकाला उत्तेजन-प्रोत्साहन

पुरस्कारांमुळे लेखकाला आपल्या श्रमाचे चीज झाल्याचे समाधान निश्चित मिळते. त्याचा उत्साह वाढतो. आत्मविश्वास वाढतो. नव्या लेखनाला जोर येतो.

पुरस्काराच्या बातम्या वृत्तपत्रात आल्यामुळे अनेक वाचकांनाही त्या पुरस्काराबद्दल कुतूहल वाटू लागते. त्यातून मागणी वाढू शकते. खपाला गती मिळते. पुरस्कारांमुळे वाचकांनाही चांगले पुस्तक कुठले, याची कल्पना येते. पुस्तकांच्या दुकानात गेल्यावर समोर हजारो पुस्तके दिसतात. त्यांपैकी कुठले निवडावे, असा संभ्रम पडतो. अशा वाचकांची सोय होते. ' अमुक पारितोषिक मिळवणारे पुस्तक द्या ' अशी मागणी करता येते. पारितोषिके मिळवणारे पुस्तक त्यातल्या त्यात दर्जेदार असणार, वाचनीय व चांगले असणार, अशी खूणगाठ मनाशी बांधून वाचक ते खरेदी करू शकतो. प्रकाशकांनाही अशा पुरस्कारांमुळे हुरूप येतो; पुस्तकांची निवड कसोशीने करण्याची, नव्या लेखकांचा शोध घेण्याची प्रेरणा मिळते. सजावट, मांडणी, मुद्रण, सुबक असावे म्हणून विशेष दक्षता घेण्याची बुद्धी होते. अशा पुस्तकांचा खप इतरांपेक्षा जास्त होतो, ही खात्री पटल्याने तो पुस्तकाकडे अधिक लक्ष देऊ लागतो. लेखक, प्रकाशक, चित्रकार, वाचक अशा सर्वांनाच हे पुरस्कार फायदेशीर ठरू शकतात. नवीन पारितोषिके ठेवणाऱ्यांनी कथा-कादंबरी इ. वाङ्मयप्रकारानुसार ती ठेवण्याऐवजी लेखक-कवींचे उमेदीचे वय, निर्मितिप्रक्रियेला चालना देण्याची क्षमता वगैरे बाबी लक्षात घेऊन काही नवे पर्याय व मार्ग शोधण्यात रस दाखवला पाहिजे.

**पण खप कुठे होतो ?**

पुरस्कारामुळे पुस्तकाच्या खपाला वेगवान गती मिळू शकते, असे इंग्लंड-फ्रान्समधील उदाहरणांवरून ध्यानात येते. आपल्याकडेही काही पुस्तकांच्या बाबतीत त्याचा पडताळा येतो. परंतु पुरस्काराच्या घोषणेचा फायदा घेऊन, प्रसिद्धीसाठी त्याचा वापर करणे व ग्राहकांना त्या पुस्तकाकडे आकृष्ट करणे यासाठी जी योजना करावी लागते, ती करण्याकडे आपल्या लेखक-प्रकाशकांचे अजून लक्ष गेलेले नाही. त्यामुळेच केवळ पुरस्कारांच्या संख्येत व रकमेत वाढ होऊन काही फायदा नाही. त्या पुरस्कारांचा उपयोग प्रसिद्धीप्रचारासाठी करून घेऊन पुस्तकाच्या प्रतींचा जलद उठाव होण्यासाठी कार्यक्षम यंत्रणा सिद्ध केली तरच या पुरस्कारांचे सार्थक होईल; एरव्ही नाही.

( महाराष्ट्र टाइम्स, रविवार दि. १८ सप्टेंबर १९८८ )

६

# साहित्य-जगतातले ग्लासनोस्त

रशियात मासिकांचा खप वाढत आहे; परंतु तरीही आपल्याला हव्या असलेल्या मासिकाचा अंक नक्की मिळेलच अशी खात्री देता येत नाही. मासिकाचे वर्गणीदार झाले, तर मात्र हक्काने प्रत मिळू शकते. परंतु वर्गणीदार होणे हेही तेथे सोपे नाही. स्टॉलवर वा पुस्तकाच्या दुकानात ताज्या अंकाच्या प्रती हातोहात खपतात.

वृत्तपत्र-वितरणाची व्यवस्था शासकीय पातळीवरच केलेली असते आणि ती एक प्रकारची मक्तेदारीच असते. त्यामुळे इतरत्र कोठे वृत्तपत्रे वा मासिके मिळत नाहीत. त्या त्या भागातील स्टॉल सकाळी आठ वाजता उघडतात; परंतु त्याआधीच वाचक-ग्राहक रांगा लावून उभे असतात. मोठ्या हॉटेलमधून वृत्त-पत्रकेंद्रे असतात, तेथेही हाच परिपाठ आढळतो. वृत्तपत्र वा मासिक मिळवायचे असेल तर तेथेही आधीच रांग लावून उभे राहावे लागते. अनेक वाचक-ग्राहक त्या स्टॉलवरील विक्रेत्या स्त्रीकडे तेथे असलेल्या प्रत्येक अंकाची एकेक प्रत दे, अशी मागणी करतात आणि तिलाही त्यात काही आश्चर्य वाटत नाही; कारण रशियन वृत्तपत्रांच्या व मासिकांच्या किंमती अल्प असतात आणि स्टॉलवर येणाऱ्या प्रतींची संख्या मोजकीच असल्याने, प्रत्येकाला जे मिळेल ते सगळे घ्यावे असा मोह झाल्याविना राहत नाही. आपण कुठल्याही स्टॉलवर गेलो तर सगळी मासिके दे, शेतीविषयक असो, शेअरमार्केटविषयी असो की भविष्यविषयक असो, असे सहसा म्हणणार नाही. परंतु रशियात मात्र आपल्याला गम्य नसलेल्या

विषयांवरील मासिकेही स्टॉलवर केवळ उपलब्ध आहेत म्हणून घेणारे वाचक सापडतात. स्टॉल उघडल्यावर दहा-पंधरा मिनिटांत सारा माल संपतो. जास्तीत-जास्त तासभर स्टॉल उघडा राहतो. दैनिके व लोकप्रिय मासिके, साप्ताहिके या स्टॉलवर उपलब्ध होतात; परंतु वाङ्मयीन मासिके मात्र अशा स्टॉलवर सहसा येत नाहीत. त्यामुळे ती मिळवण्याकरिता रशियात खूपच यातायात करावी लागते; धूर्तपणा आणि चातुर्य पणाला लावावे लागते.

## विक्रेत्यांचाही निरुत्साह

• काही रेल्वे स्टेशन्सवरील स्टॉलवर अशी मासिके येतात; परंतु तेथील विक्रेत्या महिला ती मासिके ग्राहकाच्या लक्षात येतील अशा रीतीने प्रदर्शित करतातच असे नाही. माहितगार माणूसच त्या विक्रेतीला त्या मासिकाचा अंक गठ्ठ्यातून काढून द्यायला लावतो. प्रसंगी एका रुबलच्या मासिकाला दोन-तीन रुबल देण्याचे आमिषही दाखवावे लागते. काही विशिष्ट स्टॉलवर रशियाच्या विशिष्ट भूप्रदेशातील विक्रेत्यांची नेमणूक झालेली असते. आपल्या विशिष्ट भागातील मासिके मागवण्यावर त्यांचा भर राहतो. आपल्याकडचे उदाहरण देऊन हे सांगता येईल. समजा, बंगाली विक्रेता एखाद्या स्टॉलवर असेल तर तो एखाद-दुसरा बंगाली अंक ठेवीलच. कानडी विक्रेता असेल तर कानडी मासिकही मागवील. तसे रशियातही घडते. अशा विशिष्ट स्टॉल्सवर उपलब्ध असणाऱ्या भाषिक नियतकालिकांचा शोध घेऊन ती मिळवणे हे रशियन वाचकाच्या लेखी मोठे चिकाटीचे आणि चातुर्याचे काम ठरते. अशा विशिष्ट विषयांवरील वा भाषांतील मासिकांना अर्थातच त्या स्टॉलवर मोजकी मागणी असेल किंवा तुफान मागणी असेल; परंतु त्याचा छडा लावणे हा काहीसा संशोधनाचा, हेरगिरीचा भाग ठरतो.

## अनपेक्षितपणे मिळणारी महत्त्वाची माहिती

रशियन मासिकांबाबत आणखीही एक गंमतीदार अनुभव काही परदेशी वाचकांनी नोंदविलेला आहे. 'सोविएत म्युझिक' या मासिकावर प्रसिद्ध सिम्बॉलिस्ट चित्रकार मार्क छगाल याचे पेंटिंग आलेले आढळले आणि 'सोविएत सोल्जर' या मासिकातील एका लेखात देशप्रेमी रशियनांना छगालच्या ज्यूइश प्रतीकात्मक चित्रांची अथवा नोबेल पारितोषिक विजेत्या ब्रॉडस्कीच्या काव्याची

काहीच गरज नाही, ब्रॉडस्की हा काही खरा कवी नव्हेच, असा त्यात युक्तिवाद करण्यात आला होता.

सध्या खुलेपणाचे पर्व असल्याने रशियन मासिकांत येणाऱ्या लेखांमधील वैविध्यही वाढले आहे. त्यात येणारी माहिती ही अनेकदा अधिकृत सरकारी सूत्रांनी दिलेल्या माहितीपेक्षा वा आकडेवारीपेक्षा अधिक वास्तव व नेमकी असते, असेही आढळून येते. त्यामुळे निरनिराळ्या देशांच्या वकिलाती अशी मासिके हस्तगत करण्यासाठी आपल्या कार्यालयातील काही कर्मचाऱ्यांना पूर्णवेळ भटकंती करायला लावतात. राजनैतिक गोटातील भेटीगाठींतून मिळणाऱ्या माहिती-पेक्षाही अधिक खात्रीलायक माहिती या नियतकालिकांतून कळत-नकळत येत असते आणि काही वेळा ती माहिती छापणाऱ्या नियतकालिकांनादेखील तिचे महत्त्व कळलेले असतेच असे नाही.

## प्रचारकी पुस्तके

रशियात कागद-टंचाई जाणवण्याजोगी आहे; परंतु तरीही प्रचारकी साहित्याचे मुद्रण व वितरण मोठ्या प्रमाणावर होत राहिले आहे. असे टनावारी प्रचारकी साहित्य गोदामात धूळ खात पडले आहे. पुस्तकांच्या दुकानात व वाचनालयातही त्याने बरीच जागा अडवली आहे. नव्या खुलेपणाच्या धोरणामुळे अशा न खप-लेल्या पुस्तकांच्या आकडेवारीचे प्रकाशन होऊ लागले आहे. काही लेखकांनी उच्चपदस्थांशी संधान बांधून आपली सुमार पुस्तके छापून घेतली; त्यांचे पितळ उघडे पडत आहे.

रोमन गॅझेट ही प्रकाशनसंस्था दर महिन्याला एक कादंबरी प्रसिद्ध करते. सुमारे दहा ते वीस लाख प्रतींची आवृत्ती असते. किंमत बेताची असते. शासकीय कृपादृष्टी असणाऱ्या लेखकाचीच कादंबरी त्यासाठी पूर्वी निवडली जात असे; परंतु आता मात्र नव्या शासकीय धोरणामुळे स्टॅलिनविरोधी व सरकारी धोरणावर टीका करणाऱ्या विषयांवरील कादंबऱ्याही प्रसिद्ध होऊ लागल्या आहेत. रिबाकोव्हच्या 'चिल्ड्रेन ऑफ दि अरबाट' या कादंबरीच्या १२ लाख प्रती दोन महिन्यांत संपल्या. ही कादंबरी रशियात फक्त एकाच दुकानात परकीय चलन घेऊन विकण्यात येई. ही कादंबरी दुझ्बा नरोदोव (जनमैत्री) मासिकात १९८८ च्या आरंभी तीन भागांत क्रमशः प्रसिद्ध झाली. तेव्हा त्याच्या खपात

चौपट वाढ झाली. मासिकाच्या ८ लाख प्रती छापाव्या लागल्या. नोवी मीर या मासिकाचा खप दहा लाख आहे. आणि त्यात नव्या-जुन्या लेखकांचे लिखाण प्रसिद्ध होत असते. रशियाचे अर्थकारण व समाजजीवन, यांवरील वादग्रस्त लेखही त्यात येतात. बोरिस पास्तरनाकच्या डॉ. झिवागोचे प्रकाशन या मासिकाने जानेवारी ते एप्रिल ८८ मध्ये केले. त्यामुळे त्याचा खप वाढला.

मोस्कवॉ या मासिकानेही असाच अभूतपूर्व खप गाठला. या मासिकाने निकोलाय करामझिन या इतिहासकाराने लिहिलेल्या रशियाच्या इतिहासाचे भाग क्रमशः प्रसिद्ध करण्यास आरंभ केला आणि त्याचा खप वाढू लागला. सर वॉल्टर स्कॉटच्या ऐतिहासिक रंजक कादंबऱ्यांच्या शैलीत लिहिलेला रशियन राजेरजवाडे यांचा इतिहास आजच्या वाचकांना भलताच खूष करीत आहे. गंमत अशी की, हा इतिहास १६० वर्षांपूर्वी लिहिला गेलेला आहे आणि १९१७ च्या ऑक्टोबर क्रांतीनंतर तो प्रसिद्ध करण्याचे टाळले गेले होते. त्यामुळे या पुस्तकावर वाचकांच्या उड्या पडत आहेत. मध्यंतरी रशियात इतिहास म्हणजे आकडेवाऱ्या व आलेख यांचे भरताड असे मानले जाई. त्यामुळे जुन्या रशियन इतिहासातील राजे-राण्या आणि त्यांचे पराक्रम, लफडी, कुलंगडी आणि कटकारस्थाने यांना अजिबात फाटा मिळालेला होता. करामझिनच्या दीडशे वर्षांपूर्वीच्या इतिहासात हा मालमसाला विपुल भरलेला आहे आणि रशियाच्या तरुण पिढीपुढे नव्यानेच जणू सारा खजिना खुला झाला आहे.

न्यू टाइम्स, फॉरिन लिटरेचर, झा रुबेझोम या मासिकांच्याही खपात लक्षणीय वाढ झाली आहे. ' फॉरिन लिटरेचर ' या मासिकाने जेम्स जॉइसच्या ' युलिसिस ' या कादंबरीतील उतारे छापण्यास आरंभ केला. इतर मासिकांनी फ्रांझ काफ्का आणि जॉर्ज ऑरवेल यांच्या कादंबऱ्यांचा धूमधडाका लावला आणि खप वाढवला. नेव्हा या मासिकाने ऑर्थर कोसलरच्या ' डार्कनेस ॲट नून 'चे भाग क्रमशः छापले. स्टॅलिनच्या दहशतवादाचे भयानक चित्र रंगवणारी ही कादंबरी रशियात प्रथमच प्रसिद्ध झाली.

अलेक्झांडर ड्युमाच्या ' काउंट ऑफ मॉंटे क्रिस्टो 'नेही अमाप वाचकांना वेड लावले. युरोपमधील जुन्या गाजलेल्या कादंबऱ्यांना आजही रशियात तुफान मागणी आहे. त्यांची प्रकरणे प्रसिद्ध करणे हा खपवाढीचा खात्रीचा मार्ग आहे. ॲगाथा ख्रिस्तीचीही लोकप्रियता मोठी आहे.

इझ्वेस्तिया या वृत्तपत्रानेही नव्या धोरणानुसार खळबळजनक लेख प्रसिद्ध करून आपल्या खपाला गती दिली. प्रावदा आणि ट्रुडे ही वृत्तपत्रे मात्र आपले जुने धोरण तसेच राखत असल्याने खपाच्या दृष्टीने मागे पडत आहेत.

### स्टॅलिनविरोधकांचे मुखपत्र

ओगोनयोव या सचित्र साप्ताहिकाचा खप १७ लाख पन्नास हजार आहे. हा खप तिप्पट-चौपट होऊ शकेल इतकी त्याला मागणी आहे. स्टॅलिनविरोधकांचे मुखपत्र म्हणून हे साप्ताहिक अत्यंत आक्रमक आवेशाने घणाघाती लेखन प्रसिद्ध करीत असते. यातील वाचकांची पत्रे हे सदर अत्यंत निर्भीड आणि वाचनीय असते. गंभीर पण सडेतोड लेखांनाही वेगळेच वजन असते.

रशियात सर्वच वृत्तपत्रे वा मासिके गोर्बाचेव्ह यांच्या नव्या धोरणाला प्रमाण मानतात असे नाही. स्टॅलिनचा कैवार घेणारी पत्रेही आपापल्या भूमिकेवर ठाम आहेत. स्टॅलिन यांनी न केलेल्या गोष्टीचे खापर त्यांच्यावर फोडून त्यांना उगाच दोष देण्यात येतो असा दृष्टिकोण ही वृत्तपत्रे मांडत आहेत. लष्कर व नोकरशाही यांचे गठबंधन करणारी कडेकोट शासनयंत्रणा सिद्ध करण्याचे काम ट्रॉटस्कीचे होते; स्टॅलिनचे नव्हते, स्टॅलिनने केवळ त्या धोरणाचा पाठपुरावा केला, असे हे स्टॅलिनवादी म्हणतात. शेतीला सामुदायिक रूप देण्याचे धोरण याकोवलेव याने आखले; स्टॅलिनने नाही, असे ते म्हणतात. शत्रूंचे व विरोधकांचे शिरकाण करण्याचे शुद्धीकरणाचे धोरण स्टॅलिन याने स्वीकारले नाही, ते मेखिल्सचे काम होते असेही त्यांचे मत आहे. जुनी ऐतिहासिक स्थळे जमीनदोस्त करण्याचे पाप कागानोविचने केले; स्टॅलिनने नाही, असे अनेक नवनवे गुन्हेगार व आरोपी स्टॅलिनवादी आज पुढे आणत आहेत. अर्थात स्टॅलिनच्या राजवटीविषयी प्रेम वाटावे, असे अजूनही काही घडलेले नाही. विशिष्ट धोरणांची आखणी विशिष्ट व्यक्तींनी केली असली, तरी स्टॅलिन हाच सर्व गोष्टींचा नियंत्रक होता हे विसरता येत नाही. सोविएत इतिहासकारांचे मुखपत्र वोप्रोसी इस्तोरी हे आपले जुने धोरणच रेटत होते. त्यावरील सर्व संपादकांची उचल-बांगडी करण्यात आली. नवे स्टॅलिनवादी आणि कम्युनिस्टविरोधी सनातनी यांचे संबंध सुधारत आहेत. रशियावर पाश्चात्य देशांचा प्रभाव पडू नये हा त्यांचा आग्रह; म्हणून सद्य:कालीन सरकारी धोरणाकडे ते संदेहाने बघत आहेत.

गोर्बाचेव्ह यांच्या पुनर्रचना कार्यक्रमाला यश येणार नाही, अशी त्यांची धारणा आहे. आपण रशियन लोक युरोपियन व जपानी यांच्याशी औद्योगिक व तांत्रिक बाबतीत कधीच स्पर्धा करू शकणार नाही; आर्थिक मजल गाठू शकणार नाही. आपला आध्यात्मिक वारसाच श्रेष्ठ आणि त्याचा रास्त अभिमान धरला तरच आपला देश ताठ मानेने उभा राहू शकेल, असा या उजव्या मताच्या लोकांचा सूर आहे. गोर्बाचेव्ह यांचे नवे धोरण हे उदारमतवाद्यांच्या भोंगळ निराशावादातून आणि ऐहिक वैभवाच्या स्वप्नाळूपणातून जन्माला आलेले आहे; त्यामुळे साम्यवादाशी बांधिलकी मानणाऱ्यांचा अवमान करणारे आहे, असे प्रतिपादन करणारेही लोक आहेत. त्याउलट मार्क्सवाद हा रशियाला परका आहे, त्याचा उगम झिऑनिस्ट ज्यू तत्त्वज्ञानात आहे, असाही कोणी उद्‍घोष करू लागले आहे. एवढेच नव्हे, तर ट्रॉटस्कीचे नाव घेऊन लेनिनवर छुपा हल्ला करण्याची संधी अनेकजण घेत आहेत.

**बंदी घातलेली पुस्तके**

गेल्या वर्षात सुमारे ३५०० अशा पुस्तकांचे रशियात प्रकाशन झाले की, ज्यांच्यावर पूर्वी स्टॅलिनच्या कारकीर्दीत बंदी होती. अर्थात यांतील बरीच पुस्तके वाङ्मयीन कलाकृती म्हणून यथातथाच आहेत. जुन्या जहाल क्रांतिकारकांनी लिहिलेली व सरकारी धोरणावर टीका करणारी अशी बरीच पुस्तके आहेत. त्यापैकी काही व्याकरणाची वा भाषेची पाठ्यपुस्तकेही आहेत. त्यांच्यावर बंदी घातली गेली, कारण त्यातील काही वाक्ये वा उदाहरणे तत्कालीन सरकारी धोरणाशी विसंगत असल्याने, सेन्सॉरने आक्षेप घेतला. रशियात गेल्या साठ वर्षांत हजारो पुस्तके प्रसिद्ध होऊच शकली नाहीत. अनेक लेखकांची हस्त-लिखिते तशीच पडून आहेत. रशियन समाजाचा इतिहास लिहिण्यासाठी लागणारी ऐंशी टक्के कागदपत्रे अजूनही सरकारी दप्तरखान्यात कडीकुलपात बंदिस्त आहेत. झारच्या आमदानीतही सेन्सॉरशिप होती आणि पुश्किनसारख्या अनेक लेखकांची त्यामुळे मुस्कटदाबी झाली होती. परंतु झारच्या सेन्सॉरशिपमधूनही मार्क्सचे 'दास कॅपिटल' सुटले व प्रसिद्ध होऊ शकले.

रशियातील अनेक लेखकांना ग्रासणारे ग्रहण आता सुटू लागले आहे. कादंबरीकार आंद्रे प्लेटोनोव्हची चेव्हेनगर, झामयतिनची वुई, नबोकोव्हची डॉन

वगैरे कादंबऱ्या यावर्षी प्रथमच रशियात वाचकांच्या हाती पडल्या. ॲनातोली रिबाकोव्हच्या 'चिल्ड्रन ऑफ अरबाटचे'ही प्रकाशन यंदाच झाले. १९५१ साली 'दि ड्रायव्हर्स' या कादंबरीबद्दल स्टॅलिन पुरस्कार मिळवणारा हा लेखक; आपल्या या कादंबरीच्या प्रकाशनासाठी पंचवीस वर्षे त्याला तिष्ठत राहावे लागले. स्टॅलिनच्या राजवटीतील दहशतवाद आणि जनतेला संमोहित करण्याची त्याची ताकद यांचे अंतर्भेदक चित्रण या कादंबरीत आले आहे.

### सेन्सॉरचा जाच

भयंकर, विघातक, देशविरोधी, पाखंडी अशी लेबले लावून अनेक कादंबऱ्यांच्या प्रकाशनाला मज्जाव करण्यात येत असे. अशा कादंबऱ्यांचे प्रकाशन आता मासिके–नियतकालिके यांत नित्यनेमाने होऊ लागले आहे. आपण ज्या काळात जगलो, त्या काळातील बऱ्याच घटना या आपल्यापासून दडवून ठेवल्या गेल्या, विशिष्ट एकांगी भूमिकेतून मांडल्या गेल्या, जगातील इतर देशांतील परिस्थितीचे सम्यक् ज्ञान आपल्याला होऊ नये याचा पद्धतशीर प्रयत्न शासनयंत्रणेने केला, हे आता तेथील लोकांच्या लक्षात येत आहे आणि मधल्या रिकाम्या जागा भरून काढण्याची, माहितीतील कच्चे व अपरिचित दुवे जाणून घेण्याची प्रक्रिया तेथे सुरू झाली आहे. सध्या जी नवी पुस्तके रशियात प्रसिद्ध होत आहेत, ती १९२०, १९३०, १९४०, १९५० या कालखंडातील रशियन सामाजिक व राजकीय घटनांशी संबंधित आहेत; आणि कलात्मकदृष्ट्या ती कदाचित सुमार व सामान्य असली, तरी तेथील जनतेच्या एकूण माहितीतील उणिवा भरून काढणारी असल्याने, त्यांच्याबद्दल अमाप कुतूहल तेथे आहे. जुन्या काळातील अत्याचार, भ्रष्टाचार, दुष्टपणा, जुलुम-जबरदस्ती, अन्याय यांचे हे प्रकटीकरण सामाजिक जीवनाच्या भावी निकोप घडणीला उपकारक ठरेल, आपल्या दृष्टीपुढील अंधार दूर करील, अशीही शक्यता असतेच. जीवनातील अनेक अनुभव, समाजातील अनेक घटक, हेदेखील साहित्याचे विषय होणे दुरापास्त झालेले असते. त्या घटकांनाही कुठेतरी कंठ फुटतो. रशियात सामाजिक वास्तववादाच्या नावाखाली गेल्या तीस-चाळीस वर्षांत प्रचारकी सुमार लेखनाला प्रतिष्ठेचे स्थान मिळाले. कलात्मकतेकडे तुच्छतेने पाहिले गेले. गैरसोयीचे वास्तव रंगवणाऱ्या कलावंतांना छळण्यात आले. त्यांच्या लेखनाला प्रसिद्धीची दारे बंद करण्यात

आली. अनेकांना देशत्याग करून बाहेर पडावे लागले. फिओडोर ॲब्रामोव्ह याने लिहिलेल्या 'दि हाउस' या कादंबरीत वृद्ध खेडुत महिला आणि कम्युनिस्ट पक्षाच्या जिल्हा समितीचा सदस्य यांना आपल्या श्रद्धांसाठी किती यातनांतून जावे लागते याचे चित्रण सामूहिक शेतीच्या पार्श्वभूमीवर केले गेले आहे. त्या वेळी या कादंबरीवर टीकाकारांनी झोड उठवली; पण आज ती गाजत आहे. तिच्यावर आधारलेले नाटकही तुफान गर्दी खेचत आहे. शासनमान्य धोरणाच्या पावित्र्याऐवजी व्यक्तीच्या स्वातंत्र्याची, बुद्धीची आणि सृजनाची प्रेरणा श्रेष्ठ असते, हे आता रशियात पुन्हा एकदा ठणकावून सांगण्याची मुभा मिळाली आहे.

## पुस्तक : विश्वासार्ह माध्यम

रशियन नागरिक पुस्तकांकडे केवळ करमणुकीचे साधन म्हणून पाहत नाही; रशियात पुस्तक या माध्यमावर जनतेचा विश्वास आहे. दूरचित्रवाणी, नभोवाणी, वृत्तपत्रे व मासिके यांपेक्षा पुस्तके हे अधिक प्रामाणिक माध्यम आहे, अशी तेथील जनतेची भावना आहे. अनेक लेखकांनी अमाप हालअपेष्टा सोसून, शारीरिक-मानसिक छळ सोसून, आपल्याला हवे ते लेखन करण्याचे व्रत निभावून नेले. तत्कालीन शासनकर्त्यांच्या हितसंबंधांसाठी स्वतःला गवसलेले सत्य दडवण्याचे नाकारले. शासनकर्त्यांपुढे लोटांगण घालून प्रचारकार्यात गुंतवून घेण्याचे टाळले. त्यासाठी जरूर ती किंमतही दिली. त्यामुळेच चांगल्या लेखनावरची लोकांची श्रद्धा टिकून राहिली. प्रावदासारखे सरकारचे प्रचारपत्रक तेथील लोक चाळत; परंतु ते कधीच विश्वसनीय मानून ते चाळत नसत. आठवड्यातून एकदा प्रावदावर नजर टाकली तरी भागत असे. रशियन लेखकही शासकीय सेन्सॉरला हुलकावणी देण्यासाठी लांबलचक लेख लिहिण्याचा परिपाठ ठेवत. तीस-तीस पृष्ठांचे लेख वृत्तपत्रे छापत. मुख्य सूत्र कुठेतरी मध्येच एखाद्या परिच्छेदात दडलेले असे. बाकी सारा पसारा सेन्सॉरला कंटाळा आणण्यासाठी असे. आजही पुस्तकाच्या दुकानापुढे एखादा क्यू दिसला की लोक स्वतः त्यात उभे राहतात. कारण काहीतरी महत्त्वपूर्ण पुस्तक तेथे विकले जात असणार असा प्रत्येकाचा समज झालेला असतो. पुस्तकाच्या दुकानापुढेच काय, कुठल्याही दुकानापुढे रांग असली, तर त्यात आपलाही नंबर लावायचाच अशी रशियन माणसाची मनःप्रवृत्ती घडलेली आहे. कशासाठी रांग आहे हेदेखील अनेकदा माहीत नसते; पण रांगेमध्ये उभे

राहिले की काहीतरी फायदेशीर पदरात पडते, हा वर्षानुवर्षाचा अनुभव विसरून चालत नाही. रशियन वृत्तपत्रे-मासिके यांनी आपला दीर्घकालचा प्रचारकी थाट टाकून खरोखर वाचनीय समाजस्थितीचे नेमके दर्शन घडवणारे, जागतिक घटनांची निःपक्षपाती नोंद घेणारे लेखन द्यायला आरंभ केला आहे. त्यामुळेही रशियन वाचकांच्या उत्साहाला उधाण आले आहे.

(दै. केसरी, २ एप्रिल १९८९)

## ७

# रहस्यकथांच्या दुनियेतले मातब्बर मानकरी

एक खून होतो. अनेकांबद्दल संशय घेतला जातो. खऱ्या खुन्याखेरीज इतर सर्वजण एकेक करून बाजूला होत जातात. खरा खूनी पकडला जातो वा मारला जातो, असा रहस्यकथेचा साधा परंतु वाचकांना गुंगवून ठेवणारा फॉर्म्युला असतो असे कवी डब्ल्यू. एच. ऑडेन याने म्हटले आहे.

ही अगदी साधी-सोपी रूपरेखा अत्यंत प्रामाणिकपणे पुढे ठेवून हजारो रहस्य-कथा गेल्या दीडशे वर्षांत लिहिल्या गेल्या आहेत आणि कोट्यवधी वाचक त्यावर तुटून पडत आहेत.

सन १८४१ मध्ये एडगर ॲलन पो याची ' दि मर्डर्स इन दि रू मार्ग ' ही कथा प्रसिद्ध झाली. ती पहिली रहस्यकथा मानली जाते. त्यानंतर सत्तावीस वर्षांनी विल्की कॉलिन्स यांची ' दि मूनस्टोन ' ही कादंबरी इंग्लंडमध्ये वाच-कांच्या हाती पडली. पूर्ण लांबीची ही पहिली रहस्यकथा असल्याचे सांगण्यात येते. एक हिरा हरवतो आणि त्याचा शोध घेण्याच्या निमित्ताने सार्जंट कफ हा स्कॉटलंड यार्डचा गुप्तहेर पोलिसयंत्रणेची कामाची पद्धत आणि समाजाच्या वरच्या व कनिष्ठ वर्गातील जीवनाची तऱ्हा यावर प्रकाश टाकतो. सार्जंट कफ हा लंडनमधील एका खऱ्या पोलिस अधिकाऱ्यावर बेतलेला आहे, असे कॉलिन्सने नमूद केलेले आहे.

सन १८९१ मध्ये आर्थर कॉनल डॉयल या डॉक्टरने शेरलॉक होम्सची पहिली कथा (' ए स्कँडल इन बोहेमिया ') स्ट्रँड मासिकाला ३५ डॉलरला

विकली. ती गाजली. त्यानंतरच्या ४१ वर्षांत त्याने ५६ कथा आणि ४ कादंबऱ्या लिहिल्या. शेरलॉक होम्सची नंतरही खूप अनुकरणे झाली; परंतु ' झाले बहु, होतील बहु; परंतु या सम हा ' हा सन्मान शेरलॉक होम्सचाच राहील.

आर्थर कॉनन डॉयल हा वयाच्या २२ व्या वर्षी एडिंबर्ग युनिव्हर्सिटीतून वैद्यकीय पदवी घेऊन बाहेर पडला आणि त्याने डॉक्टरकी सुरू केली. परंतु त्याच्याकडे रुग्णांची रीघ कधीच लागली नाही. सहा वर्षे त्याने वैद्यकीय पेशा केला; परंतु त्याच्याकडे पेशंट इतके कमी येत की पोटापुरतीही प्राप्ती होत नसे. दवाखान्यात बसून कंटाळा यायला लागला, तेव्हा तो सहज म्हणून गोष्टी लिहायला लागला. पण ही गोष्ट वेगळी हवी असे त्याच्या डोक्यात पक्के बसलेले होते. आपण वेगळ्या प्रकारची रहस्यकथा लिहायची, गुन्ह्याचा शोध एखाद्या डॉक्टरने आजाराचे विश्लेषण करावे अशा प्रकारे शास्त्रीय काटेकोरपणाने करायचा असा त्याचा आग्रह होता. त्याच्यासमोर त्याच्या एक शिक्षकांचा चेहरा सतत उभा असे. जो बेल हे त्यांचे नाव. ' गरुडासारखा चेहरा, तपशील सांगण्याची त्यांची गमतीदार पद्धत, तपशील शोधण्यासाठी ते वापरत असलेल्या नाना क्लृप्त्या यांचा जर वास्तव जीवनात फायदा घेता येतो तर काल्पनिक कथेत त्यांना का मज्जाव असावा ? ' असे त्याने आत्मचरित्रात लिहिले आहे.

जो बेल हे कॉलेजमध्ये वैद्यकशास्त्राचे अध्यापन करीत आणि एडिंबर्गच्या रॉयल इन्फर्मरीमध्ये शल्यविशारद म्हणून काम करीत. शेरलॉक होम्सची निर्मिती ही जो बेल यांचे व्यक्तित्व नजरेसमोर ठेवून केली गेली आहे. एका इंग्लिश क्रिकेटपटूच्या आणि ऑलिव्हर वेंडेल होम्स या लेखकाच्या नावातील ' होम्स ' हे नाव त्याने आपल्या रहस्यकथेच्या हेरासाठी नक्की केले. जो बेल हा विवाहित होता; परंतु शेरलॉक होम्सला मात्र ऑर्थर कॉनन डायलने ब्रह्मचर्य पाळायला लावले आणि २२१ बी बेकर स्ट्रीट या छोट्या ऑफिसच्या खोलीत वास्तव्य करायला लावून, त्याच्या मदतीला डॉ. वॅटसन-हा कल्पक तरुण देऊन टाकला. मोरिआर्टी हा त्याचा कायमचा प्रतिस्पर्धी राहील अशीही व्यवस्था केली. उंचापुरा, किंचित वाकलेला, गरुडासारख्या चेहऱ्याचा, डियर स्कॉटर कॅप घालणारा, गुडघ्यापर्यंतचा ओव्हरकोट धारण करणारा, मॅग्निफाइंग ग्लास आणि कोकेन घेणारा असा शेरलॉक होम्स हा लौकरच वाचकांच्या मनात एखाद्या जित्याजागत्या माणसासारखा खराखुरा गुप्तहेर म्हणून स्थान मिळवून बसला. अत्यंत किरकोळ

व क्षुल्लक गोष्टींच्या निरीक्षणातून खऱ्या खूनी माणसाचा शोध घेण्याचे शेरलॉक होम्सचे तंत्र, प्रत्येक लहान-मोठ्या वस्तूला तिचे स्वतःचे व्यक्तित्व असते हे त्याला उमगलेले सत्य आणि प्रत्येक कृत्यामागे ते करणाऱ्या माणसाच्या हस्त-कौशल्याचा वेगवेगळा प्रत्यय ही जाणीव यावर त्याच्या कथांची उभारणी झालेली असते. त्यातून एकेक गोष्टी बाद करीत तो शेवटी अचूक अशा सत्यापर्यंत पोचतो. त्याचे हे ' डिडक्टिव्ह ' तर्कशास्त्र वाचकाला स्तिमित करते.

ॲगाथा मेरी क्लॅरिसा ख्रिस्ती मेलोवज हिच्या रहस्यकथांतील हेरक्युल पॉयरॉट हा बेल्जियन गुप्तहेर १९२० पासून वाचकांच्या मनावर अधिराज्य गाजवू लागला. पहिल्या महायुद्धाच्या काळात ती परिचारिका म्हणून काम करीत होती. ' दि मिस्टीरियस अफेअर ॲट स्टाइल्स ' ही तिची पहिली कादंबरी; अनेक प्रकाशकांनी ती साभार परत केली. अखेर १९२० मध्ये ती प्रसिद्ध झाली. त्यानंतर हेरक्युल हा अनेक कादंबऱ्यांमध्ये हेर म्हणून अवतरला आणि वाचक त्याच्या नवनव्या पराक्रमांची उत्सुकतेने वाट बघू लागले. हेरक्युलप्रमाणेच मिस जेन मार्पल ह्या स्त्री गुप्तहेराचा वापरही ॲगाथा ख्रिस्तीने केला. १९३० मध्ये ' मर्डर ॲट दि विकारेज ' हे जेन मार्पलचे पहिले पुस्तक बाजारात आले.

सन १९७६ मध्ये ॲगाथा ख्रिस्ती मरण पावली. तिने एकूण ८० रहस्यकथा प्रसिद्ध केल्या. ' दे केम टू बगदाद ', ' व्हाट मिसेस गिलिकुडी सॉ ', ' मर्डर इन दि कलाइस कोच ' या विशेष गाजलेल्या रहस्यकथा. आधी वाचकांना शिताफीने चुकीच्या रस्त्यावर न्यायचे आणि मग खरा गुन्हेगार अनपेक्षितपणे उभा करायचा हा तिचा खाक्या.

ॲगाथा ख्रिस्तीने १६ नाटके लिहिली. त्यातील माऊस ट्रॅपने तर जागतिक विक्रम केला आहे. १९५७ पासून या नाटकाचे रोज एक-दोन प्रयोग होत आहेत. ब्रिटनच्या राणीने तिला १९५६ मध्ये ' कमांडर ऑफ ब्रिटिश एम्पायर ' ही पदवी दिली. १९७१ मध्ये ' डेम कमांडर इन दि ऑर्डर ऑफ ब्रिटिश एम्पायर ' हा किताबही तिला देण्यात आला.

अर्ल स्टॅन्ले गार्डनर हा कायदेपंडित. त्याने आपल्या न्यायालयीन कामकाजाच्या अनुभवाचा वापर करून पेरी मेसनच्या शंभरावर कादंबऱ्या लिहिल्या. त्या सर्वच खपाच्या दृष्टीने विक्रमी ठरल्या. १९४० मध्ये घेतलेल्या वाचकांच्या जनमत चाचणीत सर्वाधिक लोकप्रिय रहस्यकथालेखक म्हणून त्याला मान मिळाला.

१९३२ मध्ये पेरी मेसनची पहिली कादंबरी ' दि केस ऑफ व्हेलवेट क्लॉज ' ही प्रसिद्ध झाली. डेली स्ट्रीट ही पेरी मेसनची हुशार व चलाख सेक्रेटरी आणि मैत्रीण, पॉल ड्रेक हा त्याचा गुप्तहेर मित्र. रहस्यकथांचा कारखानाच अर्ल स्टॅन्ले गार्डनरने जणू सुरू केला. तो आपल्या कादंबऱ्यांना नावेही अनुप्रासयुक्त देई. ' दि केस ऑफ डुप्लिकेट डॉटर ', ' ॲमोरस ऑन्ट ' इ. इ. न्यायालयातील वातावरण अचूक उभे करण्यात त्याचा हातखंडा असे.

अर्ल हा एक खाण इंजिनिअरचा मुलगा. मुष्टियुद्धाला अनिष्ट वळण देण्याच्या आरोपावरून वालपराइसो युनिव्हर्सिटीतून त्याची हकालपट्टी करण्यात आली, तेव्हा कॅलिफोर्नियात जाऊन त्याने कायद्याची पदवी घेतली. वकिली सुरू केली. ती करीत असतानाच लेखन सुरू केले. त्याच्या अनेक कादंबऱ्यांवर टीव्ही व रेडिओ मालिका निघाल्या. ए. ए. फेअर या टोपणनावाने त्याने बर्था कूल या महिला गुप्तहेराच्या व्यक्तिरेखेला केन्द्रस्थानी ठेवून काही कथा लिहिल्या. बर्था कूल ही मध्यमवयाची, लठ्ठ, हावरट अशी दाखवली आहे.

एडगर वॅलेसने २८ वर्षांच्या अवधीत १७० रहस्यकथा लिहिल्या. ' ऑन दि स्पॉट ' हे रहस्यपूर्ण नाटक त्याने केवळ चार दिवसांत लिहिले. १९०५ मध्ये ' दि फोर जेस्ट मेन ' ही त्याची पहिली गुन्हेगार कथा प्रसिद्ध झाली. ही कथा अर्धीच छापून ती पूर्ण करण्याची स्पर्धा लावण्यात आली होती. यशस्वी स्पर्धकाला ५०० पौंडांचे बक्षीस जाहीर करण्यात आले होते. त्याची आई मेरी जेन रिचर्डस ही गाजलेली नटी होती; तर वडील टी. एच. एडगर हे अभिनेते होते. त्या दोघांचे विधिवत लग्न झालेले नव्हते. तशात त्यांचे दौरे चाललेले असत. म्हणून त्यांनी आपल्या या नवजात अर्भकाला संगोपनासाठी लंडनच्या एका महिलेच्या स्वाधीन केले. १२ व्या वर्षीच त्याने शाळेला रामराम ठोकला. १८ व्या वर्षी सैन्यात प्रवेश केला. युद्धाच्या शेवटी त्याने बोअर युद्ध समाप्त होणार ही बातमी डेली मेलला आधीच दिली; त्यामुळे त्याला युद्धानंतर रॉयटर्स या वृत्तसंस्थेने वार्ताहर म्हणून बोलाविले. ' किंगकाँग ' या गाजलेल्या चित्रपटाची पटकथा त्याने मृत्यूपूर्वी पूर्ण केली (१९३२). ' दि क्रिमसन सर्कल ', ' दि फ्लाईंग स्क्वॉड ', ' दि टेरर ' या त्याच्या गाजलेल्या कथा.

एडगर वॅलेसचाच रेमंड चँडलर हा समकालीन; पण वॅलेसच्या नेमकी उलट त्याची स्थिती होती. त्याने अवघ्या आयुष्यात फक्त सात रहस्यकथा पूर्ण केल्या.

त्या सर्व लॉस एंजेलिसच्या पार्श्वभूमीवरील आहेत. फिलीप मार्लो हा त्याचा गुन्हेगार नायक. एखाद्या आधुनिक शिलेदार सरदाराप्रमाणे मार्लो त्या शहरात हिंडतो, दीन-दुबळ्यांचे रक्षण करतो, गुन्हेगारांना शिक्षा देतो. त्याच्या कथा अत्यंत वास्तववादी वातावरण उभे करतात. ' दि बिग स्लीप ' हे त्याचे पुस्तक १९३९ मध्ये प्रसिद्ध झाले. ' फेअरवेल ', ' माय लव्हली ', ' दि हाय वुइंडो ', ' दि लेडी इन दि लेक ', ' दि लॉंग गुडबाय ' ही त्याची गाजलेली पुस्तके. ' दि लॉंग गुडबाय 'मध्ये मार्लोला त्याने खितासारखे संतपद पेश केले आहे; त्यामुळे त्याच्यावर खूप टीका झाली. ' दि बिग स्लीप ' चित्रपटात मार्लोची भूमिका हंफ्रे बोगार्ट या नटाने अत्यंत नेटकेपणाने केली होती. चँडलर १९५९ मध्ये वारला.

मार्लो हा आपला नायक अमेरिकेच्या कुप्रसिद्ध भागातून हिंडतानाही कधी घाबरत नाही वा कलंकित होत नाही असे तो म्हणे. ( नीदर टारनिश्ड नॉर अफ्रेड ). त्या वर्णनाने गुप्तहेरांना एक नवी प्रतिमा मिळाली.

सन १९४० नंतर अमेरिकन रहस्यकथा लेखकांनी या वाङ्मयप्रकारात वास्तव-वाद आणला. डॅशियल हॅमेटचा सॅम स्पेड आणि मिकी स्पिलेनचा माईक हॅमर यांनी अमेरिकेतील शहरांमधील दारूअड्डे, बार, वेश्यावस्त्या यांतील गुन्हेगार जगाचे विदारक व वास्तव दर्शन घडवले. हिंसाचाराला एक वेगळेच परिमाण दिले. लैंगिक स्वैराचाराचाही त्याने भरपूर वापर केला. क्वचित त्याला सॅडिझमचेही रूप दिले. ' दि गन इज क्विक ', ' किल मी डेडली ', ' दि डीप ', ' दि ट्विस्टेड थिंग ', ' दि डेथ डीलर्स ' वगैरे त्याच्या विशेष गाजलेल्या कादंबऱ्या.

सन १९१८ त जन्मलेला मिकी स्पिलेन कॉलेजमध्ये असल्यापासून लेखनात रंगू लागला. दुसऱ्या महायुद्धात तो सैन्यात होता. त्यानंतर त्याच्या रहस्यकथांना खरा जोर आला. एकेक कादंबरी दहा-दहा लाख खपू लागली. अमेरिकेतच नव्हे, तर जगभर त्याची लोकप्रियता वाढतच राहिली.

जेम्स हॅडली चेझ हा ' थ्रिलर मास्टर ऑफ दि जनरेशन ' मानला जातो. ' पुढे काय होणार ' याचे अत्यंत चतुर व अनपेक्षित उत्तर देणाऱ्या चेझच्या शंभर कादंबऱ्या असून त्याही उत्तम विकल्या जातात. ' ए लोटस फॉर मिस कोन ', ' दि व्हल्चर इज ए पेशंट बर्ड ', ' नो आर्चिड्स फॉर मिस ब्लँडिश ', ' ए कॉफिन फ्रॉम हॉंगकॉंग ' वगैरे त्याच्या कादंबऱ्या विशेष गाजल्या.

रहस्यकथा आणि गुप्तहेर कथा वेगळ्या काढता येतात असे नाही; परंतु

007 जेम्स बाँड या हेराला आधुनिक काळात एक वेगळेच वैभव लाभले. इआन फ्लेमिंग (जन्म १९०८) हा रशियात काही काळ पत्रकार म्हणून वावरला. ब्रिटिश नौदलाच्या गुप्तहेरखात्याच्या संचालकांचा खासगी सचिव म्हणून त्याने दुसऱ्या महायुद्धाच्या काळात काम केले. लंडनच्या संडे टाईम्सचा 'परदेशी डेस्क' व्यवस्थापक म्हणून त्यानंतर तो राहिला. 'कॅसिनो रॉयल' ही त्याची पहिली बाँड कथा. ब्रिटिश वाचकांना या व्यक्तिरेखेने वेड लावले. नायक आणि खल-नायक या दोहोंचे विशेष त्याच्यात एकवटले होते. त्याला जलद धावणाऱ्या मोटारी आवडत, सुंदर मुलींवर तो फिदा असतो, शत्रूवर तो अचूक घाव घालतो, दुष्टांचा संहार करून स्वत:ला फायदा मिळविण्यात तो कसूर करीत नाही, आपल्या बॉसना तो प्रसंगी बेदरकारपणे गुंडाळून ठेवतो, आपल्या २५ बेरेटा स्वयंचलित पिस्तुलाने तो प्रसंगी प्रतिस्पर्ध्याची हत्याही अगदी थंड माथ्याने नेमके-पणाने करून मोकळा होतो. जेम्स बाँड कथांवर चित्रपट निघाले; तेही गाजले. 'डायमंडस आर फॉर एव्हर', 'फ्रॉम रशिया वुईथ लव्ह', 'डॉ. नो', 'गोल्डफिंगर', 'थंडर बॉल', 'यू ओन्ली लिव्ह ट्वाइस'. या शिवाय त्याने प्रवास वर्णनात्मक (थ्रिलिंग सिटीज) आणि बालवाङ्मयाची (चिटी चिटी बँग बँग) पुस्तकेही लिहिली आहेत.

लेन डेइटननेही इआन फ्लेमिंगचे उदाहरण समोर ठेवून अनेक गुप्तहेरकथा लिहिल्या. 'दि फोर हार्टस', 'दि डेव्हिल टू पे', 'दि रोमन हॅटमिस्टरी' इ. गाजलेल्या रहस्यकथांचे लेखक. एलेरी क्वीन हे टोपण नाव आहे. फ्रेडरिक डॅनाए आणि मॅनफ्रेडली ली हे दोघे चुलत भाऊ. ब्रुकलिनमध्ये जन्म. दोघांचाही रहस्य-कथालेखन हाच पूर्ण वेळचा व्यवसाय. एकमेकांच्या सल्लामसलतीने ते कथानकाची उभारणी करीत. १९२९ मध्ये त्यांचे पहिले पुस्तक प्रसिद्ध झाले. १९३८ मध्ये त्यांनी 'ए चॅलेंज टू दि रीडर' हा रहस्यकथांचा संग्रह प्रसिद्ध केला. 'एलेरी क्वीन्स मिस्टरी मॅगेझिन' हे मासिक १९४१ पासून सुरू केले. त्याचेही वाचकांनी चांगले स्वागत केले. त्यांच्या कादंबऱ्यांतील मुख्य नायक हा देखील एलेरी क्वीन हेच नाव धारण करतो.

रहस्यकथांमध्ये चांगले व वाईट, सत् आणि असत् यांचे ढोबळ चित्रण झालेले असते. वाईटाला, दुष्टपणाला, पाप्याला शिक्षा हे सूत्र कथांत पाळण्यात आलेले असते. लोकांना ते आवडते. सद्य:काळात अतिरेक्यांच्या व दहशतवाद्यांच्या

कारवाया वाढल्या आहेत. कायद्याच्या राज्यात, सुव्यवस्था व शांततेला धोके सर्वत्र जाणवत आहेत. आपण सारे नागरिक या दहशतवादापुढे हतबल आहोत, निष्प्रभ आहोत अशी आपली मानसिक अवस्था आहे. आपल्या श्रद्धांना हादरे बसत आहेत. चांगल्या-वाईटातील सीमारेषा धूसर होत आहेत. रहस्यकथा वाचताना कदाचित आपल्या सुप्त मनात ही भावना असते की आपण आपल्या अगतिकतेवर मात करू शकू, गुन्हेगारांना शासन करू शकू, जग सुंदर बनवू शकू, आपल्या श्रद्धा पुनर्स्थापित करू शकू.

रहस्यकथांमध्ये कृतीला प्राधान्य असते. आपण वाचक केवळ विचार करीत बसतो. आपल्या निष्क्रियतेला रहस्यकथांमधले घटनाप्रवण जग एकप्रकारे अभावपूर्तीचे समाधान देते. जगातील समस्या आपण दूर करू शकत नाही; दोन-चार तास त्या कटकटीच्या जगापासून आपण रहस्य कथेद्वारे दूर तर जाऊ शकतो. नकळत मिळणारे हे मानसिक समाधान आपले संतुलन टिकविण्यास मदत करते.

## रहस्यकथांचा वाचक

रहस्यकथा, गुप्तहेर कथा, थ्रिलर्स, भयकथा या सामान्यपणे खूप वाचल्या जातात. अनेक लेखक अशा कथा नियमितपणे लिहीत असतात आणि प्रकाशकही त्या नित्यनेमाने प्रसिद्ध करीत असतात. बाबूराव अर्नाळकर यांनी हजारावर रहस्यकथा लिहिल्या. त्यांच्या झुंजार-विजय आणि धनंजय-छोटू या जोड्या गाजल्या. मधुकर अर्नाळकर यांनीही एक जमाना गाजवला. सुभाष शहा, सदानंद भिडे, सुहास शिरवळकर, शरद दळवी, गुरुनाथ नाईक, राजा पारगावकर, सहृदय, स. ना. सूर्यवंशी अशा अनेकांनी रहस्यकथा लिहिल्या. बऱ्याच जणांनी अनुवाद-रूपांतरावर भर दिला. अनेक माला निघाल्या; अनेक बंद पडल्या. जुनी पुस्तके पुन्हा नव्या रूपात बाजारात येत राहिली. रहस्यकथांचे लेखक बदलतात, प्रकाशक बदलतात; परंतु रहस्यकथांचे आकर्षण वाचकांना सतत वाटत राहते.

रहस्यकथांना वाचकवर्ग भरपूर असला तरी एक वाङ्मयप्रकार म्हणून रहस्यकथांचा विचार गंभीरपणे केला जात नाही. समीक्षक त्यांच्याकडे कधी लक्ष देत नाहीत. रहस्यकथालेखकाला लोकप्रियता मिळते; पण ती दीर्घकाळ टिकून राहत नाही. रहस्यकथालेखकाला मागणी असते; परंतु प्रतिष्ठा मिळत नाही. केवळ भरपूर लिहिणारे लेखक म्हणून त्यांच्याकडे दुर्लक्ष केले जाते. त्यांच्या

लेखनगुणांकडेही त्यामुळे दुर्लक्ष होत जाते.

काही अंशी हे लेखकही याला जबाबदार असतात. भरपूर लिहिण्याच्या नादात हे काही गोष्टी नजरेआड करतात. एकाच स्वरूपाची कथावस्तू ते हाताळतात, तपशील, घटना, प्रसंग, स्थलदर्शने यांत बदल करतात; परंतु मुख्य कथासूत्र एकच राहते. काही वेळा तर असेही दिसते की अनेक वर्णने, प्रसंग, संवाद हे आपल्याच जुन्या कादंबऱ्यांतून किंचितमात्र फरकाने हे लेखक पुनः पुन्हा उचलत असतात.

एरवी चोखंदळपणे वाचन करणारे लोकही रहस्यकथा करमणुकीसाठी वाचतात; आणि तिच्यातील त्रुटीकडे व पुनरावृत्तीकडे डोळेझाक करतात. बरे, एकेक रहस्यकथालेखक शेकडो कादंबऱ्या लिहितो; त्या सर्व जागरूकपणे वाचणारा वाचकही दुर्मिळच ! त्यामुळे स्वतःच आपल्या जुन्या पुस्तकांवर डल्ला मारणाऱ्या लेखकांची उचलेगिरी लक्षातही येत नाही. काही मराठी कथाकार आपल्या जुन्या कथाच नवथर दिवाळी अंकांना देतात, तशातलाच हा प्रकार. पण जागरूक वाचक अशा कथालेखकांना नेमके हुडकून काढतात. रहस्यकथांकडे रंजनासाठी वळणारे वाचक कथा वाचून झाली की दुसऱ्या कथेकडे वळतात. त्या लेखकाने पूर्वी तसे कुठे लिहिले होते की नाही हे आठवून त्याची उचलेगिरी शोधण्याच्या उचापतीत त्यांना रस नसतो.

( साप्ताहिक सकाळ, १९८८ )

# ८

# इंग्लंडमधील ग्रंथबहर

अमेरिका-इंग्लंडमध्ये १९८८ मध्ये प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांपैकी लक्षवेधक पुस्तके कोणती याचा शोध तेथील प्रमुख वृत्तपत्रे आणि नियतकालिके दरवर्षी घेतात. त्याप्रमाणे यंदाही हा शोध घेतला गेला. आपल्याकडे ही सर्वच पुस्तके लगेच येतात असे नाही; परंतु युसिस लायब्ररी आणि ब्रिटिश लायब्ररी याबाबत जागरूक असतात. महत्त्वाची पुस्तके लगोलग मागवण्याचा त्यांचा कटाक्ष असतो. त्यामुळे लक्ष ठेवल्यास ही पुस्तके आपल्यालाही वाचायला मिळू शकतात.

इंग्लंडमध्ये प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांपैकी आपल्याला विशेष आवडलेली पुस्तके कोणती अशी पाहणी 'स्पेक्टॅटर' या साप्ताहिकाने १९८८ च्या शेवटी केली. या साप्ताहिकाला १६० वर्षांची परंपरा आहे आणि कॉंझर्वेटिव्ह मताचा पाठपुरावा त्यात केला जातो. तरीही त्याला एक प्रतिष्ठा आहेच. 'स्पेक्टॅटर'मध्ये नेहमी पुस्तक-परीक्षणे करणाऱ्या समीक्षकांनी १९८८ या वर्षातील आपल्याला लक्षणीय वाटलेल्या पुस्तकांबद्दल मते दिली आहेत. ही मते आपल्याही विचारांना चालना देतील असे वाटते.

### अमेरिकन रंगभूमीचे विनोदी चित्रण

'लुक बॅक इन अँगर' या नाटकाद्वारे प्रसिद्धीच्या झोतात आलेला आणि इंग्लंडमध्ये युद्धोत्तर रंगभूमीवर नवे चैतन्य निर्माण करणारा नाटककार जॉन ऑसबॉर्न याने 'हाऊ इज दॅट फॉर टेलिंग देन, फॅट लेडी?' या अमेरिकन

रंगभूमीविषयक पुस्तकाला वर्षातील सर्वांत रंजक पुस्तक ठरवले आहे. अमेरिकन नाट्यसृष्टीतील आणि आधुनिक जीवनातील बेरकीपणा आणि दांभिकपणा यांचे हे गमतीदार, पण वास्तव दर्शन या पुस्तकात सिमन ग्रे याने घडवलेले आहे. स्वत: लेखक सिमन ग्रे हा नाट्यकलावंत आहे आणि तो प्रकृतीने उदास, गंभीर असूनही स्वत:चे चित्रही तो दिलखुलास विनोदाने रंगवतो. हॉटेलातले धूर्त क्लार्क, बनेल इलेक्ट्रिशियन्स, चहाटळ वेटर्स, नखरेल नट-नट्या, भावडे किंवा लबाड प्रेक्षक, हिशेबी निर्माते आणि नाट्यगृहांचे मालक वगैरेंचे अनेक इरसाल नमुने या पुस्तकात पानोपानी भेटतात आणि मराठी रंगमंचावरील अनेक व्यक्तींची आठवण ताजी करतात.

एखाद्या ट्रक ड्रायव्हरने पर्यटकांसाठी मार्गदर्शक पुस्तक लिहावे अशा थाटातले पुस्तक म्हणून ऑसबॉर्नने 'लेटर्स फ्रॉम ए वॉर झोन' या आंद्रिया ड्वोर किनच्या पुस्तकाचा उल्लेख केला आहे. हे पुस्तक अर्थातच पर्यटनविषयक नाही; ते आहे अमेरिकेतील स्त्रीमुक्तीच्या आंदोलनासंबंधी. आंद्रिया ही काही सराईत लेखिका नाही; परंतु तिच्या नवशिकेपणामुळे हे पुस्तकही स्त्रीमुक्तीची गंभीर चर्चा करण्याऐवजी टीव्हीवरील मुलाखतीसारखे अनेक गमती-जमतीचे किस्से सांगत अभावित विनोद करीत वाचकांना गुदगुल्या करीत राहते.

जे. एन. कार या समीक्षकाने पेनेलोपे फिटझेरॉल्ड या लेखिकेच्या 'दि बिगिनिंग ऑफ स्प्रिंग' या कादंबरीकडे लक्ष वेधले आहे. बुकर पारितोषिकाच्या अंतिम फेरीसाठी या कादंबरीची निवड झालेली होती. १९१४ मधले मॉस्कोमधील वातावरण तिने जिवंत केले आहे. क्रांतीच्या पूर्वीच्या घटनाक्रमाचे अत्यंत वेधक चित्रण तिने या कादंबरीद्वारे करून पुढच्या घटनांची अपरिहार्यता जणू बिनतोड युक्तिवादानिशी सिद्ध केली आहे.

### मरक्वीझचा जादूई वास्तववाद

जॉन मॉर्टिमर या समीक्षकाने गॅब्रियल गार्सिया मरक्वीझ यांच्या 'लव्ह इन दि टाइम ऑफ कॉलरा' या कादंबरीचा उल्लेख केला आहे. मरक्वीझ आणि इसाक बाबेल सिंगर हे लॅटिन अमेरिकेतील आजचे सर्वश्रेष्ठ लेखक. मॅजिक रिॲलिझम— जादूई वास्तववादाचे ते अध्वर्यू. उत्तम कथानिवेदक म्हणून नावाजलेले. एकमेकांवर जिवापाड प्रेम करणाऱ्या दोन व्यक्ती; परंतु तरुण वयात ते शारीरिक मीलनापासून

दूर राहतात. वृद्धापकाळी जेव्हा त्यांची जवळीक साधते तेव्हा त्यांच्या आनंदाला अनेक परिमाणे लाभलेली असतात.

म्युरियल स्पार्क हिंच्या 'ए फार क्राय फ्रॉम केनसिंग्टन' या कादंबरीचा घाटही विलक्षण आकर्षक आहे असे मार्टिमरचे मत आहे. 'आपल्या जिवलग मित्राला, प्रिय व्यक्तीला पत्र लिहितो आहोत असे समजून तुम्ही लिहायला लागा आणि हे पत्र असे लिहा की तुमच्या त्या मित्राने अशीच पत्रे वरचेवर लिहीत राहा म्हणून तुम्हाला गळ घालायला हवी' असे म्युरियल स्पार्क म्हणते आणि ती स्वतःही त्या सूत्राला अनुसरून लेखन करते. त्यामुळे तिच्या कथा वाचनीय तर असतातच; आपल्या जीवनाचीच कहाणी त्यातून आपल्यापुढे उलगडत राहते असाही भास होत राहतो.

चार्ल डिकन्स या कादंबरीकाराचा इंग्लंडमध्ये लोकप्रियतेबाबत शेक्सपिअर-खालोखाल क्रमांक लागतो. त्याचे फ्रेड कॅप्लानने लिहिलेले चरित्र हे साधार आणि सर्वंकष उतरले आहे. ब्रिटिश संसदेतील माजी विरोधी पक्षनेता मायकेल फूट यांच्या 'दि पॉलिटिक्स ऑफ पॅराडाइज' या पुस्तकात इंग्लिश कवी लॉर्ड बायरन याच्या राजकीय कर्तृत्वावर प्रकाश टाकण्यात आला आहे. बायरनचे विचार क्रांतिकारक असत आणि राजकारणाचा त्याचा अभ्यासही चांगला होता.

**फ्रॉइड – माणूस आणि तत्त्वज्ञ**

'फ्रॉइड : ए लाइफ फॉर अवर टाईम' हे पीटर गे यांचे पुस्तक अत्यंत अभ्यासपूर्ण असून फ्रॉइडचे एक माणूस म्हणून तर त्यात चित्रण अत्यंत सहानुभूतीने केलेले आहेच; एक सैद्धान्तिक म्हणूनही त्याच्या मतांची छाननी त्यात आली आहे. फ्रॉइडने माणसाकडे पाहण्याची आधुनिक दृष्टी दिली; माणसाच्या अंतरंगातील गुंतागुंतीकडे लक्ष वेधले; कामप्रवृत्तीच्या प्रभावाचे प्रथमच उघडपणे विवेचन केले. या पुस्तकाची शिफारस केली आहे ती फ्रँसिस पार्टरिज याने.

'दि परस्यूट ऑफ हॅपीनेस' या पीटर क्वेनेलच्या पुस्तकात नावात सूचित केल्याप्रमाणे सुखाचा शोध घेण्याचा प्रयत्न आहे. आधुनिक कथा-कादंबऱ्यांतील व काव्यातील नैराश्य, वैफल्य, शून्यवादाचा आढावा घेऊन त्यावर सुखी जीवनाची व सुखाची ओढ कशी मात करते हे त्याने दाखवले आहे. अत्यंत प्रसन्न शैलीतील हे पुस्तक वाचणे हा देखील आनंददायक अनुभव आहे, असे

फ्रॅन्सिस पार्टरिजचे मत आहे. कार्लाइल, सॅम्युएल जॉन्सन, प्राउस्ट, बेंजामिन फ्रँकलिन इत्यादींचीही भेट या पुस्तकात होते; आणि सुखाबद्दलच्या त्यांच्या कल्पनांचा उलगडा होतो.

कॉलिन थुब्रॉन या लेखकाच्या मते 'हाँगकांग' हे पुस्तक प्रत्येक जागरूक वाचकाने नजरेखालून घालायलाच हवे. इतिहास आणि वर्णन यांचे त्यात मिश्रण आहे. ब्रिटिशांची ही शेवटची वसाहत १९९७ मध्ये चीनच्या ताब्यात जाईल. त्या दृष्टीने हे पुस्तक निरोप-समारंभ साजरा करते.

इरिना रतुशिनस्काया ही रशियन कवयित्री. चार वर्षे तिला रशियाच्या लेबर कँप-मध्ये शिक्षा म्हणून राहावे लागले. 'ग्रे इज द कलर ऑफ होप' हा तिचा कवितासंग्रह त्या लेबरकँपमधील इतर सहकारी कैदी स्त्रियांच्या जीवनातील सुखदु:खाची गीते आळवतो. अनेक स्त्रियांना आपल्या मतांसाठी, शासनविरोधी भूमिकेसाठी तुरुंगात डांबण्यात आले होते. तेथे त्यांचा शारीरिक, मानसिक छळ केला जाई. परंतु या छळवादाला न डरता त्या आपल्या विचारांचा आग्रह धरून, शासनकर्त्यांचा अधिकच रोष ओढवून घेत. शारीरिक, मानसिक अत्याचारांच्या वातावरणातही आपल्या विवेकबुद्धीचे समतोलत्व टिकवून धरणाऱ्या व्यक्तींच्या पोलादी वृत्तीचे हे जणू पोवाडेच आहेत. मानवी प्रतिष्ठेच्या मानसशास्त्राचे हे प्रत्ययकारी रूपदर्शन आहे, असे कॉलिन थुब्रॉनचे मत आहे.

साल्वातार सट्टा या कादंबरीकाराच्या 'दि डे ऑफ जजमेंट' या कादंबरीत सार्डिनिया या देशातील एका प्रादेशिक राजधानीच्या गावाचे आणि समाजाचे प्रातिनिधिक चित्रण आढळते. न्युओरो हे शहर त्याने अशा ताकदीने उभे केले आहे की कादंबरी वाचतावाचता आपण त्यातल्या गल्लीबोळांशी समरस होऊन जातो; आणि तेथील रहिवाशांच्या सुखदु:खाने आपल्याही मनाची उलघाल होत राहते. एकूण मनावर शेवटी ठसा उमटतो तो तेथील दारिद्र्याचा आणि दुर्दशेचा. पण तो आपल्या अंत:करणाचा ठाव घेतो असे फिलिप ग्लेझब्रूकचे म्हणणे आहे.

स्टिफन स्पेंडरच्या 'दि टेम्पल' या आत्मनिवेदनपर ग्रंथात त्याच्या तरुण वया-तील अनेक घटनांचे प्रांजल व मनमोकळे निरूपण करण्यात आले आहे. ऑडेन, ईशरवूड, हर्बर्ट लिस्ट वगैरे कवी व छायाचित्रकार हे स्पेंडरचे त्या काळातील मित्र. त्यांच्या आठवणीही उद्बोधक आणि चित्रदर्शी आहेत. टॉलस्टॉयचे नवे चरित्र ए. एन. विल्सन यांनी लिहिलेले आहे आणि आत्मकेंद्रित मोठेपणाच्या

भावनेने पछाडलेल्या अहंकारी टॉलस्टॉयला आपल्या भव्य जीवनपटात इतर सर्वांनी दुय्यम भूमिका वजावत आपल्याभोवती निमूटपणे वावरावे असे वाटते, असे या चरित्रकाराचे मूलभूत प्रमेय आहे. ही दोन्ही पुस्तके फ्रॅन्सिस किंग यांच्या पसंतीला उतरलेली आहेत.

'लाइफ अँड टाइम्स ऑफ शेक्सपियर' हे पुस्तक लिहून पिटर लेव्ही याने एकच खळबळ उडवून दिली. या पुस्तकातील प्रत्येक पृष्ठ हे शेक्सपियरच्या नाट्यकृती-कडे आणि सुनीतांकडे आपले लक्ष वेधते आणि त्यावर नवा प्रकाशझोत टाकते. पॅट्रिक ले फर्मर या समीक्षकाला या पुस्तकाप्रमाणेच ब्रूस चॅटविनची 'उट्झ' ही कादंबरीही आवडलेली आहे. प्रागमधील दडपशाहीचे भयग्रस्त तणावपूर्ण वाता-वरण, पोलिसांचा ससेमिरा, सर्वसामान्य जीवनावश्यक वस्तूंचा अभाव असल्यामुळे प्रत्येकाला पत्करावी लागणारी लाचारी, सर्वच माणसांवर माणूस म्हणून जगण्या-ऐवजी सावल्या म्हणून निष्प्रभ जीवन घालवण्याची आलेली पाळी – या सर्वांचा अत्यंत दाहक असा संस्कार ही कादंबरी वाचकांवर करते.

## शिकार : कोल्ह्याची आणि मंत्र्यांची

लॉर्ड बर्टी डेनहॅम या उमरावाने लिहिलेले 'फॉक्स हंट' हे पुस्तक रॉबर्ट ब्लेक यांनी गौरविले आहे. कोल्ह्याची शिकार कशी करतात हे या पुस्तकात सामान्य वाचकालाही सुबोधपणे समजावून सांगण्यात आले आहे. कोल्ह्याला कसे जाळ्यात पकडतात, त्याचा पाठलाग कसा करतात, त्याला कसे चकवतात याबद्दलचे अनुभवसिद्ध मार्गदर्शन लॉर्ड डेनहॅम यांनी केले आहे. दुसऱ्याही एका शिकारीचे वर्णन या पुस्तकात आले आहे. लॉर्ड डेनहॅम हे इंग्लंडमधील हाऊस ऑफ लॉर्ड्सचे सदस्य. काही काळ मुख्य प्रतोद म्हणूनही त्यांनी काम केले. हाऊस ऑफ लॉर्ड्सच्या कामकाजातील गमतीजमतींचे वर्णन डेनहॅमनी केले आहे. भले भले सदस्य व मंत्री कसे जाळ्यात सापडतात आणि आपले हसे कसे करून घेतात याची किती तरी रोचक उदाहरणे यात आली आहेत. मंत्र्यांची आणि सदस्यांची आपल्या चलाख प्रश्नांनी आणि शब्दचातुर्याने सफाईने शिकार करण्यात काही संसदपटू कसे वाकबगार असतात त्याचेही मार्मिक विश्लेषण लॉर्ड डेनहॅम यांच्या चोखंदळ गुणग्रहणामुळे आपले लक्ष वेधून घेते.

जॉन बेले या समीक्षकाने निराद चौधरी यांच्या 'दाय हँड ग्रेट अॅनार्क' या

हजार पृष्ठांच्या आत्मवृत्ताचा उल्लेख केला आहे; तर ब्रिटिश नाट्यसमीक्षक केनेथ टिनॅनचे त्याच्याच पत्नीने लिहिलेले चरित्र रॉबर्ट की यांच्या पसंतीला उतरलेले आहे.

सलमान रश्दींच्या ' दि सॅटॅनिक व्हर्सेस 'ने जगभर खळबळ उडवून दिली; त्याचा निर्देशही काही समीक्षकांनी केला आहे.

इंग्लंडमधील १९८८ सालातील काही लक्षवेधक पुस्तकांचा हा ट्रेलर. दुधाची तहान ताकावर भागवण्याचा एक प्रयत्न.

## ९

# आफ्रिकन साहित्य : जादुई वास्तववादाचा प्रभाव

आफ्रिका खंडात पुस्तकांचाही दुष्काळ आहे. आपापसांत चाललेले संघर्ष वा देशा-देशांतील तणाव, निरक्षरतेचे मोठे प्रमाण, कागदाची भीषण टंचाई आणि परकी चलनाचे दुर्भिक्ष्य यांमुळे आफ्रिका खंडातील देशांमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या पुस्तकांवरही मोठ्या मर्यादा पडतात. नायजेरिया सरकारने १९७९ ते १९८३ या काळात नवे शैक्षणिक धोरण आखून शालेय विद्यार्थ्यांना शासनातर्फे पाठ्य-पुस्तके मोफत देण्याचा उपक्रम हाती घेतला. अनेक प्रकाशकांनी त्यासाठी पाठ्यपुस्तके छापून घेऊन सरकारला पुस्तके पुरविली. या योजनेला दहा वर्षे झाली; परंतु सरकारने प्रकाशकांना अजूनही त्या पुस्तकांचे पैसे दिलेले नाहीत. कोट्यवधी रुपये सरकारकडे वर्षानुवर्षे तुंबून राहिल्यामुळे तेथील प्रकाशकांवर दिवाळे काढायची पाळी आली आहे. सरकारचा आदर्श समोर असल्याने शाळा-महाविद्यालये आणि विद्यापीठेदेखील वर्षानुवर्षे पुस्तकांची बिले थकवितात आणि प्रकाशक नव्या पुस्तकांसाठी भांडवल उभे करायचे तरी कसे म्हणून डोक्याला हात लावून बसतात. बहुतेक आफ्रिकन देशांत कागद परदेशातून आयात करावा लागतो, त्यामुळे तो महाग असतो. साहजिकच महागडा कागद घेऊन पुस्तके छापण्यासाठी खर्चही अधिक येतो. त्यातच भर म्हणजे पुस्तकाच्या कुठल्याही आवृत्तीची प्रतींची संख्याही मोजकीच असते. मोजकी म्हणजे शंभर-दोनशे प्रती एवढी मोजकी. त्यामुळे एका प्रतीची किंमतही तशीच जबरदस्त पडते. व्यक्तिगत ग्राहकाला पुस्तक घेणे परवडत नाही; परंतु शाळा-कॉलेजांनाही पुस्तके

घेणे कठीण जाते. 'टांझानिया पब्लिशिंग हाऊस'चे महाव्यवस्थापक वॉल्टर बगोया यांनी म्हटले आहे की, आम्ही टांझानियात पुरेशी पुस्तकेही आयात करू शकत नाही. आमच्या देशात पुस्तक ही एक दुर्मिळ गोष्ट आहे. सर्वसामान्य माणसाच्या आटोक्याबाहेरची ही बाब आहे.

## नायजेरियन लेखकांची प्रभावळ

'गार्डियन' या इंग्लंडमधील वृत्तपत्राने आफ्रिकन वाङ्मयावर आजवर बरेच लेख प्रसिद्ध केलेले आहेत. त्यांच्या आधारे 'परस्पेक्टिव्हज् ऑन नायजेरियन लिटरेचर १७००–१९८०' या नावाने दोन खंड इंग्लंडमध्ये छापून नायजेरियात विक्रीसाठी उपलब्ध करून देण्याचे ठरविले आहे. नायजेरियातील ग्रंथप्रेमी वाचकांना नायजेरियन साहित्याची माहिती करून घेण्यासाठी 'गार्डियन'मधील हे सदर वाचावे लागे. कारण नायजेरियातील लंगोटी वृत्तपत्रे नायजेरियन लेखकांच्या कथा-कादंबऱ्या छापण्याएवढी जागा देऊ शकत नाहीत. नायजेरियन लेखक वोले सोयंका याला नोबेल पारितोषिक मिळाल्यानंतर नायजेरियन लेखक-कवींसंबंधी इंग्लंड-अमेरिकेत औत्सुक्य निर्माण झाले. तसेच नायजेरियातील लेखक-कवींना आपले साहित्य परदेशात प्रसिद्ध व्हावे, अशी ओढ लागली. इब्राहिम यारो याहामा यांनी गार्डियनमध्ये हौसा वाङ्मयपरंपरेसंबंधी लिहिले; तर चिकवेन्ये ओकोंजो ओगुनिएम याने स्त्रिया व नायजेरियन वाङ्मय यांवर लिहिले. वोले सोयंकावरही विपुल लेखन सध्या चालू आहे.

## झिंबाब्वे : पुस्तकेच नाहीत

झिंबाब्वेमध्ये उत्तम दर्जाचा कागद अत्यंत महाग आहे. पुस्तकांसाठी तो वापरणे परवडत नाही. तशातच साक्षरतेचे प्रमाणही तेथे कमी आहे. निमशासकीय झिंबाब्वे मास मीडिया ट्रस्टने 'बाओबाब बुक्स' ही नवी प्रकाशन संस्था काढून लहान मुलांसाठी पुस्तके काढण्याचा महत्त्वाकांक्षी उपक्रम हाती घेतला आहे. शाळेत प्रवेश घेण्यापूर्वीच मुलांना पुस्तके हाताळण्याची सवय व्हावी अशी इच्छा बाळगून सुलभतेने अक्षर-ओळख करून देणारी आणि पालकांनी मुलांना वाचून दाखवावी अशी पुस्तके तयार करण्यावर या संस्थेचा कटाक्ष राहणार आहे. खूप भारी कागद वापरण्याऐवजी न्यूजप्रिंट वापरून पुस्तकाची किंमत कमी करता येते, हे

भारतीय उदाहरण तेथे डोळ्यांसमोर ठेवण्यात आले आहे असे येमी ओगुनसिई या प्रकाशकाने म्हटले आहे. 'आफ्रिकन बुक्स कलेक्टिव्ह' या लंडनमध्ये स्थापन झालेल्या संस्थेने वर्षाला दोनशे पुस्तके छापण्याचे उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवले आहे. युरोप-अमेरिकेत ही पुस्तके विकून जो फायदा होईल, त्याचा उपयोग करून आफ्रिकन देशात पुस्तके कमी किंमतीला विकायची, अशी या संस्थेची योजना आहे. परकीय चलन जे मिळेल, ते आधुनिक मुद्रणयंत्रे आणण्यासाठी वापरले जाईल. प्रत्येक पुस्तकाच्या शंभर प्रती सुरुवातीला काढून त्या प्रामुख्याने इंग्लंड-अमेरिकेत विकायच्या अशीही व्यवस्था करण्यात आली आहे. आफ्रिकेतील वाङ्मयाच्या संग्रहाला प्राधान्य देणाऱ्या ग्रंथालय-संघटना या प्रकल्पाला सहकार्य देणार आहेत.

### दडपलेला आवाज

झिंबाब्वेमधील 'बाओबाब' संस्थेने या वर्षी आफ्रिकेतील लोककथा प्रसिद्ध करण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. 'गुप्तदरीतील कथा', 'टोंगा लोककथा' ही दोन पुस्तके तयारही झाली आहेत. झेंजेरल होवे या लेखकाची 'बोन्स' ही पहिलीच आत्मकथनात्मक कादंबरी खळबळ उडवून देणार, अशीही अपेक्षा आहे. उपरा-बलुतं याप्रमाणे तेथेही नव्या जाणिवा घेऊन आजवर दडपला गेलेला समाज आपला आवाज नव्या आवेगाने सर्वदूर ऐकू जावा म्हणून जागरूकपणे प्रयत्न करीत आहे.

### युगांडा : लेखकांची पिढीच्या पिढी गारद

युगांडा हे एके काळी ग्रंथ-संस्कृतीचे आद्यपीठ होते. तेथील पुस्तकांची दुकाने समृद्ध होती. हजारो पुस्तकांनी ती भरलेली असत. ओकोट पी. बिटेकच्या कविता तरुणवर्गाला तोंडपाठ असत. मॅकेरेरे विद्यापीठाचा नाट्यसंघ नवनव्या नाटकांचे सुविहित प्रयोग सादर करी. त्याला जाणकार प्रेक्षकांची गर्दी असे. परंतु इदी अमीनच्या राजवटीत आणि अंतर्गत यादवीत युगांडाची अर्थव्यवस्था कोलमडून पडली. पुस्तकांची दुकाने ओस पडली. ओकोट दारूच्या व्यसनाने खिळखिळा होऊन मरण पावला. नाटककार बायरन कावडाला इदी अमीनने ठार मारले. रॉबर्ट सेसमागा हा कादंबरीकार १९८० मध्ये केनयामध्ये आश्रयाला

गेला असता चमत्कारिक अवस्थेत मेलेला आढळला. जुने लेखक गेले आणि तरुण लेखकांची नवी पिढीही गारद झाली. जुनी पुस्तकेही तेथे भरमसाट किमतीला विकली जातात. ‘ पेटल्स ऑफ ब्लड ’ ही कादंबरी फेरीवाला ३५ अमेरिकन डॉलरना विकतो. पाचशे रुपयांना एखाद्या कादंबरीची जुनी प्रत घेणे किती लोकांना परवडणार ?

नवे लेखक अर्थातच नाउमेद झाले तरी अजिबात लिहिण्याचे थांबले असे नाही. बहुतेक लेखक नोकऱ्या सांभाळून लेखन करतात. प्रकाशक पुस्तक छापायलाही खूप वेळ घेतात. एक पुस्तक लिहून झाले की, त्याच्या प्रकाशनासाठी जी प्रतीक्षा करावी लागते, ती इतकी दमछाक करणारी असते, की दुसरे पुस्तक लिहिण्याइतका उत्साहच राहत नाही, असा अनुभव काही लेखक कुठलाही आडपडदा न ठेवता प्रकट करतात.

**इदी अमीनच्या अत्याचाराचे सावट**

युगांडातील लेखक संघटनेचे सदस्य महिन्यातून एकदा तेथील नॅशनल थिएटरमध्ये भेटतात. पाच-सहा पत्रकार कादंबऱ्या लिहीत आहेत. जॉन नगेंदाची ‘ दि सीझन ऑफ टामस टेबो ’ ही कादंबरी हिनेमान आफ्रिकन रायटर्स सीरीज-मध्ये प्रसिद्ध झाली आहे. युगांडात बालपण गेलेल्या टेबोच्या पूर्वजीवनाची कहाणी या कादंबरीत आली आहे. इदी अमीनच्या कारकीर्दीतील कृष्ण-कृत्यांचे सावट या लेखकांवर आहे. त्या अपराधी भावनेच्या कैचीतून सुटण्यासाठी बरेचसे लेखक आपले लेखन करीत आहेत. अंतःशुद्धीसाठी, पापाचे परिमार्जन करण्या-साठी. त्यामुळे वाङ्मयीन गुणवत्तेपेक्षा कबुलीजबाबाच्या व कैफियतीच्या स्वरूपात हे लेखन अधिक दिसते.

केनियाच्या स्वातंत्र्यप्राप्तीनंतर तेथील जंगलात राहून बंडखोरी करणाऱ्या मातिगरी या स्वातंत्र्यसैनिकाच्या जीवनाची कहाणी नगुगी वा थिओंगओ याने आपल्या ऐतिहासिक राजकीय ‘ मातिगरी ’ या कादंबरीत सांगितली आहे.

**मॅजिक रिॲलिझम**

ताहेर बेन जेलोऊन या मोरोक्कोतील लेखकाला नोव्हेंबर १९८७ मधील फ्रेंच प्रीक्स गोनकोर्ट ॲवॉर्ड मिळाले. त्याबरोबर त्याच्या ‘ दि सेक्रेड नाईट ’ या कादंबरीच्या पाच लाख प्रती विकल्या गेल्या. फ्रेंच टीकाकारांनी बेनची तुलना

मिलान कुंदेरा आणि गॅब्रिएल गार्सिया मरक्वीझ यांच्याबरोबर केली आहे.

मोरोक्कोत जन्मलेला बेन समाजशास्त्र, मानसशास्त्राच्या अभ्यासासाठी १९७१ मध्ये फ्रान्समध्ये गेला. फ्रान्समध्ये त्या वेळी सुमारे पाच लाख मोरोक्कन आणि दहा लाख अल्जीरियन निर्वासित आलेले होते आणि अत्यंत हलाखीत ते राहत होते. या निर्वासितांच्या दुःखदारिद्र्याचे वर्णन करणारी बेनची ' सॉलिटेअर ' ही कादंबरी १९७६ मध्ये प्रसिद्ध झाली. आपण आज जरी एकाकी असलो, पडेल ते काम करून पोट भरत असलो तरी एके दिवशी आपले नशीब उजळेल आणि आपण श्रीमंत होऊ, महालात राहू, संसार थाटू आणि धमाल उडवून देऊ, असे स्वप्न प्रत्येक निर्वासित बघत असतो. बेनच्या या कादंबरीतही अशाच एका व्यक्तीचे जीवन-चरित्र रेखाटण्यात आलेले आहे. प्रत्यक्ष जे जीवन जगत आहेत, ते जग आणि स्वप्नातून उभे राहते ते जग या दोहोंमधील सीमारेषा धूसर होत गेल्याने मानसिक उद्विग्नता आणि उभारी यात गोते खाणाऱ्या व्यक्तीचे दुभंगलेले व्यक्तित्व या कादंबरीत बघायला मिळते. अन्याय, जुल्म यांच्याशी टक्कर द्यायला हवी अशी त्या नायकाची मानसिक सिद्धता करून ही कादंबरी संपते.

## निर्वासितांची नवी पिढी

या निर्वासितांची दुसरी पिढी मात्र अधिक वास्तववादी, मेहनती आणि स्वप्नात दंग न होता वैभवाला आपल्या पायाशी लोळण घ्यायला लावण्याएवढी कर्तबगार निघते. ही पिढी रडगाणी गात बसत नाही. ती संपन्न ऐहिक जीवनाची उपासना करते आणि आपल्या हक्कांसाठी व प्रगतीसाठी प्राणपणाने लढायला सिद्ध असते. ' दि सँड चाइल्ड ' आणि ' दि सेक्रेड नाइट ' या दोन कादंबऱ्यांमध्ये या नव्या पिढीचे रेखीव चित्रण बेनने पेश केले आहे आणि फ्रेंच वाचकांना या चित्रणाने वेड लावले आहे.

एका मुलीला तिचा बाप मुलगा नसल्याने लहानपणापासून मुलगा म्हणून वाढवितो. मुलाचा वेष, मुलासारखे बोलणे, मुलासारखे आडदांड खेळणे हे तिच्या अंगवळणी पडते. तारुण्यात पदार्पण केल्यावर मात्र तिला आपल्या स्त्रीत्वाचे भान येते आणि आपल्या पुरुषी व्यक्तिमत्त्वाचे ओझे असह्य वाटू लागते. ती वडिलांशी भांडते आणि आपल्या स्वतःच्या मनासारखे जीवन जगायच्या ऊर्मीने घराबाहेर पडते आणि वाळवंटी देशात जाते. स्वतःला ती वाळूची कन्या मानत असते.

या वाळवंटी देशात तिने घेतलेला स्वतःचा शोध ‘ दि सेक्रेड नाइट ’ या कादंबरीत आपल्याला बघायला मिळतो. या तिच्या एकाकी शोधयात्रेत तिला कुटुंबाचा, धर्माचा किंवा आपल्या स्त्रीत्वाचा — कोणाचाच आधार नसतो. फ्रान्समधील निर्वासितांच्या तरुण पिढीला ज्या अनुभव-चक्रातून जावे लागते, त्याचे भेदक-स्फोटक दर्शन या कादंबरीत होते. या अनुभवांमुळे तिच्या मनातला क्षोभ समजुतीच्या पातळीवर येतो. दुसऱ्यांनी आपल्यावर अन्याय केला, आपले जीवन बरबाद केले, असा जो प्रारंभीचा ग्रह आहे, तो हळूहळू निष्प्रभ होत जातो आणि या नव्या जगाने आपल्यापुढे खूप मोठे क्षितिज खुले केले आहे; आपल्याला जे काही मिळवायचे आहे त्यासाठी किंमत द्यायलाच हवी; इतरांबद्दल सहिष्णुता बाळगण्यास शिकणे म्हणजेच खरे स्वातंत्र्य होय, अशी तिची धारणा होते.

‘ आत्मकथनात्मक कादंबऱ्यांमध्ये केवळ स्वतःच्याच दुःख-दारिद्र्याची अतिरंजित वर्णने करण्याचा मोह लेखकांना होतो. त्याचा वाचकांना कंटाळा येतो. त्यापेक्षा अधिक विस्तृत, व्यापक आणि वेगळ्या जगाची ओढ वाचकांना असते. त्यामुळे मी स्वतःच्याच भूतकाळात रंगण्यापेक्षा माझ्या पिढीच्या सामूहिक शोधयात्रेचा मागोवा घेत राहिलो आहे; जीवनाची वेगवेगळी क्षितिजे धुंडाळत आहे; वाचकाला आकृष्ट करील, गुंतवून ठेवील, आपले वाटेल असे जग उभे करण्याची ऊर्मी मला लेखन-प्रवृत्त करते ’, असे बेन जेलोइन म्हणतो. परंतु आत्मकथनात्मक कादंबऱ्या लिहिण्याकडे तेथेही लेखकांचा जास्त कल आढळून येतो.

( साप्ताहिक सकाळ, दि. १० जून १९८९ )

# १०

## निग्रो साहित्याची नवी झेप

दलित साहित्याने मराठी वाङ्मयक्षेत्रात गेल्या काही वर्षांत एक नवे चैतन्य आणले. एका पाठोपाठ एक दलित आत्मचरित्रे वाचकांपुढे येत गेली आणि बिनधास्त लेखनाचा जोर वाढू लागला. दलित लेखकांनाही आत्मकथनाच्या नीतिविषयक कल्पनांमधील मोकळेपणा हा इतर बाबतीतील भीड चेपायला उपयुक्त ठरला. दलित लेखनाला वाचकवर्गही चांगला लाभला. प्रकाशकही त्याला उचलून धरू लागले. त्यामुळे नवे नवे लेखकही पुढे येत राहिले. मात्र मराठी भाषेत दलित वाङ्मयाची जशी जोरदार लाट आली तशी इतर भारतीय भाषांमध्ये अजूनही आलेली नाही असेही लक्षात येते.

दलित वाङ्मयाशी नाते सांगता येईल असे निग्रो वाङ्मय हे अमेरिकेत एकेकाळी अत्यंत खळबळ उडवून देत होते. जेम्स बाल्डविन, राल्फ एलिसन, ले रोइ जोन्स, रिचर्ड राईट यांसारख्या लेखकांची प्रत्येक कृती वादविषय बनली होती आणि अमेरिकन प्रस्थापित वर्गाच्या संवेदनाप्रणालीवर ती घणाघाती हल्ला चढवत होती. मी १९६४-१९६५ मध्ये अमेरिकेत असताना निग्रो वाङ्मयाशी संबंधित विषयांवर अनेक अभ्यासक्रम मला हार्वर्ड युनिव्हर्सिटीत आढळले. काही निग्रो लेखक नाटककारांना भेटण्याची संधीही मला मिळाली. निग्रो रंगभूमीवरील काही नाटकेही बघायला मिळाली. माल्कम एक्स या ब्लॅक मुस्लिम नेत्याची व त्याच्या सहकाऱ्यांचीही मी हार्लेममध्ये जाऊन गाठ घेतली. (माल्कम एक्स नंतर त्याच वर्षी खूनी हल्ल्यात बळी पडला.)

परंतु निग्रो वाङ्मयाचा संपर्क त्यानंतर विशेष राहिला नाही. १९८७ मध्ये जेम्स बॉल्डविन मरण पावला, तेव्हा 'फायर नेक्स्ट टाइम'मधला त्याचा सुरुवातीचा आक्रमक आवेश बराच ओसरलेला होता; आणि अधिक समंजस भूमिकेवर तो येऊन ठेपला होता. मध्यंतरीच्या काळात निग्रो साहित्याची अमेरिकन चळवळ ढिली पडली; आणि त्याचा खपही मंदावला. परंतु गेल्या चार-पाच वर्षांत पुन्हा ब्लॅक रायटर्सना– निग्रो लेखकांना बरे दिवस येऊ लागले आहेत आणि त्यांची पुस्तके मोठ्या प्रमाणावर निघू लागली आहेत. जुन्या पुस्तकांची पुनर्मुद्रणे बाहेर पडू लागली आहेत. स्त्रीमुक्तिवादाच्या वाढत्या प्रभावामुळेही निग्रो साहित्याला नवे परिमाण लाभले आहे.

१९६० पर्यंत निग्रो साहित्याकडे विद्रोही साहित्य– प्रोटेस्ट लिटरेचर म्हणून वाचक-अभ्यासक पाहत होते आणि त्यामुळे निग्रोंच्या राजकीय जागृतीचे व अस्मितेचे एक लक्षण मानले जात होते. निग्रोंच्या गुलामगिरीचे, वेठबिगारीचे, दारिद्र्याचे, अंडरवर्ल्डचे, गुन्हेगारीचे, हिंसेचे त्यात चित्रण असे. तसेच गोऱ्या लोकांनी चालविलेल्या शोषणाविरुद्ध त्यात आवाज उठविलेला असे. 'माझी कविता माझ्या भळभळत्या रक्ताने लिहिली गेली आहे', असे एका निग्रो कवीने लिहिले होते, ते सर्वांनाच आपले ब्रीदवाक्य वाटत होते. निग्रो लेखकांच्या लेखनात इतर विषय आले तर लोकांची उत्स्फूर्त प्रतिक्रिया अशी असे : अरे, हे कसले निग्रो साहित्य ? ओ ! दॅटस नॉट ब्लॅक ? 'डबलडे' या प्रकाशनसंस्थेने १९६७ मध्ये निग्रो साहित्यासाठी स्वतंत्र ग्रंथसंपादक नेमून काही पुस्तके काढली. काळ्या लेखकांचा जाणीवपूर्वक शोध घेतला. इतर बहुसंख्य प्रकाशक गोरे असत; आणि निग्रो वाचक-ग्राहकांकडे वळण्याचा विचारही मनात आणत नसत. 'डबलडे'ने ही कोंडी फोडण्याचा प्रयत्न सुरू केला खरा; परंतु त्यांनी काढलेल्या निग्रो लेखकांच्या पुस्तकांचा विशेष उठाव न झाल्याने १९७२ पासून निग्रो वाङ्मयाचे प्रकाशन या संस्थेने थांबवले. काळे लोक पुस्तके विकत घेत नाहीत, काळ्या लेखकांच्या पुस्तकांनाही वाचकवर्ग हा गौरवर्णीय असतो हे निरीक्षण 'डबलडे'च्या या पीछेकदम निर्णयाला सहाय्यभूत ठरले. महाराष्ट्रातील दलित साहित्याचीही हीच अवस्था आहे.

१९८५ पासून मात्र अमेरिकेत निग्रो वाङ्मय हे नवी झेप घेत आहे; आणि

जुन्या ज्येष्ठ निग्रो लेखकांची पुस्तके पुनर्मुद्रित होऊ लागली आहेत. नवीन लेखनाकडे प्रकाशक आस्थेने बघू लागले आहेत. अमेरिकेत २ कोटी ७ लाख निग्रो आहेत; परंतु निग्रो लेखकांची संख्या शंभराच्या आतबाहेरच घोटाळत आहे. १९८८ मध्ये नॅशनल बुक अॅवॉर्डसाठी शेवटच्या फेरीत १२० पुस्तके होती, त्यांपैकी निग्रो लेखकांची पुस्तके फक्त दोन होती. अमेरिकेत एकूण लेखकांची संख्या अडीच लाख आहे; परंतु काळे लेखक मात्र वर म्हटल्याप्रमाणे शंभरही सापडत नाहीत. आपल्याकडील दलित लेखक एकदम सुपरस्टार बनले तसे सुपरस्टार निग्रो लेखक आज कोणी नाहीत.

अर्थात आज असा एकदम गाजलेला सुपरस्टार लेखक कोणी नसला तरी निग्रो लेखनाकडे प्रकाशक-लेखक हे अधिक आस्थेने बघू लागले आहेत.

या आस्थेमुळेच ' वायकिंग पेंग्विन ' ही जगद्विख्यात प्रकाशनसंस्था ' करंट ब्लॅक रायटिंग ' हा प्रातिनिधिक संग्रह प्रसिद्ध करणार आहे. गेल्या वीस वर्षांत अशा प्रकारचा प्रातिनिधिक संग्रह प्रथमच निघत आहे. १९६०-७० या काळात निग्रो लेखकांच्या निवडक लेखनाचे प्रातिनिधिक संग्रह वेगवेगळ्या प्रकारे निघत राहिले होते. या नव्या उपक्रमाच्या संपादनाचे काम टेरी मॅकमिलन ही करीत असून, सुमारे ९० निग्रो लेखक-लेखिकांशी तिने संपर्क साधला आहे. त्यांपैकी ३० लेखक असे आहेत की यापूर्वी त्यांचे एकही पुस्तक प्रकाशित झालेले नाही. अमेरिकेत कथा-एकांकिका वगैरेंचे प्रातिनिधिक संग्रह विपुल संख्येने प्रसिद्ध होतात; परंतु त्यामध्ये निग्रो लेखकांना क्वचितच संधी मिळते. अँथॉलॉजीमुळे लेखकांना व्यापक वाचकवर्ग मिळतो. त्यांना लेखकवर्गात काही मानाचे स्थान आहे हे त्यामुळे जनमानसावर बिंबवले जाते. पेंग्विनच्या या नव्या संग्रहाबद्दल त्यामुळेच औत्सुक्य आहे. टेरी मॅकमिलन अॅरिझोना विद्यापीठात लेखनकलेचे अध्यापन करते. तिला आढळलेले निग्रो लेखक आता विज्ञानकथा, विनोदी लेखन, शृंगारकथादेखील लिहू लागले आहेत. केवळ निग्रो जीवनापुरते ते लेखन मर्यादित नाही. त्यामुळे तिला समाधान वाटते.

सध्या अमेरिकेत ज्यांना थोडीफार मान्यता मिळालेली आहे अशा निग्रो लेखकांमध्ये एल. यंग, जॉन विल्यम्स, ट्रे एलिस, बिल विल्यम्स फोर्ड, रँडाल केनन, ब्रेंडा कॉनर-बे, मरिलीन डक्सवर्थ, अॅड्रिएने इनग्रम, पॉला गिडिंग्ज, मेरी ब्राउन, डोरिस जीन ऑस्टिन यांचा उल्लेख करण्याजोगा आहे.

एल. यग यांची ‘ सिडक्शन बाय लाइट ’ ही कादंबरी गतवर्षी डेल्टाने प्रकाशित केली. या कादंबरीचे लेखन आठ वर्षे चालले होते. हॉलिवुडमध्ये एके काळी चित्रपटात काम करणाऱ्या अभिनेत्रीच्या उत्तरायुष्यातील गृहिणीचे जीवन रेखाटणारी ही कादंबरी एक उत्कट भावस्पर्शी प्रेमकथा हळुवारपणे उलगडून दाखवते. या कादंबरीची प्रथमावृत्ती ही संख्येच्या दृष्टीने लक्षवेधक आहे. यंगची पहिली कादंबरी अनेक प्रकाशकांनी २०-२५ वर्षांपूर्वी नाकारली होती. निग्रो जीवनाचे चित्रण करणारी कादंबरी इतकी उदात्त आणि हळुवार असावी ही कल्पनाच अनेक प्रकाशकांना चमत्कारिक वाटत होती. ‘ होल्ट ’ या संस्थेने ‘ स्नेक्स ’ ही त्याची कादंबरी १९७० मध्ये प्रसिद्ध केली. यंग हा समन्वयवादी असल्याने, लढाऊ निग्रो लेखक त्याच्याकडे उपेक्षेने बघत. परंतु आता मात्र यंगचा वाचकवर्ग वाढत आहे. ‘ तू प्रेमाच्या गोष्टी सांगतोस. आमच्या मुलांना सध्या प्रेमाची गरज आहे. त्यांनी तुमचे तरी ऐकले तर बरे होईल ’ असे अनेक निग्रो पालक त्याची भाषणे ऐकल्यावर त्याला आवाहन करतात.

चार्ल्स जॉन्सन आता साठीत आहे. २६ व्या वर्षी वायकिंगने त्याचे पहिले पुस्तक ‘ फेथ अँड दि गुड थिंग ’ ( १९७४ ) प्रसिद्ध केले. कादंबरीकार म्हणून त्याला मानाचे स्थान आहे. रुदरफोर्डस ट्रॅव्हल्स ही त्याची ताजी कादंबरी प्रसिद्धीच्या मार्गावर आहे. ‘ बीइंग अँड रेस : ब्लॅक रायटिंग सिन्स १९७० ’ हे त्याचे समीक्षात्मक पुस्तक इंडियाना युनिव्हर्सिटी प्रेसने प्रकाशित केले आहे. जॉन्सन आपल्या निग्रो तरुणांना सल्ला देतो, ‘ तुम्हाला सर्वजण सांगत राहतात की, तुम्हाला ज्या जीवनाची चांगली माहिती आहे त्याबद्दलच तुम्ही लिहा, निग्रोंबद्दलच लिहा; परंतु माझ्या मते ही दुर्दैवाची गोष्ट आहे. निग्रो जीवनापेक्षाही कदाचित तुम्हाला रहस्यकथांची माहिती अधिक व्यापक असते. त्याबद्दल तुम्ही का लिहू नये ? लेखनाला आरंभ करण्याआधी निग्रो लेखकांनी आपण आता निग्रो जीवनावरील कादंबरी लिहायला घेत आहो असे जणू प्रतिज्ञापत्रच करून लिहायला बसायचे का ? निग्रो लेखक इतर अनुभवांबद्दल लिहूच शकणार नाहीत असे का मानावे ? इतर गौरवर्णीय लेखकांप्रमाणेच अमेरिकन जीवनाचा व्यापक पट घेऊन त्यावर आपण लिहावे असे निग्रो लेखकांनाही का वाटू नये ? ’ असे अनेक प्रश्न जॉन्सन उपस्थित करतो. निग्रो लेखकांच्या मानसिकतेशी व लेखनविषयक संकल्पनेशी ही बाब निगडित आहे. गार अँथनी हेवूड याने रहस्यकथांच्या क्षेत्रात

प्रवेश केला. ' त्याच्या फियर ऑफ दि डार्क ' या रहस्यकथेला ' प्रायव्हेट आय रायटर्स ' या संस्थेने पारितोषिक देऊन गौरविले आहे.

### रायटिंग इज फायटिंग

इस्माइल रीडच्या निबंधसंग्रहाचे नाव आहे, ' रायटिंग इज फायटिंग.' त्याचा एक नवा कवितासंग्रहही प्रसिद्धीच्या मार्गावर आहे. इस्माइल रीडचे असे मत आहे की, नव्या पिढीतले निग्रो लेखक अधिक धाडसी आहेत. ते धोके पत्करायला तयार असतात. त्यामुळे तिसरा रेनेसान्स नजीक आहे. ब्लॅक आर्टस् मूव्हमेंट आणि हार्लेम रेनेसान्स या घटना निग्रो मानसिकतेमधील आशादायक बदलाकडे लक्ष वेधतात असे तो मानतो.

बेबी मूर कँपबेल हिने आरंभीच्या काळात संतप्त कविता लिहिल्या; पण कोणी त्या प्रकाशित करायला तयार नव्हते. त्यामुळे ती अंतर्मुख होऊन विचार करू लागली. आपल्या संतापाबद्दल लोकांना काहीच सोयरसुतक का नाही ? तिच्या लक्षात आले की सारेच निग्रो तारस्वरात आपल्यावरील अन्यायाचे गाऱ्हाणे गात असतात आणि गोऱ्यांवर आगपाखड करीत राहतात. परंतु ही आगपाखड वा संतप्त प्रतिक्रिया म्हणजे काव्य नव्हे. आपल्या जीवनात चांगलेही खूप काही आहे. संतापाच्या भरात आपण त्याकडे दुर्लक्ष करतो. आपल्या अनुभवातला मानवतेचा, माणसाचा भाग आपण नजरेआड करता कामा नये. आपण अल्पसंख्य असल्याने परिवर्तनासाठी झगडत राहणे हा आपला स्वभाव बनतो. परंतु हे विद्रोहाचे साहित्य अखेर जीवनाची एक नकारात्मक बाजूच सातत्याने पुढे मांडत असते. आपले वाचक वा प्रकाशकही त्याच दृष्टीने मग आपले वाङ्मय वाचतात. तशाच लेखनाची आपल्याकडून अपेक्षा धरतात. त्यामुळे आपल्या जीवनातील इतर संपन्न भागाकडेही आपण दुर्लक्ष करीत राहतो. एक लेखक म्हणून आपणच आपले जणू खच्चीकरण करत जातो.

बेबी मूर कँपबेलने ' वॉशिंग्टन पोस्ट 'मध्ये एक लेख लिहिला होता. घराकडे पूर्णतया दुर्लक्ष करणारा तिचा बाप, त्यामुळे त्या कुटुंबात निर्माण झालेले ताण याबद्दल तिने आपले काही अनुभव मांडले होते. तो लेख वाचून हा विषय अधिक उदाहरणांनिशी व्यापक संदर्भात मांडावा अशी सूचना तिच्या काही वाचकांनी केली. त्याप्रमाणे तिने पुनर्लेखन केले. ' स्वीट समर : ग्रोइंग अप विद्

अँड विदाउट माय डॅड ' ही आत्मचरित्रात्मक कादंबरी त्यातून तयार झाली. " माझे बालपण तसे सुखाचे व गमतीजमतीचे होते. माझ्या अनेक मैत्रिणींचेही बालपण असेच मजेशीर होते, स्वच्छंद होते. त्याचेच चित्रण मी या कादंबरीत केले आहे." असे ती म्हणते.

ट्रे एलिस हा लेखक फक्त पंचवीस वर्षांचा आहे. त्याची पहिली कादंबरी ' प्लॅटिट्यूडस ' ही व्हिंटेज काँटेपोररीजने ८८ साली प्रसिद्ध केली. त्या कादंबरीचे स्वागत चांगले झाले. त्याला वाटते की, निग्रो विरुद्ध गौरवर्णीय असा संघर्ष आज उरलेला नाही. आज संघर्ष आहे तो निग्रो विरुद्ध निग्रो असाच आहे. आपली पुस्तके गौरवर्णीय वाचकांनी वाचावी. ते इतके वाङ्मय वाचतात, लॅटिन अमेरिकन लेखकांची पुस्तके वाचतात, त्याच भावनेने आमचे निग्रो वाङ्मय त्यांनी वाचले तरी काय हरकत आहे असा त्याचा भाव आहे. आपली ' न्यू ब्लॅक एस्थेटिक्स 'ची कल्पना मांडताना तो १९६०–८० या काळातील अमेरिकन निग्रो वाङ्मयातील संकेतांची व समीक्षाविषयक सिद्धान्तांची टवाळी करतो.

निग्रो लेखकांनी स्त्रीमतवादी भूमिकेतून लिहिलेल्या कथा-कादंबऱ्यांनाही सध्या मागणी चांगली आहे इस्माईल रीड या तरुणाच्या ' रेकलेस आयबॉलिंग ' या उपहासात्मक कादंबरीची नायिका ही पुरुषी अरेरावीशी टक्कर देऊन आपले श्रेष्ठत्व सिद्ध करते. ॲलिस वॉकरची ' दि कलर परपल ' ही कादंबरी बेस्ट सेलर ठरली. तिचे श्रेयही लढाऊ नायिकेच्या चित्रणाला आहे. ॲलिस वॉकर विवाहबाह्य संबंध, बेवारशी संतती, ड्रग ॲडिक्शन, गुन्हेगारीचे जग यांच्याशी संबंधित कथाविषय हाताळते, पुरुषवर्गाची खिल्ली उडवते. त्यामुळे काही समीक्षक म्हणतात की सध्याचा जमाना हा ब्लॅक वूमेन रायटर्स मुव्हमेंटचा आहे. निग्रो पुरुष लेखकांपेक्षा निग्रो स्त्री-लेखिका अधिक वाचकप्रिय आहेत. आर्थिकदृष्ट्या त्या अधिक यशस्वी आहेत असेही आढळून येते. सध्याच्या पुस्तकांच्या दुकानातील स्त्रीविषयक ग्रंथांच्या दालनात निग्रो स्त्रियांच्या पुस्तकांनी बरीच जागा व्यापलेली दिसते. स्त्री लेखिकांच्या यशामुळे अनेक पुरुषलेखक अस्वस्थ होतात. ' आमच्या यशाचा हेवा वाटायला नको आपण सारेजण निग्रोविषयक जागृतीसाठीच धडपडत आहोत ' अशी समजूत घालण्याचा प्रयत्न ट्रे एलिससारखे लेखक करीत आहेत.

पॉला गिडिंग ही निग्रो लेखिका आपली पुस्तके खपवण्यासाठी प्रकाशकांना सगळ्या प्रकारे सहकार्य देण्यास सिद्ध असते. ' इन सर्च ऑफ सिस्टरहूड ', ' डेल्टा

सिग्मा थेटा अँड दि चालेंज आफ दि ब्लॅक सोरोरिटी मुव्हमेंट' ही तिची पुस्तके. याच चळवळीच्या वतीने घेण्यात आलेल्या अधिवेशनाच्या स्टॉलमध्ये पॉलच्या पुस्तकाच्या ४ हजार प्रती विकल्या गेल्या. त्या अधिवेशनाला १० हजार स्त्रिया उपस्थित होत्या, हे लक्षात घेतले तर हा खप नेत्रदीपक वाटेल.

टेरी मॅकमिलनने आपले 'ममा' हे पुस्तक प्रसिद्ध होण्यापूर्वी ३००० पत्रे संभाव्य ग्राहकांनी पाठवली. गावोगाव आपल्या पुस्तकातील उतारे वाचण्याचे कार्यक्रम ती स्वीकारते. रेडिओ, वृत्तपत्रे व टीव्ही यावर तिच्या मुलाखती होतात. या सर्व प्रयत्नांमुळे तिच्या पुस्तकाच्या तीन आवृत्त्या अल्पावधीतच खपल्या.

'हार्लेम रायटर्स गिल्ड' हे तर गेली ५० वर्षे अत्यंत प्रभावीपणे कार्यरत आहे. पॉल मार्शल, वॉल्टर डीन मेयर्स, लुइझा मेरीवेदर, ओसी डेव्हिस, वेस्ली ब्राउन, ब्रेंडा विल्करसन वगैरे लेखकांना या गिल्डने घडवले. या गिल्डच्या सदस्यांनी लिहिलेल्या पुस्तकांची संख्या शंभरावर गेली आहे.

**ब्लॅक रायटर्स गिल्डची कामगिरी**

या गिल्डचे डायरेक्टर म्हणून १९७०-८० या काळात कादंबरीकार बिल विल्यम्स फोर्ड याने काम केले. गिल्डकडे येणाऱ्या तरुण लेखकांना आपल्या अनुभवांना कलात्मक रूप देण्याच्या दृष्टीने स्वतःची अस्मिता व पृथगात्मता शोधण्याच्या दृष्टीने आणि आपली स्वतःची भाषा निर्माण करण्याच्या दृष्टीने गिल्डने मोलाचे मार्गदर्शन केले. आपण कुणासारखे लिहायचे? शेक्सपियरसारखे? हेन्री जेम्स-सारखे? फॉकनेरसारखे? आपण आहोत तरी कोण? आपण लिहितोय ते तरी कशासाठी? आपले वेगळेपण असलेच तर ते कशात आहे? अशा रीतीने गिल्ड-मधील होतकरू लेखक आपल्या प्रतिभेची अंतःसूत्रे शोधत असत. गिल्डचे अनेक सदस्य हे स्पर्धेच्या जगातही आपले स्थान निर्माण करण्यात यशस्वी ठरले. आर्थर फ्लॉवर्सने व्हिएतनामवर कादंबरी लिहिली (डि मोजो ब्लूज). सध्या तो हॉलिवूडमध्ये काम करतो. ब्रेंडा कानोर वे हिने एका सभेत एक दीर्घ कविता वाचून दाखवली. वेस्ट इंडीजच्या पार्श्वभूमीवरील या कवितेचे पुढे कादंबरीत रूपांतर तिने केले (क्लॅपर्स बेंड). तिला न्यूयॉर्कच्या आर्ट फाउंडेशनचे ६ हजार डॉलर्सचे बक्षीस मिळाले. मध्यमवर्गीय निग्रोंचे तिने रंगवलेले जीवन हे कुतूहलाचा विषय ठरले आहे.

हकी मधुबुती या कवीची प्रकाशनसंस्थाही आहे ( थर्ड वर्ल्ड प्रेस ). ' डोन्ट क्राय ', ' स्क्रीम ' या त्याच्या काव्यसंग्रहाच्या एक लाख प्रती आजवर विकल्या गेल्या आहेत.

अमेरिकेतील निग्रो साहित्याला आपले स्थान निर्माण करण्यासाठी विविध आघाड्यांवर लढावे लागत आहे. आपल्याकडे त्या मानाने दलित साहित्याला लौकर व सहज मान्यता मिळताना दिसते.

सहजपणे मिळालेली मान्यता तितक्याच सहजपणे हिरावून घेतली जाऊ शकते.

अमेरिकेतील कृष्णवर्णीय लेखकांची शोधयात्रा त्यामुळेच आपल्यालाही बळ देणारी ठरावी.

( साप्ताहिक सकाळ, दि. १८ नोव्हेंबर १९८९ )

# ११

## उत्साही वाचकांचा देश : जपान

भारत आणि जपान यांच्यात आर्थिक आणि सांस्कृतिक स्नेहसंबंधाचे नवे पर्व जोरात सुरू झाले आहे. १९८९ मध्ये जपानमध्ये भारत महोत्सव सुरू झाला. पंतप्रधान राजीव गांधी त्यासाठी जपानला गेले होते.

भारतात पुस्तके विकत घेऊन वाचणारे वाचक बंगाली व तमीळ भाषा सोडल्यास मोजकेच आढळतात. परंतु जपान हा एक असा देश आहे की जेथे पुस्तकांचा खप मोठ्या प्रमाणावर होतो. जपानी माणूस कुठेही दिसला तरी त्याच्या हातात पुस्तक असणारच. मग तो बस स्टॉपवर वा बसमध्ये असो, रेल्वेत असो, दुकानात असो वा रस्त्याने चालत असो. जगातील सर्वांत जास्त अधाशी ग्रंथ-वाचक हे जपानमध्ये सापडतील. बस, रेल्वे, लोकल, कोठेही क्यू असतोच आणि अशा क्यूमध्ये उभे राहिल्यावर वेळ घालवायला पुस्तकासारखे अन्य साधन कुठले असणार? उभ्याउभ्याने पुस्तक वाचणे या अर्थाचा मराठीत शब्द आहे का? नाही. परंतु जपानी भाषेमध्ये मात्र त्यासाठी खास शब्द आहे– टचियोमी. उभ्याने वाचणे, कोठेही क्यूमध्ये वाचत उभे राहणे हा जपानी माणसाच्या जीवनपद्धतीचा एक विशेष भाग आहे.

जपानमध्ये शंभर टक्के साक्षरता आहे आणि वेळ घालवण्यासाठी, रंजनासाठी अत्याधुनिक नवनवी इलेक्ट्रॉनिक साधने सतत बाजारात येत आहेत त्यांच्या किंमती अत्यल्प असूनही पुस्तकांचे वेड तेथे सर्वांत जास्त आहे. जगातील सर्वांत जास्त खपाची वृत्तपत्रेही जपानमध्येच आहेत. जगातील सर्वांत जास्त खपणाऱ्या

'योमिउरी शिंबुन' या जपानी दैनिकाचा खप १४० लाख प्रतींपेक्षा जास्त आहे. (त्याच्या संपादक मंडळावर ३ हजार कर्मचारी आहेत.) तर ' असाही शिंबुन 'चा रोजचा खप १२५ लाख प्रती एवढा आहे. त्याच्या कचेरीला मी भेट दिली होती. माझ्या त्या पत्राचा एक सहसंपादक माझ्याबरोबर वर्षभर अमेरिकेत होता. मैनीची (७० लाख), सांकेइ (३१ लाख), निहोतं कीझाइ किंवा जिक्केइ (३० लाख) हे इतर वृत्तपत्रांचे खपही जगातील इतर वृत्तपत्रांच्या खपापेक्षा अधिकच असतील. १२ कोटी लोकसंख्या असणाऱ्या देशात रोज १२५ वृत्तपत्रांच्या ७ कोटी प्रती खपतात. शिवाय २००० मासिकेही तेथे निघतात. यावरून जपानी वृत्तपत्राच्या महत्तेवर प्रकाश पडतो. जपानमध्ये प्रत्येक घरात टेलेव्हिजन आहे; तरीही वृत्तपत्रे व मासिके घरोघर जातात. एवढेच नव्हे, तर ' कोबे ॲबे 'सारख्या लोकप्रिय लेखकाच्या कादंबऱ्यांची पहिली आवृत्ती दीड लाख प्रतींची असते आणि ती काही महिन्यांतच संपते.

**४० हजार कोटी रुपयांची पुस्तकविक्री**

टोकियोमधील कांडा या भागात पुस्तकांची शेकडो दुकाने दाटीवाटीने वसलेली आहेत आणि त्यात जपानी भाषेतील हजारो पुस्तकांबरोबर अमेरिकन व इंग्लिश कथा-कादंबऱ्या, जर्मन, फ्रेंच, इटालियन व इतर भाषांतील पुस्तके ही देखील दिमाखाने शेल्फवर विराजमान झालेली दिसतात. जपानमध्ये जपानीशिवाय इतर भाषांतील पुस्तकांचा खप सुमारे दहा टक्के होतो. एकूण ग्रंथविक्री वर्षाला ४० हजार कोटी रुपयांच्या जवळपास होते आणि फक्त १३०० सार्वजनिक वाचनालये. त्यांपैकी १ टक्काही पुस्तकेही ती घेऊ शकत नाहीत; यावरून वैयक्तिक ग्राहकांचे प्रमाण किती मोठे असेल हे लक्षात येईल. जपानी पुस्तकांच्या किंमतीही त्या मानाने बेताच्या असतात. दोन-तीनशे पृष्ठांची कादंबरी एक डॉलरला म्हणजे वीसतीस रुपयांना मिळू शकते. एकूण नव्या पुस्तकांत कादंबऱ्यांचे प्रमाण एकपंचमांशावर असते. त्यातही स्त्री-लेखिकांचे प्रमाण फार मोठे आहे. लोकप्रियतेतही या लेखिका अनेक पुरुष कथाकादंबरीकारांवर मात करतात; आणि त्यामुळे तेथेही स्त्रीलेखिकांबद्दल चिंता आणि चिंतन करणारे पुरुष ( विचारे ! ) आहेत.

**पहिली कादंबरी हजार वर्षांपूर्वीची**

खरे तर जपानी भाषेतील पहिली कादंबरी एका स्त्रीनेच लिहिली; आणि तीही

चांगली अकराशे पृष्ठांची दणदणीत कादंबरी. या घटनेला हजार वर्षे झाली. 'गेंजीची गोष्ट' ही ती कादंबरी; आणि या कादंबरीची लेखिका होती लेडी शिकिबु मुरासाकी. अकराव्या शतकात लिहिली गेलेली ही कादंबरी आजही जपानमध्ये तुफान खपते; आणि मनोविश्लेषण, काळ व स्थळांचे गुंतागुंतीचे संज्ञाप्रवाही चित्रण, व्यक्तिरेखांचे विश्लेषण, समाजातील विविध वर्गांचे व्यवहार वगैरे आधुनिक तंत्रविशेष या हजार वर्षांपूर्वीच्या कादंबरीतही विद्यमान आहेत. राजपुत्र गेंजी याच्या लहानपणाची आणि प्रेमप्रकरणांची ही कहाणी अनेक उपकथानकांनी भरलेली आहे. राजदरबाराचे वातावरण अत्यंत वास्तववादी रंगवलेले आहे. इ. स. १००१ ते १०१५ हा या कादंबरीचा लेखनकाळ असून लेडी मुरासाकीची तीन वर्षांची दैनंदिनीही उपलब्ध आहे.

गेंजीच्या गोष्टीनंतरही राजाराणीच्या, पराक्रमी वीरांच्या, युद्धलढ्याच्या गोष्टी जपानमध्ये गद्यात लिहिल्या गेल्या. १६०३ ते १६६८ या काळात पद्यलेखनालाही चालना मिळाली. राजाराणींच्या व समुराई योद्धयांच्या धीरोदात्त मृत्यूच्या कहाण्या मागे पडून व्यापारी आणि धनिक वर्गाच्या गोष्टींना प्राधान्य मिळू लागले. पोर्तुगीज, डच, युरोपियन खलाशी जपानला भेट देऊ लागले. १६४० मध्ये परदेशी प्रवाशांना जपानमध्ये प्रवेश करण्यास बंदी घालण्यात आली. शोगुन राजवटीत जपान हा बंदिस्त देश बनला.

**व्यापारी व मध्यमवर्ग – समाजचित्रण**

सन १६८६ मध्ये मैजी राजवट पुन्हा प्रस्थापित झाली आणि रशिया-जपान युद्धाने जपानमध्ये नव्या विचारांची लाट उसळली. राजदरबारच्या कट-कारस्थानांच्या आणि विदूषकी गमतीजमतीच्या कथांऐवजी प्रतिमाप्रचुर काव्य आणि मानसशास्त्रीय कादंबऱ्या अधिक प्रचारात आल्या. इंग्लिश-युरोपीय पुस्तकांची भाषांतरे जपानमधील सुशिक्षितांच्या जाणिवेच्या कक्षांना विस्तृत वास्तवाचे भान देऊ लागली. एमिल झोलाच्या नॅचरलिस्ट कादंबऱ्या, डिझराएलीच्या राजकीय कादंबऱ्या या जपानमध्ये आवडीने वाचल्या जाऊ लागल्या.

एकोणिसाव्या शतकात नव्या दमाच्या कादंबरीकारांची नवी पिढी जपानी वाचकांवर अधिराज्य गाजवू लागली. सोसेकी नतसुमे, ओगाई मोरी, तोसान शिमाझाकी यांनी अलंकारिक भाषेचा त्याग करून दैनंदिन व्यवहारातील भाषा

कादंबऱ्यांमध्ये सर्रास वापरली. १९६८ मध्ये यासुनारी कावाराबा याला नोबेल पारितोषिक मिळाले, त्या वेळी तो ६९ वर्षांचा होता. ओसामु दाझाई ला जपानचा आल्बेर कामू मानले जाते. युकिओ मिशिमा हा सर्वांत जास्त गाजलेला जपानी कादंबरीकार. त्याला जपानमधील तत्कालीन मध्यमवर्गीय व्यापारी संस्कृती तिरस्करणीय वाटे आणि पूर्वकाळातील मूल्ये आणि लढाऊ सरंजामी जीवनपद्धती आकर्षक वाटे. त्या पूर्वपरंपरेचा उद्घोष करणाऱ्या त्याच्या कादंबऱ्या जपानी वाचकांना संमोहित करीत. त्याने जपानी परंपरेप्रमाणे शेवटी आत्महत्या केली (१९७०). 'कन्फेक्शन्स ऑफ ए मास्क', 'दि टेंपल ऑफ गोल्डन पॅव्हिलियन' या त्याच्या लोकप्रिय कादंबऱ्या.

**गाजलेले कादंबरीकार**

सध्या जपानमध्ये लोकप्रिय असणारे कादंबरीकार म्हणून कोबो अॅबे, हिसाशी इनोऊ, केंझाबुरो ओए, शोहेइ ऊका, ओतोहिको कांगा, सबुरो शिरोयामा यांचा उल्लेख केला जातो. कोबो अॅबेच्या 'वूमन इन् दि ड्युन्स' या कादंबरीचे इंग्रजी भाषांतरही गाजले आहे. त्याच्या पुस्तकाच्या पहिल्या आवृत्तीच्या दीड लाख प्रती निघतात. जपानचा ग्रॅहम ग्रीन म्हणून ज्याचा गौरव होतो तो शुसको एन्डो हा ख्रिश्चन धर्म आणि जपानी समुराई संस्कृती यांतील विरोधाचे विलक्षण दर्शन घडवतो. त्याच्या कादंबऱ्यांची जगातील अनेक भाषांत भाषांतरे झालेली आहेत. नॉर्मन मेलर आणि हेन्री मेलर यांच्या प्रभावाखाली केंझाबुरो ओए हा पन्नाशीतला कादंबरीकार असून 'हिरोशिमा नोटस्' व 'ए परसनल मॅटर' यात त्याने जपानच्या आधुनिक इतिहासाचे भेदक चित्र रंगवले आहे.

शोहेइ ऊकाने दुसऱ्या महायुद्धाच्या काळातील जपान लष्कराच्या अनन्वित अत्याचारांचा समाचार घेणारी 'दि लॅंग स्लोप' ही कादंबरी लिहिली आहे. यातील अनेक तपशील अतिपूर्वेकडील लष्करी न्यायालयाच्या दप्तरातून घेण्यात आलेले आहेत. सत्य आणि काल्पनिक यांचे मिश्रण करणाऱ्या कादंबऱ्यांची संख्या वाढत आहे. आर्थर हेलीच्या धर्तीवर जपानी मोटार उत्पादनाची पार्श्वभूमी लाभलेली साबुरो शिरोयामाची 'ए हीरो नेव्हर टॉक्स' ही कादंबरीही विक्रीचे उच्चांक मोडणारी ठरली.

### स्त्री लेखिकांना भाव

जपानमधील स्त्री-लेखिकांची परंपरा आजही जोमदार आहे. चियो उनो ही ९० वर्षांची लेखिका अजूनही कादंबऱ्या, आणि आत्मचरित्रात्मक लेखनात दंग आहे. 'दि साउंड ऑफ रेन', 'दि टेल ऑफ ए सर्टन वूमन' ही तिची पुस्तके गाजलेली आहेत. टाएको कोनो ही सत्तर वर्षांची लेखिका. 'रिव्हॉलविंग डोअर' ही तिची कादंबरी कामविकृत अशा नायकाच्या जीवनावर आधारलेली आहे. टाएको टोमीओका पन्नाशीत असून ती काव्याकडून कादंबरीकडे वळली. तिने समाजातील विघटन-वैफल्याच्या प्रक्रियांना कथारूप दिले आहे. युको त्सुशिता ही चाळीस वर्षांची लेखिका जपानी आज्ञाधारक व परंपराप्रिय खानदानी घराण्यात उत्पन्न होणाऱ्या नव्या ताणतणावांचे व बदलत्या मूल्यांचे भयावह दुष्परिणाम दाखवण्यात अग्रेसर आहे.

### चित्रकथांचा प्रचंड प्रसार

'मंगा' ही चित्रकथापुस्तके जपानमध्ये मुलांनाच नव्हे, तर प्रौढांनाही प्रिय आहेत. पेपरबॅक आकारातील या चित्रकथांतील नायक-नायिका युद्धभूमीवर आणि साहसपूर्ण मोहिमांवर अचाट पराक्रम करीत असतात. जेम्स बाँडच्या धर्तीवर त्यांचे वैभवशाली, पण सतत धोक्यांनी भरलेले जीवन चित्रकथा रूपाने वाचकांच्या हृदयात धडकन पैदा करीत असते.

१९७० सालापासून मंगा लोकप्रिय आहे. ५ कोटी डॉलर्सच्या घरात त्याची विक्री होते. मंगाच्या नावाचे एक देऊळही टोकियो शहराबाहेर उभारलेले असून त्याच्या गाभाऱ्यात मूर्तीवर 'दि आदर्श धर्मगुरू व्यंगचित्रे आणि सत्याचा शोध' असा निर्देश आहे. जपानमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या २००० मासिक-नियतकालिकांतही चित्रकथा मोठ्या प्रमाणावर पाहायला मिळतात.

### नोबेल पारितोषिकाचे वेध

जपानमधील प्रकाशनसंस्थाही लोकप्रियतेच्या लाटेवर आरूढ होण्यासाठी नव-नवीन युक्त्यांचा आणि विषयांचा शोध घेण्यात कसूर करीत नाहीत. ग्रंथवाचन हा जपानी माणसाचा एक स्वभावधर्मच आहे आणि बहुसंख्य जपानी माणसे ही नोकरदार आहेत हे लक्षात घेऊन त्यांच्या पसंतीला उतरतील अशी पुस्तके लिहून

घेण्यावर त्यांचा भर असतो. ' राजकारण घोळ घालते आहे म्हणून या जगात गंमत आहे ' अशा लांबलचक शीर्षकाचे एक पुस्तक सहा महिन्यांत लाखावर खपले. जपानी लेखकांची पुस्तके युरोप-अमेरिकेत आता झपाट्याने भाषांतरित होत आहेत. पूर्वी इतर भाषांतून जपानीत जास्त पुस्तके भाषांतरित होत असत. वाङ्मयीन नोबेल पारितोषिक अजूनपर्यंत जपानला एकदाच मिळाले आहे; परंतु आजही त्या पारितोषिकावर हक्क सांगू शकणारे अनेक सामर्थ्यवान लेखक जपानमध्ये आहेत. त्यांच्या वाङ्मयाचे पाश्चात्त्य भाषांत भाषांतर झाले तर त्यांची जगाला किंमत कळेल असे जपानीचे काही समर्थक म्हणतात. जपान औद्योगिक, इलेक्ट्रॉनिक क्षेत्रात जगभर मुसंडी मारत आहेच. जपानचे वाङ्मयही या मुसंडीला हातभार लावील अशी लक्षणे दिसत आहेत.

निबंध

# १२

## नोबेल पारितोषिकाचे पहिले मानकरी : नगीब महफौज

इजिप्शियन कादंबरीकार नगीब महफौज यांना १९८८ चे वाङ्मयाचे नोबेल पारितोषिक जाहीर झाले तेव्हा आश्चर्याचा धक्काच बसला. इजिप्शियन लेखकाला पहिल्यांदाच हा सन्मान मिळाला. इंग्लिशमध्ये महफौजच्या कादंबऱ्यांचे विशेष अनुवाद झालेले नाहीत, आणि त्याचे नावही माहीत नाही. आशिया – आफ्रिकेतील भाषांमध्ये लिहिणाऱ्या लेखकांना आपापल्या भाषांमध्ये कितीही मोठे स्थान असले तरी त्यांच्या साहित्याचे इंग्रजीत वा युरोपियन भाषांमध्ये अनुवाद झाल्याशिवाय त्यांच्या अस्तित्वाची इतर भाषिकांना कल्पनाही नसते. त्यामुळे त्यांच्या लेखनाबद्दल, त्यांच्या लेखनवैशिष्ट्यांबद्दल आपण अजाणच असतो. त्या लेखकांच्या भावविश्वाशी अपरिचितच राहतो. इंग्लिश-अमेरिकन पुस्तके जगभर स्वस्तात व सुलभरीत्या उपलब्ध असल्याने त्यांची जेवढी आपल्याला माहिती, असते तेवढी अन्य भाषांतील पुस्तकांबद्दल नसते. साहजिकच नगीब महफौजसारखे नाव नोबेल-पारितोषिकाच्या निमित्ताने पुढे येते तेव्हा त्याची नवलाई जाणवतेच.

७७ वर्षे वयाचे नगीब महफौज हे आज पूर्ण बहिरे, नजरेने अधू बनलेले आहेत. कैरोमधील आपल्या घरातच ते दीर्घकाळ व्यतीत करत असतात. परंतु तरीही लेखन मात्र चालूच आहे. कारण लेखनाची ओढ संपली तर जीवनात जगण्यासारखे काही उरणार नाही अशी त्यांची धारणा आहे. ज्या दिवशी लेखनाचा कंटाळा येईल तो दिवस आपल्या आयुष्यातील अखेरचा असेल असे

ते म्हणतात.

## अरबी कादंबरीचे जनक

नगीब महफौज यांनी इजिप्तमध्ये कादंबरी या वाङ्मयप्रकाराला आधुनिक परिवेश दिला, आधुनिक भाषा दिली आणि इजिप्तमधील वर्तमानकालीन वास्तव जीवनाला प्रथमच कथा-कादंबरीचा विषय बनवण्याचे धारिष्ट्य दाखवले. या तीनही बाबतींत त्यांची कामगिरी मोठी आहे. इजिप्तमध्ये अरबी भाषा प्रचलित आहे.- लिहिण्यासाठी जी अरबी भाषा वापरतात तेव्हा ती आपल्याकडच्या संस्कृत-सारखी काटेकोर ग्रांथिक प्रमाण भाषा असते. या प्रमाण भाषेचा वापर कोणीही आज दैनंदिन जीवनात करीत नाही. तेथील बोलीभाषा सोपी, सुटसुटीत आहे. परंतु तिचा लेखनासाठी वापर करण्याची पद्धत अरब देशांमध्ये आजही शिष्ट-संमत नाही. मोरोक्को ते कुवेतपर्यंत सर्वत्र ग्रांथिक क्लासिकल भाषाच वापरण्यात येते. मात्र तिच्यात कोणी बोलत नाही. साहजिकच पन्नास वर्षांपूर्वी नगीबनी दैवाचा खेळ ( ए गेम ऑफ फेट्स ) ही कादंबरी बोलीभाषेत लिहिली तेव्हा खळबळ उडाली. बुजुर्ग व प्रतिष्ठित लेखकांनी तिच्यावर टीका केली, हे भाषा भ्रष्ट करायला निघाले म्हणून महफौजवर झोड उठवली.

महफौजच्या या पहिल्या कादंबरीत फारच विस्कळीतपणा होता. तंत्रावर पुरेशी पकड नव्हती. परंतु तरीही तत्कालीन इजिप्तमधल्या कथा-कादंबऱ्यांपेक्षा ती वेगळी ठरली. त्या वेळी कादंबरी म्हणजे अरेबियन नाइट्ससारखे पुस्तक असा तेथे समज प्रचलित होता. एका गोष्टीतून दुसरी, दुसरीतून तिसरी अशी एकमेकां-पासून स्वतंत्र पण कच्च्या सूत्रात गुंफलेल्या कथांची मालिका म्हणजे कादंबरी असा आजही इजिप्तमधल्या लेखकांचा समज आहे. साहजिकच पन्नास वर्षां-पूर्वी ( १९३९ मध्ये ) फाटा देऊन चार्ल्स डिकन्स, डोस्टाव्हेस्की, बाल्झॅक, टॉलस्टॉय यांसारख्या लेखकांच्या कादंबऱ्यांच्या धर्तीवर आपली कादंबरी बेतणाऱ्या महफौजसारख्या तरुण लेखकाकडे लोकांचे लक्ष जाणारच. महाविद्यालयीन शिक्षण घेताना व विद्यापीठात असताना युरोपियन कादंबऱ्यांचे अफाट वाचन महफौज यांनी केले. रहस्यकथा, थ्रिल्स, भयकथा यांचाही फडशा पाडला. चार्ल्स डिकन्स, एमिल झोला, सॉमरसेट मॉम वगैरेंची पारायणे केली. डिकन्सने आपल्या कादं-बऱ्यांतून तत्कालीन लंडनचे साग्रसंगीत दर्शन घडवले, तर एमिल झोलाने पॅरीसच्या

संभावित व कनिष्ठ वर्गाचे. हाच आदर्श डोळ्यांपुढे ठेवून महफौज यांनी कैरो शहरावर आपले लक्ष केंद्रित केले आणि आपल्या बहुतेक कादंबऱ्यांतून कैरोची नानाविध रूपे रेखाटली. महफौज तेथील कॅफेमध्ये तासन् तास बसून राहात. कैरोच्या रस्त्यांमधून तासन् तास फेरफटका मारीत. तेथील जनजीवन न्याहाळीत. कथाबीजे शोधत.

सन १९४५ ते १९५७ या बारा वर्षांच्या काळात त्यांनी तीन खंडांतील कादंबऱ्यांचे एक त्रिकूट पूर्ण केले. अरबीतील ही सर्वश्रेष्ठ कादंबरी म्हणून आजही सर्वजणांच्या आदराला पात्र आहे. बिट्विन दी पॅलेसेस्, पॅलेस ऑफ ॲस्पिरेशन्स, दि शुगर पॉट ही या तीन भागांची नावे. अरब राष्ट्रांची धार्मिक - ऐतिहासिक पार्श्वभूमी तर या कादंबरीमालिकेला लाभली आहेच. तेथील वेश्याव्यवसाय, तेथील मादक द्रव्यांचा प्रभाव, झोपडपट्ट्यांतील जीवन, नव्या बाजारी संस्कृतीमुळे घडून येणारे सार्वत्रिक नैतिक अवमूल्यन हे देखील या कादंबरीद्वारे पेश केले जाते. ही कादंबरीमालिकाही पूर्णतया बोलीभाषेत, कैरोमधील शहरी भाषेत लिहिली गेली आहे आणि त्यामुळे सर्वसामान्य सुशिक्षित वाचकालाही तिने आकृष्ट केले. आपल्या कुटुंबाच्याच तीन-चार पिढ्यांचा इतिहास त्यांनी या कादंबऱ्यांत उभा केला.

नगीब महफौज यांच्यावर त्या काळात बर्नार्ड शॉच्या स्वप्नाळू समाजवादी कल्पनांचा प्रभाव होता. समाजपरिवर्तनाची सारी जबाबदारी नियतीने आपल्यावर टाकली आहे आणि आपल्या लेखनाद्वारे रूसो-व्हॉल्टेअरप्रमाणे आपण समाजक्रांतीची मशाल प्रज्वलित करण्याचे महान कार्य बजावणारच असा त्यांचा तरुणसुलभ आत्मविश्वास होता. आपल्या या क्रांतिकारक विचारसरणीमुळे सरकारची नोकरी करताना त्यांची मानसिक घुसमट होऊ लागली. इजिप्तमधील अंतर्विरोध, विसंवाद, वेगवेगळ्या समाजघटकांतील ताणतणाव यांचे चित्रण करताना राजकीय आणि धार्मिक सनातनी मतवाद्यांशी त्यांचा संघर्ष होऊ लागला. त्यामुळे सरकारी नोकरीत त्यांना त्रास झाला. परंतु तेथील नभोवाणीवर त्यांना नेमण्यात आल्यावर मात्र आवडीचे काम करायला मिळाले आणि त्यामुळे त्यांनी निवृत्त होईपर्यंत नभोवाणीवर काम केले.

इजिप्शियन क्रांतीनंतर नासर सत्तारूढ झाल्यावर तेथे अनेक निरपराध व्यक्तींचे निर्घृण शिरकाण झाले. त्यावर आधारलेली त्यांची दि चिल्ड्रेन अँड ऑफ

गबल्लवी ही कादंबरी प्रतीकात्मक आणि दृष्टान्तवजा आहे. ही कादंबरी १९५९ मध्ये लिहून झाली. ती चिरकालीन अध्यात्मिक मूल्यांचा शोध घेते. तिची काही प्रकरणे तेथील वृत्तपत्रांत प्रसिद्ध झाली. परंतु एल अजहर या इस्लामी धर्मगुरूंच्या पीठाने ही कादंबरी पाखंडी आणि इस्लामविरोधी आहे असे कारण सांगून तिच्या प्रकाशनावर बंदी घातली. आश्चर्य असे की महफौज यांना नोबेल पारितोषिक मिळाल्याचे जाहीर झाल्यावर या कादंबरीची प्रकरणे क्रमशः प्रसिद्ध करण्याचे कैरोतील एका वृत्तपत्राने जाहीर केले तेव्हा एल अजहरने त्या वृत्तपत्रावर मनाई हुकूम बजावला. या निर्णयाविरुद्ध अपील करा असे महफौज यांना सुचवण्यात आले. परंतु त्याला त्यांनी नकार दिला. ' हा काहीतरी समजुतीचा घोटाळा दिसतो. हे पुस्तक कादंबरी म्हणून वाचायला हवे. इतिहास म्हणून ते वाचता कामा नये.' असे महफौज यांनी म्हटले, ' परंतु एल अजहरनी त्याबद्दल लढा देण्याचे कारण दिसत नाही ' असे स्पष्ट केले.

## मुल्लामौलवींचा विरोध

कचरापेटीच्या ढिगाऱ्यात आपल्या मोक्षाचे काही साधन व ताईत सापडते का याचा शोध घेणारा या कादंबरीतील नायक हा इस्लामी धर्मगुरूंना आज तीस वर्षांनंतरही आक्षेपार्ह वाटतो. ही बाब त्यांच्या मानसशास्त्राची घडण कशी चिरेबंदी आहे हे स्पष्ट करते. ' सॅटनिक व्हर्सेस 'बद्दल सलमान रश्दींची हत्या करण्याचे फर्मान काढणारा इराणचा खोमेनी हा एकटाच नाही. इजिप्तमध्येही त्याचे भाऊबंद आहेत. फक्त ते हत्येचा हुकूम देत नाहीत एवढेच !

कैरोतील मुल्लामौलवींच्या या विरोधी भूमिकेने महफौज विचलित झाले नाहीत. ते त्यांच्या कचाट्यात न सापडेल असे लेखन करीत राहिले. त्यांच्या पुस्तकात वादग्रस्त भाग मात्र येतच राहिले. १९७९ मध्ये इस्राईल आणि इजिप्त यांच्यात शांतताकरार झाला. त्याबरोबर महफौजच्या पुस्तकांवर अनेक अरब देशांनी बंदी घातली.

इजिप्शियन लोक हे आपल्याला अरब मानीत नाहीत. आपणाला ते नाइल नदीचे पुत्र मानतात. ' निलोटिक ' मानतात. आधुनिक वेषभूषा आणि जीवनपद्धती त्यांनी स्वीकारली असली आणि ग्रीक, कोप्टिक इस्लामिक, युरोपियन संस्कारांची छाप त्यांच्यावर पडली असली तरी ते आपल्या परंपरेचा अभिमान बाळगतात आणि आजही इजिप्तमधील प्राचीन काळातील राजांची-फॅरोहांची पूजा

केली जाते. स्वत: फॅरोह आणि इस्लामिक संस्कृतीचा संगम म्हणजे आपले जीवन असे महफौज आजही म्हणतात. ७ हजार वर्षे प्राचीन फॅरोहांची संस्कृती आणि सातशे वर्षांची जुनी इस्लामी संस्कृती– यांच्या यशस्वी विवाहातून झालेला पुत्र म्हणून स्वत:चा उल्लेख करतात.

महफौज यांच्या सात पुस्तकांची इंग्रजी भाषांतरे कैरोच्या अमेरिकन युनिव्हर्सिटी प्रेसने प्रसिद्ध केली आहेत. नोबेल पारितोषिकामुळे या पुस्तकांची मागणी वाढली आहे आणि त्यांच्या भाषांतराचे करारही अनेक देशांशी होत आहेत. गेल्या तीन महिन्यांत भाषांतराचे ३९ करार झाले अशी बातमी आहे. इतरही अरबी लेखकांच्या पुस्तकांबद्दल परदेशी वाचकांना आता आकर्षण व कुतूहल वाटत असून त्यांनाही मागणी येत आहे. अरबी कादंबऱ्यांच्या भाषांतराच्या कार्यक्रमाला चालना देण्यासाठी अनेक संस्था भरघोस आर्थिक मदत द्यायला सिद्ध झाल्या आहेत. स्वत: महफौज यांनी आपल्याला मिळालेल्या पारितोषिकाच्या ३ लाख ९० हजार डॉलर्स या रकमेची आप्तस्वकीय, मित्र व धर्मादाय संस्था यांच्यामध्ये खैरात करून टाकली आहे. परंतु त्यांच्या पुस्तकांची मागणी खूपच झपाट्याने वाढल्यामुळे त्यांना मिळणाऱ्या मानधनाच्या रकमेतही घवघवीत वाढ झाली आहे.

१९७५ मध्ये त्यांचे रिस्पेक्टेड सर हे पुस्तक प्रथम प्रसिद्ध झाले. त्याचे इंग्रजी भाषांतर नुकतेच बाजारात आले आहे. इजिप्शियन पदवीधर तरुण ओथमन बयुमी हा सनदी नोकरीत बढत्या मिळवत मिळवत उच्चपदावर पोचतो. तो आपल्याला पगारातून बरीच रक्कम बाजूला काढत असतो. कशासाठी? तर स्वत:चे थडगे बांधण्यासाठी. फॅरोह राजे जसे आपली थडगी भव्य बांधत, तसे भव्य थडगे आपलेही हवे असे त्याच्या मनात असते. त्याच्या नोकरीच्या पहिल्या दिवशी डायरेक्टर जनरलच्या ऑफिसात तो प्रवेश करतो तेव्हा आपल्या बॉसपुढे तो सपशेल लोटांगण घालतो. प्राचीन काळी फॅरोहा हे स्वर्गातील देवांचे प्रतिनिधी म्हणून पृथ्वीवर वावरत, नाईल खोऱ्यावर राज्य करण्यासाठी देवाने त्यांना अधिकार देऊन धाडलेले असे. बयुमीच्या दृष्टीने ते फॅरोहा हे नोकरशहाच होते आणि राज्यकारभार करण्यासाठी त्यांनी नोकरशाहीची यंत्रणा चांगल्या प्रकारे उभी केली होती. ती नोकरशाही पवित्र होती. आता स्वत: या सरकारी नोकरीत उच्चपदावर काम करण्याची संधी आपल्याला मिळत आहे तिच्या मागे दैवी

योजनाच असणार. तेव्हा देवाच्या लाडक्या अशा आपल्या थडग्याचीही भव्यता फॅरोहांप्रमाणेच सर्वांना स्तीमित करणारी हवी अशी त्याची भावना असते.

### ताजी कादंबरी

कुश्तुमुर कॅफे ही त्यांची अगदी कोरी करकरीत कादंबरी. अल अहराम या वृत्तपत्रात ती क्रमशः प्रसिद्ध होत आहे. एका कॅफेमध्ये दर आठवड्याला ठरावीक वेळी चार वयोवृद्ध मित्र भेटतात आणि राजकारणावर तसेच अध्यात्मावर गप्पा मारतात. जुन्या स्मृतींना उजाळा देतात. आपली जीवनविषयक मतमतांतरे प्रकट करतात असा तिचा घाट आहे.

नगीब महफौज यांना प्रकृति-अस्वास्थ्यामुळे नोबेल पारितोषिकाचा स्वतः हजर राहून स्वीकार करणे शक्य झाले नाही. त्यांनी आपल्या दोन मुली आणि इजिप्तचे सांस्कृतिक खात्याचे उपमंत्री मोहमद सलमानी यांना पाठवले.

नोबेल पारितोषिकाच्या स्वीकारसमयी त्यांनी तयार करून पाठवलेल्या लेखी भाषणात म्हटले होते :

" पिरॅमिडस एक दिवस भुईसपाट होतील, परंतु सत्य आणि न्याय हे मात्र कायम राहतील. जोपर्यंत आपली संस्कृती शोधक बुद्धीने आणि जागृत सदसद्‌विवेकबुद्धीने वाटचाल करीत राहील तोपर्यंत सत्य आणि न्याय यांचीच उपासना करीत राहील. तिसऱ्या जगातील गरीब देशांच्या हालअपेष्टांकडे केवळ बघ्या-याप्रमाणे बघत राहू नका. तिसऱ्या जगाच्या अस्मितेचा आदर ठेवील असा उदात्त आणि श्रेयस्कर दृष्टिकोण पाश्चात्त्य प्रगत राष्ट्रांनी दाखवायला हवा. "

नोबेल पारितोषिकाची रक्कम तर महफौज यांनी वाटून टाकली. या पारितोषिकाने त्यांच्या जीवनक्रमात काही फरक पडला का ? आजही नेहमीप्रमाणे सकाळी लौकर उठून कैरोतील तहरीर कॅफेमध्ये ते कॉफी प्यायला जातात. तेथेच वृत्तपत्रांवरून नजर फिरवतात. घरी येऊन जेवण घेतात. अल अहराम या वृत्तपत्राच्या कचेरीत दुपारी जातात. लेखन करतात. तेथून पुन्हा एखाद्या कॉफी शॉपमध्ये जुन्यानव्या मित्रांबरोबर अड्डा जमवून काव्यशास्त्रविनोदाची मैफल रंगवतात. पन्नास वर्षांचा हा परिपाठ आजही तसाच जारी आहे. त्यात पारितोषिकाने खंड पडलेला नाही.

('साप्ताहिक सकाळ' : ६ मे १९८९)

# १३

# कॉमिक्स लोकप्रियतेच्या लाटेवर

सुपरमॅन, बॅटमन, स्पायडरमॅन, हीमॅन, वंडरवुमन, व्हिएतनाम सैनिक एड मार्क्स, मशीनगनशी लीलया खेळणारी इलेक्ट्रा या सर्वांच्या अचाट पराक्रमांवर बालवाचक खूष असतात. दूरदर्शनवर यापैकी कोणतीही मालिका असली तरी मुले दूर जायला तयार नसतात आणि त्यांचे पालकही कुठलेही रूप धारण करणाऱ्या शत्रूला हैराण करण्यासाठी अफलातून कल्पना वापरणाऱ्या, आडदांड शक्तीच्या आणि दैवी अतींद्रिय सिद्धी लाभलेल्या अशा महामानवांचे मुलखावेगळे खेळ पाहताना गुंगून जातात ते अशासाठी की आपल्यालाही अशा काही गोष्टींचा लाभ झाला असता तर आपले दैनंदिन जीवनच कसे अद्‌भुतरम्य झाले असते !

## वर्षाला ३६० कोटींची विक्री

दूरदर्शनच्या प्रभावामुळे १९५० च्या दरम्यान अमेरिकेतील सुपरमॅन, स्पायडरमॅन, वंडरवुमन वगैरे कॉमिक्सच्या नायक-नायिकांचा भाव कमी होत गेला आणि कॉमिक्सचा खप फारच मंदावला. चित्रकथांची मागणी घटल्यामुळे बऱ्याच प्रकाशकांनी कॉमिक्सवरचे आपले लक्ष कमी केले. परंतु १९८३ नंतर मात्र अमेरिकेत चित्रकथांना पुन्हा मागणी येऊ लागली आणि त्यांचा खप जोरात वाढू लागला. १९८५ मध्ये सुमारे १९० वेगवेगळ्या कॉमिक्सचे प्रकाशन होई तर १९८६ मध्ये ही संख्या अडीचशेवर गेली आणि त्यांचा एकूण खप

१५ कोटांच्या घरात गेला. त्या वर्षी कॉमिक्सची विक्री ३० कोटी डॉलर्सच्या म्हणजे ३६० कोटी रुपयांच्या रुपयांच्या आसपास झाली असे सांगण्यात येते.

### तीन प्रमुख निर्माते

अमेरिकेतील तीन प्रमुख कॉमिक्सचे निर्माते या ३० कोटी डॉलरमधील दोन तृतीयांश खपावर हक्क सांगतात. मार्व्हल प्रकाशनचे स्पायडरमॅन हे मुख्य आकर्षण असून १९८५ मध्ये १० कोटी डॉलरची विक्री त्याला मिळाली. डी. सी. कॉमिक्स बॅटमन हा नायकही लोकप्रिय असून त्याने सात कोटीचा धंदा केला. तर आर्चि कॉमिक्स पब्लिकेशनने कॉमिक्सबरोबर अभिनव भेटकार्डे काढून २ कोटी डॉलर्सची कमाई केली. त्यानंतरही ऑर्चिची तुफान दौड चालू आहे. यातील तीन मुख्य प्रकाशन संस्थांच्या बरोबरीने इतरही शंभरावर प्रकाशक वेगवेगळ्या नायक-नायिकांच्या जीवनावरील चित्रकथा काढत असतातच. अशा अडीचशेवर चित्रकथामाला अमेरिकेत निघत आहेत आणि त्यात नित्यशः भर पडत आहे.

### दूरदर्शनशी समर्थ टक्कर

हे आकडे स्तिमित करणारे आहेत हे खरेच आहे. परंतु त्यामागे या सर्व कॉमिक्सच्या उत्पादकाचे जबरदस्त प्रयत्नही आहेत हे विसरून चालणार नाही. दूरदर्शन, व्हिडिओ, कॉम्प्युटर, इलेक्ट्रॉनिक्स गेम्स यांच्या जमान्यात मुलांनी कॉमिक्स वाचावी अशी आपली अपेक्षा असेल तर त्या कॉमिक्समध्ये असा काही रोमहर्षक मालमसाला हवा की जो मुलांना दूरदर्शनपासून दूर नेऊन कॉमिक वाचण्यास उत्सुक करील. त्या दृष्टीने चित्रकथांतील चित्रे, त्यातील कथाकल्पना, त्यातील रंगसंगती, त्याची छपाई आणि त्याचे वितरण या सर्वच दृष्टींनी या प्रकाशकांनी वेगळेपण आणलेले आहे. सुपर मार्केटस्, फास्ट फूड काऊंटर्स, रेस्टारंटस वगैरे ठिकाणी कॉमिक्स उपलब्ध केल्याने त्यांच्या खपात झपाट्याने वाढ होत गेली आहे. सुपर मार्केटमुळे ही कॉमिक्स कॅश काऊंटरच्या शेजारी ठेवण्यात येतात. इतर सर्व खरेदी करून बिल करायला आले की तिथे ही कॉमिक्स ठेवलेली असतात.। त्यामुळे त्यापैकी काही कॉमिक्स तरी घेण्यास पालकांना मुले भाग पाडतात, अस अनुभव आहे.

### साहसी नायकांचे पराक्रम

' कॉमिक्स 'चे सुपरमॅन, स्पायडरमॅन, वंडरवुमन वगैरे नायक हे गेली अनेक वर्षे वाचकांची करमणूक करीत आले आहेत. सुपरमॅन तर १९३९ पासून आपल्या पराक्रमांनी बालवाचकांचा दोस्त बनला आहे. डेली प्लॅनेट या दैनिकाचा हा वार्ताहर : शालीन, सज्जन, आदबशीर. आपल्या वृत्तपत्रासाठी तो सतत बातम्यांच्या मागावर असतो. तो हवेतून उडू शकतो. कुठेही प्रवास करू शकतो. त्यामुळे बातम्या मिळविण्यात सदैव आघाडीवरच राहतो. आता कालमानाप्रमाणे या सुपरमॅनला अधिक आकर्षक बनवण्यात आले आहे. डेली प्लॅटूनचा सर्वांत जास्त तालेवार वार्ताहर म्हणून तर त्याला भाव आहेच. परंतु आता तो कादंबऱ्या लिहितो, मेजवान्यांना जातो, आपल्या मैत्रिणींशी गप्पागोष्टी करतो. त्याचे पोलादी शरीर हे आता अधिक रेखीव व घाटदार करण्यात आले आहे. बघताक्षणी त्याची अफाट ताकद जाणवावी असे त्याचे चित्र घडवण्यात आले आहे. या नव्या रूपातला सुपरमॅन हा वाचकांना अधिक आवडला आणि त्याचा खपही चढत गेला.

### प्रौढही कॉमिक्सचे वाचक

दूरदर्शनवर बॅटमन, सुपरमॅन, स्पायडरमॅन, वंडरवुमन, रॉबिन वगैरे कॉमिक्स दाखविण्यात आल्याने मध्यंतरी त्यांचा खप कमी झालेला होता. परंतु पुढे मात्र दूरदर्शनच्या प्रसिद्धीमुळे या व्यक्तिरेखा वाचकग्राहकांच्या मनावर ठसल्याने त्यांच्या कथापुस्तकांची मागणी जोर धरू लागली. दूरदर्शनवर सुपरमॅनची मालिका लागली तर सुपरमॅन कॉमिक्सचा खप कमी होण्याऐवजी उलट जास्त होऊ लागला असा अनुभव येऊ लागला. त्यामुळे धाडसी प्रकाशकांनी अधिक आकर्षक कॉमिक्स बनविण्यासाठी जणू आघाडीच उघडली. जुन्या व्यक्तिरेखांना नवे रंगरूप दिले. नवा आशय दिला, तसेच उत्तमोत्तम चित्रकार आणि कल्पक लेखक यांना एकत्र आणून एकाहून एक सरस कथाकल्पनांचा पाठपुरावा करण्याचा चंग बांधला. कॉमिक्स ही फक्त शाळकरी मुलांसाठी असतात हा समज बदलून ती १६ ते २५ वर्षांच्या तरुणांनाही वाचनीय वाटतील असा त्यात आशय असावा यावर कटाक्षाने भर देण्यात आला. स्टार वॉर्स यासारख्या मालिका आवडणाऱ्या वाचकवर्गासाठी आपली कॉमिक्स आहेत हे लक्षात घेऊन त्या दृष्टीने कॉमिक्सच्या नायकांच्या

वागण्या-बोलण्यात बदल करण्यात आले. आजकालच्या तरुणांना कोणत्याही महान व्यक्तीबद्दल काहीशी साशंकता वाटते. बॅटमनला त्यामुळेच अधूनमधून खूप मद्य प्राशन करायला लावून, त्याची गुन्हेगारांशी खुमखुमी व ताकद पडते असे अधूनमधून दाखवले जाते. शेवटी तो जिंकतो खरा पण त्यासाठी त्याला खूप जोराची लढत द्यावी लागते असे दाखवल्याने आजच्या तरुण वाचकाला तो जास्त जवळचा वाटतो आहे असे एका पाहणीत आढळून आले. सुपरमॅन जर सारखा शत्रूला जिंकतच राहिला तर त्यात काय मजा उरणार? तोही कोंडीत सापडून आता मरणार असे वाटले पाहिजे, तर त्याच्या सुटकेने आनंद वाटणार हे साधे मानसशास्त्र आहे. बऱ्याच जुन्या चिरपरिचित कॉमिक्स नायकांना त्यामुळे सध्या नवीन अवतारात पेश केले जात आहे. डी. सी. प्रकाशनाने तर अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष रेगन यांच्या पत्नीला, नॅन्सी रेगनलाच एका चित्रकथामालिकेची नायिका म्हणून पेश केले आहे.

### लोगोचा वापर फायदेशीर

सुपरमॅन, स्पायडरमॅन वगैरेंच्या लोगोचा वापर शैक्षणिक साहित्य, मुलांचे तयार कपडे, कार्डे, वस्तूंची बाह्य वेष्टने यांवर करून त्यापासून उत्पन्न मिळवण्याचीही आता जोरदार लाट आली आहे. रिलायन्स विश्वचषकाच्या वेळी त्याचा लोगो वापरण्याच्या परवानगीसाठी लाखो रुपये एकेका उत्पादकांपासून घेतले गेले. तशातलाच हा प्रकार. त्यायोगे प्रकाशकांना चांगला फायदा मिळत आहे.

एशियाडच्या वेळी अप्पू हा हत्ती लोकप्रिय झाला. आजही त्याचे आकर्षण ओसरलेले नाही. त्याचा जाहिरातीसाठी वापर अजूनही होऊ शकतो.

### भारतीय प्रकाशकांचाही डोळा

भारतातील अनेक प्रकाशक अमेरिकेतील कॉमिक्सच्या भारतीय आवृत्ती काढत आहेत. वॉल्ट डिस्नेच्या चित्रकथांच्या मुद्रणाचे हक्क 'इंडिया टुडे'ने मिळवले असून डिस्ने ही चित्रकथामाला सुरू केली आहे. अमर चित्रकथांद्वारे भारतीय संत महात्मे आणि इतिहास पुराणातील व्यक्ती व घटना यांना मोठा उठाव मिळाला आहे. टाईम्सतर्फे इंद्रजाल कॉमिक्स प्रसिद्ध होते. पूर्वी त्यात फँटमची मक्तेदारी होती. दैनिक लोकमतनेही एक चित्रकथांचे साप्ताहिक सुरू केले आहे. अनेक मासिके, साप्ताहिके कॉमिक्स आवर्जून प्रसिद्ध करतात.

**अमिताभवर चित्रकथा**

अधूनमधून काही भारतीय समकालीन व्यक्तीही कॉमिक्सच्या रूपाने अवतार घेऊ लागल्या आहेत. मध्यंतरी सुपरस्टार अमिताभच्या तथाकथित पराक्रमचित्र-कथांच्या कॉमिक्सची चलती होती. चार्ल्स शोभराजला पकडणारे पोलिस अधिकारी इन्स्पेक्टर मधुकर झेंडे यांनी छडा लावलेल्या काही प्रकरणांवर आधारित कपिल कॉमिक्सही बाजारात येऊन गेली. 'चार्ल्स शोभराज इन्स्पेक्टर झेंडेच्या ताब्यात' या मालिकेच्या सप्तरंगी कथांचा वेग पुढे मंदावलेला दिसतो. परंतु भारतीय भाषांतील मुलांना कॉमिक्स अजून 'पोटभर' मिळत नाहीत. अमर चित्रकथेच्या अनंत पै यांना नाइलाजाने मराठी चित्रकथांचे प्रकाशन खप नसल्याने थांबवावे लागले. इंग्रजी कॉमिक्सचे वेड कॉन्व्हेंटमध्ये शिकणाऱ्या मुला-मुलींना असते तसे ते मराठीसारख्या भाषांत अजून जोपासले गेलेले नाही. परंतु जगभरची एकूण लाट पाहता भारतात इंग्रजी कॉमिक्सबरोबर प्रादेशिक भाषांतील कॉमिक्सचीही लोकप्रियता व खप यात वाढ होत राहणार आहे हे सूर्यप्रकाशाइतके सत्य आहे. आपले लेखक, प्रकाशक, चित्रकार, मुद्रक, वितरक या सर्वांनाच हे एक जबरदस्त आव्हान आहे.

(साप्ताहिक सकाळ, २ एप्रिल १९८८)

# १४

## विश्वकोशाचा इलेक्ट्रॉनिक अवतार

साहित्य संस्कृती मंडळातर्फे प्रसिद्ध होणारा विश्वकोश तुम्ही वाचला आहे का ? असा प्रश्न विचारला तर बहुधा नकारार्थी उत्तर येणार, खरे ना ? कारण अर्थातच स्पष्ट आहे. विश्वकोश हे काही कथा-कादंबरीसारखे सलग वाचून संपवावे असे पुस्तक नाही. विश्वकोश हा मुख्यतः संदर्भासाठी वापरला जातो. आपल्याला महात्मा गांधींबद्दल माहिती हवी असेल तर माहिती ज्या खंडात असेल त्या खंडातील नेमका तेवढाच मजकूर वाचून आपण तो खंड बाजूला ठेवू. पहिल्या पानापासून शेवटच्या पानापर्यंत काही वाचत बसणार नाही.

परंतु हे विश्वकोशासारखे ग्रंथ फार किंमतीचे आणि अवजड असतात. दोन-चार हजार रुपये त्यासाठी खर्च करायचे जिवावर येते आणि आपल्या घरांची छोटी छोटी होत जाणारी ' एरिया ' बघता दहावीस खंडांचा हा प्रचंड कोश ठेवायलाही जागा कुठे शोधायची असा प्रश्नही पडणारच. गोदरेजच्या कपाटाचा वा शोकेसेसचा एकेक कप्पाही त्याला अपुरा पडणार. अशा परिस्थितीत विश्व-कोशासारखे ग्रंथ घरोघर जावेत, ही आपली अपेक्षा फलद्रूप होणे दिवसेंदिवस कठीणच होत जाणार हे उघडच आहे.

ॲकॅडेमिक अमेरिकन हा विश्वकोशही असाच प्रचंड आहे. २१ खंड, २८००० लेख वा टीपा आणि ९० लाख शब्द.

त्यापेक्षाही एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिका हा विश्वकोश सुमारे पाचपट मोठा आहे. ४ कोटी ३० लाख शब्द त्यात आहेत. ३० खंडांचा हा विश्वकोश

जगातील सर्व कोशांचा राजा मानला जातो. दरवर्षी त्याची नवी अद्ययावत आवृत्ती प्रसिद्ध होते. १९८७ च्या आवृत्तीची किंमत भारतात २३ हजार रुपये अशी सांगण्यात येत होती.

### वर्ल्डबुक २२ खंड / एक कोटी शब्द

वर्ल्डबुक हा विश्वकोश १ कोटी शब्दांचा असून २२ खंडांत विभागलेला आहे. दरवर्षी त्याचीही सुधारित अद्ययावत आवृत्ती प्रसिद्ध होत असते.

आपल्याकडील विश्वकोशाची तयारीच गेली पंचवीस वर्षे चालू आहे आणि अजूनही तीस-चाळीस टक्के काम बाकी आहे. दरवर्षी नवी सुधारित आवृत्ती काढण्याची कल्पना आज तरी केवळ स्वप्नासारखीच आहे.

आता प्रश्न असा पडतो की असे हे महागडे विश्वकोश घरोघर पोचू शकतील की नाही? ज्ञानाचे हे भांडार केवळ ग्रंथालयांच्या संदर्भ विभागातील कपाटातच कायमचे बंदिस्त होऊन राहणार का? मोठ्या श्रीमंत लोकांनाही विश्वकोश घरी बाळगणे अवघड ठरते, मग सामान्य मध्यमवर्गीयांना तर ते अशक्यच ठरणार. आजच्या ' माहिती-स्फोटा 'च्या या युगात आपण अद्ययावत ज्ञानापासून असे दूरदूरच राहून कसे चालणार? आपल्या मुला-बाळांना या ग्रंथांतील सर्वांगीण माहितीपासून वंचितच राहावे लागणार काय?

या प्रश्नाचे अगदी अनपेक्षित असे एक उत्तर अमेरिकेने शोधून काढले आहे. दहा वर्षांचा मुलगा विश्वकोशातील लेख वाचतो आहे असे दृश्य आपल्या डोळ्यांसमोर उभे करता येईल का? मला विश्वकोशातील ' नेहरू 'च्या वरील नोंद वाचायची आहे, अशी मागणी एखादा विद्यार्थी अमेरिकेतील एखाद्या शाळेच्या ग्रंथपालाकडे करीत आहे, असे दृश्य आपल्याला कसे वाटेल? विश्वकोश हवाय म्हणून शंभर-दोनशे मुले ग्रंथपालाभोवती गर्दी करीत आहेत आणि टेबलावरच्या कॉम्प्युटरच्या मॉनिटरवर विश्वकोशातील पानेच्या पाने अधाशाप्रमाणे वाचणारी, हातात पाच-दहा व्हिडिओ कॅसेटस पुस्तकाप्रमाणे घेऊन इकडे-तिकडे फिरणारी मुले असे चित्र तुमच्यापुढे कोणी ठेवले तर तुम्हांला आश्चर्य वाटल्याविना राहील का? हे दृश्य आश्चर्यकारक जरूर वाटेल, परंतु ते कल्पनेतले नाही. वास्तवातले आहे.

अमेरिकन मुला-मुलींमध्ये विश्वकोशातील नोंदी वाचण्याचे जणू वेडच संचारले आहे आणि शाळा-कॉलेजातली शेकडो हजारो मुले आपला सगळा अभ्यासच

अशा विश्वकोशांच्या मदतीने करण्यात धन्यता मानत आहेत ही वस्तुस्थिती आहे. अमेरिकेतील शाळा-कॉलेजांत कॉम्प्युटर ही काही दुर्मिळ चीज नाही. प्रत्येक ग्रंथालयात गरजेप्रमाणे कॉम्प्युटर्स असतात. वीस-पंचवीस, शंभर आणि या कॉम्प्युटरच्या मदतीने विश्वकोशातील माहिती वाचण्यासाठी तेथील बाल-तरुण वाचकांची झुंबड उडते. अमेरिकेतील शेकडो ग्रंथालयांनी आपल्या वाचकांसाठी ही ' ऑन-स्क्रीन एन्सायक्लोपीडिया ' किंवा ' इलेक्ट्रॉनिक विश्वकोश 'ची सुविधा उपलब्ध करून दिली आहे.

## हवी ती मुद्देसूद माहिती

या इलेक्ट्रॉनिक विश्वकोशाचे काम कसे चालते? त्यामुळे अगदी लहान मुलांपासून तं मोठ्या माणसांपर्यंत सर्वांनाच माहिती मिळविणे कसे सुलभ होते?

समजा, तुम्हाला प्रेसिडेंट रेगनबद्दल माहिती हवी आहे. ॲकॅडेमिक अमेरिकन एन्सायक्लोपीडियामध्ये रेगनवर बराच मजकूर आहे. रेगनच्या जीवनाबद्दल तुम्हाला त्यात ३००/३०० शब्दांच्या सहा परिच्छेदांत माहिती दिलेली आढळेल. त्याचबरोबर रेगनविषयक पुस्तकांची सूचीही शेवटी मिळेल. त्या विशिष्ट पृष्ठाचा संदर्भ देऊन कॉम्प्युटरची त्या नंबरशी संबंधित कळ दाबली की मॉनिटरवर एकेक परिच्छेद दिसू लागेल. एक परिच्छेद वाचून झाला की दुसरा, या क्रमाने सहाही परिच्छेद वाचून झाले की, दुसऱ्या विषयाकडे वळता येईल किंवा रेगनशी संबंधित अशा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष, अमेरिकन राजकारण, अमेरिकेचे आर्थिक धोरण, रेगनचे चित्रपट, रेगनचे सल्लागार, रेगनची विविध विषयांवरील भूमिका वगैरे विषयांबद्दलची माहिती मिळविण्यासाठी तुम्ही कॉम्प्युटरला तशा सूचना देऊ शकाल. त्या विश्वकोशात अर्थात त्या त्या विशिष्ट बाबींबद्दल माहिती मात्र हवी.

आणि या कॉम्प्युटरला जर प्रिंटर ( मुद्रक ) जोडलेला असेल तर जो मजकूर तुम्ही संगणकाच्या चित्रफलकावर पाहता, तो तुम्हाला टंकलिखित होऊनही मिळेल. वेगळ्या नोटस काढायची गरज नाही.

दहा वर्षांच्या मुलालाही ही माहिती सहज मिळविता यावी या दृष्टीने या इलेक्ट्रॉनिक्स एन्सायक्लोपीडियाची एकूण रचना करण्यात आली आहे आणि सहावीच्या अनेक मुलांवरील चाचण्या यशस्वी झाल्यावरच ही विश्वकोश सेवा ग्रंथालयांना उपलब्ध करून देण्यात आली आहे.

डाऊ जोन्स न्यूज आणि बिब्लिओग्राफिक रिट्रिव्हल सर्व्हिसेस या दोन संस्थांच्या सहकार्याने इलेक्ट्रॉनिक विश्वकोशाची ही कल्पना प्रत्यक्षात उतरली आहे. डाऊ जोन्स न्यूज ही प्रामुख्याने आर्थिक क्षेत्रातील आकडेवारी आणि माहिती आपल्या ग्राहकांना पुरवणारी अग्रगण्य संस्था, तर बिब्लिओग्राफिक रिट्रिव्हल सर्व्हिसेस ही संस्था शालेय, विद्यापीठीय, शास्त्रीय संशोधनात्मक माहिती पुरवणारी अमेरिकेतील जुनी संस्था. या दोन संस्थांनी एकत्र येऊन ॲकॅडेमिक अमेरिकन एन्सायक्लोपीडियाच्या सहकार्याने विश्वकोशातील माहिती कॉम्प्युटरवर उपलब्ध करण्याचा उपक्रम पाच वर्षांपूर्वी सुरू केला आणि त्याचा फायदा घेणारे हजारो ग्राहक पुढे आले. आज ग्राहकांची संख्या काही लाखांच्या घरात जाते. आपला वैयक्तिक संगणक टेलिफोनद्वारे व केबल टेलिव्हिजनद्वारे या विश्वकोशाच्या केंद्राशी जोडून, हव्या त्या विषयावरील हवी ती माहिती आपण मागू शकतो. केबल टेलिव्हिजनद्वारे ही माहिती मिळविण्यासाठी दरमहा वीस-पंचवीस डॉलर्स खर्च येतो. टेलिफोनवरून मात्र ती फार महाग पडते. मिनिटाला आपल्याकडचे सात-आठ रुपये.

विश्वकोशातील गुंतागुंतीच्या नोंदीही अत्यंत सुलभरीत्या या इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे सर्वसामान्य व्यक्तीलाही मिळवता, वाचता यावे या दृष्टीने या उपक्रमाच्या एकूणच आखणीत विशेष दक्षता घेण्यात आली आहे. कुठलीही माहिती चटकन मिळावी, नेमकी आणि अचूक असावी अशा प्रकारे प्रत्येक विषयाचे काटेकोर वर्गीकरण करून त्यावरील माहितीही फाफटपसारा गाळून मुद्देसूद देण्याकडे विशेष लक्ष पुरवण्यात आले आहे."

विद्यार्थी वर्ग तर या विश्वकोशावर बेहद्द खूष आहे. प्राचीन इतिहास, विज्ञान, अंतरिक्षज्ञान, भूगोल वगैरे विषयांचा अभ्यास या पद्धतीने एकदम छान होतो आणि लक्षात ठेवायला त्यामुळे मदत होते असा एकजात सर्वांचा अनुभव आहे. पुस्तके वाचत बसण्यापेक्षा संगणकाच्या चित्रफलकावरचा मजकूर अधिक झटपट वाचून होतो आणि स्मरणातही राहतो असे बहुतेकांचे मत आहे. अर्थातच विद्यार्थ्यांचा पुस्तकवाचनावरचा भर कमी होत असल्याने काही शिक्षक-पालकांना चिंताही वाटते. अशा विश्वकोशाद्वारे एखाद्या विषयाची रूपरेखा व्यवस्थित कळेल हे खरे, परंतु त्या विषयावरील पुस्तकात त्याबद्दल अधिक तपशील असतात. ते तपशील विचारात घेतल्याविना त्या विषयाचा अभ्यास वरवरचा राहणार असे

शिक्षक-प्राध्यापक म्हणतात. तशातच ॲकॅडेमिक अमेरिकन विश्वकोश हा 'ब्रिटानिया' इतका दर्जेदार व सर्वसमावेशक नसल्याने त्याला नाके मुरडणारे लोक आहेतच.

**स्पर्धेची शक्यता**

ॲकॅडेमिक अमेरिकन विश्वकोशाच्या या इलेक्ट्रॉनिक माध्यमातील आवृत्तीचे यश लक्षात घेऊन, एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिका आणि वर्ल्ड बुक या प्रतिस्पर्ध्यांनाही या इलेक्ट्रॉनिक माध्यमाकडे वळावेसे वाटले की नाही ? त्यांनाही वळावेसे वाटले. त्या दृष्टीने त्यांनी अनेक प्रयोगही चालवले आहेत. कॉम्प्यु-सर्व्ह या संगणकाद्वारे माहितीपुरवठा करणाऱ्या संस्थेच्या सहकार्याने वर्ल्ड बुकने काही काही काळ या दृष्टीने प्रयोग करून पाहिला तर मिड डेटा सेंट्रलच्या नेक्सिस प्रणालीने ब्रिटानिकानेही या माध्यमाची चाचणी घेतली. परंतु अजून त्यांनी याबाबत पक्का निर्णय घेतलेला नाही.

साहजिकच ॲकॅडेमिक अमेरिकन विश्वकोशाची या बाबतीत आज मक्तेदारी आहे आणि नवनव्या योजनांची आखणी करण्यात संबंधित मंडळी गर्क आहेत. छापलेल्या पृष्ठांच्या मर्यादा ओलांडून, वाचन हे सुखद बनविण्यासाठी आम्ही सारखे धडपडत आहोत, असे त्या संस्थेच्या इलेक्ट्रॉनिक प्रकाशन विभागाचे अध्यक्ष म्हणाले होते. व्हिडिओ-कॅसेटचे उत्पादनही सुरू करण्याची त्यांची तयारी झालेली आहे. आसुळे घरच्या घरी व्हीसीआरवरही मुलांना आता हव्या त्या विश्वकोशातील माहितीचा अभ्यास करता येईल.

इलेक्ट्रॉनिक्सच्या बाबतीत भारतही आता जगाबरोबर धावत आहे. फारसा मागे नाही. त्यामुळे विश्वकोशाच्या व्हिडिओ कॅसेटस आपल्याकडेही यायला वेळ लागणार नाही. आपल्या विद्यार्थिवर्गाला त्यामुळे अभ्यासाचे ओझे वाटणार नाही. चित्रपट बघितल्यासारखा एकेक विषय आवडीने पाहून, स्मरणात पक्के ठेवता येईल. अर्थात परीक्षेत ती माहिती लिहिता येण्याएवढी हाताने लिहायची सवय मात्र ठेवायला हवी ! डोक्यात खूप ज्ञान असूनही ते जर कागदावर उतरवता आले नाही तर त्याची किंमत शून्यच !

(साप्ताहिक सकाळ, २४-१२-१९८८)

# १५

# बोलणारी पुस्तके हवीत !

पुस्तक म्हणजे पुस्तक. छापलेले कागद एकत्र बांधलेले. हातात धरावे, डोळ्यासमोर ठेवावे, एकापुढे एक शब्द. एका ओळीपुढे दुसरी ओळ. डोळ्यांनी वाचावे, जे काही वाचतो ते दृश्य अंतश्चक्षूंसमोर कल्पनाशक्तीच्या सहाय्याने उभे करीत जावे. त्यातून आपल्या भावविश्वाच्या अनुभव संग्रहालयातले एकेक दालन उभे करीत जावे. संगणकातल्या स्मृतीप्रमाणे मनाच्या स्मृतिकक्षात जपून ठेवावे. वर्षानुवर्षे. कधीही त्या स्मृतिकक्षाला आवाहन करावे. ते सारे पुस्तक, त्यातले प्रसंग, त्यातल्या व्यक्ती, त्यातले संघर्ष—आणि आपल्या भावजीवनाशी त्यांचे जुळलेले सौहार्द-सारे एकदम पुन्हा जगण्याचा अवसर मिळावा, असे पुस्तक एकदा अनेकदा पुनः पुन्हा हातात धरावे, डोक्यात साठवावे.

**वाचन : एकलकोंडे बनवणारी प्रक्रिया**

जनसंपर्क माध्यमांचा आधुनिक काळातील एक श्रेष्ठ भाष्यकार मार्शल मॅक-लुहान याने असे भाकित केलेले आहे की गटेनबर्गचे म्हणजे छापील शब्दाचे, पुस्तकाचे युग आता संपुष्टात येणार असून त्याची जागा विद्युतयुग म्हणजे रेडिओ, व्हिडिओ, दूरदर्शन घेणार आहे. मॅकलुहानने हे भाकित करून पंचविसावर वर्षे झाली. पण या भाकिताचा गर्भितार्थ आपल्या ध्यानात आता कुठे येऊ लागला आहे. अमेरिकेत व युरोपमध्ये दूरदर्शनच्या सार्वत्रिक प्रभावाचे सावट तेथील सर्वच ज्ञानक्षेत्रावर व माणसाच्या मोकळ्या वेळेवर व छंदाफंदावर त्या वेळी किती

गडद पडले आहे हे पाहूनच मॅकलुहानच्या मनात हा विचार आला असणार. आपल्याकडे गेल्या दोन-तीन वर्षांत दूरदर्शनचा झपाट्याने विकास झाल्याने आणि त्यावरील कार्यक्रमाची विविधता व व्याप्ती वाढल्याने त्याची लहान मुलांपासून ते वयस्क व्यक्तींवर जी मोहिनी पडते तिचा अनुभव आपण घेत आहोत. म्हणून दूरदर्शन, व्हिडिओ यांचा ग्रंथवाचनाच्या प्रवृत्तीवर अनिष्ट परिणाम होत आहे आणि पुढेही होऊ शकेल या विधानाची यथार्थता आपल्याला अस्वस्थ करण्याएवढी जाणवू लागली आहे. मीडिया इज मेसेज, माध्यम हाच संदेश असे सांगणारा मॅकलुहान याच्या द्रष्टेपणाचीच ही आपण घेतलेली प्रचीती होय.

## छापील शब्दांची मक्तेदारी

अर्थात दूरदर्शनवर चोवीस तास कार्यक्रम चालू असतात म्हणून अमेरिकेतील वृत्तपत्रे वा नियतकालिके बंद पडली आहेत, पुस्तक प्रकाशन थांबले आहे, चित्रपटगृहे ओस पडली आहेत, नाईट क्लब दिवाळे काढत आहेत वा माणसाचे वाचन अजिबात थांबले आहे, असे दिसत नाही. परंतु पूर्वी छापील शब्दांची संदेशवहनात वा विचारसंक्रमणात जी मक्तेदारी होती ती आता तशी राहिलेली नाही असा याचा अर्थ आहे आणि त्याबाबत कोणी मनात शंका ठेवण्याचे कारण नाही.

मार्शल मॅकलुहानने मुद्रणाने व्यक्तीवर, समाजावर व राजकारणावर जे काय परिणाम झाले त्याचे विवेचन आपल्या ' दि गटेन्बर्ग गॅलक्सी : दि मेकिंग ऑफ ए टायपोग्राफिक मॅन ' या ग्रंथात केले आहे.

## अनुभवविश्व सपाट झाले

आपण एखादा मजकूर छापतो म्हणजे काय करतो. एका अक्षरापुढे दुसरे अक्षर ठेवतो. एका शब्दापुढे दुसरा शब्द ठेवतो. एक ओळ संपल्यावर दुसरी ओळ सुरू करतो. पहिल्या शब्दाचा दुसऱ्या शब्दाशी पहिल्या ओळीचा दुसऱ्या ओळीशी संबंध असतो. त्यात काही अर्थाची साखळी असते, शिस्त असते. आपण डोळ्यांनी हा मजकूर वाचतो. म्हणजे आपल्या डोळे या इंद्रियाला महत्त्व मिळाले. आपला एका शब्दाचा दुसऱ्या शब्दाशी असलेला संबंध, एका विधानाचा दुसऱ्या विधानाशी असलेला संबंध, कार्यकारणभावाचा संबंध आपण उलगडू

पाहतो. म्हणजे बौद्धिक शिस्त वा व्यापार आला. सरळ रेषेत असणाऱ्या मुद्रणामुळे भावनिक-वैचारिक आकलनात एक प्रकारचा सरळपणा, सूत्रबद्धपणा स्वीकारण्याची गरज निर्माण झाली. परंतु माणसाचा अनुभव वा त्याच्या भावभावना या काही नेहमीच सरळ, सुटसुटीत, सूत्रबद्ध, विवेकपूर्ण, बुद्धिप्रवण नसतात. एकरेषीय मुद्रणामुळे ही गुंतागुंत पकडणे अवघड ठरले. म्हणून मॅकलुहान म्हणतो की मुद्रणामुळे मानवी अनुभवांचे विश्व सपाट झाले. उजाड झाले.

## एकटेपण जोपसणारी प्रक्रिया

वाचन हे एकाच व्यक्तीला करावे लागते. समोरच्या अक्षरावर, ओळीवर, परिच्छेदावर, पृष्ठावर लक्ष केंद्रित करावे लागते. साहजिकच माणूस अधिक वेळ एकटाच राहू लागतो. एकलकोंडा, तुसडा बनतो. वाचनाने ज्ञानग्रहण करणे ही अशी माणसाचे एकटेपण जोपासणारी प्रक्रिया ठरते.

मुद्रण नव्हते, ग्रंथ नव्हते तेव्हा पोथीपुराणे ऐकण्यासाठी माणसे एकत्र येत. डोळ्यांपेक्षा त्या वेळी कर्णेंद्रियांना महत्त्व असे. पोथीपुराण ऐकताना इतरही गप्पाटप्पा होत. व्यक्ति-व्यक्तीतील आपुलकी वाढीला लागे. पाणवठ्यावर केवळ पाणी भरण्यासाठीच बायका येत असे नव्हे. गावातल्या सगळ्या घटनांची चर्चा करण्याचे ते एक केंद्र असल्याने त्याला सामाजिक व्यासपीठाचेही स्थान असे. सामुदायिक ग्रंथवाचनाचा वा पुराणप्रवचनाचा होणारा परिणाम सामाजिक असे. एकाचे डोळे भरले की दुसऱ्याच्या डोळ्यांच्या कडा पाणावत.

पण आता पुस्तकाचे हे छापील रूप आपल्याला हळूहळू हुलकावण्या देणार आहे आणि छापलेल्या मजकुराची पाने एकत्र करून त्याची बांधणी केलेली चीज म्हणजे पुस्तक ही आपली समजूतही हळूहळू बदलत जाणार आहे.

## पुस्तकांचा नवा अवतार

तुम्ही म्हणाल– हे काय भलतेच सांगताय? पुस्तक म्हणजे पुस्तकच. ते आपले रूप कसे बदलणार?

खरे सांगायचे तर पुस्तकांनी कधीच नवा अवतार धारण करण्यास आरंभ केला आहे. व. पु. काळ्यांच्या कथा तुम्ही कॅसेटवर ऐकताच ना? पु. ल. देशपांडे यांचे विनोदी लेख त्यांच्याच तोंडून आपल्याला कॅसेटवर ऐकायला

मिळतातच ना ? कुसुमाग्रजांच्या कविता त्यांनीच म्हटलेल्या ऐकायला आज कवि-संमेलनाला जायला नको. त्यांची कॅसेट आणली की झाले ! आता या कॅसेट म्हणजे पुस्तकेच की ! बोलकी पुस्तके. श्रवणीय पुस्तके. श्रुतिवाङ्मय.

### परत एकदा श्रुतिवाङ्मयाकडे

नाहीतरी आपले आधीचे सारे वाङ्मय हे श्रुतिवाङ्मय होते. मौखिक वाङ्मय होते. लेखनाची कला जेव्हा अवगत नव्हती, कागदाचा शोध लागलेला नव्हता तेव्हा कथानिवेदक कथा तोंडाने सांगत असे आणि अशी कथा ऐकून लक्षात ठेवणारे श्रोते आपला मालमसाला, आपली निवेदनशैली यांची यथोचित फोडणी देऊन ती इतरांना सांगत. आपले वेद पाठांतरानेच शेकडो वर्षे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होत राहिले. पुढे भूर्जपत्रावर हाताने लिहिलेल्या पोथ्या मिळू लागल्या, परंतु त्यांचा प्रसार एकूण बेताचाच. त्यात आमूलाग्र क्रांती झाली ती गटेनबर्गने मुद्रणकलेचा शोध लावल्यानंतर आणि त्या मुद्रणकलेचा आपल्या देशात प्रसार झाल्यावर. छापील पुस्तके ही सर्वत्र उपलब्ध होऊ लागली. साह-जिकच पुस्तक म्हटले की, एकत्र बांधणी केलेले छापील कागद हेच रूप आता आपल्या डोळ्यांच्या सवयीचे झाले आहे.

### प्रवासातील सोबती

आणि आता पुस्तकांनी दुसरे रूप स्वीकारण्याचा कालमानानुरूप जणू निर्णय घेतला आहे.

आता पुस्तके म्हणजे टेप्स, कॅसेटस यांच्या रूपाने आपल्याशी बोलणार आहेत. पु. ल. देशपांडे, व. पु. काळे, शंकर पाटील, शं. ना. नवरे वगैरेंच्या कॅसेट्स आपल्या सर्वांच्या घरी पोचल्या आहेत. शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे, मंत्रमुग्ध करणारे अद्‌भुत वक्ते प्राचार्य शिवाजीराव भोसले यांच्या कॅसेटनीही लोकप्रियता संपादन केली आहे. या कॅसेटरूपी पुस्तकांची एक खासियत आहे. आपण घरी बसूनच त्या ऐकायला हव्यात असे नाही. पुस्तक हे नेहमी एकट्याने कुठेतरी बैठक मारून वाचावे लागते. एकावेळी एक पुस्तक एकापेक्षा अधिक-जणांना वाचता येत नाही. एकाने वाचावे व इतरांनी ऐकावे—अशी पारायणे होऊ शकतात. परंतु कॅसेटसचे तसे नाही. कॅसेट आपण कुठेही ऐकू शकतो. कितीही-

जण एकावेळी ऐकू शकतात. आता आपल्या जीवनात कार ही एक सामान्य वस्तू होऊ घातली आहे. प्रवास हे आपल्या गतिशील जीवनाचे अविभाज्य अंग बनलेले आहे. दिवसात तास दोन तास प्रवास हे आता आपल्या अंगवळणी पडले आहे. त्यामुळे कार चालवता चालवता कॅसेट ऐकणे हे आता एक सोपे सुलभ साधन हाती आले आहे. अनेक पुस्तके वाचण्याचे आपले संकल्प वेळे-अभावी अपुरे राहिलेले असतात. कॅसेटवर पुस्तकेच्या पुस्तके येऊ लागली की, अशा प्रवासात ती अनायासे ऐकण्याची संधी साधता येईल आणि आपली अपुरी राहिलेली वाचनाची इच्छा सहजगत्या, मुद्दाम वेगळा वेळ न देता पूर्ण होऊ शकेल.

**पुस्तके 'ऐकू येतात'**

अमेरिकेत टेपवरील पुस्तके खूपच लोकप्रिय ठरली आहेत आणि त्यांची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे. अमेरिकेत अर्थातच बहुसंख्य लोकांकडे स्वतःच्या मोटारी असतात, आणि कामाच्या जागी जाण्यासाठी पाच-पन्नास मैल प्रवास दररोजच करावा लागतो, त्यासाठी तास दोन तास कार चालवावी लागते. या वेळेत पूर्वी केवळ रेडिओवरील वा टेपवरील संगीत ऐकणे ही फॅशन होती. परंतु आता बरेच लोक 'पुस्तके' ऐकू लागले आहेत. कादंबऱ्या, आत्मचरित्रे, चरित्रे, कथा, कविता, इतिहास वगैरे आता मोठ्या प्रमाणावर टेप्सवर उपलब्ध असून, व्हिडिओ कॅसेटप्रमाणेच त्यांची देवाणघेवाण करणाऱ्या लायब्ररीजही सर्वत्र निघत आहेत. चर्चिलचे दि सेकंड वर्ल्ड वॉर हे सहा खंडांचे प्रचंड पुस्तक. ते जसेच्या तसे कॅसेटवर आणले आहे. ९९ कॅसेट्स त्यासाठी लागल्या आहेत आणि त्या सर्व ऐकण्यासाठी एकूण १४९ तास लागतात. सॉमरसेट मॉमच्या 'ऑफ ह्युमन बॉंडेज' वगैरे गाजलेल्या कादंबऱ्या कॅसेटमुळे आणखी खूप मोठा नवा चाहता वर्ग मिळवत आहेत. शेक्सपियरच्या नाटकांच्या कॅसेट्सही मोठ्या प्रमाणावर श्रोतृ-वाचक विकत घेतात. थोरोच्या 'वॉल्डेन' या ग्रंथाला या कॅसेटमुळे नवे आयुष्य जणू लाभले आहे. सर्व तऱ्हेचे मानसिक ताण दूर करण्यासाठी डॉक्टर्स ट्रॅंक्विलायझर्स देत, अमेरिकन जनतेला 'वॉल्डेन' ऐकतानाही अभूतपूर्व मनःशांती लाभते याचा प्रत्यय येत आहे. एरॉल फ्लिनचे 'माय विकेड विकेड डेज' हे आत्मचरित्र डॅन लाझार या अभिनेत्याच्या आवाजात

कॅसेटवर आले आणि त्यातील शृंगारकथांनी पुन्हा खळबळ उडवून दिली.

### हेक्टचे धाडस

आपल्याकडे आलुरकरांनी व. पु. काळे, पु. ल. देशपांडे वगैरेंच्या कॅसेटस काढण्यात पुढाकार घेतला. अमेरिकेत १९७५ सालापासून पुस्तके जशीच्या तशी पूर्णपणे टेपवर उपलब्ध होऊ लागली. डुव्हाल हेक्ट या कॅलिफोर्नियातील एका ५१ वर्षाच्या गृहस्थाने याबाबत प्रथम धाडस केले. दररोज त्याला दोन तास कारने प्रवास करावा लागे. हा वेळ वाया जातो आणि कंटाळवाणा असतो याची त्याला सारखी बोच होती. अशा प्रवासातच आपली जी पुस्तके वाचा-वयाची राहून गेली आहेत, ती टेप करून ऐकायला मिळाली तर मोठी मजा येईल असे त्याला वाटले आणि त्याप्रमाणे जॉर्ज प्लिप्टन याची पेपर लायज ही कादंबरी त्याने टेप केली. एकेक तासाच्या दहा कॅसेट्स त्याला लागल्या. या कॅसेट्स मेल ऑर्डरने भाड्याने पुरवण्याचा व्यवसाय त्याने सुरू केला. वर्षाला शंभर पुस्तके तो कॅसेटवर आणत असे आणि आपल्या ३० हजार वर्गणीदार ग्राहकांना महिन्याकाठी सहा ते सोळा डॉलर्स वर्गणीवर त्या कॅसेट्स तो पाठवत असे. तिकिटे न लावता त्या कॅसेट पोस्टाने परत करण्यासाठी कार्टनही जोडलेले असे. गाजलेल्या शेकडो पुस्तकांच्या कॅसेट्स हेक्टने काढल्या. रहस्यकथा, गुप्तहेरकथा वगैरेही त्याला व्यर्ज्य नव्हत्या. शृंगारिक कादंबऱ्या, सेक्सवर भर देणाऱ्या कथा-कादंबऱ्याही वगळून चालणार नव्हते. तशा कॅसेटच्या मागे हेक्टने आपल्या सूचीमध्ये ' डबल एक्स ' टाकणे सुरू केले. हाइट रिपोर्ट, डेल्टा ऑफ व्हेनिस यासारखी पुस्तके या रेटिंगमुळेही खूप खपली.

### लेखकाच्या आवाजाचा आनंद

हेक्टच्या पाठोपाठ अमेरिकेतही इतर अनेक धाडसी व्यक्तींनी या क्षेत्रात पदार्पण केले. हेक्टपेक्षाही अधिक कॅसेट्स केडमॉन याने काढल्या असून तो आज अमेरिकेतला सर्वांत मोठा ' स्पोकन-वर्ड रेकॉर्डिंग प्रोड्युसर ' मानला जातो. शेक्सपिअरच्या ३३ नाटकांच्या त्याच्या रेकॉर्डस होत्या. त्या रेकॉर्डस खूप खपत. १९७१ मध्ये दहा रेकॉर्डसच्या तुलनेत एक टेप खपत असे. आज हे प्रमाण उलटे झाले आहे. केडमॉन लेखकाच्या तोंडून त्याचे पुस्तक ऐकवले जावे याबाबत

अधिक आग्रही असतो आणि पुस्तक जसेच्या तसे शब्दशः कॅसेटवर न आणता त्याचे संपादन करून नेमका महत्त्वाचा भाग रेकॉर्ड व्हावा असा कटाक्ष बाळगतो. अर्नेस्ट हेमिंग्वेच्या गुरगुरणाऱ्या आवाजातील ' ॲक्रॉस दि रिव्हर ॲन्ड इनटू दि ट्रीज ' किंवा जेम्स जॉइसच्या आवाजातील ' युलिसिस 'चे उतारे त्याने उपलब्ध करून दिले आहेत. डिलन टॉम्सच्या कवितांची कॅसेटही त्याच्या कवितेतल्या शब्दांतील एक वेगळी अर्थपूर्णता लक्षात आणून देते. चार्ल्स डिकन्स, पुश्किन, कॉनरॅड, टॉमस मॅन, आयर्व्हिंग स्टोन यांच्या कादंबऱ्यांबद्दल वाचकांना पुन्हा आस्था वाटू लागली आहे, त्याचे श्रेय या कॅसेटकडेच जाते.

### वातम्या ऐकवणारे पाक्षिक

' बुक्स ऑन टेप 'तर्फे आणखीही एक अभिनव उपक्रम सुरू आहे. तो म्हणजे न्यूजट्रॅक ही कॅसेट मालिका. दर पंधरा दिवसांनी नव्वद मिनिटांची एकेक कॅसेट ग्राहकांना पाठवली जाते. त्या १५ दिवसांतील महत्त्वाच्या घडामोडींचे टाइम आणि इतर मान्यवर वृत्तपत्रांच्या आधारे केलेले संकलन या टेपद्वारे सादर केले जाते. हे बोलके पाक्षिक खूप लोकप्रिय ठरले आहे आणि त्याचे वर्गणीदार सारखे वाढतच आहेत.

कार चालवता चालवता कादंबऱ्यांचा वा कथांचा टेप ऐकत जाणे हा प्रकार कधीकधी मोठा तापदायकही ठरतो. काही ड्रायव्हर-श्रोते त्या कथानकात इतके गुंतून जातात की आपल्याला कुठे जायचे आहे हेच विसरतात किंवा भलत्याच ठिकाणी जाऊन पोचतात. आपले उतरण्याचे ठिकाण आले तरी गाडी पार्क करून अर्धवट असलेले प्रकरण ऐकेपर्यंत गाडीत बसून राहणारेही महाभाग आढळतात ! ऐकता ऐकता ट्रॅफिक लाईटकडे दुर्लक्ष होऊन क्वचित अपघातही होतात !... परंतु एवढे खरे की या गतिमान यंत्रयुगाला साजेसा असाच पुस्तकांचा हा नवा बोलका अवतार आहे.

### बोलकी पुस्तके मराठीत कधी ?

मी आता स्वप्ने पाहात आहे की मराठीत ही लाट कधी येते ! हरिभाऊ आपटे, ना. सी. फडके, साने गुरुजी, माडखोलकर, खांडेकर, श्री. ना. पेंडसे,

गो. नी. दांडेकर, नाथमाधव, ग. ल. ठोकळ, बाबा कदम वगैरेंच्या कादंबऱ्या, आचार्य अत्रे, कानेटकर, तेंडुलकर, दळवी वगैरेंची नाटके, लक्ष्मीबाई टिळक, विश्राम बेडेकर, दुर्गा खोटे, जयश्री गडकर, स्नेहप्रभा प्रधान, ग. वा बेहेरे, लक्ष्मण माने वगैरेंची आत्मचरित्रे ही कधी कॅसेटवरच्या बोलक्या अवतारात येतायत ! डॉ. श्रीराम लागू यांच्यासारख्याच्या कमावलेल्या आवाजात जी. ए. कुलकर्णी यांच्या विदूषकसारख्या कथा ऐकायला मिळणे हे कोण भाग्य ठरेल !

( साप्ताहिक सकाळ, १२/१७ फेब्रुवारी १९८७ )

# १६

## पाककला साहित्याचे विश्वरूप

माणसाला देवाने पोट दिले आहे. पोट भरण्यासाठी धान्ये, फळे, भाजीपाला, कंदमुळे, तेले, वनस्पती आणि अशाच कितीतरी गोष्टी दिल्या आहेत.

शिवाय इतर लहानमोठे पशुपक्षी, जलचर जीव, त्यांचे मांस, त्यांची अंडी, दूधदुभते, लोणी, लोणची, मुरंबे, ज्यूस, रस, माणसाला स्थलभिन्नत्वे असे सारे काही चालते. सर्व काही स्वाहा करण्याची त्याची क्षमता अचाट आहे.

गेल्या दोन-तीन हजार वर्षांत माणसाने आपल्या पोटाची पूजा करण्यासाठी उपलब्ध खाद्यपदार्थांची वेगवेगळ्या प्रकारे मिश्रणे करून, अनेकविध पाककलाकृतींची निर्मिती केली आहे. त्यातील विविधता थक्क करणारी आहे. भारतासारख्या देशात हजारो प्रकारचे खाद्यपदार्थ खायला मिळतात. प्रत्येक भूभागातील खाद्यपदार्थांत वेगळेपणा आढळतो. ते बनवण्याच्या पद्धतीत भिन्नता दिसते. केवळ चपाती-भाकरी वर्ग घेतला तरी, चपाती, पराठा, रोटी, भाकरी, तान, पुरी, पुडी, रोट, दशमी, गूळपोळी, तिखट पुरी, पापडी, अशी यादी किती लांबवावी ? गहू, ज्वारी, बाजरी, भात, सातू, कडधान्ये, नाचणी, वरी वगैरेंपासून बनपाव, चपाती, भाकरी वर्गातील खाद्यपदार्थ वेगवेगळ्या भागात वेगवेगळी चव व वेगवेगळे आकार घेऊन अवतरतात आणि आपल्याला थक्क करतात. या पाककृतींना हजारो वर्षांची परंपरा आहे आणि त्यात नवनवे प्रयोगही सतत चालू असतात. जुन्या पदार्थांत थोडाफार बदल करून नव्या पदार्थांची साधनसिद्धता चालू असते.

### ब्रह्मानंद सहोदर

मराठीत अन्नपूर्णा, रुचिरा वगैरे पाकशास्त्रावरील पुस्तके खूपच लोकप्रिय ठरली आहेत आणि ती पुस्तके ओट्यावर ठेवून अनेक नवविवाहित कन्यकांनी केलेले पदार्थ वाहवा वाहवा करीत पुरुषवर्ग मोठ्या कौतुकपूर्ण सहिष्णुतेने खात आला आहे. समस्त पुरुषवर्गाच्या या उत्तेजक दृष्टिकोणामुळे महिलावर्गातील पाकशास्त्रीय प्रयोगशीलता नित्य नव्या जोमाने फोफावत राहिली आहे. उत्तम पदार्थांच्या सेवनाने मिळणारा आनंद ब्रह्मानंद सहोदर जातीचा असतो; असे म्हणतच हे ऐहिक जीवन गोड करून घ्यायचे असते.

आपल्याकडे अन्नपूर्णा, रुचिरा यासारखी पुस्तके हजारोंनी खपतात. इतर पुस्तके खपोत, न खपोत. पाकशास्त्रावरील पुस्तकांचा खप वर्षानुवर्षे चालूच असतो.

पाश्चात्त्य देशांतही पाकशास्त्रावरील पुस्तके ही बेस्ट सेलर्सच्या यादीत बरेच नंबर पटकावत असतात आणि तेथील महिलाही नित्य नव्या खाद्यपदार्थांच्या प्रयोगात गुंतलेल्या दिसतात. उत्तम प्रकारे तयार केलेल्या खाद्यपदार्थांची आकर्षक चित्रे छापलेली ही पुस्तके चाळतानाही तोंडाला पाणी सुटते. त्यामुळे त्यांच्या किंमती तीस-चाळीस डॉलर्स– म्हणजे चार-पाचशे रुपये असल्या तरी त्या खरेदी करण्याचा मोह आवरत नाही. तीनशे वर्षांपूर्वी रेसिन या फ्रेंच नाटककाराने म्हटले होते : फ्रान्समधले एखादे छोटेसे गाव घ्या, तेथे वीस रेस्टॉरंटवाले आरामात जगू शकतील. परंतु एक ग्रंथविक्रेता आपले पोट धड भरू शकणार नाही. त्याच्यावर उपासमारीने मरण्याची पाळी येईल. परंतु आज रेसिन जिवंत असता आणि त्याने पाकशास्त्रावरील ग्रंथांची होणारी विक्री बघितली असती तर आपले हे विधान त्याने बदलले असते. निदान पाकशास्त्रावरील ग्रंथ लिहिणारे व विकणारे यांच्या बाबतीत तरी उपासमारीने मरण्याची भीती प्रकट केली नसती.

पाकशास्त्रावरील चांगले पुस्तक म्हणजे त्या देशाची वा समाजाची सांस्कृतिक आणि भौतिक पातळी दाखवणारा दस्तऐवजच. आहारावरून त्या त्या समाजाची संपन्नता, अभिरुची कळते; त्या समाजाची भौगोलिक स्थिती आणि ऐतिहासिक वाटचाल ध्यानात येते, एवढेच नव्हे तर आहारावरून त्या त्या समाजाचे तत्त्वज्ञानही कळते. ज्याचे खाद्यपदार्थांवर प्रेम असते, तो समाज ऐहिक जीवनाची लज्जत लुटण्यासाठी सज्ज असतो. खाण्यापिण्याकडे तुच्छतेने बघणारा आणि केवळ

जगण्यासाठी खायचे; खाण्यासाठी जगायचे नाही असे म्हणणारा समाज हा उदरनिर्वाहाच्या धडपडीतच आपली बहुतांश शक्ती गमावणारा, ऐहिक प्रगतीच्या फारच थोड्या पायऱ्या चढलेला असतो. साखरेचा खाणार त्याला देव देणार, यासारख्या लोक-उक्तीतून हेच तत्त्वज्ञान प्रकट होत असते.

सुदैवाने मला वीसेक देशांत फिरण्याची आणि भारताच्या वेगवेगळ्या राज्यांत प्रवास करण्याची संधी मिळाली आणि खाद्यपदार्थांबाबत चपाती ताक-भाताशिवाय पोट भरल्यासारखे वाटतच नाही. ' हो ! किंवा कढीचा भुरका म्हणजे महाराजा, स्वर्गसुखच. ' असा माझा एतद्देशीय जीव गुंतवून पडलेला नसल्याने व्हिएतनाम-मधले पंधरा कोर्सेसचे चार तास चालणारे जेवण जसे मला आवडले; तसेच लॉस एंजेलिसमधील अस्सल मेक्सिकन ठसकेबाज तिखट सीफूडही ! हवाईमधील पपयांचा नाश्ता, सॅनफ्रॅन्सिस्कोच्या चायना हाऊसमधील चिनी खाना, फ्रेंच वाईनचे मंद घुटके घेत घेत हलक्या होत चाललेल्या देहाच्या विमानात तेथील सौंदर्यपूर्ण खाद्यपदार्थांचा होणारा अद्भुत संचार त्यांची लज्जत काही वेगळीच !... पण मला आजच्या या लेखात माझ्या खवैयेगिरीतील मुलुखगिरीचे निरूपण करायचे नाही म्हणून हे वर्णन तेथेच थांबवतो. परदेशात गाजलेल्या पाकशास्त्रावरील काही ग्रंथांची झलक पेश करायची आहे सुगरण अंकाच्या निमित्ताने.

ॲने विल्सन हिच्या ' फ्रेंच रिजनल कुकिंग ' या पुस्तकाची शैली आकर्षक आहे. पाकशास्त्रासारखा विषयही किती मसालेदार आणि खुसखुशीत होऊ शकतो, हे ॲनेकडून शिकावे. ॲने मूळची इंग्लंडमधील; परंतु दीर्घकाळ राहिली अमेरिकेत. फ्रेंच पाकशास्त्राने तिला झपाटले तेव्हा तिने चौघा जाणकार सहकाऱ्यांना बरोबर घेऊन फ्रान्समध्ये वर्षभर फेरफटका केला. दहा हजार किलोमीटर प्रवास केला आणि पिरॅनिझपासून आल्प्सपर्यंत, सेंट मालोच्या किनाऱ्यापासून नाइसच्या बीचपर्यंत खाद्यपदार्थांच्या वेगवेगळ्या नमुन्यांचा आस्वाद घेतला. ते पदार्थ कसे बनवतात हे घराघरात हिंडून बघितले, तेथील बायकांशी समरस होऊन, त्यांची माहिती मिळविली. त्यासाठी वापरण्यात येणारे पदार्थ, त्या पदार्थांवर होणारे संस्कार आणि ते पदार्थ बनवताना घेण्यात येणारी दक्षता यांचे मार्मिक विश्लेषण करून, त्यावर विनोदाची फोडणी देऊन ते कसे उत्तम सजवून पेश केले जातात हे तिने समजावून घेतले आणि ४०० पदार्थांची कृती देणारे हे पुस्तक सिद्ध केले. कोर्सिकत बीफ स्ट्यू व मॅकरोनी यांचे मिश्रण करणारे स्टुफट्टू, तुरीच्या

डाळीसह शिजवण्यात येणारे ब्रेझ्ड पार्टरिज, वटाण्याचा पाय यासारख्या शेतकरी-वर्गातल्या दणदणीत डिशेसप्रमाणेच डँडोलियन या दोनही अणकुचीदार पाने व पिवळी फुले असणाऱ्या वनस्पतीपासून बनवलेले सॅलेड, 'वकिलीच्या जिभा' म्हणून ओळखले जाणारे सुळसुळीत बोरडॉक्स मासे भरून बनवलेले पदार्थ, पोरलार्दे डेमी डेव्हिड (अर्धा सैतान) सारख्या झणझणीत डिशेस, चेरींनी सजवलेले गोड-आंबट बदक वगैरे डिशेसची नावे घेतली तरी ॲने विलनच्या निवडीतील वैविध्य ध्यानात यावे. मांस, मासे व पाळीव प्राणी यांच्यापासून बनवलेले स्ट्यूज, चीजपासून बनवलेले पदार्थ, आल्प्समधील पेट्स दि नॉनसारखी तोंडीलावणी, लॉयरेतील फळांचे केक इत्यादी पदार्थांची आकर्षक रंगीत छायाचित्रे बघूनच आपण त्यांच्या प्रेमात पडतो.

अधूनमधून ॲने विलन ऐतिहासिक माहिती देते. रेस्टॉरंट हा शब्द पॅरिसमध्ये सुमारे २०० वर्षांपूर्वी प्रचारात आला. तेथील एका खानावळवाल्याने रेस्ताँरातिफ नावाच्या सूप असलेल्या कटोऱ्या आपल्याकडे भोजनासाठी येणाऱ्यांना सर्व्ह करणे सुरू केले. त्यावरून खाद्यपदार्थ पुरवणाऱ्या स्थळाला रेस्ताँरां असे सामान्य नाव रूढ झाले. चौडर म्हणजे ताजे मासे, बेकन, कांदा, बिस्किटे यांचे मिश्रण असणारा स्ट्यू. हा चौडर शब्द चौदियेरे नामक जी कढई वापरीत त्यावरून रूढ झाला. असे काही तपशीलही अधेमधे येत असल्याने हे पुस्तक केवळ डिशेस तयार करणाऱ्या महिलांसाठी उरत नाही; ते इतर वाचकांनाही भूल पाडते. पॅरिसमध्ये ती पाकशास्त्रकलेचे शिक्षण देणारी संस्था चालवते आणि तिच्यातून पदवी घेऊन बाहेर पडणारे पाकशास्त्रप्रवीण जगभर फाइव्हस्टार हॉटेलमध्ये आढळतात.

## ब्रिटिश खाद्यपदार्थांचे गुपित

ग्रेट ब्रिटिश कुकिंग : ए वेल-केप्ट सीक्रेट या पुस्तकाची लेखिका जेन गारमे हीदेखील इंग्लंडमध्ये खूप भटकली. इंग्लंडमध्ये केवळ तीनच प्रकारच्या भाज्या आढळतात; त्यांपैकी दोन कोबी वर्गातल्या आहेत अशी टवाळी करण्याची पद्धत आहे. तसेच ब्रिटनमध्ये ६० धर्मांचे लोक राहात असले तरी सॉस मात्र तेथे दोन प्रकारचाच मिळतो अशी खिल्ली उडवण्याची पद्धत आहे. परंतु जेनचे हे पुस्तक चाळल्यावर तशी टवाळी करण्याचे धाडस होणार नाही. कॅरेमे, एस्कॉफर, फ्रँकाटेली, सोयर वगैरे गाजलेले पाकशास्त्रज्ञ लंडनमध्ये होऊन गेले

आणि उच्चवर्गीय ब्रिटिशांनी त्यांच्या रुचकर खाद्यपदार्थांचा आस्वाद घेतला हे खरे, परंतु इंग्लंडच्या ज्या खास डिशेस आहेत त्या तेथील भागातून आलेल्या आहेत. लँकेशायर हॉट पॉट, लंब चॉप्स व किडनीचा लांबट कॅसरोल, शेफर्ड पाय वगैरे पदार्थ हे फ्रेंच जर्मनीतील अशा उत्तमोत्तम पदार्थांशी तुल्यबळ आहेत. लेमनी ससेक्स पाँड पुडिंग, प्रुन-फ्लेवर असलेली कोल्ड पोचड चिकन डिश ( हिंडल वेक्स नावाची )

वेल्समधील कांद्याचा केक आणि चिकन-लीक सूप, स्कॉटिश स्ट्यू वगैरे पारंपरिक ब्रिटिश पदार्थ हे पंचतारांकित हॉटेलमधल्या मेन्यूवरही मानाने मिरवतात. मिट स्टॉक, व्हिनिगर वॉरसेस्टशायर सॉस आणि मोहरी यांपासून बनवलेला ' वाऊ-वाऊ ' या डिशची चवही विलक्षण असते असे जेनचे म्हणणे आहे. अशी दीर्घकाळची खाद्यपदार्थांची गुपिते या पुस्तकात प्रकट करते.

' ए न्यू जेम्स बियर्ड कुक बुक ' हे पुस्तक एका ७८ वयाच्या अनुभवी स्वयंपाक्याने लिहिले आहे. १९५९ मध्ये दि जेम्स बियर्ड कुकबुक प्रसिद्ध झाले होते. त्याची वीस वर्षांनी नवी आवृत्ती काढताना त्याने म्हटले, " गेल्या वीस वर्षांत माझ्या दृष्टिकोणात, अनुभवात, पदार्थ करण्याच्या पद्धतीत खूपच परिवर्तन घडून आले आहे. त्यामुळे ही आवृत्ती काढताना नव्यानेच पुन्हा लिहून काढण्याचे मी ठरवले. मॅन्यू ठरवण्यापासून तो पाककृती लिहिण्याच्या पद्धतीतही त्यामुळे फरक पडत गेला आहे.

या पुस्तकात लॅटिन अमेरिकन आणि अतिपूर्वेकडील देश यांमधील प्रादेशिक पाकशास्त्राचा प्रभाव जाणवतो, परंतु मूळ अमेरिकन ग्रामीण भागातील खाद्य-पदार्थही त्यात मोठ्या प्रमाणावर आलेले आहेत. जेम्स बियर्डच्या भूमिकेत वीस वर्षांच्या अनुभवाने फरक काय पडला ? त्याने म्हटले आहे : " पूर्वी अमूकच पदार्थ घ्या, तमुकच प्रमाण घ्या असे मी आग्रहपूर्वक ठासून सांगत असे. परंतु आता माझ्या दृष्टिकोणात लवचिकपणा आला आहे. कुठल्याही पदार्थाच्या सिद्धतेत त्यातील घटकांचे प्रमाण कमीजास्त करता येते; काही घटकही बदलता येतात; ते एकत्र करण्याच्या पद्धतीतही लवचिकपणा राहू शकतो; एकूण जेवणाचा मेन्यू ठरवतानाही तोचतोपणा टाळण्याकडे माझा कल आता जास्त असतो. पूर्वी वाटे— एखादी डिश निर्दोष व रुचकर होण्यासाठी ती अमूक एका पद्धतीनेच करायला हवी. परंतु आता माझी वृत्ती अधिक प्रयोगशील आहे. कुठलेही नवे

घटक व प्रमाण यांचा वापर करताना ' आपण असे का करून बघू नये ? ' असा विचार माझ्या मनात असतो."

या नव्या प्रयोगवादी पाककलापटूने पूर्वीच्या अनेक डिशेसमध्ये त्यामुळे बदल करून नवनव्या डिशेस पेश केल्या आहेत. फ्रेंच प्रॉव्हेन्समधील वाइनमिश्रित स्टयूचे ( दॉब-Daube ) सहा प्रकार त्याने सादर केले आहेत. तसेच फ्रेंच सीफूड सॉसेन, लसूण-लवंग मिश्रित रोस्ट चिकन, डक, पावट्याचे व फॉइ ग्रासचे सॅलड, पुदिना घातलेले ताजे सारडाइन्स या सर्व डिसेसमध्ये ताज्या भाज्या, ताजे पदार्थ, स्वाभाविक स्वाद आणि त्यांची परस्पर विरुद्ध चवींच्या पदार्थांचे अनपेक्षित मिश्रण – यावर भर देण्यात आला आहे. " विअर्डला वाटतेय की, उत्तमोत्तम खाद्यपदार्थांचे आता स्वागत करण्यासाठी जगभरचे खवैय्ये सिद्ध आहेत. त्यामुळे माझ्यासारख्याला सगळ्या जगभरच्या पाककलांची माहिती घेण्याचे आव्हान मिळाले आहे असे वाटते."

' बेटी ग्रॉफ्स कंट्री गुडनेस कुकबुक ' हे प्रामुख्याने अमेरिकेतील पेनसिल्वानिया संस्थानातील पारंपरिक डच खाद्यपदार्थांची माहिती देते. हे डच लोक चोखंदळ खवैय्ये आहेत आणि आपली खाद्यपरंपरा अत्यंत कडवेपणाने जतन करण्यात त्यांनी कसूर केलेली नाही. स्वतः बेटी ग्राफ ही पेनसिल्वानियात स्थायिक होणाऱ्या आद्य जर्मन-स्विस कुटुंबापैकी असून, तिने पारंपरिक डिशेसची माहिती परिश्रमपूर्वक जमवली आहे. हासेनफेफर ( रॅबिट स्टयू ), रिनत्झ अँड नेप ( सफरचंद उकळत्या पाण्यात उकळून तयार केलेले ' डम्पलिंग ' लाडू ), शूफ्लाय पाय, सॉवर क्रॉट केक, ॲमिश व्हॅनिला पाय वगैरे डिशेसची वर्णनेही आपल्याला गुदगुल्या करू लागतात. मातीत भाजलेले कबुतराचे ब्रेस्ट, लँब क्राऊन रोस्ट वुइथ क्रीम हे पंचतारांकित हॉटेलातच मिळावे इतके भारी असते !

स्वादिष्ट पाय ही एकच डिश पूर्णतया पोट भरायला समर्थ असते. पेस्ट्री, पिट्टा, पिझ्झा वगैरेही डिशेस या वर्गात मोडतात. एक मोठा पिझ्झा खाल्ला की, मग इतर पदार्थांसाठी पोटात जागाच उरत नाही. अशा बहुगुणी पिझ्झांच्या आणि ' पाय ' च्या जगात नेणारे ' दि वंडरफुल वर्ल्ड ऑफ पियाज, क्विचेस अँड सेव्हरी पाइज ' हे पुस्तक ॲना टेरेसा कॅलेनने तयार केले आहे. इटालियन पिझ्झाशी दक्षिण फ्रान्समधील पिझ्झालेदियर आणि स्वित्झर्लंडमधील झिवेलवाहे हे पदार्थ मिळतेजुळते आहेत. पिझ्झाच्या शंभरावर प्रकारांचे वर्णन या पुस्तकात आहे.

रशियन कुलेबिआका, ग्रीसचा स्पॅनकोपिता, हंगेरीचा कापोत्झतास, पोगाक्सा, इजिप्शियन इफ्लागुन, मोरोक्कोचा वी-स्टीला यांचेही पिझाशी नाते जुळते. आपल्याकडचे टोमॅटो आम्लेट, उत्तप्पा, दोसा, थालिपीठ, मालपुआ, चिलडा ( राजस्थानी ) वगैरे पदार्थही या सदरात बसतील.

ॲना टेरेसा कॅलेनने दिलेल्या काही डिशेस ग्रामीण भागातील काही विशिष्ट इन्समध्येच आढळतात. ख्रिस्ताचे वय त्याच्या मृत्यूच्या वेळी ३३ वर्षांचे होते. हे दाखवण्यासाठी इटलीमध्ये ईस्टरच्या वेळी जो पाय तयार करतात, त्यात ३३ थर असतात. ॲरोराज पिलो ( अरोराची उशी ) हा गोड पदार्थ ( पेस्ट्री ) फीझंट, वील, डुकराचे मांस, कोगनॅकमस, फोई ग्रास आणि ट्रुफल्स घालून तळून काढतात. स्पेनमधील स्पिनाक पॅनकेकही असाच रुचकर असतो. त्याचे नाव मात्र ' पिनाभाटिओहुकाइसेट ' असे लांबलचक आहे. ते उच्चारण्यापेक्षा तो पदार्थ तोंडात टाकणे सुलभ !

**ॲना, डॅम हर !**

दि यांकी मॅगेझिन कुकबुक हे नावाप्रमाणेच अमेरिकन पाकशास्त्रावर प्रकाश टाकणारे आहे. बायकोने केलेले नेहमीचे मक्याचे पदार्थ आणि मळीचे पॅरिज खाऊन कंटाळलेल्या एका गृहस्थाने त्यात पीठ, अंडी, ईस्ट वगैरे घालून ओव्हन-मध्ये भाजून त्याचा ब्रेड बनवला आणि तो चांगला खमंग बनलेला बघून, बायकोच्या नावाने ' ॲना, डॅम हर ! ' असे उद्‌गार काढले. त्या ब्रेडला ॲना डॅम हेच नाव पडले आणि आजही घराघरांतून या ब्रेडचा आस्वाद घेतला जातो. अशासारखे अनेक किस्से या पुस्तकात आढळतात.

मी काही पाकशास्त्राचा अभ्यासक नाही. मला स्वतःला चहा सोडल्यास कुठलेही पदार्थ करता येत नाहीत. अमेरिकेत असताना अर्धवट शिजवलेले रेडी टू सर्व्ह पदार्थ गरम करून खाण्याचाही प्रसंग येई तेव्हा थोडेफार प्रयोग चालत. परंतु पाकशास्त्रावरील पुस्तके कधी हाती लागली तर ती अधाशीपणे चाळण्यात मात्र गंमत वाटते. त्याबद्दल कुठे काही लक्षवेधक मजकूर वाचायला मिळाला तर उत्सुकता चाळवली जाते. हे साहित्य नित्यनेमाने पोटाला मिळते म्हणून तर कथा-कादंबऱ्यांसारखे साहित्य पचवता येते.

१-४-८९

# १७

## दुर्मिळ ग्रंथांची मौल्यवान दुनिया

एडगर ॲलन पो या प्रसिद्ध लेखकाच्या 'टॅमरलेन अँड अदर पोएम्स' या चाळीस पृष्ठांच्या १८२७ साली प्रसिद्ध झालेल्या पुस्तकाच्या एका प्रतीची किंमत ४० लाख रुपये येईल असे आपल्याला कोणी सांगितले तर खरे वाटेल का? दुर्मिळ पुस्तकांचा संग्रह करणारे जे खास शौकिन आहेत ते या चाळीस पृष्ठांच्या पुस्तकाच्या एकेका पृष्ठासाठी एकेक लाख रुपये मोजायला तयार आहेत; आणि अशा दुर्मिळ पुस्तकांच्या बाबतीत त्यांच्या अस्सलपणाची खातरजमा करून देणाऱ्या व लिलाव करणाऱ्या काही मातब्बर प्रकाशन संस्थाही युरोप-अमेरिकेत आहेत. 'टॅमरलेन'मधील कविता एडगर ॲलन पो याने वयाच्या चौदाव्या वर्षी म्हणजे १८२१ मध्ये लिहिल्या. त्या त्याच्या २१ व्या वर्षी म्हणजे १८२७ साली प्रसिद्ध झाल्या. या आवृत्तीच्या त्या वेळीही मोजक्याच प्रती निघाल्या. आज त्या आवृत्तीच्या फक्त डझनभर प्रती उपलब्ध असाव्यात असा जाणकारांचा कयास आहे. १९५४ मध्ये या पुस्तकाची एक प्रत एका जाणकाराच्या हाती आली; ती १९७४ साली एक लाख तेवीस हजार डॉलर्सना विकली गेली. नुकतीच एका गृहस्थाला न्यू हॅंपशायरमधल्या एका गोठ्यात खते, औजारे आणि जुनेपुराणे कागदपत्र ठेवलेल्या एका पेटीत टॅमरलेनची ही प्रत सापडली; ती एका रद्दीच्या दुकानदाराने १५ डॉलर्सना विकत घेतली; आणि येत्या जूनमध्ये होणाऱ्या लिलावात जी प्रत ३ लाख डॉलर्सपेक्षाही जास्त किंमतीला विकली जाईल असा न्यूयॉर्कच्या सोथेबी या दुर्मिळ ग्रंथांचा व्यवहार करणाऱ्या लिलाव कंपनीचा अंदाज

आहे. ही नवीन सापडलेली प्रत अत्यंत नीटनेटक्या अवस्थेत आहे. तिच्या पहिल्या पृष्ठावर कवीच्या नावाऐवजी फक्त ' ए बॉस्टॅनियन ' असा निर्देश असून, प्रस्तावनेत म्हटले आहे की " या कविता छापण्यासाठी कोणीही प्रकाशक पुढे आला नाही; त्यामुळे त्या प्रकाशकांसाठी नाहीत. त्या आता प्रसिद्ध का केल्या जात आहेत याचे सोयरसुतक त्या लिहिणाऱ्या कवीखेरीज इतर कोणाला असण्याचे कारण नाही. "

## सौंदर्यवादाचा पुरस्कर्ता

एडगर ॲलन पो, हा प्रतिभावंत होताच. त्याने कवितांबरोबर कथा आणि समीक्षात्मक लेखनही केले. पत्रकार, संपादक म्हणूनही काम केले. टेल्स ऑफ ग्रोटेक्स अँड ॲराबेस्क, दि गोल्ड बग, दि रॅव्हेन अँड अदर पोएम्स वगैरे त्याची पुस्तके चांगली गाजली. १८४९ मध्ये बाल्टिमोर येथे गेला असताना निवडणुकीच्या एका सभेत झालेल्या गोंधळात तो अडकला आणि बेशुद्ध पडला. पुन्हा तो शुद्धीवर आलाच नाही. त्याच्या मृत्यूचे गूढ उकललेच नाही. ' कलेसाठी कला ' वादाचा पो हा पुरस्कर्ता होता; आणि त्याच्या सौंदर्यवादाच्या कल्पना आणि कथाकविता सफाईदार करण्यासाठी तो घेत असेल ती मेहनत—यांचा युरोप अमेरिकेतील कवि-लेखकांवर फारच प्रभाव पडला.

## वृत्तपत्राला १२ हजार पौंड किंमत

बीटल्स या गाजलेल्या चौकडीपैकी जॉन लेनॉन हा १९८० साली गोळ्या झाडल्याने वयाच्या ४० व्या वर्षी मरण पावला.

लेनॉनने शाळेत शिकत असताना आपल्या वहीत एक चार पानी वृत्तपत्राची नक्कल लिहून काढली आणि त्याला ' दि डेली हॉउल ' असे नाव दिले. किंमत एक पेनी असे लिहिले. त्यात त्याने गमतीदार विनोदी विडंबनात्मक मजकूर, कविता आणि व्यंगचित्रे यांचा समावेश केला होता. सोथेबी लेनॉनच्या जीवनातील ही एक लक्षणीय शैलीदार करामत आहे असे म्हटले; आणि त्याच्या उत्तरायुष्यातील लेखनाशी त्याचे घनिष्ठ नाते आहे असे मत प्रकट केले. हे चार पृष्ठांचे हस्तलिखित वृत्तपत्र ७ एप्रिल १९८८ रोजी लंडनला सोथेबीच्या लिलावात १२ हजार पौंडांना विकले गेले.

याच लिलावाच्या वेळी त्याच्या तीन कवितांची हस्तलिखितेदेखील विकण्यात आली. १९६४ मध्ये त्याने लिहिलेल्या 'इफ आय फेल' या गीताचे हस्तलिखित ७ हजार ८०० पौंडांना विकले गेले. 'एनी टाईम अॅट ऑल'चे हस्तलिखित ६ हजार पौंडांना विकले गेले तर जपानच्या बीटल्स फॅनक्लबने उपग्रहाद्वारे या लिलावात भाग घेऊन त्याच्या काही वस्तू ८ हजार पौंडांना विकत घेतल्या. लेनॉनची एक गिटार तर १५ हजार पौंडांना मागितली गेली. लेनॉनची पत्नी योमो ओनो ही जपानी होती.

### लेनिनचे घड्याळ/१४ लाख रुपये

१२ एप्रिल १९८७ रोजी लेनिनचे चांदीचे घड्याळ म्युनिचमधील एका लिलावात १ लाख ३ हजार डॉलर्सना म्हणजे सुमारे १४ लाख रुपयांना विकले गेले. रशियन झारच्या वापरातील या घड्याळावर कोयताविळा कोरून घेऊन लेनिन ते १९१८ पर्यंत वापरत होता. त्याच लिलावात जर्मन कम्युनिस्ट पक्षाच्या संदर्भातील १५ ऐतिहासिक पत्रे (सन १९१८-१९) चौदा हजार डॉलर्सना विकली गेली.

### प्राचीन ग्रंथांची दरवर्षी जत्रा

युरोप-अमेरिकेतील अनेक श्रीमंत व्यक्ती प्राचीन व दुर्मिळ चित्रे, शिल्पकृती, जुन्या मूर्ती, प्राचीन कलावस्तू वगैरेंचा संग्रह करण्यासाठी भरपूर पैसे देऊन मिळतील त्या कलाकृती घेण्यासाठी उत्सुक असतात. अशा वस्तूंबरोबर पुस्तकांची हस्तलिखिते आणि पहिल्या आवृत्तीच्या कोऱ्या करकरीत प्रती यांचाही संग्रह करण्याकडे सध्या वाढता कल दिसतो. लेखकांची पत्रे, हस्तलिखितांचे कच्चे मसुदे वगैरेंनाही सध्या चांगली मागणी आहे. अशा जुन्या व प्राचीन ग्रंथांची, हस्तलिखितांची व प्रथम आवृत्तीच्या प्रतींची दरवर्षी सूची प्रसिद्ध होते; आणि दरवर्षी इंटरनॅशनल बुक अॅन्टीक्वेरियन फेअर (आंतरराष्ट्रीय प्राचीन ग्रंथजत्रा) अमेरिकत भरत असते. त्या वेळी जगातले धनिक पुस्तक-संग्राहक स्वतः हजर राहतात वा आपल्या एजंटामार्फत जुनी, दुर्मिळ पुस्तके खरेदी करण्यासाठी लिलावात भाग घेतात. एकेका जत्रेत कोट्यवधी रुपयांची उलाढाल होते आणि जगाच्या कानाकोपऱ्यातून गोळा केलेली हस्तलिखितें तेथे बघायला मिळतात.

सध्या शेअर मार्केट गडगडलेले असल्याने बरेच श्रीमंत लोक शेअरऐवजी कलावस्तू आणि प्राचीन ग्रंथ वगैरे दुर्मिळ गोष्टींत गुंतवणूक करणे श्रेयस्कर समजतात.

### हेमिंग्वेची पत्रे

हेमिंग्वेने आपल्या वडिलांना १९२० ते २८ च्या दरम्यान लिहिलेली ३० पत्रे व कार्डे ६५ हजार डॉलर्सना अशा एका लिलावात दहा वर्षांपूर्वी एकाने विकत घेतली. पहिल्या महायुद्धात तो आघाडीवर असताना जे बायबलचे पुस्तक सतत जवळ बाळगत असे, ते बायबलही ४५०० डॉलर्सना विकले गेले. एवढेच नव्हे तर शाळेत शिकत असताना ९ वर्षे वयाच्या हेमिंग्वेचे तेथील अॅक्वेरियममधील गोल्डफिशला एका क्लॅमने कसे पकडले याचे वर्णन करणारी वहीची दोन पाने देखील २७५० डॉलर्सला एका हेमिंग्वेच्या भक्ताने घेतली. विल्यम कार्लोस विल्यम्स याच्या कवितांचे पहिले पुस्तकही दुर्मिळ असल्याने १६ हजार डॉलर्स कमावून गेले. फॉकनेरच्या दि मार्बल फॉनच्या पहिल्या आवृत्तीची प्रत ६२५० डॉलर्सना विकली गेली. १९३६ साली ज्या फिटस जेरॉल्डला संबंध वर्षात ८१ डॉलर्स रॉयल्टीपोटी मिळाले; त्याच्याच दि ग्रेट गॅट्स्बी या पुस्तकाच्या पहिल्या आवृत्तीची त्याने सही केलेली प्रत १९७६ साली ४२५० डॉलर्स मिळवून गेली. १९२० ते ३० दरम्यानच्या अशा अनेक पुस्तकांच्या पहिल्या आवृत्त्यांच्या चांगल्या प्रतींना पाचदहा हजार डॉलर्स किंमत आज सहज मिळू शकते.

### पहिल्या आवृत्तीच्या प्रतींना भाव

पहिल्या आवृत्तीच्या प्रती दुर्मिळ का मानल्या जातात ? आणि त्यांनाच ग्रंथसंग्राहकाच्या दृष्टीने असे महत्त्व का मिळते ? अमेरिकेत साधारणपणे प्रथम आवृत्तीच्या ५ हजार प्रती निघतात; त्यातील ४ हजार प्रती वाचनालयांना विकल्या जातात. त्यावर वाचनालयांचा शिक्का मारला गेला की ग्रंथसंग्राहकाच्या दृष्टीने त्या बाद ठरतात. उरलेल्या हजार प्रतींपैकी परीक्षणे, भेटी वगैरेदाखल तीनशेवर प्रती जातात. किरकोळ दुकानदारांकडून विकल्या गेलेल्या व वैयक्तिक ग्राहकांनी घेतलेल्या प्रतींपैकी काहीच प्रती काळाच्या ओघात नीटनेटक्या राहतात आणि अशा दुर्मिळ झालेल्या प्रतींना पुढे कालांतराने भाव येतो. लेखकाची लोकप्रियता, त्याच्या भोवती असलेले वलय, समीक्षकांना त्याचे वाटणारे मोल

यावर अशा प्रथमावृत्तीच्या पुस्तकांची किंमत कमीजास्त होत जाते.

## दुर्मिळ ग्रंथांची सूची

जॅक मॅथ्यूज् या कादंबरीकाराला ग्रंथसंग्रहाचा नाद आहे. तो अशा लिलावात सहसा भाग घेत नाही. कारण लिलावात पुस्तकांच्या किंमती उगाच अवाच्यासवा बोलल्या जातात. लिलाव बोलणाऱ्या व्यक्ती त्या अहमहमिकेने बोली वाढवत जातात; त्याचे म्हणणे असे की किरकोळ पुस्तकांच्या दुकानातच अशी पुस्तके स्वस्तात उपलब्ध होतात. अँटिक्वेरियन बुक्सच्या यादीत ज्या पुस्तकांच्या किंमती शंभर डॉलरवर असतात ती पुस्तकेही अशा दुकानात त्यावरील छापील किंमतीला वा क्वचित् रद्दीच्या भावातही मिळतात. जॅक मॅथ्यूजने ' कलेक्टिंग रेअर बुक्स फॉर प्लेझर अँड प्रॉफिट ' हे पुस्तकच लिहून प्रकाशित केले आहे. नेहमी पुस्तके विकत घेऊन संग्रही बाळगणारे ग्राहकच कालांतराने ग्रंथसंकलक होतात. पहिल्या आवृत्तीच्या प्रती त्यांच्या शेल्फवर वा कपाटात जाऊन विराजमान होतात. एकदा वाचून झाल्या की त्यांना अनेकदा पुन्हा हातही लावला जात नाही. साहजिकच ती पुस्तके अगदी कोरी करकरीत राहतात. संग्राहकांच्या दृष्टीने अशी पुस्तके म्हणजे सोन्याचे अंडे देणारी कोंबडीच ठरते !

१९२०–३० मध्ये प्रकाशित झालेली पुस्तकेच असा भाव मिळवतात असा समज करून घेण्याचे मात्र कारण नाही. १९६१ मध्ये जोसेफ हेलरची कॅच–२२ ही अमेरिकन सैनिकी बराकीचे गमतीदार चित्रण करणारी कादंबरी प्रसिद्ध झाली. आज तिच्या पहिल्या आवृत्तीच्या प्रतीची किंमत दोनशे डॉलर सांगण्यात येते. सॉल बेलो या नोबेल पारितोषिक विजेत्याच्या डँगलिंग मॅन, दि व्हिक्टिम वगैरे पुस्तकांच्या प्रथमावृत्तींनाही असाच भाव मिळतो.

## शास्त्रीय ग्रंथही भाव खातात

जुनी शास्त्रीय विषयांवरील पुस्तके आणि चित्रकला वगैरे विषयांवरील पुस्तकेही संग्राहकांच्या दृष्टीने मोठीच पर्वणी होय. न्यूटनच्या ' दि मेथड ऑफ फ्लुक्शिअन्स अँड इन्फिनिट सेरीज ' या १७३६ साली प्रसिद्ध झालेल्या पुस्तकाची किंमत आज एक लाख रुपयांच्या घरात आहे. १९४७ मध्ये हेन्री मॅतिसा या चित्रकाराचे ' जाझ ' हे चित्रमय पुस्तक प्रसिद्ध झाले. त्याची किंमत वीस हजार

डॉलर्स करण्यात आली आहे. मॅतिसाने त्याची आवृत्ती अगदी मोजक्याच प्रतींची काढलेली होती.

**हेर आणि विक्रेते मागावर**

अशा दुर्मिळ पुस्तकांच्या मागावर अनेक हेर आणि जागरूक विक्रेते सतत असतात. वस्तूची किंमत ती हवीशी वाटणाऱ्याच्या गरजेवरून, तीव्र इच्छेवरून ठरते. हौसेला मोल नसते. तसे दुर्मिळ वस्तू संग्रही हवीच असे एकदा मनात आले की मग तिच्यासाठी किती किंमत द्यावी याला काही धरबंद उरत नाहीत. इंग्लंड-अमेरिकेत दुर्मिळ प्राचीन ग्रंथांचा लिलाव करणारी सर्वांत मोठी संस्था सोथेबी ही असून, हस्तलिखिताचा वा पुस्तकाचा अस्सलपणा पारखण्याची यंत्रणाही तिने जय्यत उभी केली आहे. पुस्तकांच्या अशा संग्राहकांना फायदा होतोच असे नाही. काहींचे संग्रह काळाच्या ओघात नष्ट होतात; त्यांचा त्यातील रस कमी होतो. आपल्याकडे अनेकांनी हौसेने आयुष्यभर जमवलेले ग्रंथ शेवटी कुठल्यातरी विद्यापीठाच्या वा ग्रंथालयाच्या कपाटात धूळखात बंदिवान होऊन पडतात. जी. ए. कुलकर्णी यांच्यासारखा चोखंदळ वाचकही परिश्रमपूर्वक जमा केलेले ग्रंथ रद्दीच्या दुकानदाराला विकून टाकतो.

दुर्मिळ पुस्तकांचा संग्रह करणे, प्राचीन पुस्तके मिळवणे हा आपल्याकडे हौसेचाच भाग राहिलेला आहे. त्यासाठी फार मोठे मोल मोजायची कोणाची तयारी नसते. तसे लिलाव करण्याचीही प्रथा अजून आपल्याकडे सुरू झालेली नाही. मर्यादित प्रतींची आवृत्ती ही कल्पनाही आपल्याकडे हास्यास्पद ठरते. कारण हजार प्रतींची आवृत्ती हीच आपली बहुसंख्य मराठी पुस्तकांची लक्ष्मणरेषा ठरते.

या मर्यादित आवृत्तीच्या कल्पनेची मराठी ग्रंथविश्वात कशी शोकांतिका होते याचे उदाहरण म्हणून विश्राम बेडेकर यांच्या ब्रह्मकुमारी नाटकाचे देता येईल. साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष म्हणून बेडेकरांची निवड झाल्यावर पॉप्युलर प्रकाशनचे रामदास भटकळ यांनी त्याची नवी आवृत्ती काढायचे ठरवले. पहिल्या आवृत्तीला ४० वर्षे झालेली होती. ऑफसेटने मुळाबरहुकूम नवी आवृत्ती छापली. प्रती फक्त ५००. प्रत्येक प्रतीवर क्रमांक आणि लेखकाची स्वाक्षरी. 'कलेक्टर्स आयटेम्' या दृष्टीने ही खास आवृत्ती काढल्याचा आणि मराठीत एक नवा पायंडा पाडल्याचा अभिमान भटकळांना वाटत होता. परंतु गंमत अशी की

संमेलनाच्या वेळी दहा प्रतीही या नाटकाच्या विकल्या गेल्या नाहीत. इंग्लंड–अमेरिकेप्रमाणे हजार-पाचशे डॉलर्स देऊन आपले वेगळेपण व वैभव प्रकट करण्याचे मराठी उद्योगपतींना आणि धनिकांनाही वावडेच आहे! पंचतारांकित हॉटेलात एका पार्टीसाठी पाचदहा हजार रुपये खर्च करताना मात्र त्यांना कृत-कृत्यता वाटत असते...युरोप-अमेरिकेतील ग्रंथसंग्राहकांची अशी उदार उदाहरणे बघून तरी आपल्यापैकी धनिक मंडळींना दुर्मिळ ग्रंथसंग्रहाची प्रेरणा मिळावी! नामवंत लेखकांच्या गाजलेल्या पुस्तकांची हस्तलिखिते मिळवून ती उत्तम प्रकारे जतन करावी; लेखक-कवींचा पत्रव्यवहार मिळवून त्याचे वर्गीकरण करून तोही अभ्यासकांना उपलब्ध करून द्यावा. आपले सरकार इतके असंस्कृत आहे की त्याकडून काही अपेक्षा करणे चूकच आहे. तेव्हा दूरदर्शी व संस्कृतिप्रेमी मराठी धनिकांनी व संस्थांनी याबाबत पुढाकार का घेऊ नये?

# १८

# झपाटेबंद पण सुमार

बाबा कदम, चंद्रकांत काकोडकर, कुमुदिनी रांगणेकर, चिंतामणी लागू, सुहास शिरवळकर, अनंत तिबिले, श्रीकांत सिनकर, अरुण हरकारे, गुरुनाथ नाईक, कुसुम अभ्यंकर, प्रभाकर दिघे, अशोक थोरे वगैरे लेखकांच्या पुस्तकांना वाचनालयांची विशेष मागणी असते आणि हे ' लोकप्रिय ' लेखक मानले जातात. त्यांच्या पुस्तकांकडे समीक्षेने विशेष लक्ष दिलेले नाही. किंबहुना दुर्लक्षच केलेले आहे. याचे कारण कदाचित असेही असेल की हे सर्व लेखक एकामागोमाग एक अगदी झपाट्याने पुस्तके बाहेर काढत असतात. त्यांपैकी काहींनी अल्पकाळात ग्रंथशतके झळकावलेली आहेत.

चिंतामणी लागूंनी गेल्या ११ वर्षांत ११० कादंबऱ्या प्रसिद्ध केल्या. सुहास शिरवळकरांनी २०० रहस्यकथा व ५० सामाजिक कादंबऱ्या गेल्या बारा वर्षांत बाजारात टाकल्या. कुसुम अभ्यंकरांनी अवघ्या ५–६ वर्षांत तीसेक पुस्तके प्रसिद्ध केली. त्यांच्या अकाली निधनाने त्यांच्या लेखनाला अवेळीच पूर्णविराम मिळाला. अनंत तिबिले यांच्या शंभराव्या पुस्तकाचा प्रकाशनसमारंभ नुकताच संपन्न झाला. गुरुनाथ नाईक, शरच्चंद्र वाळिंबे वगैरेंनी रहस्यकथांवर भर दिल्याने त्याची गंभीरपणे दखल घेतली जात नाही. श्रीकांत सिनकर यांच्या गुन्हेगार कथांना मराठीपेक्षाही हिंदीत मोठा भाव मिळतो. कुमुदिनी रांगणेकर या सत्तरी-तील लेखिका असून त्यांचे अनुवादित-रूपांतरित कादंबऱ्यांचे झपाटेबंद लेखन चालूच आहे. चंद्रकांत काकोडकर यांनी १९६५–७५ या कालखंडात चांगलेच

अधिराज्य सर्वसामान्य वाचकवर्गावर गाजवले. स्वतःच्याच कादंबऱ्यांचा दिवाळी अंक काढण्याचाही उपक्रम त्यांनी चालवला. शरद्बाबूंच्या धर्तीवरील बंगाली कादंबऱ्यांचीही त्यांनी मोठ्या प्रमाणावर निर्मिती केली. बाबा कदम यांच्या ५८ कादंबऱ्या प्रसिद्ध झालेल्या आहेत आणि त्यांपैकी अनेकांच्या एकापेक्षा अधिक आवृत्त्या निघालेल्या आहेत.

## खटल्यांतून कादंबऱ्यांचे विषय

लोकप्रिय कादंबरीकारांमध्ये बाबा कदम हे आर्थिकदृष्ट्या सर्वांत जास्त यशस्वी लेखक आहेत असे म्हणता येईल. सरकारी वकील म्हणून अठ्ठावीस वर्षांत २८ हजार खटले चालविले. त्या खटल्यांतून कादंबऱ्यांची कथानके गवसली असे बाबा कदम म्हणतात. गुन्हेगारी, कोर्टकचेऱ्या यांची पार्श्वभूमी अनेक कादंबऱ्यांना असली तरी गुन्हेगारीचे समर्थन आपण कधीच केले नाही. लैंगिकता, हिंसाचार टाकूनही वाचनीय लेखन करता येते, असे त्यांचे मत आहे.

अरुण हरकारे यांनी पाच-सहा वर्षांत तीस कादंबऱ्या लिहून स्वतःच प्रसिद्ध केल्या. त्यातील कीड, कोंडी, कर्तव्य आणि पैसा, काळं मन सुंदर चेहरा, काळा फळा पांढरा खडू वगैरे कादंबऱ्या अनेकांना वाचनीय वाटल्या. बरीचशी रूपांतरेही त्यांनी केली आहेत. मूळ कृतींची नावे शक्यतो देण्याचे टाळले आहे. इतरही बहुप्रसव लेखकांच्या बाबतीत हीच शंका घेण्याला जागा राहते. महिन्याला एकदोन कादंबऱ्या लिहिणे ही काही सोपी गोष्ट नव्हे. तेव्हा कुठल्यातरी अन्य कथाकल्पनांचा आधार घेण्याची प्रवृत्ती प्रबळ राहणारच.

## सोयीस्कर अळीमिळी गुपचिळी

कदाचित या कारणामुळेही असेल, झपाट्याने लेखन करणाऱ्या आणि वाचनालयातून अधिक वाचल्या जाणाऱ्या, पुस्तकांपेक्षा लेखकाच्या नावाने मागणी केल्या जाणाऱ्या (सुहास शिरवळकरांचं एखादं पुस्तक द्या, काकोडकरांची कादंबरी द्या) लेखकांच्या पुस्तकांकडे स्वतंत्र कलाकृती म्हणून पाहण्याची व त्यांच्या गुणावगुणांची चर्चा करण्याची प्रेरणा जागरूक अभ्यासकांनाही होत नाही. वाङ्मयचौर्य सारेच करतात असे नाही. परंतु बरीच पुस्तके ही रूपांतरित, भाषांतरित व आधारित

असावीत या केवळ कल्पनेनेही समीक्षक त्यांजकडे दुर्लक्ष करतात. वाचकाला केवळ वेळ जावा म्हणून मनोरंजक काहीतरी वाचायला हवे असते; त्याला बोअर न होता पुस्तक वाचता आले की झाले, तो त्या पुस्तकांची कथा परदेशी पुस्तकांवरून घेतली आहे की लेखकाच्या प्रगल्भ प्रतिभेचा आविष्कार आहे याचा शहानिशा करीत बसत नाही. बऱ्याचशा वाचनालयांतून पुस्तके, मासिके घेणाऱ्या वाचकांत गृहिणींची संख्या मोठी असते. नवरा ऑफिसात गेल्यावर, मुले शाळेत गेल्यावर मोकळा वेळ मिळतो. त्या वेळी काहीतरी मनोरंजनपर कथा-कादंबऱ्या, हलक्याफुलक्या गोष्टी वाचायला बरे वाटते. अशा बायकांचा मोठा वाचकवर्ग आज निर्माण झाला आहे.

**लोकप्रिय म्हणजे काय ?**

अर्थात अशा लेखकांच्या कादंबऱ्या वाचकांना आवडतात. लोकप्रिय असतात या विधानाच्या मर्यादाही मराठी साहित्यक्षेत्राच्या दृष्टीनेही सहज लक्षात येतात. यांपैकी फारच थोड्या पुस्तकांच्या एकापेक्षा अधिक आवृत्त्या निघालेल्या दिसतात. स्थिर खप होणाऱ्या पुस्तकाच्या यादीत ती येत नाहीत. त्यांची पहिली आवृत्तीही हजार-दोन हजार प्रतींचीच असते. पाच-दहा वा पंचवीस-तीस हजारांची नसते. ( अपवाद थोडे असणारच ) हे लेखक सातत्याने लिहीत असतात आणि एकापाठोपाठ एक पुस्तकं येत राहिल्याने वाचक ती पुस्तके वाचत राहतात. किमान रंजकता त्यात असते. खूप पुस्तके लिहितात ते लेखक वाचकप्रिय ठरतात. त्यांच्या प्रत्येक पुस्तकांच्या वर्षानुवर्षे नव्या आवृत्त्या निघतात किंवा एकेक आवृत्ती दहावीस हजारांची निघते किंवा खपाचा उच्चांक केला या अर्थाने त्यांना ‘ लोकप्रिय ’ असे म्हटले जाते असा गैरसमज करून घेण्याचे कारण नाही.

काही जुनी पुस्तके हे लेखक नव्या नावांनी वा नव्या परिवेशात सादर करतात. तेव्हाही वाचकांची विशेष तक्रार नसते. कारण त्या त्या वेळी ते पुस्तक वाचून मोकळे झाल्यावर वाचक त्याचा स्वंथ करीत बसत नाहीत. आधी वाचलेली कादंबरी पुन्हा चुकून वाचनालयातून आणली गेली तरी अर्धीअधिक वाचून झाल्यावर ‘ अरे ही कादंबरी आपण वाचलेली दिसतेय ’ असा शोध त्यांना लागतो. अशीही कितीतरी उदाहरणे सापडतील. यांपैकी एखादा लेखक तर एकच कादंबरी वेगवेगळ्या प्रकाशकांना वेगवेगळ्या नावांनी काढायला देतो, तरी

त्या प्रकाशकांना पत्ता लागत नाही आणि लेखकालाही त्याची लाज वाटत नाही, असाही अनुभव आहे. नवनवे हौशी प्रकाशक अशा लोकप्रिय लेखकांच्या मागे असतात. त्यामुळे अशी चलाखी जमूनही जाते.

### न लिहिले तर चुटपुट वाटेल

वाचकांवर या लेखकांच्या पुस्तकांचा प्रभाव पडतो का? कितपत पडतो? जी. ए. कुलकर्णींच्या कथा वाचून झाल्यावरही मनात घोळत राहतात, पिच्छा पुरवतात तसा काही अनुभव या लोकप्रिय लेखकांच्या एखाद्या कृतीबाबत येतो का? अशा लोकप्रिय लेखकाने बऱ्याच दिवसांत काही नवे लिहिले नाही तर वाचकांना त्याबद्दल चुटपुट लागली आहे असे आढळते का? वाचकांना या लेखकांची अनुपस्थिती वा गैरहजेरी जाणवते का? चुकल्याचुकल्यासारखे वाटते का? आवडलेल्या एखाद्या कादंबरीतील अमुक नायिका माझ्या मैत्रिणीसारखी आहे, ही कथा तर माझ्याच जीवनात घडलेली आहे. तुम्हाला कशी कळली? त्या नायिकेचे पुढे काय झाले ते कळवा, त्या नायिकेला तुम्ही मध्येच का मारले वगैरे प्रतिक्रिया वाचक कळवतात तेव्हा अर्थातच त्या कादंबरीने वाचकांना कशा प्रकारे आकृष्ट केले आहे याचा शोध लागतो. कथानकातील गुंतागुंत, योगायोग, पार्श्वभूमीचे वेगळेपण, काही व्यक्तिरेखांचे आकर्षक चित्रण यामुळे या कादंबरीचे वाचन सर्वसामान्य वाचकांना सुखकर होऊ शकते. हे लेखक जीवनाचे नवे तत्त्वज्ञान प्रकट करतात, लेखनाचे नवे प्रयोग करतात, भाषाशैलीचे नवे रूप प्रकट करतात, अभिव्यक्तीचा नवा घाट शोधतात, प्रतिभेचा प्रभाव दाखवतात. परंतु त्या नवेपणाला व सामर्थ्याला काही मर्यादा असतात. त्यातील साहित्यगुण, त्यांचा कसदारपणा, त्यातील सांस्कृतिक अंतः-स्रोत यावर त्यांचे मोल ठरते. लोकप्रिय लेखकांच्या काही चांगल्या कादंबऱ्यांत नवनिर्मितीपेक्षा कारागिरीचा, क्रॉफ्ट्समनशिपचा प्रभाव जाणवतो आणि बहुतांश कादंबऱ्यांत सरधोपट सहजपणा आणि सपकपणा आढळतो. त्या लिहिताना त्यांनी काही विशेष मेहनत घेतलेली आहे वा काही वेगळ्या प्रकारच्या हाताळणीसाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केला आहे असे प्रत्ययाला येत नाही.

### ढिसाळपणाही खूप

वाचकप्रियतेचा हा सुलभ टप्पा सहजी गाठणारे अनेक लेखक आपण

निवडलेल्या कथावस्तूला वा विषयाला पूर्णत: न्याय देतात असेही नाही. त्या कथावस्तूच्या विषयाच्या स्वाभाविक सर्वांगीण विकासाकडे काटेकोर लक्ष देऊन, तिच्या विविध क्षमता पूर्णतया उपयोगात आणण्याऐवजी, योगायोग, अपघात वगैरे आणून ते कथानक कसेबसे गुंडाळण्याचाही मोह अनेकजण दाखवतात. कथावस्तूची तर्कसंगत, बंदिस्त, एकसंध उभारणी करण्यात हे लेखक पराकोटीचा ढिसाळपणा दाखवतात. अनेकदा आपल्या कथावस्तूसाठी निवडलेल्या पार्श्वभूमीचा सम्यक् वा साक्षात् परिचय नसल्याने तपशिलात भयानक चुकाही राहून जातात. काश्मीरला वा स्वित्झर्लंडला न जाता नायकनायिकांच्या तेथील प्रणयप्रसंगांची दृश्ये रंगवताना काही तपशिलाचे घोटाळे झाले तर कोणाचे लक्ष जाणार असेच ते मानतात. कोर्टाच्या कामाची वा पोलिसांच्या कार्यपद्धतीची माहिती करून न घेता, कोर्टाचे व पोलिसांचे प्रवेश लिहिले जातात तेव्हा त्यात काही वस्तुस्थितीशी विसंगत अशा गोष्टी येणारच.

## फॉर्म्युल्यावर भर

काही लेखक त्यांच्या एखाद्या विशिष्ट कलाकृतीपेक्षा त्यांच्या फॉर्म्युल्यामुळे वाचकांमध्ये प्रिय होतात, त्या लेखकाची एखादी कृती वेगळी काढून दाखवणे कठीण जाते; परंतु त्यांचे एकूण लेखन मात्र वाचकांना आवडत राहते. ना. सी. फडके यांच्या उत्तरकालीन प्रणयकथांतील ठरावीक त्रिकोणाचा फॉर्म्युला वाचकांनी स्वीकारला होता. पी. जी. वुडहाऊस यांची व्यापारी-व्यावसायिक पार्श्वभूमीवरील विनोदी कथानके आजही वाचकाला खिळवून ठेवतात. एकाच कथानकाभोवती सतत फेऱ्या घालत राहण्याची, वेगवेगळ्या कोनांतून बघण्याची लेखकाप्रमाणेच वाचकालाही जणू चटक लागते.

या वाचकप्रिय लेखकांची तुलना जर अन्य वाचकप्रिय पण अधिक साहित्यगुण असणाऱ्या लेखकांशी केली तर आणखी काही गोष्टी स्पष्ट होतील.

वसंत पुरुषोत्तम काळे, मधु मंगेश कर्णिक, ना. सं. इनामदार, शिवाजी सावंत, ज्योत्स्ना देवधर, रमेश मंत्री, रणजित देसाई, शं. ना. नवरे वगैरे साहित्यिक हे निश्चितच लोकप्रिय आहेत; आणि त्यांचे विपुल लेखन प्रसिद्ध झालेले आहे. या प्रत्येकाचे स्वत:चे असे खास वैशिष्ट्यही आहे. जीवनदृष्टीचे वेगळेपण, प्रादेशिक वा अन्य पार्श्वभूमीचे वेगळेपण, लेखनातील प्रयोगांचे वैविध्य व त्या

प्रयोगांच्या मुळाशी असणारे विशिष्ट भान, व्यक्तिरेखांचे वेगळेपण, लेखनातला सराईतपणा—एकूणच साहित्यगुणांचा अधिक प्रभाव आपल्याला जाणवतो. परंतु समीक्षक मात्र या सर्वांच्या लोकप्रियतेमुळे आणि लेखनाच्या झपाट्यामुळे काहीसे त्यांच्यापासून दूर जातात आणि त्यांचे एखाददुसरे पुस्तक वाचूनच त्यांच्यावर शिक्का मारून टाकतात. विपुल लेखन करणाऱ्यांकडे काहीसे तुच्छतेने वा उपेक्षेने बघितले जाते. व. पु. काळे यांची गोष्ट चटपटीत, चुरचुरीत, नाट्यपूर्ण, संभाषणातून फुलणारी, भावनांना साद घालणारी असणार, तेव्हा आता नवीन वेगळे असे ते काय दाखवणार असाच जणू मनोमन प्रश्न विचारून त्यांच्या नव्या कथा-कादंबऱ्यांकडे बिनधास्त कानाडोळा करण्याकडे त्यांचा कल असतो. जी. ए. कुलकर्णी, चिं. त्र्यं. खानोलकर, गंगाधर गाडगीळ, ग्रेस, ना. धों. महानोर, पु. शि. रेगे, कुसुमाग्रज, श्री. ना. पेंडसे, विजय तेंडुलकर, विश्राम बेडेकर, द. ग. गोडसे, माधव आचवल वगैरे लेखकांच्या संदर्भात ‘ ते काय व कसे लिहितात ते आम्हाला माहीत आहे, त्यांचे नवे काही वाचायची गरज आहे असे नाही ’ असे म्हणणे अवघड ठरते. उलट ते दरवेळी काहीतरी नवेच देणार, ते नवी उंची गाठतात की मध्येच कडमडतात हे बघण्यासाठी काही लोक टपून बसलेले असतात. अशा लेखकांचे फसलेले प्रयोगही चर्चेचा विषय ठरतात आणि आपल्या वाङ्मयीन जाणिवेला खाद्य पुरवतात. उदाहरणार्थ, गंगाधर गाडगीळ यांची लिलीचे फूल ही कादंबरी. वसंत कानेटकर यांचे देवांचे मनोराज्य हे नाटक. ‘ फसलेला प्रयोग ’ वगैरे शब्दसंहिता आपण काकोडकर, शिरवळकर वा व. कृ. जोशी यांच्याबाबतीत सहसा वापरत नाही आणि गंमत अशी की गल्लीबोळांतील वाचनालयांनी पसंत केलेल्या, स्वीकारलेल्या लेखकांच्या पुस्तकांचा खप हा वृत्तपत्रीय अभिप्रायावर वा समीक्षकांच्या शाबासकीवर फारसा अवलंबून नसतो. बहुप्रसव लेखकांच्या पुस्तकांवर अभिप्राय क्वचितच येतात, आणि ते न आल्याने त्यांच्या वाचकांच्या संख्येत घट होते असेही नाही. एखाद्या लेखकाचे एक पुस्तक एकदा वाचनालयाने घेतले की त्या लेखकाचे पुढचे पुस्तकही वाचनालय घेत राहते, तशी जणू प्रथाच पडते. तिचा फायदा अशा वाचकप्रिय लेखकांना मिळतो.

### खपाचा नवा टप्पा

परंतु अशा लेखकांनी खपाचा जो एक टप्पा गाठलेला असतो, त्या टप्प्याच्या

वरच्या पायरीवर जाण्यासाठी मात्र काही तरी विशेष घडावे लागते. एखादा वैशिष्ट्यपूर्ण खळबळजनक विषय हाताळणे, जनमानसाला एकदम आकर्षित करून घेणारे पुस्तक लिहिले जाणे व त्यावर प्रतिष्ठित मातब्बर समीक्षकांचे चांगले समीक्षण येणे. कुठले तरी पारितोषिक लाभणे किंवा 'वासूनाका' प्रमाणे वादविषय ठरणे—वगैरे गोष्टींचा फायदा लेखकाला मिळाला तरी खपाचा वरचा टप्पा गाठणे त्याला सुलभ ठरते. पहिल्या आवृत्तीच्या एक हजार प्रतीच खूप झाल्या असे ज्यांच्या बाबत म्हणता येईल असा लेखक; आणि ज्याच्या नव्या पुस्तकाच्या पहिल्या आवृत्तीच्या दहा हजार प्रती काढल्या तरी पडून राहणार नाहीत असा विश्वास प्रकाशकाला ज्याच्याबद्दल वाटतो असा लेखक—यात फरक हा राहतोच. काही प्रासंगिक कारणामुळे एखाद्या पुस्तकाचा विशिष्ट काळात उठाव होतो. उदाहरणार्थ 'तमस' दूरदर्शन मालिकेच्या प्रसारामुळे 'तमस'च्या प्रती हजारोंनी खपल्या. दूरदर्शनवर चिमणराव आल्याबरोबर चिं. त्रि. जोशी यांच्या पुस्तकांना मागणी वाढली.

### बेस्ट सेलरचे भाग्य थोड्यांनाच

आपल्याकडील चांगले खपणारे पुस्तक आणि इंग्लंड-अमेरिकेत बेस्ट सेलर म्हणून गाजणारे पुस्तक यांच्यातील तुलनाही उद्‌बोधक ठरेल. बेस्ट सेलर म्हणून अमेरिकेत गाजणारे पुस्तक लाखोंनी खपले. आणि कालांतराने स्थिर खपावू पुस्तकांच्या मालिकेत जाऊन बसले. एखाद्या बुक क्लबने त्या पुस्तकाचा पुरस्कार केला तर हजारो प्रतींची एकदम मागणी त्याला येते. दूरदर्शनवर त्याबद्दल काही कार्यक्रम झाला तर खपाला आणखी चालना येते. त्याचे नाट्यरूपांतर केले गेले वा त्यावर चित्रपट निघाला तर आणखी खप वाढतो. वृत्तपत्रांत जर काही कारणाने ते पुस्तक गाजले व त्यावर उलटसुलट बातम्या आल्या तर त्याचा खप वाढू शकतो. प्रकाशकांनी जाहिरात खूप मोठ्या प्रमाणावर केली तर त्याचाही खपावर प्रभाव पडतो. चांगला लेखक हा सहसा उपेक्षिला जात नाही; चांगल्या पुस्तकाची सहसा उपेक्षा होत नाही. परंतु खप जेवढा जास्त तेवढा पुस्तकाचा दर्जा चांगला असे विधान मात्र बरोबर होणार नाही किंवा खप जेवढा कमी तेवढे पुस्तक जास्त चांगले असे म्हणणेही चुकीचेच ठरेल. बेस्ट सेलरच्या यादीत जाणारी पुस्तके ही आपल्या आंतरिक वेगळेपणामुळे फार मोठ्या वाचकवर्गाचे लक्ष वेधून घेतात.

## १९

# कवितेचा धंदा

आपल्याकडे काव्याचा धंदा कसा चालतो ! अगदीच ओबडधोबड असा हा प्रश्न वाटेल. काव्य हे हस्तिदंती महालातील कोरीव ठेवणीतले लेणे. त्याबाबत धंद्याची घिसाडी भाषा शोभून दिसते का ?

परंतु व्यवहार हा शेवटी व्यवहारच असतो.

कवीलाही पोट असते. काव्यालाही किंमत असते.

कवितासंग्रह छापायलाही पैसे लागतात.

कवितासंग्रह विकत घ्यायलाही पैसे लागतात.

काव्य कितीही रोमँटिक असो व्यवहाराशी त्याची सांगड घालावीच लागते. आपल्याकडील काव्य, कवी, कवितासंग्रह यांच्याबद्दलही या दृष्टीने प्रश्न विचारता येईल आणि काव्याची आर्थिक बाजू तपासून घेता येईल. या दृष्टीने इंग्लंडमधील काव्यबाजाराची माहिती मात्र लक्षवेधक वाटली.

इंग्लंडमध्ये बड्या प्रकाशनसंस्थांपैकी फक्त फाबेर, चॅटो अँड विल्यम्स, ऑक्सफर्ड, सेकर अँड वॉरबर्ग या संस्थाच काव्यसंग्रह काढण्याबाबत आस्था दाखवतात. पेंग्विननेही काव्यसंग्रह काढण्याचे प्रमाण कमी केले आहे. पेंग्विनची मॉडर्न पोएट मालिका मात्र नियमित चालू आहे. कॅरकनेट न्यू प्रेस या प्रकाशन संस्थेने मात्र गेल्या आठ-दहा वर्षांत काव्याची पुस्तके काढण्याचा धूमधडाका लावला आहे. एडिनबर्ग येथील सॅलमँडर प्रेसने काव्यसंग्रहांच्या संपादित आवृत्ती-कडे लक्ष पुरविलेले आहे.

दि टाइम्स लिटररी सप्लिमेंट, दि न्यू स्टेटसमन, लिसनर, एन्काउंटर, लंडन मॅगेझिन, लंडन बुक रिव्ह्यू ही नियतकालिके नव्या-जुन्या कवींच्या कविता आवर्जून प्रसिद्ध करतात. केवळ काव्य प्रसिद्ध करणारी छोटी नियतकालिके १९६१–७० या दशकात बरीच प्रसिद्ध होत होती. ती मात्र पुढे एक-एक करून बंद पडली. अधूनमधून कोणीतरी अशी नियतकालिके काढत असतात आणि ती लहानशा वर्तुळात फिरत असतात.

१९८० नंतर इंग्लंडमध्ये काव्यलेखनाचा ओघ थंडावला आहे असे नाही. परंतु संग्रह निघण्याचे प्रमाण कमी झालेले आहे.

ॲरव्हॉन फाउंडेशन या संस्थेने तरुण नवलेखकांसाठी प्रशिक्षण वर्ग सुरू केले आहेत. टेलिव्हिजन नेटवर्क, ऑब्झर्व्हर दैनिक आणि इतर काही संस्थांच्या सहकार्याने ॲरव्हॉनने अप्रकाशित कवितांच्या स्पर्धा सुरू करून काव्यलेखनाला एक नवी चेतना दिली आहे. ५ हजार पौंडांचे (आपल्याकडच्या भाषेत दीड लाख रुपयांचे) पहिले पारितोषिक असून, इतर छोटीछोटी बक्षिसेही बरीच आहेत. या स्पर्धेत भाग घेणाऱ्यांची संख्या किती असावी असा आपला अंदाज आहे? सुमारे चाळीस हजार स्पर्धक दरवर्षी भाग घेत असतात. प्रत्येक स्पर्धकाला जी प्रवेश फी पाठवावी लागते त्यातून या स्पर्धेचा खर्च भागवला जातो. बक्षिसासाठी मात्र इतरांचे सहाय्य घ्यावे लागते.

बीबीसीच्या 'गंभीर' रेडिओ नेटवर्क नंबर ३ च्या सहाय्याने दि नॅशनल पोएट्री सोसायटी ही संस्था देखील काव्यस्पर्धा आयोजित करते. तिचे बक्षीस मात्र कमी असते. साहजिकच स्पर्धकही त्यात कमी भाग घेतात.

### स्पर्धांचा उपयोग

अशा स्पर्धांचा उपयोग होतो का? त्यातून चांगल्या काव्याला प्रोत्साहन मिळते का? काव्यविषयक जाणीव व अभिरुची विकसित होते का? नव्या कवींना उत्तेजन मिळते का? काव्याला लॉटरीची सोडत मानणे बरोबर आहे का? अशांसारखे प्रश्न इंग्लंडमध्येही विचारले जातात. परंतु स्पर्धेत कुठेतरी काव्याचा कस लागतोच.

इंग्लंडमधील अनेक नामवंत कवी या स्पर्धांत भाग घेतात. टोपणनावाने प्रवेशिका पाठवतात आणि गंमत अशी की, त्यांच्या कविता बक्षीसपात्र ठरतात.

टोपणनावाने कविता पाठवल्याने परीक्षकांवर अनाठायी प्रभाव पडत नाही आणि निवड नि:पक्षपाती होऊ शकते. इंग्लंडमधील टॉनी हॅरिसन, क्रेग रेन, ह्यूगो विल्यम्स, अँड्र्यू मोशन, यु. ए. फॅनथोर्प, मॅकगुकिमन वगैरे अनेक नामवंत कवींना अशा स्पर्धांमध्ये मोठी बक्षिसे मिळाली आणि त्यांचे कवी म्हणून स्थान उंचावण्यास या बक्षिसांनी हातभार लावला. काही कवी तर अशा स्पर्धांतूनच पुढे आले. या काव्यस्पर्धांचे परीक्षक म्हणून इंग्लंडमधील नामवंत कवींची योजना केली जाते. त्यांच्या निवडीला एक वजन आपोआपच प्राप्त होते. इंग्लंडमध्ये अशा काव्यस्पर्धांना आज प्रतिष्ठा प्राप्त झालेली आहे आणि त्यात नंबर काढणाऱ्यांचे भाग्य उजळते ही वस्तुस्थिती आहे.

परंतु इंग्लंडमध्येही काव्य विकले जातेच असे नाही. कवींना निर्वाहापुरती अर्थप्राप्ती त्यातून होतेच असे नाही. कारण बहुतेक नव्या कवींचे संग्रह छापले जातात तेव्हा त्यांची आवृत्ती ७००–८०० प्रतींच्या आतबाहेर असते. बऱ्यापैकी नाव मिळालेल्या कवींच्या काव्यसंग्रहाची आवृत्ती २ हजार प्रतींची निघते आणि दोन हजार प्रतींची आवृत्ती हे एक मोठेच यश मानले जाते. फिलिप लारकिन हा इंग्लंडमधील आजचा सर्वांत प्रसिद्ध व आघाडीवरचा कवी. त्याचा ताजा संग्रह ऑक्टोबर ८८ मध्ये प्रसिद्ध झाला. त्याच्या प्रती एक लाखावर निघाल्या. त्याच्या मागच्या दि व्हिटसन वेडिंग्ज या संग्रहाच्या ७०००० प्रती खपल्या होत्या. टेड ह्युजेसच्या क्रो या संग्रहाने ५० हजारांची तर सीमस हीनेच्या नॉर्थने ३० हजारांची मजल गाठली. शाळा-कॉलेजांत ज्या कवींची पुस्तके लावली जातात ते खरोखरच भाग्यवान होत. टेड ह्युजेस आणि टॉम गुन या कवींच्या पेपरबॅक आवृत्त्या एक लाखावर खपतात.

टी. एस. इलियट वगैरे कवींनी १९५४ मध्ये पोएट्री बुक सोसायटी स्थापन केली. कवी आणि काव्याचे प्रकाशक यांना आर्थिक सहाय्य देण्याचा या सोसायटीचा प्रयत्न असतो. दरवर्षी चार अप्रकाशित पुस्तकांची निवड ही संस्था करते आणि या चार संग्रहांच्या आपल्या सदस्यांसाठी प्रत्येकी एक-एक हजार प्रती ती विकत घेते. ज्या संग्रहाची निवड होते त्याच्या प्रकाशकाला पूर्वसूचना दिल्यामुळे तो नेहमीच्या ७००-८०० प्रतींच्या आवृत्तीऐवजी दोन हजार प्रतींची आवृत्ती काढतो. कवीला मानधनाची रक्कम तर मिळतेच. शिवाय पोएट्री सोसायटीने निवडलेला कवी म्हणून त्याला प्रतिष्ठाही मिळते.

बीबीसीचे रेडिओ ३ हे केंद्र काव्यवाचनाचे कार्यक्रम वरचेवर करते.

काव्यवाचनाचे कार्यक्रम ठेवण्यास उत्सुक अशा संस्थांना इंग्लंडमधील नॅशनल पोएट्री सेक्रेटरिएट हे मार्गदर्शन करते. कार्यक्रम मिळवून देते. कवी आणि अशा संस्था यांच्यातील संपर्क प्रस्थापित करण्यासाठी अद्ययावत सूची तयार ठेवते. काव्य वाचण्यापेक्षा कवींच्या तोंडून ऐकणे हा अधिक समृद्धिकारक अनुभव असतो, असेच युरोपमध्ये मानले जाते.

ब्रिटनच्या आर्ट्स कौन्सिलतर्फे 'शाळांमध्ये साहित्यिक' व 'समाजामध्ये साहित्यिक' या कार्यक्रमाच्या अंतर्गत विविध शाळा व समाजघटक यांना लेखकाच्या सान्निध्यात लाभ मिळेल अशी व्यवस्था केली जाते. त्यासाठी लेखकांना प्रवासखर्च व मानधन देण्यात येते. संगीताच्या कार्यक्रमाप्रमाणेच काव्यवाचनाचे कार्यक्रमही रंगतदार होतात. हा इंग्लंडमधलाही अनुभव आहे. रशियात तर काव्यवाचनाच्या कार्यक्रमांना मोठीच गर्दी होते. अमेरिकेतही श्रोत्यांची चांगली गर्दी होते. सर्वसामान्य इंग्लिश माणसाला काव्याची गोडी असतेच असे नाही. परंतु काव्य व कविता म्हटल्यावर तो आपण त्या गावचेच नव्हे असा साळसूद प्रश्नचिन्हांकित चेहरा करीत नाही एवढे मात्र खरे. १९६५ मध्ये लंडनच्या प्रसिद्ध अल्बर्ट हॉलमध्ये काव्यवाचनाचा भव्य कार्यक्रम प्रथमच झाला. त्या वेळी काव्याला शो बिझिनेसचे रूप देणे कितपत श्रेयस्कर ठरेल याबद्दल खूप वाद माजला. परंतु काव्य हे एका मोठ्या समाजघटकाच्या दैनंदिन जीवनाचा भाग होऊ शकते, तसे ते व्हावे असाही विचार आग्रहपूर्वक मांडण्यात आला.

आपल्या मराठीतील काव्यक्षेत्रातील धंद्याचे अंग या दृष्टीने तपासून बघण्यासारखे आहे.

### स्वखर्चाने काव्यसंग्रह

मराठीत दरवर्षी शंभरावर कवितासंग्रह प्रसिद्ध होतात. त्यातील ऐंशी तरी नव्या कवींच्या पहिल्याच बहराचे असतात. ते बहुतेक त्या कवीने स्वखर्चाने वा साहित्य संस्कृती मंडळाच्या प्रथम प्रकाशन अनुदान योजनेखाली काढलेले असतात. त्यांच्या ५०० ते १००० प्रती निघतात, परंतु परीक्षणासाठी पाठविलेल्या प्रती, इतर लेखक-कवींना पाठविलेल्या प्रती सोडल्या तर कुठेतरी गळी पडून वाचनालयांना वा वशिला लावून जि. प. मध्ये त्या विकल्या जातात.

वैयक्तिक ग्राहक त्यांना लाभत नाही. काही नामवंत प्रकाशक कवींकडून पैसे घेऊन असे संग्रह काढतात परंतु तेथेही काव्याबद्दल असणाऱ्या निर्व्याज व अस्सल प्रेमापोटी ते हे काम करतात असे क्वचितच दिसते. ( पॉप्युलरचे ' नवे कवी : नवी कविता ' ही मालिका हा ठळक अपवाद.)

मराठी नियतकालिके व साप्ताहिके कविता प्रसिद्ध करतात, परंतु निवडीत चोखंदळपणा दाखवितातच असे नाही. नव्या कवींच्या उत्तमोत्तम कविता निवडणे, त्या कवींच्या विकासाकडे लक्ष ठेवून त्याला प्रोत्साहन देणे, त्या काव्याचे रसग्रहण समीक्षण करणे याबाबत पद्धतशीर प्रयत्न होत नाहीत. मागे ' महाराष्ट्र टाइम्स'मध्ये ' चालू पिढीच्या कविता ' म्हणून सुमारे चाळीस कवींची निवड करून त्यांच्या प्रातिनिधिक कविता फोटो परिचयासह मी दिल्या होत्या. पुढेही म. टा. ने कविता मागवून त्यांची नामवंत समीक्षकांकडून निवड करून त्या छापल्या होत्या. साधनेत आजचे कवी या मालिकेत काही तरुण नव्या कवींच्या प्रत्येकी दहा-बारा कविता समीक्षणात्मक टिपणीसह दिल्या होत्या. अनुष्टुभची स्पर्धा ही महत्त्वाकांक्षी असते. ग्रंथालीचा ' कविता दशका'ची हा उपक्रमही प्रतिभाशोध घेण्याच्या दृष्टीने उपयुक्त होता.

कवितेला वाहिलेली मासिके / नियतकालिके निघत राहिली तशीच बंद पडत राहिली. रमेश पानसे यांचे ऋचा तीन-चार वर्षे तग धरून होते. भगवान ठग हे अनुवादित कवितांवर भर देणारे विश्ववाङ्मय अनियतकालिक चालवतात. प्रा. पुरुषोत्तम पाटील यांच्या कवितारती मासिकातही काव्याला व काव्यविचाराला प्राधान्य मिळत आहे. ' कवितेच्या प्रदेशात ' हे वार्षिकही अनिल कांबळे दिवाळीत थाटामाटात काढतात. मात्र काव्यविषयक हे उपक्रम करणारी मासिके कधीच आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी वा स्वयंपूर्ण होत नाहीत. त्यामुळे त्यांचे अस्तित्व हे सदैव डळमळीतच राहते.

कवितेवर पैसा मिळवणारे काही भाग्यवान कवी अर्थात आपल्याकडेही आहेत. कवितेबरोबर गीतकार म्हणून सांगड घातली गेली तर हे भाग्य आणखीनच बलवत्तर ठरते. ग. दि. माडगूळकर, शांता शेळके, सुधीर मोघे, जगदीश खेबुडकर, पी. सावळाराम वगैरे नावे या संदर्भात सहज आठवावीत. स्वत:चे जाहीर कार्यक्रम करून चांगली कमाई करणारे सुरेश भट, सुधीर मोघे, ना. धों. महानोर, यांच्यासारखे गीतकार मात्र मोजकेच आहेत. पु. ल. नी मर्ढेकर-

रेगे सादर करून वाहवा मिळवली. पाडगावकर, बापट, करंदीकर या त्रिकुटाने पंचवीस वर्षे गाजवली. अनिल, बोरकर यांचाही ढंग आगळाच होता. कवि-संमेलने, कवितेचे दोन दिवस, कविता उत्सव यांसारखे कार्यक्रमही कवींना प्रोत्साहक ठरतात. परंतु आघाडीवरचे यशस्वी कलाकार सोडल्यास आर्थिकदृष्ट्या काव्यवाचन लाभदायी ठरणारे कवी तुरळकच होते. काव्यवाचनासाठी साहित्य-संमेलनात गर्दी करणारे कवी दुसऱ्या कोणाचा काव्यसंग्रह विकत घेतीलच असे नाही. काव्यावर होणारे समीक्षालेखनही नगण्यच आहे. ललितच्या काव्यविशेषांकात जवळजवळ प्रत्येक कवीने तक्रार केली होती की आपल्या काव्याची गंभीरपणे दखल अजून कोणाही टीकाकाराने घेतलेली नाही, त्यामुळे समीक्षेचा कसलाही प्रभाव आमच्यावर पडलेला नाही. म्हणजे पैसा तर नाहीच. समीक्षेमुळे मिळणारा मानसन्मानही नाही असा हा सगळा आतबट्ट्याचा व्यवहार आहे.

There is a poet indulging his wretched rage for order or not as the case may be for his is a dying art, an eddy of semantics scruples in an unstructurable sea.

( Derea Mahon. Rage of order )

काव्य हा व्यक्तीच्या व समाजाच्या गुणवैशिष्ट्यांचा एक सौंदर्यसंपन्न प्रतिभाशाली आविष्कार असतो, सुखदु:खांचा व आशा-आकांक्षांचा उद्‌गार असतो. म्हणूनच नव्या कवींना फुलण्यासाठी, प्रसिद्धीसाठी नित्य नव्या प्रयत्नांची गरज आहे.

( २८–१–१९८९ )

निबंध
३४६८
२६६३३
२८।८२

# २०

# किल्लीवाल्या कादंबऱ्या

प्रा. वसंत कानेटकर यांच्या ' वादळ माणसाळतंय ', ' हिमालयाची सावली ', ' विषवृक्षाची छाया ' वगैरे नाटकांतील मध्यवर्ती व्यक्तिरेखा या बाबा आमटे, महर्षी कर्वे, इतिहासाचार्य राजवाडे वगैरेंशी बऱ्याच अंशी मिळत्याजुळत्या आहेत. काही बाबतीत त्या व्यक्तिरेखांमध्ये वेगळेपणा आढळतो, काही घटनांची सरमेसळ आढळते. परंतु मुख्य गाभा वास्तवातील व्यक्तींशी निगडित असल्याचे आढळते.

कॅलिडोस्कोप ( अच्युत बर्वे ), बॉन्सॉय ( सुभाष भेंडे ), इतिवृत्त ( ह. मो. मराठे ), कशासाठी पैशासाठी ( अरुण हरकारे ), राजपुत्र ( म. गो. पाठक ), धृतराष्ट्र, कागदी सिंह, उत्तरकाल (रमेश मंत्री), सरस्वतीच्या दरबारात (रघुवंशी), वगैरे कादंबऱ्यांमध्येही प्रत्यक्षातल्या व्यक्तींवर आधारित खऱ्या-खोट्या घटनांची गुंफण करण्यात आली आहे.

विडंबनात्मक लेखनासाठी तर फॅडिस्ट वा आग्रही विचार असणाऱ्या व्यक्तींना नेहमीच वेठीला धरले जाते. राजकीय नेते, साहित्यिक, समाज-कार्यकर्ते, नट-नट्या यांची खिल्ली उडवली जाते.

**चरित्रात्मक कादंबऱ्या**

मराठीत अशा लेखनाला सध्या बहर आला आहे. एखाद्या खऱ्याखुऱ्या व्यक्तीच्या जीवनावर अथवा एखाद्या प्रत्यक्ष घडलेल्या घटनेवर आधारित कथा, कादंबऱ्या, नाटके, विनोदी विडंबनात्मक लेखन हे मोठ्या प्रमाणावर होत असल्याचे दिसते.

आत्मचरित्रात्मक वा चरित्रात्मक कादंबरीपेक्षा वेगळे असे हे लेखन असते; आणि संबंधित व्यक्तींच्या जीवनाचा पंचनामाच त्यात जणू मांडण्यात येतो. डॉ. लागू, तो मी नव्हेच (आचार्य अत्रे), साहेब (उद्धव शेळके), यज्ञ (खेर-राजे), आनंदी-गोपाळ, बखर रघुनाथाची (श्री. ज. जोशी) वगैरे कृतींत त्या व्यक्तीचे खरेखुरे नाव देऊन त्याच्या जीवनातील घटनांची संगती लावलेली आहे. परंतु अशा प्रकारे खरे नाव न देता आणि सर्वच घटना जशा घडल्या तशा न देता त्यात कल्पनेने बदल करून लेखक आपली कथा-कादंबरी सिद्ध करतो तेव्हा ती कृती वेगळेच रंगरूप धारण करते.

मराठीतच अशा प्रकारचे लेखन होत आहे असे नाही. ते जगातल्या सर्व देशांत सर्वकाळ होत आलेले आहे. फ्रान्समध्ये त्याला खास वाङ्मयप्रकाराचा दर्जा देण्यात आलेला आहे. 'रोमान ए क्लेफ' असे त्याला म्हणतात. क्लेफ म्हणजे किल्ली, किल्लीवाली कथा किंवा कादंबरी. इंग्लिशमध्येही याला पर्यायी समर्पक शब्द नाही. परंतु वास्तवातील, खऱ्या व्यक्तींवर आधारित व्यक्तिरेखांशी संबंधित कथा असा ढोबळ मानाने त्याचा अर्थ सांगता येतो. हयात व्यक्तीबद्दल आपल्याला काहीतरी सांगायचे असते, ते खरे नाव घेऊन जसेच्या तसे सांगणे अडचणीचे असते. कायदा आड येतो. बदनामीचा धोका असतो. संबंधित माणूस दुखावला तर तो येनकेन प्रकारेण त्रास देऊ शकतो. म्हणून लिहायचे तर त्याच्यावर पण नावगाव बदलून, थोडाफार संभ्रम निर्माण होईल अशी काळजी घेऊन लिहायचे. हे या वाङ्मय-प्रकाराचे व्यवच्छेदक लक्षणच होय.

### अनेक नामवंतांनी हे केले

आल्डस हक्स्ले याने 'पॉईंट काऊंटर पॉईंट' या कादंबरीतील मार्क रॅम्पिअन या व्यक्तिरेखेद्वारे डी. एच. लॉरेन्सचे चित्र रेखाटले आहे. बुद्धिमान पण विक्षिप्त. सॅम्युअल रिचर्डसनच्या १७४८ साली प्रसिद्ध झालेल्या 'क्लॅरिसा' या कादंबरीतील खलप्रवृत्तीचा रॅाण लव्हलेस हे त्या वेळच्या ड्युक ऑफ व्हार्टनचे चित्रण आहे असे सांगण्यात येते. लॉरेन्स स्टर्न याच्या 'ट्रिस्टॅम शँडी' या कादंबरीतील अनेक पात्रांचे तोंडवळे त्याच्या यॉर्कमधील शेजाऱ्यापाजाऱ्यांशी मिळतेजुळते होते.

'गलिव्हर्स ट्रॅव्हल्स'चा लेखक जोनाथन स्विफ्ट याच्या 'टेल ऑफ ए टब'-मधील एक व्यक्तिरेखा रस्त्यावर प्रार्थनेसाठी गुडघे टेकून बसते तेव्हा बघे लोक

त्याच्याभोवती कोंडाळे करतात. त्यानंतर ती व्यक्ती लघुशंका करते असे दाखवले आहे. या घटनेलाही वास्तवतेचा आधार होता.

'रॉबिन्सन क्रुसो 'मधील घटनांना अलेक्झांडर सेलकर्क हा प्रवासी चिलीच्या किनाऱ्यावर एकटा अडकून पडला त्या वेळच्या त्याच्या अनुभवांचा आधार आहे. एच. जी. वेल्सने ' मेन लाइक गॉड्स 'मध्ये विन्स्टन चर्चिलवर रुपर्ट कॅटस्किलच्या रूपात हल्ला चढवला आहे.

आपले प्रतिस्पर्धी, आपले शत्रू, आपल्या हितसंबंधांना बाधा आणणारे विघ्नसंतुष्ट यांच्यावर सूड उगवण्यासाठी त्यांची विडंबनात्मक वा उपहास-उपरोधात्मक चित्रणे खोडसाळपणे रंगवून आपली खुमखुमीही अनेक कादंबरीकार पूर्ण करतात असे दिसते.

अर्नेस्ट हेमिंग्वेने ' दि सन आल्सो रायझेस 'मध्ये रॉबर्ट कोहेनच्या व्यक्तिरेखेत हॅराल्ड लोएब याचे रंग मिसळले त्यामुळे तो संतप्त झाला. त्याच्या सहवासात आलेली त्याची प्रेयसी तर चक्क आजारी पडली.

ट्रूमन कॅपोटे, जॉन एहरलिकमन, एलिझाबेथ रे, जॅकी सुसान वगैरे कादंबरीकारांनी गेल्या वीस वर्षांत अशा किल्लीवाल्या कादंबऱ्यांची भराभर निर्मिती करून मोठीच धमाल उडवून दिली आहे.

**कादंबरी प्रसिद्ध झाल्यावर खऱ्या स्त्रीची आत्महत्या**

ट्रूमन कॅपोटे याच्या ' अॅनूसर्ड प्रेयर्स ' या कादंबरीचा पहिला भाग १९७६ साली नियतकालिकांत प्रसिद्ध झाला. न्यूयॉर्कच्या मॅनहटन भागातील ला कोटे बास्क रेस्टॉरंटमध्ये वेगवेगळ्या व्यक्ती एकत्र बसून गप्पा मारतात; त्यात एकमेकांची लफडी-कुलंगडी बाहेर काढतात. कॅपोटेने आपल्या उच्चवर्गीय मित्रांपैकी अनेकांच्या व्यक्तिरेखा या कादंबरीत चितारल्या आणि त्यांचा रोष ओढवून घेतला. या कादंबरीतील अॅन हॉपकिन्स नामक नायिका आपल्या नवऱ्याला आधी ठरवून ठार मारते.

' एस्क्वॉयर ' मासिकात यासंबंधीचे कादंबरीतील प्रकरण प्रसिद्ध झाले आणि अॅन वूडवर्ड या स्त्रीने आत्महत्या केली. तिच्या मित्रांनी कॅपोटेवर आरोप केला की, या आत्महत्येला तूच कारणीभूत आहेस. कारण १९५५ साली आपल्या नवऱ्याचा खून केल्याच्या आरोपातून अॅन वूडवर्डची निर्दोष सुटका झालेली होती.

तिचा खेळाडू नवरा वुइल्यम वूडवर्ड याची हत्या ही अपघाताने झाली असे न्यायालयाने ठरवले होते. त्यानंतर वीस वर्षांनी त्या घटनेशी संबंधित असे लेखन कॅपोटेने आपल्या कादंबरीत केले आणि परिणामी तिने आत्मघात करून घेतला. कॅपोटेचे अनेक मित्र या कादंबरीतील आपल्या चित्रणाने इतके नाराज झाले की ते त्याला टाळू लागले.

**चलाखीचे प्रयोग**

'दि वॉशिंग्टन फ्रिंज बेनेफिट' या कादंबरीतील अनेक पात्रे वॉशिंग्टनच्या राजकीय आणि उच्चभ्रू वर्गातील खऱ्याखुऱ्या व्यक्तींवर बेतलेली आहेत.

जॅकी सुसान हिच्या 'डोलोरस' या कादंबरीची नायिका डोलोरस रायन ही जॅकेलिन केनेडी-ओनासिसची सहीसही प्रतिमा आहे. अमेरिकन राष्ट्राध्यक्षाचा खून झाल्यावर त्याची ही सुंदर बायको जगातील सर्वांत श्रीमंत अशा व्यक्तींशी पैशासाठी लग्न करते, असे दाखवले आहे. परंतु हे करताना लेखिका आणखी एक चलाखी दाखवते. जॅकलिन ओनासिस नावाची खरी व्यक्तीही ती कादंबरीत खऱ्या नावाने रंगवते. परंतु अशा क्लृप्त्यांनी वाचक फसतोच असे नाही.

**सत्ताधीशांची नक्कल**

जॉन एहरलिकमनच्या 'कंपनी' या कादंबरीत अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री हेन्री किसिंजर यांची व्यक्तिरेखा फारसा आडपडदा न ठेवता रंगवण्यात आली आहे. वॉशिंग्टनच्या राजकीय क्षेत्रातल्या अनेक व्यक्तींची विडंबनेही त्यात आली आहेत. अनेकांचा भंपकपणा उघड करून दाखवण्यात आला आहे. अफवा-गॉसिप-गावगप्पांवर आधारलेला हा सगळा लेखनप्रपंच म्हणजे 'ओळखा पाहू'चा खेळच बनला आहे. मुंबई दिनांक, सिंहासन ( अरुण साधू ), धृतराष्ट्र ( रमेश मंत्री ) मुख्यमंत्री ( वि. वा. शिरवाडकर ), सूर्यास्त ( जयवंत दळवी ) वगैरे कादंबऱ्या-नाटकांत राजधानीतील राजकीय सौदेबाजीचे आणि भ्रष्टाचाराचे दर्शन घडते.

अमेरिकेतील अशा राजकीय कादंबऱ्यांचा 'वॉशिंग्टन नॉव्हेल्स' असा एक वेगळा प्रकारच आता मानला जात आहे. राजकारणातील सगळी मूल्ये आता देशोधडीला लागली आहेत; त्यामुळे त्याला आलेले हास्यास्पद आणि विकृत स्वरूप, सद्य:कालीन सत्ताधीशांचे क्षुद्रपण यांची टिंगलटवाळी करणे एवढेच काय

ते आता बिचारा संवेदनाक्षम लेखक करू शकतो.

## लेखकाचा उद्देश

अशा कादंबऱ्या लिहिण्यामागे लेखकाचा उद्देश काय असतो ? भ्रष्टाचार, भंपकपणा, ढोंगीपणा यावर प्रखर हल्ला चढवणे, समाजातील तथाकथित प्रतिष्ठित व्यक्तींचे खरे स्वरूप उलगडून दाखविणे, आपल्यावर अन्याय करणाऱ्या लोकांचे विडंबन करून त्यांना हास्यास्पद बनवणे, आपण सर्वांपेक्षा कसे शहाणे-सोवळे आहोत हे जगजाहीर करणे, येनकेन प्रकारेण पैसा आणि प्रसिद्धी मिळवणे, इत्यादी इत्यादी.

या कादंबऱ्यांतील चित्रणे ही एकांगी, भडक असतात; छिद्रान्वेषी चारित्र्यहनन करणारी असतात. मनातील खुन्नस वा मळमळ प्रकट करणारी असतात. व्यक्तिरेखांचे उदात्तीकरण करण्याऐवजी क्षुद्रीकरण करण्यात या लेखकांना अधिक रस वाटतो. खोटेपणा, चारित्र्याचा अभाव, व्यसनाधीनता, दुराचार यांचाच प्रभाव दाखविण्यासाठी हा सारा आटापिटा ते करीत असतात. आपल्या व्यक्तिरेखा ज्यांच्यावर आधारलेल्या असतात त्या मूळ व्यक्तींशी ते प्रतारणा करतात; तिला ते कुठल्याच रीतीने जबाबदार नसतात. उलट, कळसूत्री बाहुलीप्रमाणे आपल्या पात्रांना ते नाचवतात. त्यांनी ज्या व्यक्तींवरून आपली पात्रे घेतलेली असतात त्या व्यक्तींना कुठल्याही प्रकारे अशा लेखनाविरुद्ध दाद मागता येत नाही. बदनामीचा खटला भरण्याचा मार्गही तेवढासा सोयीस्कर ठरत नाही. वाङ्मयीन सनसनाटीपणाच्या बळींनी तक्रार करणे म्हणजे स्वतःची आणखीच बेअदबी करून घेणे ठरते.

अशा किल्लीवाल्या कादंबरीच्या लेखकाचे पात्र मध्यवर्ती धरून आपणही तशीच कादंबरी लिहिणे हा एक उपाय आहे खरा; पण त्यालाही तशी जबरदस्त प्रतिभा हवी. व्यंगचित्राला व्यंगचित्राने काटशह द्यायचे तर त्या माध्यमावर प्रभुत्व हवेच. सध्याच्या वृत्तपत्रांनी व राजकीय निरीक्षकांनी गॉसिप म्हणजेच बातमी असा आपला पक्का समज करून घेतला आहे. त्यांच्या पावलावर पाऊल टेवून आजचे कादंबरीकार-नाटककारही या ' रोमाँ ह क्लेफ'चा फायदा उठवत आहेत. चरित्रात्मक कादंबरीत मूळ चरित्रनायकाच्या जीवनातील घटना-प्रसंगांशी इमान राखावे लागते. माहिती अचूक मिळविण्यासाठी परिश्रम घ्यावे लागतात. परंतु या

प्रकारात माहिती अपुरी असली तरी नडत नाही, आणि कुठलेही घटनाप्रसंग आपल्या सोयीने घुसडायला पूर्ण मोकळीक असते. खळबळजनक अर्धसत्य विधाने व तपशील कोणाला कसे लागू पडतात याचा शोध घेण्यात जिज्ञासू वाचक रमून जातात आणि नवनव्या दंतकथा मिटक्या मारत सांगितल्या-ऐकल्या जातात.

## सर्वच क्षेत्रे खुली

आजकालच्या जगातले कुठलेही क्षेत्र घ्या— राजकारण, समाजकारण, व्यवसाय-उद्योग, शिक्षण-विद्यापीठ, नोकरशाही, पत्रकारिता, लेखन-प्रकाशन, सौंदर्यस्पर्धा, जाहिरात कला, चित्रपट-नाट्यसृष्टी, शास्त्रीय संशोधन—भंपक लोकांनी आणि बाजारबुणग्यांनी भरलेले आहे. काही बरी माणसेही त्यात आहेत. पण त्यांचे भलेपणही सीतेच्या चारित्र्यासारखे विशुद्ध राहिलेले नसते. त्यामुळे अशा खळबळजनक सनसनाटीपूर्ण 'किल्लीवाल्या' कादंबऱ्यांची पैदास वाढतच राहणार आणि ओळखा पाहूचा खेळही वाचकांच्या दृष्टीने रंगत जाणार.

(मेनका, १६ फेब्रुवारी १९८९)

## २१

# पेंग्विन प्रकाशनाची विश्वझेप

पेंग्विन हा शब्द उच्चारला की कोणाही ग्रंथप्रेमी व्यक्तीला अंटार्क्टिकामधला तो पक्षी आठवत नाही तर अल्प किंमतीतील दर्जेदार पॉकेट बुक्सच त्याला दिसू लागतात. पेंग्विनने भारतातही आता प्रकाशन सुरू केले आहे. भारतीय लेखकांच्या सहा पुस्तकांचा पहिलाच संच नुकताच बाजारात आला आहे.

### १९३५ मध्ये आरंभ

' पेंग्विन 'ची पहिली पुस्तके १९३५ मध्ये निघाली. ॲगाथा ख्रिस्ती, अर्नेस्ट हेमिंग्वे, आंद्रे मोर्वा वगैरेंच्या गाजलेल्या पुस्तकांच्या स्वस्त पेपरबॅक आवृत्त्या भराभर ' पेंग्विन 'च्या बोधचिन्हानिशी बाहेर पडू लागल्या. त्या वेळी किंमत असे २५ सेंट म्हणजे सुमारे दोन रुपये. दोनशे-तीनशे पृष्ठांच्या पुस्तकाची २५ सेंट ही किंमत इंग्लंडमधील वाचकांच्या दृष्टीने अगदीच नगण्य अशी होती. ( आता या किंमती पुस्तकागणिक बदलतात आणि साडेतीन डॉलरपर्यंत, चाळीस-पंचेचाळीस रुपयांपर्यंत असतात. ) त्यामुळे ही पुस्तके भराभर खपू लागली. पेंग्विन ही जगातील पेपरबॅक्स प्रसिद्ध करणारी सर्वांत मोठी प्रकाशनसंस्था हा लौकिक दीर्घकाळ टिकवून आपला पसारा सारखा वाढवत राहिलेली आहे.

### प्रवासात वाचण्यासारखे हवेच

स्वस्त पुस्तके सहजी सर्वत्र उपलब्ध करून देण्यारी कल्पना कशी सुचली ?

प्रकाशक ॲलन लेन हा एकदा ॲगाथा ख्रिस्ती या सुविख्यात रहस्यकथा लिहिणाऱ्या मैत्रिणीकडे वीकएंडसाठी गेला होता. परत येताना रेल्वेस्टेशनवर न्यूजस्टॉलवर काहीतरी वाचनीय मिळते का हे बघण्यासाठी डोकावला. तास दीड तासाच्या रेल्वेप्रवासात वाचण्यासारखे काहीतरी त्याला हवे होते. परंतु त्या न्यूजस्टॉलवर वृत्तपत्राचे अंक व काही सपक मासिके याखेरीज काहीच नव्हते. ॲलन लेन त्यामुळे एकदम अस्वस्थ झाला. हे काही बरोबर नाही. प्रवासात वाचण्यासारखे एक पुस्तकही या स्टॉलवर मिळू नये. या वस्तुस्थितीने तो जाम उद्विग्न झाला. चहाच्या कपाच्या किंवा बिअर बाटलीच्या किंमतीत जर पुस्तके मिळाली आणि ती सहजपणे रेल्वे स्टेशनवरच नव्हे तर जागोजाग उपलब्ध होऊ शकली तर वाचकांची मोठी सोय होईल अशी कल्पना त्याच्या डोक्यात गुंजारव करू लागली.

## स्वस्त किंमतीचे रहस्य

त्याने या कल्पनेचा पाठपुरावा सुरू केला. पुस्तकाच्या किंमती कमी ठेवता येणे शक्य व्हावे म्हणून कुठल्या खर्चात काटकसर करता येईल ? कागद न्यूज-प्रिंट वापरणे, सजावट चित्रे यावरील खर्च कमीत कमी करणे आणि बांधणी साधी पण टिकाऊ करणे, नवीन लेखकांच्या नव्या कोऱ्या पुस्तकाऐवजी गाजलेली, लोकप्रिय ठरलेली पुस्तकेच पुनर्मुद्रित करणे आणि ती सर्वत्र सुलभपणे उपलब्ध व्हावी अशी विक्रीकेंद्राची मालिका देशभर उभी करणे वगैरे सूत्रे त्यांनी ठरवली आणि त्यानुसार पहिली काही पुस्तके बाजारात आणली.

## डिपार्टमेंटल स्टोअर्समधून विक्री

पेंग्विन सुरू करताना ॲलन लेनच्या जवळ भांडवल होते फक्त ५०० डॉलर्स. पेंग्विनची पहिली पुस्तके प्रकाशित करण्याच्या आधी 'वुलवर्थ' या डिपार्टमेंटल स्टोअर्सच्या चालकांशी संपर्क साधून ॲलन लेन याने आपल्या पुस्तकांच्या विक्रीची गळ त्यांना घातली. ती आकर्षकपणे मोक्याच्या जागी मांडण्याची व्यवस्था करावी अशीही विनंती त्याने केली. वुलवर्थने पहिलीच मागणी नोंदवली ती ६३ हजारांवर प्रतींची. इंग्लंडमध्ये प्रत्येक शहरात वुलवर्थचे डिपार्टमेंटल स्टोअर होते. पुस्तकांच्या दालनाची त्यात भर पडली.

इतर प्रकाशकांनी ॲलन लेनला त्या वेळी वेड्यातच काढले. ही कल्पना मूर्खपणाची आहे अशीच त्यांची भावना असल्याने, स्वस्तात पुस्तके निघाल्याने आपला धंदा मार खाईल अशी त्यांना मनातल्या मनात वाटणारी भीती त्यांनी झटकून टाकली.

## ग्राहकांचे मानसशास्त्र

वुलवर्थमध्ये केलेली विक्रीची व्यवस्था पुस्तकाचा जलद खप होण्यास उपयुक्त ठरली. किराणा माल, कापड, औषधे, खेळणी, भाजीपाला इत्यादी वस्तू खरेदी करण्यासाठी आलेला ग्राहक स्वस्तात मिळणारी पुस्तकेही घेऊ लागला. मुद्दाम बुकस्टॉलमध्ये जाऊन पुस्तक विकत घ्यायला लोक सर्वसाधारणपणे नाराज असतात, टाळतात. परंतु सहज कुठे पुस्तक दिसले तर ते घ्यायचा मोह होतो. ग्राहकांच्या या मानसशास्त्राचा फायदा पेंग्विनच्या पुस्तकांना मिळाला. वुलवर्थशिवाय रेल्वे स्टेशन व बुकस्टॉल्स यावरही ही पुस्तके मिळतच.

## नव्या लेखकांचा शोध

या पुस्तकांना ग्राहक चांगला मिळू शकतो याची ॲलन लेनला खात्री पटली आणि नवनव्या कल्पनांचा तो पाठपुरावा करू लागला. मोठ्यांसाठी पुस्तके आपण छापतो, पण मुलांचे काय ? मुलांसाठीही स्वस्त पण सुबक पुस्तके हवीतच म्हणून ‘ पफिन बुक्स ’ त्याने सुरू केली. जुन्या गाजलेल्या पुस्तकांच्याच आवृत्त्या काढायच्या हे आधीचे धोरण पण नव्या लेखकांचे काय ? त्यांना का वाळीत टाकायचे ? म्हणून नवनवीन लेखकांचा शोध घेण्यासाठी, नव्या साहित्यातील उत्तम लेखन मिळवण्यासाठी ‘ पेंग्विन न्यू रायटिंग ’ नावाचे एक पुस्तकाकारातील नियतकालिक सुरू केले. त्या नियतकालिकामुळे भावी काळात इंग्रजी भाषेला लाभभूत ठरलेल्या अनेक लेखकांचा शोध लागला. ग्रॅहम ग्रीन, डब्ल्यू. एच. ऑडेन इ. इ.

## युद्धकाळातही नव्या योजना

१९३९ मध्ये दुसरे महायुद्ध सुरू झाले. कागदाची टंचाई निर्माण झाली. पेंग्विनने त्यातूनही मार्ग काढून प्रकाशन जारी ठेवले. एवढेच नव्हे तर युद्ध-

विषयक माहितीची वाचकांची जिज्ञासा पूर्ण करण्यासाठी एअरक्राफ्ट रेकग्निशन, व्हाय ब्रिटन इज अॅट वॉर यांसारखी पुस्तकेही झटपट काढली. नियतकालिका-इतकीच पेपरबॅक पुस्तकेही जनसंपर्काचे काम झपाट्याने व प्रभावीपणाने बजावू शकतात, हे पेंग्विनने दाखवून दिले. युद्धकाळात पुस्तके स्वस्तात देता यावीत म्हणून त्यात जाहिरातीही देण्याला मागेपुढे बघितले नाही.

तरीही इंग्लंडमधील बहुसंख्य प्रकाशक पेपरबॅककडे तुच्छतेने बघत. अनेक वर्षे पेंग्विनशिवाय इतर कोणी प्रकाशनसंस्था या क्षेत्रात उतरली नाही.

### वाचकांची नाडी जाणली

अॅलन लेन वाचकांची नाडी जाणण्यात वाकबगार होता. वाङ्मयीन मूल्याची त्याची जाण अभिजात होतीच; परंतु व्यावसायिक साहसे करण्यातही तो अग्रेसर असे. डी. एच. लॉरेन्स यांच्या लेडी चॅटर्लीज लव्हर या पुस्तकावर अश्लील म्हणून १९२८ मध्ये बंदी घालण्यात आली होती. अश्लीलताविषयक इंग्लंड-मधील कायदा हा काहीसा संदिग्ध आहे असे अॅलन लेनचे मत होते; तेव्हा एक टेस्ट केस करून याचा शहानिशा करावा असे त्याने ठरवले. 'लेडी चॅटर्लीज लव्हर' ही कादंबरी त्याने १९६० मध्ये प्रकाशित केली. अपेक्षेप्रमाणे सरकारने खटला भरला. तो अॅलन लेनने लढवला. निष्णात कायदेपंडित दिले. त्या खटल्याला खूप प्रसिद्धी मिळाली. पेंग्विनने तो खटला जिंकला. त्यानंतर केवळ दीड महिन्यात लेडी चॅटर्लीज लव्हरच्या २० लाख प्रती विकल्या गेल्या.

एर्स्किन कॉल्डवेल या अमेरिकन लेखकाच्या 'गॉड्स लिटल एकर' व 'टोबॅको रोड' या कादंबऱ्याही अश्लील म्हणून टीकेला पात्र ठरल्या होत्या. 'पोरनो बुक्स' म्हणून त्या इंग्लंडमध्येही छापाव्या असे लेनचे मत होते.

१९७० मध्ये अॅलन लेन वारला. त्या सुमारास पेंग्विनच्या पुस्तकांवरही काहीसे सावट आले. अमेरिकन पेपरबॅक्सच्या माऱ्यापुढे पेंग्विनची पुस्तके खपात मागे पडू लागली. कागद, छपाई, वितरण, पोस्टेज सर्वच खर्च वाढत होते. त्या मानाने पुस्तकांच्या किंमती वाढवून चालणार नव्हते. त्यामुळे नवी पुस्तके काढण्याच्या कार्यक्रमाला बरीच कात्री लावण्यात आली. अनेक कर्मचाऱ्यांनाही कमी करण्यात आले.

## पीटर मेयरचे नवजीवन

१९७८ मध्ये पेंग्विनच्या संचालकांनी पीटर मेयर याच्या हाती पेंग्विनची धुरा सोपवली. अमेरिकेच्या पेपरबॅक प्रकाशनात नवचैतन्य आणणारा जादूगार असा लौकिक त्याने कमावलेला होता. त्याने आल्या आल्या पेंग्विनच्या ५००० पुस्तकांपैकी कमी खपणाऱ्या ८०० पुस्तकांची एक ' काळी यादी ' तयार केली. पेंग्विनची मुखपृष्ठे अगदी साधी असत. फक्त पुस्तकाचे नाव, लेखकाचे नाव व पेंग्विनचे बोधचिन्ह एवढेच त्यावर असे. मेयरने मात्र आकर्षक चित्रे, रंगीत डिझाईन्स देण्यास आरंभ केला. त्यामुळे पुस्तकांच्या किंमती थोड्याफार वाढत गेल्या. पेंग्विनचे निष्ठावंत वाचक तक्रार करू लागले, परंतु पूर्वी पेंग्विनला हातही न लावणारे नवे वाचकही मिळू लागले. ' पेंग्विन 'ने स्वतःच्या प्रतिमेची जी चौकट तीस-पस्तीस वर्षे जपलेली होती, त्या कालविसंगत ठरलेल्या चौकटीतून बाहेर पडण्यासाठी मेयरला बरीच मेहनत घ्यावी लागली.

## ॲनिमल फार्म–खपाचा उच्चांक

पेंग्विनची या पुढची वाटचाल जेट युगाला साजेशी गती घ्यायला लागली. १९८२ मध्ये मेयरने ' एफ-प्लेन डाएट ' नावाचे पुस्तक प्रसिद्ध केले. त्याच्या दोन-अडीच वर्षांत ४० लाख प्रती खपल्या. हे पुस्तक खरे म्हणजे पेंग्विनच्या अभिजात क्लासिक्सच्या साच्यात बसेल असे नव्हते. परंतु मेयरने त्याबद्दल काथ्याकूट न करता, उपयुक्ततेच्या कसोटीवर ते पुस्तक निवडले आणि प्रसिद्ध केले. त्याचा आडाखा किती अचूक होता हे त्या पुस्तकाने केलेल्या खपाच्या विक्रमानेच सिद्ध केले आणि मेयरच्या विरोधकांची वाचाच बंद झाली.

पेंग्विनची सर्वांत जास्त खपलेली पुस्तके कुठली हा प्रश्नही अनेकांना कुतूहलाचा वाटत असणार. जॉर्ज ऑरवेलची ' ॲनिमल फार्म ' ही दृष्टान्त कथा–पहिल्या क्रमांकावर आहे. आजवर तिच्या सत्तर लाख प्रती खपलेल्या आहेत. ' वॉटरशिप डाऊन ' हे आपल्याकडे विशेष माहीत नसलेले पुस्तक दुसऱ्या क्रमांकावर आहे. त्याच्या ५० लाख प्रती खपलेल्या आहेत.

## अमेरिकेतही पाय पसरले

इंग्लंडमधील पेंग्विनला अमेरिकेत पूर्वी फारसा ग्राहक वर्ग मिळत नसे. परंतु

अमेरिकेतील अनुभवांचा खजिना जवळ घेऊन आलेल्या मेयरने पेंग्विनच्या पुस्तकांना अमेरिकेत बाजारपेठ मिळावी यासाठी अनेक भव्य योजना आखल्या आहेत. हार्वर्ड युनिव्हर्सिटीच्या परिसरात फक्त पेंग्विनचीच पुस्तके विकणारे एक केंद्र त्याने सुरू केले आहे. बर्कले विद्यापीठातही असेच केंद्र सुरू होत आहे. अमेरिकन जनतेला आपलेसे वाटावे म्हणून पेंग्विनच्या ऐवजी मॅकपेंग्विन असे नामकरण करण्याचेही त्याच्या डोक्यात आहे. 'वाल्डेनबुक्स'ची अमेरिकेत ९२० ग्रंथ-विक्री-केंद्रं आहेत. त्याद्वारे आपली पुस्तके विकण्याचीही सोय मेयरने केली आहे.

१९८५ मध्ये पेंग्विनने ५० वर्षे पूर्ण केली. त्या वर्षी सुमारे १० कोटी डॉलर्सची विक्री करून पेंग्विनने १ कोटी ३० लक्ष डॉलर्सचा विक्रमी नफा मिळवला. 'इतर कोणाही प्रकाशनसंस्थेपेक्षा अधिक पुस्तके आणि चांगली दर्जेदार पुस्तके आम्ही प्रकाशित करतो.' असे मेयर आत्मविश्वासाने प्रतिपादन करतो.

### भारतीय शाखेचा शुभारंभ

भारतात आपली शाखा उघडून भारतीय लेखकांची पुस्तके मोठ्या प्रमाणावर प्रसिद्ध करण्याची कल्पनाही आता मेयरने मूर्त स्वरूपात आणली आहे. भारतातील आत्मसंतुष्ट आणि अल्पसंतुष्ट अशा प्रकाशनव्यवसायाला पेंग्विनच्या प्रवेशाने आलेली ही चैतन्याची लाट एकदम खडबडून जाग आणील तर मोठी मजा येईल. पेंग्विनची झेप साऱ्या जगाला आपल्या कवेत घेत आहे.

दा. क्र. ३८६८
२६६३
२८।७।९२

## पुस्तकांचं जग
शंकर सारडा

पुस्तकांशी कधीतरी आपली मैत्री जुळते.
आणि मग पुस्तकं जन्मभर आपली साथसंगत करीत राहतात.
पुस्तकांचं जग किती विशाल... किती अथांग...
जगातल्या कानाकोपऱ्यातल्या माणसांशी आपलं नातं जोडणारं.
आणि भूत-वर्तमान-भविष्यकाळांचा वेध घेणारं.
'हे विश्वचि माझं घर' याचा साक्षात्कार घडवणारं.
...
शंकर सारडा हे या पुस्तकांच्या जगात बालवयापासूनच रमलेले.
जगभर गाजलेल्या नव्या-जुन्या लेखकांचे साहित्य
आवर्जून वाचत आलेले.
अनेक देशांत फिरून, अनेक साहित्यिकांना भेटून आलेले.
विश्वसाहित्यातील सुंदर सुंदर कलाकृतींचा चिरंतन मनाने आस्वाद घेत राहिलेले.
...
रशिया, इंग्लंड, पूर्व युरोपातील देश, जपान, लॅटिन अमेरिका,
इजिप्त...इ. देशांतील वाङ्मयीन परंपरांचा आणि विद्यमान घडामोडींचा
तसेच
पुस्तकांच्या जगाला स्पर्श करीत नव्या तंत्रज्ञानाने
वेगवेगळी परिमाणे देणाऱ्या विविध आविष्कारांचा
आस्वादक भूमिकेतून रंजकपणे परिचय करून देणारे
या ग्रंथातील वैशिष्ट्यपूर्ण लेख
रसिक वाचकांना विश्वसाहित्याचा फेरफटका घडवून आणतील.

**पुष्प प्रकाशन**
सी-२, ए. टी. एस्. एस्., पोस्ट ऑफीस समोर,
चिंचवड, पुणे ४११ ०१९